# अर्थसंवाद

अ

खंड 20, अंक 2

जुलै-सप्टेंबर 1996

भारतीय सौर आषाढ-भाद्रपद 1918

- न्या. म. गो. रानडे यांची व्यापारविषयक व्याख्याने
- विद्यापीठांतील अर्थ-शास्त्राचे अध्यापन - संशोधन
- खतासाठीच्या अर्थ-साहाय्याचे अर्थशास्त्र
- सार्वजनिक वितरण व्यवस्था व दारिद्र्य-निर्मूलन

मराठी अर्थशास्त्र परिषद

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिद्धये ।
शोधचर्चाविवादार्थं संवादोऽयं प्रवर्तितः ।।

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

# अर्थसंवाद

खंड 20, अंक 2 | जुलै–सप्टेंबर 1996

● प्रमुख संपादक
रवीन्द्र दोशी

● सहायक संपादक
सु. गो. भानुशाली

● सल्लागार मंडळ
(1994–97)
पुरुषोत्तम पाळंदे
भालचंद्र मुणगेकर
अंजली कुलकर्णी
श्रीराम पेडगांवकर

● संपादकीय पत्रव्यवहार
रवीन्द्र दोशी,
प्राध्यापक व विभाग प्रमुख,
अर्थशास्त्र विभाग,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर–416 004
दूरध्वनी (निवास)
[ 0231 – 656963 ]

## अनुक्रमणिका

105 न्या. म. गो. रानडे यांची 1872–73 ची व्यापारविषयक व्याख्याने
नी. वि. सोवनी

120 भारतीय विद्यापीठांतील अर्थशास्त्राचे अध्यापन आणि संशोधन
रवीन्द्र दोशी

149 खतासाठीच्या अर्थसाहाय्याचे अर्थशास्त्र
वसंत जुगळे

176 आर्थिक वार्ता
सु. गो. भानुशाली

182 संवाद
जयंत राईलकर / मो. स. भावे

191 सांख्यिकी पुरवणी (25)
भारतातील सहकारी संस्था
रवीन्द्र दोशी

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## कार्यकारी मंडळ
**( 1996-97 )**

**अध्यक्ष**
भ. मा. बापट

**कार्याध्यक्ष**
व्यं. सु. पाटणकर

**कार्यवाह–खजिनदार**
आ. गो. पुजारी

**प्रमुख संपादक, 'अर्थसंवाद'**
रवीन्द्र दोशी

**सदस्य**
उत्तम वाकोडकर
अर्जुन पाटील
विजय साठे
शिवाजी पाटील
रमेशचंद्र बेराड
दिलीप पाटील
बाळकृष्ण कुलकर्णी
नंदकिशोर सुदा
कृष्णराव भोसले
मृणालिनी फडणवीस
शर्मिष्ठा सातव–मतकर
श्रीकांत जोशी

■ **कार्यालयीन पत्रव्यवहार :**
(वर्गणी व जाहिरात पाठविणे, सदस्यत्वाची नोंदणी करणे इत्यादी)
**डॉ. आ. गो. पुजारी,**
कार्यवाह, मराठी अर्थशास्त्र परिषद,
किल्ला भाग, **मंगळवेढा** 413 305 (जिल्हा सोलापूर)
(दूरध्वनी : 02188–20556)

■ **परिषदेचे प्रमुख कार्यालय :**
मराठी अर्थशास्त्र परिषद,
द्वारा / सेंटर फॉर द स्टडी ऑफ सोशल चेंज,
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, ग्रंथसंग्रहालय मार्ग,
दादर, मुंबई 400 014.

■ **वर्गणी :**
(अ) **परिषदेचे सदस्य**
( 1 ) आजीव सदस्य : रु. 600 ( एकरकमी )
( 2 ) साधारण सदस्य : रु. 100 ( वार्षिक )
( 3 ) संस्था सदस्य :
शैक्षणिक संस्था : रु. 100 ( वार्षिक )
व्यावसायिक संस्था : रु. 150 ( वार्षिक )
[ * परिषदेच्या सदस्यांना 'अर्थसंवाद' त्यांच्या वर्गणीतच दिला जातो. ]

(आ) **'अर्थसंवाद' वर्गणीदार**
ग्रंथालये : रु. 100 (वार्षिक)

(इ) **वर्षगणना** 1 एप्रिल ते 31 मार्च.
** वर्गणी डिमांड ड्राफ्ट / मनी ऑर्डरने 'मराठी अर्थशास्त्र परिषद' या नावाने कार्यवाहांकडे मंगळवेढ्याला पाठवावी.


■ **'अर्थसंवाद' साठीच्या अनुदानाबद्दल आभार :**
( 1 ) पश्चिम विभागीय केंद्र, भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद, मुंबई.
( 2 ) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.
**(टीप : म. रा. सा. सं. मंडळाने अनुदान दिले असले तरी या नियतकालिकामधील लेखकांच्या विचारांशी मंडळ आणि राज्य शासन सहमत असतीलच असे नाही.)**

# न्यायमूर्ती म. गो. रानडे यांची 1872-73 ची व्यापारविषयक व्याख्याने - प्रतिपादन, परीक्षण, प्रवाद व विपर्यास

नी. बि. सोवनी *

## 1

1872–73 मध्ये न्यायमूर्ती म. गो. रानडे यानी पुणे येथे हिंदुस्थानच्या त्यावेळच्या विदेशी व्यापाराबद्दल आणि देशाच्या एकूण आर्थिक स्थितीबाबत दोन व्याख्याने मराठीत दिली. ती व्याख्याने त्यावेळी पुण्यात प्रसिद्ध होणाऱ्या 'लोककल्याणेच्छू' नावाच्या वर्तमान-पत्रात छापली होती. ती वेगवेगळ्या पत्रातून थोडीथोडी असल्यामुळे वाचणाऱ्यास एकदम सर्व व्याख्याने पाहाण्यास आणि पूर्वापार संबंध जुळविण्यास अडचण पडते. ती पडू नये आणि "हा अत्यंत उपयुक्त विषय निरंतर साद्यन्त सर्वांच्या डोळ्यासमोर राहावा या हेतूने ती सर्व व्याख्याने पुन्हा रा. ब. माधवराव गोविंद रानडे याजकडून तपासून घेऊन त्यांचे हे लहानसे पुस्तक करून सर्व स्वदेशाभिमानी लोकास नजर केले आहे," असे निवेदन विनायक बाळकृष्ण दामले, म्यॅनेजर, 'लोक-हितेच्छू', यानी पुस्तकाच्या प्रस्तावनेत केले आहे. पुस्तकाची एकूण 63 पाने असून त्याची किमत 4 आणे आहे. ते ऑगस्ट 1873 साली प्रसिद्ध झाल्याची नोंद आहे.

कालौघात हे पुस्तक दुर्मिळ झाले आणि पुढच्या पिढ्यांच्या विस्मृतिपटलात गेले असे दिसते. रानडे यांचे अधिकृत चरित्र न. र. फाटक यानी 1924 मध्ये लिहून प्रसिद्ध केले. त्याना या पुस्तकाची व व्याख्यानांची माहिती होती आणि त्यानी लिहिलेल्या चरित्रात या पुस्तकातील दोन दीर्घ उतारे दिले आहेत. तथापि त्या व्याख्यानांबद्दल आणि त्यातील आशयाबद्दल फाटक यानी काही प्रमाद केले आहेत ते आपण पुढे पाहूच. या चरित्रामुळेही या व्याख्यानांच्या पुस्तकाबद्दल फारशी माहिती त्या कालात प्रसृत झाली असे दिसत नाही. रानडे यांच्या विचारांच्या बऱ्याच अभ्यासकाना या व्याख्यानांच्या पुस्तकाचे अस्तित्व अज्ञात होते. 1942 मध्ये रानडे यांचा शतसांवत्सरिक उत्सव साजरा करण्यात आला आणि त्याप्रसंगी द. गो. कर्वे यानी 'Ranade – The Prophet of Modern India'

* भूतपूर्व अध्यक्ष व कार्याध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद, पुणे.

हे 100–200 पानांचे पुस्तक प्रसिद्ध केले. त्यानाही या व्याख्यानांची माहिती नव्हती. कारण 1963 साली जेव्हा या व्याख्यानांचे मूळचे पुस्तक मला वाडिया महाविद्यालयाचे नूलकर यानी दाखविले आणि दिले त्यावेळी मी कव्वींना ते दाखविले आणि त्यानी वाचून ते यापूर्वी त्याना माहीत नव्हते असे मला सांगितले. नूलकरांनी हे पुस्तक मला दिल्यावर त्याचे पुनर्मुद्रण करण्याचे मी ठरविले आणि धनंजयराव गाडगीळ यांची समती घेऊन गोखले अर्थशास्त्र संस्थेतर्फे ते 1963 साली प्रसिद्ध केले. त्याला एक प्रस्तावना आणि काही टीपा मी जोडल्या. त्याची किंमत रु. 2·50 होती. त्याच्या प्रती अजूनही संस्थेकडे विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

वास्तविक हे सर्व झाल्यावर त्या व्याख्यानांकडे आता तीसहून अधिक वर्षांनी वळण्याचे आणि त्याचे अंशतः तरी पुनरुज्जीवन या लेखामार्फत करण्याचे काय प्रयोजन आहे अशी शंका वाचकांना साहजिकच येणे क्रमप्राप्त आहे. ते प्रयोजन थोडक्यात असे. या पुस्तकाच्या प्रती अजूनही उपलब्ध असल्या तरी ते विकत घेऊन वाचणारे फार थोडे निघतील. त्याहूनही महत्त्वाचे असे की, हे पुस्तक पुन्हा प्रसिद्ध झाले त्यावेळी त्याला लिहिलेल्या प्रस्तावनेत त्याचे परीक्षण मी केले होते. परंतु त्यानंतरच्या काळात रानडे यांच्यावर इंग्रजीत व मराठीत लिहिणाऱ्यांनी या व्याख्यानांच्या आवृत्त्यासंबंधी अज्ञानामुळे आणि तत्त्वग्रस्ततेमुळे बऱ्याच गैरसमजुती करून घेतल्या आहेत. त्यामुळे रानडे यांच्या प्रतिमेवर बरेच शितोडे उडालेले आहेत. त्याचप्रमाणे विरुद्ध टोकाला जाऊन या व्याख्यानांच्या भोवती एक कल्पनारम्य कादंबरी रानडे यांच्या चहात्यांनी रचिली आहे. त्याचेही निराकरण करणे आणि रानडे यांची प्रतिमा पुन्हा उजाळून स्वच्छ करणे हा या लेखाचा उद्देश आहे. याचदृष्टीने मी रानडे यांच्या या व्याख्यानांचे इंग्रजी भाषांतर करून आणि त्यास नवीन प्रस्तावना लिहून 'Journal of the Indian School of Political Economy', जानेवारी–मार्च, 1995 या अंकात प्रसिद्ध केले आहे. मराठी वाचकांसाठी हा प्रयत्न आहे. या लेखात प्रथम या व्याख्यानांची पार्श्वभूमी वर्णिली आहे. नंतर त्यातील प्रमुख प्रतिपादन कलमे दिली आहेत. त्यांचे परीक्षण पुढील भागात आहे. त्यासंबंधीचे प्रवाद शेवटच्या भागात दिले आहेत.

## 2

या व्याख्यानांतील विषय नीट लक्षात येण्यासाठी त्यांची पार्श्वभूमी सांगणे आवश्यक आहे. ईस्ट इंडिया कंपनी ( कुंपिणी सरकार ) 1858 मध्ये गुंडाळण्यात आली आणि ब्रिटिश सरकारने हिंदुस्थानचा सर्व कारभार आपल्या हाती घेतला. त्यासाठी भारतमंत्री नेमण्यात येऊ लागला. कंपनीचे भांडवल 120 लक्ष पौंड होते ते हिंदुस्थानचे कर्ज म्हणून ठरविण्यात आले आणि त्यावर दरवर्षी व्याज देण्याची आणि त्याची फेड करण्याची जबाबदारी हिंदुस्थान सरकारवर सोपविण्यात आली. 1857 चा दंगा मिटविण्यासाठी 4 कोटी पौंड खर्च आला तो या कर्जास जोडण्यात आला. त्यात आगगाड्यांसाठी काढलेल्या कर्जाची भर पडली. हिंदुस्थानात नोकरी करून निवृत्त होणाऱ्या इंग्रजी सनदी व इतर नोकरांना द्यावयाच्या निवृत्ती वेतनाची त्यात भर पडू लागली. अशा प्रकारे हिंदुस्थान सरकारला दरवर्षी विलायतेस पाठवावी लागणारी रक्कम वाढत राहिली. परंतु हिंदुस्थानच्या कारभारावर पूर्वीप्रमाणे पार्लमेंटचे लक्ष या नवीन व्यवस्थेत मुळीच राहिले नाही. त्यामुळे भारतमंत्री करील ते प्रमाण असे होऊन पार्लमेंटपुढे हिंदुस्थानातील निरनिराळ्या गाऱ्हाण्यांना वाट फुटण्याचा मार्ग बंद झाला. हा खुला करण्यासाठी एक कायमची देखरेख समिती पार्लमेंटने नेमावी अशी मागणी हिंदुस्थानतर्फे होऊ लागली. ही मागणी नेटाने पुढे ढकलण्यात दादाभाई नौरोजी आणि त्यांची ईस्ट इंडिया असोसिएशन ( लंडन ) ही प्रमुख होती. ही मागणी उदारमतवादी पक्षाचे त्यावेळचे अध्वर्यू ग्लॅडस्टन याना मान्य होऊन ते पंतप्रधान झाल्यावर त्यांनी 1871 मध्ये अशा तऱ्हेची चौकशी करण्यासाठी फॉसेट यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. ती तीनचार वर्षे चालली आणि पुढे मंत्रिमंडळ बदलल्यामुळे ती रद्द झाली. तथापि या समितीपुढे पुष्कळांच्या साक्षी झाल्या आणि पुष्कळ माहिती उपलब्ध झाली. या समितीपुढे दादाभाईंची साक्ष झाली. तशीच साक्ष देण्यासाठी रानडे विलायतेस जाण्याचे घाटत होते. दादाभाईंची तशी इच्छा व खटपट होती परंतु त्यांचे जाणे झाले नाही, कारण सरकारने त्याना तशी परवानगी देण्याचे नाकारले. याचा खुलासा पदटीपेत केला आहे.[1] या समितीपुढे आलेल्या माहितीवर आधारलेला 'Revenue Manual of the Indian Empire' हा ग्रंथ न्याय–

मूर्तींनी 1878 मध्ये प्रसिद्ध केला. या तपशिलावरून ध्यानात येईल की, या व्याख्यानांच्या वेळी फॉसेट समितीपुढील संभाव्य साक्षीत काय सांगावयाचे याचा न्यायमूर्तींचा अभ्यास चालू असावा. या व्याख्यानांतील रानडे यांचे विचार दादाभाईंच्या विचारांशी पुष्कळच जुळते आहेत. ते तसे पुढे राहिले नाहीत याची चर्चा पुढे येईलच.

## 3

या व्याख्यानांचा सर्वसाधारण आशय आणि त्यातील विविध प्रतिपादने यांकडे आता वळू. या दोन व्याख्यानांपैकी पहिले 8 डिसेंबर 1872 रोजी फडतरे-वाडा (सदाशिव पेठ) येथे झाले. दुसरे त्यानंतर जवळ-जवळ अडीच महिन्यांनी 22 फेब्रुवारी 1873 रोजी विश्रामबाग वाड्यात (सदाशिव पेठ) झाले. ही सभा-स्थाने एकमेकांपासून 500 फुटांच्या अंतरावर आहेत. ही व्याख्याने पुणे व्यापारोत्तेजक मंडळीपुढे आणि त्यांच्या वतीने देण्यात आली. त्या संस्थेत गणेश वासुदेव जोशी ऊर्फ सार्वजनिक काका हे पदाधिकारी होते. ते त्या दोन्ही सभांना हजर होते. या व्याख्यानांच्या मध्ये जरी अडीच महिन्यांचा काल गेला असला तरी विवे-चनाचे सूत्र पहिल्या व्याख्यानातून दुसऱ्या व्याख्यानात सलगपणे नेलेले आहे. त्यावरून या दोन व्याख्यानांत सांगावयाचा विषय एकसंध असा योजून वेळेच्या सोई-प्रमाणे या दोन निरनिराळ्या व्याख्यानांतून मांडलेला दिसतो.

पहिल्या व्याख्यानाचा विषय 'राजकीय संबंधाने संपत्तीची स्थिती व व्यापाराच्या संबंधाने या देशातील संपत्तीची स्थिती' असा होता. त्याने मूळ पुस्तकाची[2] 1 ते 18 पाने व्यापली आहेत. दुसऱ्या व्याख्यानाचा विषय 'हिंदुस्थानच्या व्यापाराची स्थिती' हा होता. त्या व्याख्यानाने पुस्तकाची 19 ते 63 पाने व्यापली आहेत. म्हणजे पहिल्या व्याख्यानापेक्षा ते दुपटीहून अधिक मजकुराचे होते. याशिवाय दुसऱ्या व्याख्यानात 9 कोष्टके होती.

हिंदुस्थानातील द्रव्यसंपत्ती लोक ज्या मानाने उद्योग करतात त्या मानाने का वाढत नाही? या प्रश्नाचा विचार या व्याख्यानांतून मुख्यतः केला आहे. त्याची दोन कारणे सांगितली आहेत. (1) आपला देश विदेशी सत्तेखाली आहे. (2) येथे कला कौशल्य अगर उद्योगधंदे पाहिजेत तितके वाढविण्याजोगे आपणापाशी साधन नाही. हे साधन म्हणजे आपल्या उत्पन्नातील बचतीतून करावयाची भांडवलाची गुंतवणूक होय. ही बचत पाहिजे तितकी न होण्याची कारणे: (अ) आपल्या बचतीतून दरवर्षी इंग्लंडला खंडणी द्यावी लागते; (आ) आपल्या बचतीचा लक्षणीय भाग आपण सोन्याचांदीच्या दागिन्यात गुंतवून फुकट घालवितो. त्यामुळे आपला विदेशी व्यापार जरी अलीकडे पुष्कळ मोठ्या प्रमाणावर वाढला असला तरी तो तितकासा फायद्याचा होत नाही. यात सुधारणा व्हावयाची असेल तर आपल्या बचतीचा जेवढा अनुत्पादक उपयोग होतो तेवढी आणखी बचत करून भरून काढली पाहिजे आणि ती व्यापारविषयक उद्योगात गुंतविली पाहिजे. विदेशी मालावर इतर देशांप्रमाणे संरक्षण जकाती बसविण्या-चाही विचार झाला पाहिजे. असे सर्वसाधारण विचार न्यायमूर्तींनी येथे मांडले आहेत. त्यातील प्रतिपादन तपशिलवार पाहू.

### (१) इंग्लंडला द्यावी लागणारी खंडणी व तिचा अंदाज

"दरसालच्या आजमास असा आहे की, पन्नास कोटी वसुलापैकी आजमासे साडेदहा कोटी रुपयांची वरात हिंदुस्थानचे सरकारास बिलायतेस हिंदुस्थानचे संबंधाने जे राज्यप्रकरणी खर्चास देणे भाग पडते त्याचे तजविजीकरता धाडून द्यावी लागते. त्याचा पोट तप-शील येणे प्रमाणे :"

"$1\frac{1}{2}$ कोट रुपये हिंदुस्थानच्या सरकारी कामाकरता बिलायतेस माल खरेदी होऊन येतो त्याचा आजमास.

$\frac{1}{2}$ कोट जे रुपये नोकर बिलायतेत आहेत, त्यांचा पगार व एस्टाब्लिशमेंटचा खर्च.

$2\frac{1}{2}$ कोट लष्करात उमेदवार लोक नवीन ठेवतात त्यांचा खर्च व आरमारासंबंधी खर्च.

$4\frac{1}{2}$ कोट हिंदुस्थानचे राज्य ब्रिटिश लोकांनी प्रथम काबीज केले व त्याचे वेळोवेळी संरक्षण केले. त्या-

संबंधाने सरकारास जे कर्ज झाले त्याचा आजमास सुमारे 100 कोट रुपये आहे. त्यापैकी पावपासून दहा कोटी कर्ज नेटिव लोकांनी सरकारास दिले आहे. त्याचे व्याज आपल्या लोकास मिळते. ते खेरीज करून बाकी 90 कोटीचे व्याज विलायतेचे लोकास आपण भरतो त्याचा आजमास.

$1\frac{1}{2}$ कोट सदरहू रकमेशिवाय विलायतच्या लोकांनी या देशात रेल्वे बांधून गाड्या चालू केल्या. त्या रेल्वेच्या कामात सुमारे 90 कोट रुपये खर्च केले. त्याबद्दल दर–शेकडा पांच रुपये प्रमाणे व्याज देण्याची जामिनकी सरकारांनी घेतली आहे. त्या रकमेचे व्याज $4\frac{1}{2}$ कोटी रुपये होते. पैकी रेल्वेचा खर्च भागुन उत्पन्न राहते ते वजा करून निव्वळ सरकारास नुकसान भरून द्यावे लागते त्याचा आकार अलीकडे काही वर्षे सुमारे $1\frac{1}{2}$ कोट रुपये होता."

---

**$10\frac{1}{2}$ कोटी**

---

"$5\frac{1}{2}$ कोटी सदरहूशिवाय या देशात लष्कराचे अंमल–दार युरोपियन लोक सुमारे 7,000 आहेत व लष्क–राचे युरोपियन शिपाई सुमारे 60,000 आहेत. तसेच सिविल अंमलदार लहानमोठे युरोपियन सुमारे 5,000 आहेत. बाकी व्यापारी, उदमी, वगैरे लोक मिळून युरोपियन दीड लाख लोकांचा आजमास आहे. त्या सर्व लोकास पगार व प्राप्त्या मोठ्या असोन त्यांचा संचय होतो तो विलायतेस जातो. त्याचा आपले लोकांचे निर्वाहाचे कामी काही उपयोग होत नाही. त्या रक–मेचा आकार करवत नाही, परंतु साधारण आजमास पुष्कळ विचाराने साडेपांच कोटी रुपये धरला असता ज्यास्ती धरल्याचा दोष येणार नाही."

"एकंदर 16 कोटी रुपये. यावरून असे दिसेल की परदेशस्थ लोकांचे राज्य हिंदुस्थानात असल्याकारणाने दरसाल 16 कोट रुपये विलायतेस खंडणी धाडावी लागते" (पृ. 35)[3].

(2) वर दिल्याप्रमाणे दरवर्षी खंडणी द्यावी लागत असल्यामुळे या देशात दारिद्र्य येते. याचे कारण असे की, आपले देशातील लोकांनी केलेल्या प्रतिवार्षिक निव्वळ संचयातील (बचतीतील) चवथा हिस्सा विला–यतेस जातो. हिंदुस्थानातील प्राप्ती कराच्या आकड्या–वरून रानडे प्रतिवार्षिक संचयाचा अंदाज 60–65 कोट रुपये असा करतात आणि त्यावरून वरील प्रमाण काढतात. प्रतिवर्षीच्या संचयाचा उपयोग उद्योगधंद्यांच्या वाढीसाठी करावयाचा असतो. विलायतेस जाणाऱ्या "आपल्या संचयाचा विनियोग याच देशातील लोकास रोजगार मिळण्याचे कामी झाला तर किती लोकांचे पोषण होईल याची कल्पना सर्व लोकांनी करावी" (पृ. 10).

याखेरीज या संचयातून दुसरी खंडणी आपण स्वखुषीने समुद्रास देतो; म्हणजे पाण्यात नेऊन बुडवितो. "आधीच आपला संचय थोडा, त्यात विलायतेकडे 16 कोट रुपये खंडणी धाडावी लागते. शिवाय आपल्या लोकांच्या मूर्ख समजुतीमुळे व एकमेकांवरील अविश्वा–सामुळे या अत्यल्प संचयापैकी सुमारे आठ कोटी रुपये दागिन्यांच्या रूपाने मातीत मिसळतात, म्हणजे लोक त्याचा व्यापारधंद्याचे कामी उपयोग न करता दागिने वगैरे करून आपला संचय सर्वथा व्यापाराचे कामी पडू नये अशी व्यवस्था करतात." (पृ. 14-15) या गोष्टीचा सर्वत्रांनी विचार करावा कारण ही गोष्ट सर्वत्रांच्या स्वाधीनची आहे" (पृ. 15).

(3) हिंदुस्थानच्या या खंडणीचे 1870 च्या युद्धानंतर जर्मनीने फ्रान्सवर जी युद्धखंडणी लादली तिच्याशी रानडे साम्य दाखवितात आणि ती खंडणी फ्रेंच लोकानी कशी हाल सोसून थोड्याच काळात भरून टाकली याकडे लक्ष वेधून त्याप्रमाणे आपण फ्रेंचांचे अनुकरण करून आपली खंडणी निरस्त करावी अशी रानडे शिफारस करतात.

"आपणास जी खंडणी द्यावी लागते ती खंडणी तूर्त कमी होण्याचे अगर चुकविण्याचे विचार फार दूर आहेत. तेव्हा ते ओझे आपल्या शिरावर नेहमी आहे असे धरून सर्व प्रयत्न झाले पाहिजेत. त्यास ज्याप्रमाणे फ्रान्स देशातील लोकांनी हिम्मत धरून आपल्यावर आलेला प्रसंग विनाकारण मिजाशीचे खर्च जेवढे कमी होतील तेवढे करून टाकला व सरकारी सारा दुप्पट तिप्पट वाढला तेवढा देण्याविषयी कंबर बांधली, त्याच हिम्मतीने आपणही आपले निष्कारणी खर्च कमी

करून संचय विशेष वाढवावा व तो संचय आपल्या लोकास जेणेकरून रोजगार धंदा लागेल अशा उद्योगात लावण्याची तजवीज करावी." म्हणजे, "खंडणी पंधरा कोटींची आपणास द्यावी लागते ती देऊन संचय पूर्वी-इतकाच झाला पाहिजे. अर्थात निष्कारणी खर्च कमी करून संचय वाढविला पाहिजे. अथवा अन्य रीतीने सर्वांनी मितव्यय केला पाहिजे, म्हणजे आपोआप संचय वाढेल व त्याचे पायी सर्व काही होईल" (पृ. 17).

(4) "परस्थ लोकांच्या अंमलाने ज्याप्रमाणे ही जबर खंडणी आपणास देणे भाग पडते, त्याचप्रमाणे त्या लोकांचे साहचाने आपण इतर मुलखांपासून सात-आठ कोट रुपयांची खंडणी घेतो, हा प्रकार विसरता कामा नये...जी कोटचवधी रुपयांची अफू चीनचे बंदरात आपण पाठवितो त्यावर फार जबर जकात सरकारची आहे. त्या जकातीचे रूपाने आपणास चीनचे लोक खंडणी देतात असे म्हटले असता चालेल. पूर्वी किंवा पेशवाईत हे उत्पन्न बिलकुल नसे...दरसाल अफूचे उत्पन्न खर्चवेच वजा जाऊन सात कोट सुमारे आपणास होते. हा नफा हल्लींच्या प्रभूचे सत्तेने आप-णास होत आहे" (पृ. 19).

(5) "ज्या परस्थ लोकांचा अंमल आपणावर आहे त्या लोकांनी पूर्वी या देशात जिन्नस पिकत नव्हते ते पिकविण्याचा उद्योग कोटचवधी रुपये खर्च करून बहुत वर्षे सुरू केला आहे." चहा, कॉफी, नीळ ही ती पिके आहेत. "हे तीन जिन्नस मुख्य धरिले तरी चारपासून पाच कोट रुपये दरसाल साहेबलोकांचे या देशात या कामी गुंतले जातात. इतका नवीन रोजगार आपल्या लोकास मिळतो असे म्हणावयास हरकत नाही" (पृ. 20).

पण "जे सुमारे शंभर कोटी रुपये या देशात आगगाडीचा रस्ता सुरू करण्याचे कामी साहेबलोकांचे खर्च झाले आहेत...त्यास असा प्रकार मात्र मनात आणता कामा नये. ज्या मंडळ्यांनी हे काम उचलेले आहे त्यांनी जर आपल्या जोखमीवर नफातोटचास जबाबदार होऊन या कामी आपले भांडवल घातले असते, तर त्यांनी जे भांडवल खर्च केले त्याचा आप-ल्याला उपयोग पूर्वी लिहिल्याप्रमाणे झाला असता. प्रस्तुत व्यवस्था तशी नाही... त्या उद्योगात नफा होवो न होवो शेकडा पाच रुपये व्याज पैसा भरल्यापासून त्यास मिळेल असा सरकारांनी त्यांजबरोबर करार केला आहे... एकदम प्रथम आगगाडीच्या रस्त्याचे काम सुरू झाले म्हणजे दोन दिवस रोजगारास तेजी येते, तेवढा नफा.... आगगाडी सुरू झाल्यापासून ते आज तागाईत उत्पन्न झालेले जमेस धरून शिवाय रेल्वे कंप-नीतील भागीदार लोकास हिंदुस्थान सरकारने सुमारे वीस कोटी रुपये व्याजापोटी भरले आहेत. ही व्यवस्था अशीच चालल्यास .. चाळीस वर्षांत या बुडीची रक्कम भांडवलाएवढी होणार आहे... अशा रीतीने चाललेल्या कारखान्याचा आपल्या देशातील रोजगारासंबंधाने कितपत उपयोग आहे हे सर्वांचे ध्यानी येईल" (पृ. 23).

(6) आपल्या देशाचा विदेशी व्यापार त्यासंबं-धीचे आकडे पाहिल्यास गेल्या वीस वर्षात पुष्कळच वाढला आहे. परंतु आकड्यांवरून जो बोध होतो तो खरा नाही. आपल्या देशातून बाहेरदेशी जो माल जातो त्यापैकी पुष्कळसा "सरकारच्या वसुलीची बेरीज दुप्पट वाढली त्याच्या नडीने बाहेरदेशी पाठविला जातो. तितक्या मानाने व्यापार वाढला असे होत नाही." दुसरे असे की, "देशाची खरोखर संपत्ती वाढून आपला व्यापार वाढला असता तर आपल्या देशातील बंदरांचा एकमेकाशी व्यापारही त्यामानाने वाढला असता. तो तसा वाढला नाही" (पृ. 37). हा एकमेकातील व्यापार बाहेरदेशांच्या व्यापाराच्या 25 टक्के आहे.

"हल्ली देशात जो माल बाहेरुन येतो त्याबद्दल थोडा विचार कर्तव्य आहे." त्यात सोनेरुप्याचा भाग लक्षणीय आहे. त्याचा उपयोग चलन व दागदागिन्यां-साठी होतो." आपल्या लोकांचे अंगी शहाणपण, समज व विश्वास नाही; त्यामुळे चलनाच्या कामी कोटचवधी रुपयांचे सोनेरुपे गुतून राहिले आहे तसेच दागिन्यांच्या वेडामुळेही सोनेरुप्याचा खप आपणात होतो" (पृ. 38).

"विलायतेखेरीज दुसऱ्या देशांशी आपला व्यापार चालतो त्यापासून आपला खरोखरी नफा आहे. म्हणजे सरळ व्यापारात बरोबरीच्या नात्याने सदर देशातील माल आपल्या देशातील मालाच्या मोबदल्यात येतो व बहुतकरून त्या मालाच्या संबंधाने देशात पूर्वी उत्पन्न

अगर तयार होणाऱ्या मालास विशेष प्रत्यवाय येत नाही, अशा तऱ्हेचा हा व्यापार आहे. विलायतेशी जो व्यापार घडतो त्याचे स्वरूप या दोन्ही संबंधाने वेगळे आहे. मूळ व्यापार बरोबरीच्या नात्याने होत नाही . . . शिवाय आपल्या देशात उत्पन्न अथवा तयार होत नाही अशा मालाच्या मोबदल्यात तिकडील माल येत नाही. बहुतककरून या देशात पूर्वी उत्पन्न व तयार होत असलेल्या मालाच्या ठिकाणी सदर माल येतो व जो माल असा येतो त्याचा बोजा आपणावर पडून किफायत त्या लोकांस होते. या तऱ्हेचा हा व्यापार आहे" (पृष्ठे 41–42).

(7) "त्यांच्या यंत्रसामर्थ्यापुढे आपल्या हस्तकौशल्याने झालेले कापड टिकाव धरील असे दिसत नाही . . . साधारणतः जेथे दोन पैशात काम होणार आहे तेथे चार पैसे द्यावे अशी बुद्धी कोणासही व्यवहारात होत नाही हे म्हणणे खरे आहे . . . विलायतेबरोबर अखेर धाव मारणे असेल तर यंत्रसामर्थ्यानेच मारली पाहिजे. तथापि काही काळपर्यंत ज्याप्रमाणे हल्ली आवड, विशेष गुणांच्या संबंधाने नाही, परंतु केवळ लौकिक अनुकरणाने विलायती मालावर जशी बसली आहे, तशी गावठी मालावर बसल्यास काही उद्योग करण्यास अवसर मिळेल" (पृ. 62). यासाठी संरक्षक जकाती बसविण्याचा विचार आवश्यक आहे. आपल्याकडचा यासंबंधीचा गेल्या काही वर्षातला इतिहास उद्बोधक आहे.

(8) "आता आपल्या लोकांचे भाग्य मोठे आहे की, परमेश्वरकृपेने ज्या भूमिमातेच्या ओटयात आपण पडलो आहे तिची समृद्धी व फलद्रूपता अशा मानाची आहे की सर्व पृथ्वीतील हवा, पाणी, जमीन आपल्या मुलखात आहे. सर्व देशातील झाडे, वनस्पती, औषधे, द्रव्ये, धान्ये आपल्या जमिनीत विपुल पिकतात, असे म्हटले तरी चालेल . . . येथील प्रजा दुर्बल, दुर्भिक्षाने पिडलेली, यंत्राची साधने वगैरे माहीत नाहीत, संपत्ती नाही, संचयाविषयी वासना नाही, अशा प्रजेच्या हातून पृथ्वीतील अन्य देशाबरोबर आपल्या देशाचा टिकाव कसा लागेल ही भीती मनात वाटते. त्या भीतीचे निराकरण परमेश्वराने आपल्या जनकभूमीचे अंगी जी विलक्षण कामधेनूसारखी सिद्धी दिली आहे त्या सिद्धीच्या योगाने होते . . . आपल्या देशाचे सामर्थ्य वर वर्णिले ते आपल्या देशासच भूषण होऊन राहिले आहे" (पृष्ठे 24–25).

## 4

## परीक्षण

रानडे यांच्या व्याख्यानातील प्रमुख विषय येथवर थोडक्यात सांगितले. त्यांचे आता परीक्षण करावयाचे आहे. 125 वर्षांपूर्वीची ही व्याख्याने त्या काळच्या बौद्धिक व वास्तवाच्या मर्यादातच आहेत हे प्रथम लक्षात घेतले पाहिजे. इतक्या वर्षांनंतर ती वाचताना त्यातील विश्लेषणाबद्दल शंका येणे अपरिहार्य आहे. 1963 मध्ये या व्याख्यानांच्या पुनर्मुद्रणाला लिहिलेल्या प्रस्तावनेत मी म्हटले होते, "त्या शंकांची चर्चा करताना आपल्या शहाणपणाचा टेंभा पाजळून रानडे यांच्या विवेचनातील दोष दाखविण्याचा हेतू नसून आज उपलब्ध असलेल्या माहितीवरून व आजच्या अर्थशास्त्र चिकित्सेच्या आधाराने त्यांनी विवेचिलेल्या विषयांचा कोणत्या दृष्टिकोनातून विचार करावा लागतो याचे दिग्दर्शन करण्याचा आहे. त्यामागील वृत्ती अगदी विनम्र आहे. अशा विवेचनामुळे रानडे यांचे मोठेपण कमी न होता तावून सुलाखून जास्तच खुलून दिसेल अशी त्यामागची भूमिका आहे" (पृ. आठ). माझी भूमिका येथेही तीच आहे.

मागील विभागात सांगितलेल्या आठ कलमांपैकी पहिली चार हिंदुस्थानाने इंग्लंडला द्याव्या लागणाऱ्या खंडणीबद्दल आहेत. एकप्रकारे या दोन्ही व्याख्यानांत हा मुख्य विषय आहे. या परीक्षणाची सुरुवात या विषयापासूनच करू. या व्याख्यानांतील या विषयाची मांडणी, त्यासंबंधीच्या विवेचनातील आवेश, त्यातील ढसठशीतपणा आणि त्यासंबंधीच्या तीव्र भावना आणि त्याबरोबर येणारा थोडासा एकांगीपणा हे न्यायमूर्तींच्या नंतरच्या (मुख्यतः इंग्रजी) पोक्त समतोल लिखाणाशी थोडेफार विसंगत आहे. रानडे यांची ऐन तारुण्यातील ही मते आहेत. ती पुढे पुष्कळच सौम्य व भारदस्त झाली. याच विषयावर 1890 मध्ये–सुमारे वीस वर्षांनंतर –जाहीर रीतीने त्यांनी ही खंडणीची चर्चा वायफळ असल्याचे घोषित केले. त्यामुळे अनेक गैरसमजांना व प्रवादांना जन्म दिला आहे हे आपण पुढे पाहूच. माझे

स्वतःचे असे मत झाले आहे की, या व्याख्यानांतील या विषयाची त्यांची सदोष मांडणी लक्षात घेतली तर अधिक विचाराअंती त्यांना खंडणीच्या सिद्धान्ताचे वैय्यर्थ लक्षात आले असले पाहिजे. ज्या उदारतत्त्ववादाचे ते पुरस्कर्ते होते आणि जो त्यांनी अंगीकृत केला होता त्याच्या त्यावेळच्या उज्ज्वल परंपरेप्रमाणे आपण पूर्वी मांडलेला चुकीचा सिद्धान्त जाहीरपणे परत घेणे हे नैसर्गिक होते. जॉन स्टुअर्ट मिल यांनी आपला वेतन–निधी सिद्धान्त जाहीरपणे मागे घेतल्याचे ताजे उदाहरण त्यांच्यासमोर होते. पण हा साधा व सरळ खुलासा कुणाला फारसा पटत नाही. अनेकांनी त्यात अनेक अर्थ काढून रानडे यांचे खंडन वा मंडन करण्याचा उपक्रम केलेला आहे. त्याची चर्चा पुढे येईलच. पण या विषयाचे महत्त्व जाणून त्याची बिनचुकीची व नीट समजूत प्रथम व्हावी या हेतूने पुढील विद्यानिष्ठ परीक्षण केले आहे.

हिंदुस्थानला इंग्लंडला द्यावी लागणारी खंडणी हा विषय नौरोजी व रानडे यांच्याहून जुना आहे. त्याचा प्रथम उल्लेख राजा राममोहन राय (1820) यांच्या लिखाणात आढळतो. विशेष ठळक अशी चर्चा कॅप्टन विनगेट (1835) यांनी केलेली आढळते. खंडणीविषयी ओरड प्रथम इंग्रज लेखकांनीच केलेली आहे. 1860 च्या सुमारास दादाभाईंनी या सिद्धान्तास बरेच ठसठशीत, राजकीय व संख्यात्मक असे स्वरूप दिले. त्यांच्या या विचारांचे मार्क्स यांच्या विचाराशी (हिंडेमान यांच्या मार्गे) साधर्म्य दाखविण्याचा काहींनी प्रयत्न केला आहे. पण ते पुढे पाहू. 1872 साली ही व्याख्याने देण्याच्यावेळी रानडे यांची मते पूर्णपणे नाही तरी बरीचशी दादाभाईंच्या मताशी जुळली होती. दादाभाईंची मते पुढच्या काळात फारशी बदलली नाहीत पण रानडे यांची बदलली हे स्पष्टच आहे.

ब्रिटिश राज्य हिंदुस्थानात स्थापल्याने इंग्लंडला अगणित फायदे मिळाले आणि मिळत राहिले. ते सर्व रुपये-आणे-पैत मोजता येण्याजोगे नव्हते आणि नाहीत. त्यामुळे रुपये–आणे–पैत त्या शोषणाचे मोजमाप करण्याचे प्रयत्न फारसे यशस्वी ठरण्याचा संभव नव्हता आणि नाही. असे प्रयत्न ढोबळ, अपुरे, अव्याप्त असेच होते. खंडणी व तिची मोजदाद हा त्यापैकी एक विशेष प्रसिद्धी पावलेला प्रयत्न. विशिष्टप्रकारे या खंडणीची केलेली मोजदाद बरोबर नाही. असे सिद्ध करणे म्हणजे इंग्लंडकडून हिंदुस्थानचे आर्थिक वगैरे शोषण होत नव्हते असे म्हणणे नव्हे. असे शोषण होतच होते; फक्त त्याचे स्वरूप 'खंडणी' (निष्कासन) या नावाखाली रुपये–आणे–पैत मूर्त केले जात होत होते ते दोषपूर्ण व अव्याप्त होते असे म्हणणे आहे. खंडणीसंबंधीचे अंदाज वा गणित त्या शोषणाच्या सर्व अंगांना स्पर्श करणारे नव्हते. ते एकूण शोषणाचे पूर्ण माप नाही आणि नव्हते. पुढचे गैरसमज टाळण्यासाठी हे सुरुवातीसच स्पष्ट केले आहे.

आता खंडणीच्या गणिताकडे लक्ष देऊ. त्यासंबंधीच्या निरनिराळ्या अंदाजात एक घोटाळा सतत आढळतो. तो म्हणजे दोन प्रकारच्या हिशोबांचा आणि ताळेबंदांचा एकमेकाशी केलेला गोंधळ. हे दोन हिशोब म्हणजे : (1) हिंदुस्थान सरकारचा फडणिशी ताळेबंद (अर्थसंकल्प, वगैरे); (2) सर्व देशाच्या विदेशी देण्याघेण्याचा ताळेबंद. या दोन हिशोबात काही कलमे तीच असली तरी हे हिशोब एकमेकापासून स्वतंत्र असतात आणि तसाच व्यवहार चालतो. त्यांच्यात गल्लत झाल्यास विवेचनात अनेक घोटाळे होतात. खंडणीवरील बहुतेक उपलब्ध लिखाणात तसे झालेले आहे.

रानडे यांनी पहिल्या व्याख्यानात या खंडणीची जी फोड प्रथम दिली आहे (मागच्या भागातील कलम 1) त्यातही हा घोटाळा आहे. रानडे यांच्या कोष्टकाकडे पाहिल्यास हे सहज लक्षात येईल की, त्यातली पहिली 5 कलमे (एकूण हिशोब $10\frac{1}{2}$ कोटी रुपये) ही सर्व हिंदुस्थान सरकारच्या अर्थसंकल्पात समाविष्ट असलेली आहेत. हे सर्व देणे हिंदुस्थान सरकारमार्फत व हस्ते दिले जात होते. पण सहाव्या कलमातील आकार ($5\frac{1}{2}$ कोटी रुपये) हा हिंदुस्थान सरकारमार्फत दिला जात नव्हता आणि त्याचा सरकारी फडणिशी ताळेबंदाशी संबंध नव्हता. तो एकूण देशाच्या देण्याघेण्याच्या ताळेबंदाचा भाग होता. पण रानडे यांनी तसा फरक न करता सर्व सहा कलमांची बेरीज करून खंडणी 16 कोटी रुपयांची ठरविली. एवढेच नव्हे तर हे देणे सरकारमार्फतच दिले जाते असे आपले मत दिले आहे. "हिंदुस्थानात जो इंग्रज सरकारचा मुलूख आहे त्यातील प्रजेपासून जे उत्पन्न होत आहे त्या उत्पन्नापैकी आजमास 2 हिस्से उत्पन्न येथे खर्च होते व एक हिस्सा म्हणजे 16 कोटी रुपये

विलायतेस जातात" (पृ. 5). त्यापूर्वी दिलेल्या आकड्यांप्रमाणे हिंदुस्थान सरकारचा महसूल प्रतिवर्षी 50 कोटी रुपये व 16 कोटी रुपये हा त्याचा तिसरा हिस्सा. वर म्हटल्याप्रमाणे ही गल्लत खंडणीवरील सर्व लिखाणात आढळते.

सरकारच्या एकूण महसुलाशी खंडणीचे प्रमाण सांगून रानडे थांबले नाहीत तर त्यानी त्याच खंडणीचे नाते हिंदुस्थानातील लोकांच्या एकूण प्रतिवर्षीच्या बचतीशीही (संचयाशी) जोडले आहे. त्याच व्याख्यानात (मागील भागातील कलम 2) देशातील प्रजेची दरसालची प्राप्ती काय आहे असा प्रश्न विचारून त्यावेळच्या प्राप्तीकराच्या वसुलीच्या आकडेवारीवरून हे उत्पन्न साधारण 200 कोटी रुपयांच्या आसपास असावे आणि त्यापैकी तिसरा हिस्सा लोक बचत करतात असे गृहीत धरून प्रतिवर्षीच्या प्रजेच्या बचतीचा (संचयाचा) अंदाज 60 ते 65 कोटी रुपये असा करतात. ते पुढे लिहितात "देशातील जो निव्वळ संचय आहे त्याचा चवथा हिस्सा दरसाल विलायतेस जातो . . . या चार आणे संचयाचा विनियोग याच देशातील लोकास रोजगार मिळण्याचे कामी झाला तर किती लोकांचे पोषण होईल याची सर्व लोकांनी कल्पना करावी" (पृ. 10).

हा सर्वच युक्तिवाद तर्कदुष्ट व एकमेकाला छेदणारा आहे. प्रथम, देशातील बचतीचा ज्याप्रकारे अंदाज केला आहे तो शंकास्पद व दोषपूर्ण आहे. पण सध्या ते सोडून देऊ आणि तो अंदाज बरोबर आहे असे धरून चालू. तसे केले तरी हा प्रजेचा खाजगी संचय किंवा त्याचा चार आणे भाग हा सरकारकडे कसा हस्तांतरित होतो (आणि मग त्यातून खंडणी जाते) हे गूढ राहतेच. प्रजेकडून सरकारकडे द्रव्य येण्याचा मार्ग म्हणजे कर व कर्ज. पैकी कर्ज त्यावेळी फार महत्वाचे नव्हते. हिंदुस्थानची प्रजा त्यावेळी आपले पैसे सरकारी कर्जरोख्यात गुंतवीत नसे हा इतिहास आहे. उरले कर. त्यासंबंधी न्यायमूर्तींनी स्वतःच लिहिले आहे. की, "आता सरकारी वसुलाची बेरीज चाळीस पंचेचाळीस कोटी आहे ती सर्व संचय करणारांपासूनच सरकार उत्पन्न करते असे नाही. त्यातील दोन हिस्से वसूल गरीब प्रजेपासूनच प्राप्त होतो" (पृ. 10). पण मग हा खाजगी संचय सरकारकडे कसा जातो (वा त्यांच्या हाती कसा येतो) याचा काहीच उलगडा होत नाही.

खरोखरीची वस्तुस्थिती अशी की प्रतिवर्षीची देशातील खाजगी बचत (संचय) आणि सरकार मार्फत दिली जाणारी खंडणी यांचा अर्थाअर्थी काहीही संबंध नाही आणि नव्हता. त्यामध्ये नाते सांधण्याचा हा प्रयत्न व्यर्थ तर आहेच पण घोटाळा उत्पन्न करणारा आहे.

परंतु विदेशी देण्याचा देशाच्या अंतर्गत बचतीशी संबंध नसला तरी बहिर्गत बचतीशी संबंध असतो. एखाद्या देशाचा आंतरराष्ट्रीय वस्तु व्यापारशेष जर धन असेल तर धन व्यापारशेष ही देशाची बहिर्गत बचत असे मानण्याचा अर्थशास्त्रात रिवाज आहे. या बहिर्गत बचतीपैकी आठवा हिस्सा आपण सोन्याच्या आयातीत फुकट घालवितो हे न्यायमूर्तींनी पुढील चर्चेत केलेले विधान शंभर टक्के बरोबर आहे. पण खंडपीठाने अंतर्गत बचतीशी जोडलेले नाते तितकेच चूक आहे.

रानडे यानी मांडलेल्या खंडणीच्या हिशेबाकडे लक्ष देऊ. खंडणी या संज्ञेची काटेकोर व्याख्या न्यायमूर्तींनी केलेली नाही. तरी तिचे दोन अर्थ त्याना अभिप्रेत होते असे त्यांच्या विवेचनावरून दिसते. (1) जी रक्कम प्रतिवर्षी इंग्लंडला द्यावी लागते परंतु ज्याबद्दल काहीही मोबदला हिंदुस्थानला मिळत नाही ती सर्वार्थाने खंडणी वा निव्वळ खंडणी (शोषण) होय. (2) जी रक्कम द्यावी लागते परंतु ज्याबद्दल वस्तू अगर सेवारूपाने पूर्ण वा अंशतः तरी मिळतो ती स्थूल खंडणी.

यादृष्टीने विचार केल्यास रानडे यांच्या कोष्टकातील जे सहावे कलम त्यानी जोडले आहे ते स्थूल खंडणीतही समाविष्ट करणे बरोबर नाही असे दिसेल. जे युरोपीय लोक हिंदुस्थानात राहून आपले उद्योगधंदे वा नोकरी करीत त्याना देशातील आर्थिक घडामोडीतील त्यांच्या योगदानासाठी उत्पन्न मिळत. ते योग्यच म्हटले पाहिजे. या त्यांच्या उत्पन्नाचा मोठा भाग या देशातच त्यांच्या जीवनमानासाठी खर्च होई आणि त्यातून देशातील लोकाना रोजगार मिळे. त्यांच्या बचतीचा काही भाग ते हिंदुस्थान सरकारच्या कर्जरोख्यात गुंतवीत हे कागदोपत्रीच सिद्ध आहे. उरलेली बचत ते विलायतेस पाठवीत. ही खंडणी आहे असे रानडे यांचे म्हणणे. ही बचत सरकारमार्फत जात नसे तर व्यापारी व हुंडणावळीच्या बाजारामार्फत विलायतेस जाई. हा

ओघ खंडणीवजा असे कसे म्हणता येईल? ह्याला खंडणी म्हणावयाचे तर त्याच न्यायाने जे हिंदी लोक लंका, मलेशिया, आफ्रिका वगैरे ठिकाणी यावेळी गेले होते आणि जात होते ते जे पैसे परत हिंदुस्थानात पाठवीत त्या पैशाना हिंदुस्थानने त्या परदेशांपासून वसूल केलेली खंडणीच होय असे म्हणण्यासारखे आहे. ते जितके चूक तितकेच पहिलेही चूक. तेव्हा सहावे कलम गैरलागू म्हणून खंडणीच्या हिशोबातून वगळावेच लागेल. मग खंडणी $10\frac{1}{2}$ कोटी रुपयेच राहते.

यासंबंधात बरवाच धागा पुढे ओढावयाचा तर रानडे यानी स्वतःच म्हटल्याप्रमाणे ज्याप्रमाणे इंग्रजी राज्यामुळे आपणास इंग्लंडला दरवर्षी खंडणी द्यावी लागते त्याच राज्यामुळे चीनचे लोक आपणास खंडणी देतात (मागच्या भागातील कलम 4). ही दरवर्षी साधारण 7 कोटी रुपयांची असते. मूळ $10\frac{1}{2}$ कोटी खंडणीतून ती वजा केल्यास निव्वळ खंडणी $3\frac{1}{2}$ कोटी रुपयेच उरते. पण असा हिशोब रानडे करीत नाहीत याचे आश्चर्य वाटते.

या खंडणीसंबंधी जी कलमवार फोड रानडे यानी दिली आहे तिच्या युक्ततेविषयी रानडे यानी 20 वर्षांनंतर स्वतःच जे म्हटले आहे ते दिले तरी काम होईल. 1890 मध्ये त्यानी जाहीर रीतीने सांगितले की, "काही लोकाना वाटते की, आपल्याला जी वीस कोटी रुपयांची खंडणी जादा निर्यातीच्या रूपाने जोपर्यंत द्यावी लागते तोपर्यंत आपण हतबल आहोत आणि आपल्याला काहीच करता येणार नाही. हा विचार योग्य अगर आपल्या पुरुषार्थास साजेसा आहे असे वाटत नाही. या खंडणीपैकी एक भाग आपल्याला कर्जाऊ दिलेल्या रकमांवरील व्याजाच्या रूपाचा आहे आणि त्याबद्दल तक्रार करण्याऐवजी इतक्या कमी व्याजावर आपल्या गरजा भागविणारा सावकार आपल्याला मिळाला आहे याबद्दल आपण कृतज्ञ राहिले पाहिजे. खंडणीचा आणखी एक भाग सरकारी कामास लागणारा माल (stores) विकत घेण्यासाठी दिला जातो. अशा प्रकारचा माल आपल्याकडे होत नसल्यामुळे तो बाहेरून आणणे आणि त्याची किंमत देणे हे यथायोग्यच आहे. खंडणीचा जो भाग राज्यकारभार, संरक्षण, निवृत्तीवेतन, वगैरे गोष्टींसाठी द्यावा लागतो त्याची मुळीच गरज नाही अशी तक्रार त्याच्याबद्दल करता येण्याजोगी आहे. परंतु इंग्रजांच्या अधिराज्यामुळेच आपल्याला चीनकडून आपल्या अफूच्या मक्त्याने जवळजवळ तेवढीच खंडणी वसूल करता येते. म्हणून या खंडणीच्या वायफळ चर्चेत आपला वेळ अगर बुद्धी तुम्ही खर्च करावी असे मला वाटत नाही. तो प्रश्न आपल्या राजकीय पुढाऱ्यांसाठी राखून ठेवावा हे बरे".[4]

खंडणीबाबत रानडे यानी मांडलेल्या आणखी एका विचाराची परीक्षा आवश्यक आहे. पहिल्या व्याख्यानात हिंदुस्थानला द्याव्या लागणाऱ्या खंडणीची तुलना रानडे यानी त्यावेळी नुकत्याच झालेल्या फ्रेंच–जर्मन लढाईत जर्मनीने फ्रान्सवर लादलेल्या युद्धखंडणीशी केली आहे आणि असे सुचविले आहे की, फ्रेंच लोकानी अत्यंत स्वार्थत्याग करून ती खंडणी ज्याप्रमाणे थोड्या मुदतीत फेडली त्याप्रमाणे आपणही ब्रिटिश खंडणीचे दुष्परिणाम अधिक बचत करून टाळणे आवश्यक आहे.

हे त्यांचे विधान अनेक दृष्टींनी आक्षेपार्ह आहे. प्रथम हिंदुस्थानची खंडणी ही युद्धखंडणीसारखी नव्हती. युद्धखंडणी ही एकदाच ठरते आणि द्यावयाची असते. त्याबद्दल कोणताही मोबदला मिळत नाही. ब्रिटिश खंडणी ही एकदाच ठरलेली नसून आवर्ती (दरवर्षी द्यावी लागणारी) आणि कमीजास्त होणारी होती. त्यातल्या काही बाबींबाबत मोबदला मिळत होता हे स्वतः रानडे यानीच म्हटले आहे. तेव्हा युद्धखंडणीची उपमा चूक होती. दुसरे, पूर्वी दाखविल्याप्रमाणे खंडणी आणि अंतर्गत बचत यात रानडे म्हणतात तसे कोणतेच नाते नव्हते. त्यामुळे अधिक बचत करून त्या खंडणीचे दुष्परिणाम दूर होण्याचा संभव नव्हता. तिसरे, दारिद्र्यपीडित देशातील लोकांनी आपली बचत एक–तृतीयांशाने अधिक वाढवावी हे सुचविणे अवास्तव होते. याबाबतीत रानडे यांची दिशाभूल झाली होती.

विदेशी भांडवलाच्या गुंतवणुकीविषयी रानडे यानी जे विचार मांडले आहेत त्याकडे आता वळू (मागील भागातील कलम 5). चहा, कॉफी, नीळ यातील विदेशी भांडवलाच्या गुंतवणुकीने आपला रोजगार वाढून फायदा झाला आहे असे रानडे यानी म्हटले आहे. पण आगगाड्यांच्यासाठी ज्या विदेशी भांडवलाची गुंतवणूक झाली आहे त्याला 5 टक्के व्याजाची सरका–

रने हमी दिली आहे, त्यामुळे आपला तोटा आहे. यात विदेशी भांडवलाच्या विरुद्ध असे काही नसून फक्त ते ज्या विशिष्ट अटींवर त्या विशिष्ट उद्योगात गुंतविले गेले होते त्याचा निषेध आहे. त्यामुळे नुकसान होत आहे असे हे विधान आहे. याबद्दल पुढच्या काळात जे गैरसमज झाले आणि ज्याची चर्चा पुढे केली आहे त्याची पूर्वतयारी म्हणून येथे हा खुलासा केला आहे.

आगगाड्यांच्या बाबतीत रानडे यांचा दृष्टिकोन संकुचित म्हणजे फक्त वित्तीय दृष्टीनेच पाहणारा आहे. कसा ते पाहू. एकतर व्याजाची हमी फक्त हिंदुस्थाना–तील आगगाड्यांतील गुंतवणुकीस दिलेली नसून अशी हमीची पद्धत त्यावेळच्या बऱ्याच देशांतून रूढ होती. फ्रान्समध्ये ती अवलंबिण्यात येत होती. अमेरिकेतही तिथल्या राज्यांनी रेलरोड कंपन्यांना अशीच हमी दिलेली आढळते. तेव्हा हिंदुस्थान सरकारने दिलेली हमी ही जगावेगळी अगर साम्राज्यशाहीदर्शक अशा प्रकारची नव्हती हे नक्की.

आगगाड्यांच्या बांधणीबद्दल रानडे यांची दुसरी तक्रार अशी की, त्यांच्यामुळे कायमचा रोजगार निर्माण होत नाही. तीही बरोबर नव्हती. आगगाड्यांच्या बांधणीत तात्पुरता रोजगार निर्माण होतो हे खरे. पण आगगाड्या नुसत्या बांधून चालत नाहीत. त्या गाड्या चालू ठेवाव्या लागतात आणि त्याला कायमचा नोकर-वर्ग लागतो. असा कायमचा रोजगार हिंदुस्थानातही निर्माण झालेला आढळतो. तक्ता 1 मधील आकडे हेच दाखवितात.

याबाबतीत रानडे यांचे विधान सर्वस्वी चूक होते. याशिवाय आगगाड्यांच्या बांधणीमुळे देशाला झालेले अप्रत्यक्ष फायदे रानडे यांच्या नजरेतून पूर्णपणे सुटले आहेत. आगगाड्यांमुळे मालाची व माणसांची वाहतूक सुलभ होऊन अंतर्गत व्यापारास मिळालेली बढत, उद्योगीकरणास अत्यंत आवश्यक अशी सुविधा निर्माण होणे, वगैरे गोष्टी यासंदर्भात अगदीच दृष्टिआड करणे बरोबर नव्हते.

रानडे यांच्या इतर विधानांकडे वळू (मागील भागातील कलम 6 व 7). ही विधाने हिंदुस्थानच्या विदेशी व्यापारासंबंधी आणि अनुषंगाने त्यावेळच्या आंतरराष्ट्रीय व्यापारासंबंधीच्या सिद्धान्तासंबंधीची आहेत. त्या सिद्धान्तनातील अनेक त्रुटी व संकल्पना–विषयक घोटाळे यांचे प्रतिबिंब त्यात पडले आहे.

**तक्ता 1**

**हिंदुस्थानातील आगगाड्यांच्या संबंधित कामावर असलेले कामगार**

| वर्ष | प्रतिवर्षी बांधण्यात येत असलेले आगगाड्यांचे रस्ते (मैल) | त्या बांधकामावर दररोज कामावर असणारे कामगार | आगगाड्या ज्यावर चालू आहेत असे रस्ते (सरासरी) (मैल) | आगगाड्यांवर रोज कायमचे नेमलेले नोकर |
|---|---|---|---|---|
| 1856–60 | 2,431 | 3,86,500 | 134 | अनुपलब्ध |
| 1861–65 | 2,128 | 3,37,200 | 505 | 36,449 |
| 1866–70 | 1,890 | 2,83,560 | 282 | 43,555 |
| 1871–75 | 2,200 | 3,30,030 | 636 | 69,175 |
| 1876–80 | 1,466 | 2,19,820 | 491 | 1,35,682 |

स्रोत : Ian Derbyshire, 'The Building of India's Railways : The Application of Western Technology in the Colonial Periphery, 1850–1920,' in Roy Macllоyd & Deepak Kumar (Eds.), TECHNOLOGY AND THE RAJ, ETC., Sage Publications, New Delhi, 1995, p. 186.

रानडे यांचे एक विधान असे की, जरी गेल्या वीस वर्षांत आपल्या देशाचा विदेशी व्यापार (आयात + निर्यात) खूप वाढला असे त्यासंबंधीच्या आकड्यांवरून दिसत असले तरी तो खऱ्या अर्थाने वाढलेला नाही. या विधानाचे रहस्य आपल्या निर्यातीच्या व आयातीच्या स्वभावात आहे. आपली निर्यात वाढली आहे पण ती नैसर्गिक रीतीने वाढली नसून सरकारच्या वसुलीची बेरीज दुप्पट वाढली त्याच्या नडीने बराचसा माल परदेशी पाठविला जातो. तितक्या मानाने व्यापार वाढला असे होत नाही. यातील कार्यकारणभाव चुकीचा आहे. वसूल वाढला हे खरे पण तो सर्वस्वी करवाढी-मुळे वाढलेला नव्हता. ब्रिटिश सरकारच्या अधिपत्या-खाली नवीन मुलुख (नागपूरचे राज्य, सिंध, वगैरे) आल्यामुळेही वाढला होता. या काळातच हिंदुस्थाना-तील शेतीचे व्यापारीकरण झपाट्याने होत होते. व्यापारी पिके काढण्याकडे शेतकरी अधिकाधिक प्रवृत्त होत होते. कापूस, पाट, नीळ यांचे उत्पादन वाढत होते. मुख्य म्हणजे, या सर्व पदार्थांना परदेशची माग-णीही सतत वाढत होती. निर्यात वाढली, महसूलही वाढला पण त्यात कार्यकारण संबंध नव्हता. ते एक-मेकाच्या स्वतंत्रपणे वाढत होते.

रानडे यांचे दुसरे विधानही असेच शंकास्पद आहे. आपला परराष्ट्रीय व्यापार वाढला आहे पण "देशाची खरोखर संपत्ती वाढून तो वाढला असता तर आपल्या देशातील बंदरांचा एकमेकाशी व्यापार त्या-मानाने वाढला असता". पण तसे दिसत नाही. हा व्यापार विदेशी व्यापाराच्या तुलनेत 25 टक्केही नाही. इथे इंग्लंडशी तुलना करण्याच्या पायी रानडे यांची चूकभूल झाली आहे. अंतर्गत व्यापारासंबंधीचा अंदाज बंदराबंदरातील व्यापारावरून करणे इंग्लंडसारख्या लहान बेटाच्या व दर्यावर्दी परंपरा असलेल्या देशाबाब-तीत योग्य आहे. पण हिंदुस्थानसारख्या खंडप्राय देशात खुष्कीवरील व्यापार हाच मुख्य अंतर्गत व्यापार अस-णार. तेथे बंदराबंदरांमधला व्यापार हा त्याला फक्त पूरक म्हणूनच असणार. त्यावरून देशातील अंतर्गत व्यापाराबद्दल अंदाज बांधणे योग्य नव्हे.

आंतरराष्ट्रीय व्यापाराचा आणखी एक सिद्धान्त रानडे यांनी दोन वेळा या व्याख्यानांत सांगितला आहे. तो असाच शंकास्पद आहे. "साधारणपणे जितका माल या देशातून बाहेर जातो त्याहून अधिक किंवा तितका तरी माल या देशात यावा असा सिद्धान्त असून या देशाचे व्यापारात यासंबंधाने उलट व्यवस्था दिसून येते, म्हणजे इकडून माल जातो त्याऐवजी तितक्या किमतीचा माल या देशात येत नाही." (पृष्ठे 8,52). असा कोणताही सिद्धान्त नाही आणि असणेही शक्य नाही. कारण तो तर्कदुष्ट आहे. जगातील सर्व देशांपैकी प्रत्येक देशात तो खरा ठरणे अशक्य आहे. काही देशात वस्तु व्यापारशेष धन व काही देशात ऋण असणे भाग आहे. त्याशिवाय सर्वंकष असा आंतरराष्ट्रीय देण्या-घेण्याचा समतोल होणार नाही. दुसरे, तो ऐतिहासिक दृष्टीनेही चुकीचा आहे. कित्येक संपन्न देशातही त्यावेळी हिंदुस्थानसारखीच आंतरराष्ट्रीय व्यापाराची स्थिती होती हे आकड्यांनीच सिद्ध आहे.

रानडे यांचे आणखी एक विधान दिशाभूल कर-णारे आहे. विलायतेशी आपला होणारा व्यापार बरोबरीच्या नात्याने होत नाही कारण आपल्या धन वस्तु व्यापारशेषातून आपल्याला दरवर्षी इंग्लंडचे देणे द्यावे लागते. ते द्यावयाचे नसते तर त्या किमतीचा माल आपल्याला आयात करता आला असता. इतर देशांना आपण जेवढे निर्यात करतो तितक्या किमतीचा माल आपल्याला आयात करता येतो. हा सरळ व्यापाराचा व्यवहार आहे. पण विलायतेशी होणारा व्यवहार तसा नाही. हा निष्कर्ष चुकीचा आहे.

खंडणी देणे हे अटळ होते. मग ती कोठून तरी भरली पाहिजे हे ओघानेच येते. विलायतेशी होणारा व्यापार काय किंवा इतर देशांशी होणारा व्यापार काय सर्व व्यापारातून होणाऱ्या उत्पन्नातूनच ती द्यावयाची. इंग्लंडशी आपला व्यापार मुळीच नसता, तेवढाच इतर देशांशी असता आणि इंग्लंडला खंडणी देणे आवश्यक असते तर खंडणी त्यातून गेली असती एवढेच. आंतरराष्ट्रीय देवाणघेवाणीचा व्यवहार अशाच वजावटीने नेहमी होत असतो. त्यात वाकड्या आणि सरळ व्यापाराचा काही प्रश्न नसतो. एका अगदी सोप्या उदाहरणाने हे दाखविता येईल. समजा, मला एखाद्याकडून रु. 40 येणे आहे पण मलाही त्याला रु. 15 द्यावयाचे आहेत. त्याने मला रु. 25 देऊन सर्व हिशोब मिटविता येईल. त्याऐवजी त्याने मला रु. 40 द्यावयाचे आणि मग मी त्याला रु. 15 द्याव-

याचे हा द्राविडी प्राणायामही करता येईल. पण शेवटी हिशोब सारखाच. तसेच वरील व्यवहारात आहे. द्राविडी प्राणायामास सरळ व्यापार आणि पहिला वाकडा व्यापार असे म्हणणे व्यर्थ आहे.

आयात मालाबद्दलही रानडे यांनी एक प्रमेय मांडले आहे. तेही मान्य होण्यासारखे नाही. त्यांनी म्हटले आहे, "बाहेरून जो माल येतो . . . त्यापैकी पुष्कळ जिन्नस या देशात नावाला मात्र येतात, परंतु त्यांचा खप सरकारचे, रेल्वेचे व लष्करी कारखान्याचे कामी आणि परस्थ वस्तीतच बहुशः होतो. त्यामुळे त्याप्रमाणाने आपल्या देशातील लोकांचे सामर्थ्य वाढले असे होत नाही" (पृ. 53). विलायती कोळसा, रेल्वे सामान, दारू (उडवायची, बंदुकीची), स्टोअर हे आयातीतील पदार्थ रानडे यांनी यासंदर्भात उल्लेखिलेले आहेत. 'खऱ्या' आयात मालाची ही व्याख्या विचित्र आहे. देशातल्या लोकांकडून प्रत्यक्षपणे ज्या आयात पदार्थांचा उपभोग घेतला जातो तेवढेच 'खऱ्या' आयातीत समाविष्ट होतात असा याचा अर्थ होतो. हीच तर्ककसोटी पुढे चालवावयाची तर आयात होणारी सर्व यंत्रसामग्री, वगैरेही आयातीतून वगळावी लागतील. तसे करणे अव्यवहार्य तर आहेच पण आर्थिक दृष्टीनेही चूक ठरेल. साहेब लोकांच्या येथील कारखान्यांना लागणारा आयात माल प्रत्यक्षपणे नाही तरी अप्रत्यक्षपणे हिंदी प्रजेच्याच उपयोगी पडतो याकडे रानडे यांचे दुर्लक्ष झाले. आगगाड्यांसाठी येणारे सामान आम्हीच आगगाड्यांचा उपयोग करून वापरतो आणि त्याचा अप्रत्यक्ष उपभोग घेतो. मुंबईमधील कापडाच्या गिरण्यांसाठी काही वर्षे कोळसा विलायतेहून येत असे. त्या गिरण्यांनी उत्पादिलेले कापड, सूत वगैरे वापरून आम्हीच त्या कोळशाचा अप्रत्यक्ष उपभोग घेतो. इतर पदार्थांबद्दलही तसेच म्हणता येईल.

रानडे यांच्या विचाराचे आतापर्यंत विद्यानिष्ठ परीक्षण केले. त्यामागची वृत्ती अगदी विनम्र आहे हे सुरुवातीसच सांगितले आहे. त्याकडे फक्त लक्ष वेधतो.

## 5

## गैरसमज व विपर्यास

रानडे यांच्या या व्याख्यानांसंबंधी नंतरच्या लेखकांनी दोन प्रकारचे प्रमाद केले आहेत. एक प्रकार रानडे यांचे कर्तृत्व किंवा महत्त्व होते त्यापेक्षा जास्त दाखविण्याच्या इच्छेने केलेले. दुसरा प्रकार रानड्यांची ऐतिहासिक कामगिरी व त्यांचे राष्ट्रीय चळवळीतील स्थान यासंबंधी यथायोग्य मूल्यन करण्याचा आव आणून त्यांच्या प्रतिमेचे विरूपण करण्याचा. त्यांचा अनुक्रमे परामर्श घेऊ.

पहिल्या प्रकारच्या विपर्यासाचे बी कळत न कळत रानडे यांचे अधिकृत चरित्रकार न. र. फाटक यांनी पेरले. त्यांचे रानडे यांचे चरित्र 1924 साली प्रसिद्ध झाले.[5] त्यांना या व्याख्यानांचे जुने पुस्तक उपलब्ध होते, कारण त्यांनी त्यातील लांबलचक उत्तरे चरित्रात दिले आहेत. या व्याख्यानांबद्दल लिहिताना त्यांनी सुरुवातच अशी केली आहे की, वंगभंगानंतर (1905) सुरू झालेली व विकसलेली स्वदेशी चळवळ महाराष्ट्राला नवीन नव्हती. त्यापूर्वी तीस वर्षे रानडे यांनी 'स्वदेशी व्यापार' या विषयावर व्याख्याने दिल्यापासून ती सुरू झाली होती. त्या व्याख्यानांमुळे गणेश वासुदेव जोशी (सार्वजनिक काका) इतके भाववश झाले की, त्यांनी जानेवारी 1873 मध्ये स्वदेशी मालच वापरण्याची शपथ घेतली (पृष्ठे 189, 193). या बीजाचा जो कल्पनारम्य वटवृक्ष पुढच्या काळात निर्माण झाला त्याचे स्वरूप बा. रं. सुंठणकर यांच्या अगदी ताज्या महाराष्ट्राच्या आर्थिक-राजकीय-सामाजिक इतिहासात[6] पुढीलप्रमाणे प्रकट झाले (मूळ पुस्तक इंग्रजीत आहे). या इतिहासाच्या 122 व्या पानावर त्यांनी लिहिले आहे, "1870 मध्ये संघटित व लोकप्रिय अशा स्वदेशीची चळवळ सुरू करण्याचे श्रेय रानडे यांच्याकडे जाते. पुण्यात 1872 मध्ये वक्तृत्वोत्तेजक सभेमार्फत त्यांनी दिलेली दोन व्याख्याने इतकी खात्री पटविणारी व प्रभावी होती की, त्यामुळे संघटित आणि लोकप्रिय अशा पुढच्या स्वदेशी चळवळीचे ते जणू प्राथमिक रूपच होते."

याच विषयावर आणखी लिहिताना सुंठणकरांनी लिहिले आहे, "1872 च्या शेवटी व 1873 च्या सुरुवातीस हिंदुस्थानची आर्थिक प्रगती व वाढते दारिद्र्य या विषयावर रानडे यांनी एक व्याख्यानमाला गुंफिली. या व्याख्यानात त्यांनी स्वदेशीचे समर्थन करून श्रोत्यांनी स्वदेशात उत्पन्न होणाऱ्या वस्तूच वापरण्याचा आग्रह

केला. या व्याख्यानांचा परिणाम विद्युतसंचारासारखा झाला आणि पुणे आणि त्याच्या परिसरातील जिल्ह्यांत स्वदेशीची लाटच उसळली. सार्वजनिक काकांच्यावर या व्याख्यानांचा इतका परिणाम झाला की, त्यानी परदेशी बनावटीचे कापड वापरावयाचे सोडून आपल्या उर्वरित आयुष्यात फक्त स्वदेशी कापड वापरले" (पृ. 536).

या सर्व हकिगतीत किती असत्ये गुंफलेली आहेत पाहा. (1) फाटक म्हणतात त्याप्रमाणे ही व्याख्याने हिंदुस्थानच्या 'स्वदेशी व्यापारा'बद्दल नव्हती तर मुख्यतः विदेशी व्यापाराबद्दल होती. 'स्वदेशी व्यापार' हे फाटकांचे वर्णन दिशाभूल करणारे आहे. स्वदेशी मालाची भलामण व शिफारस करणारे एकच वाक्य या दोन व्याख्यानांत आहे. स्वदेशी हा शब्द कोठेही वापरण्यात आलेला नाही. तेव्हा या व्याख्यानांचा विषय स्वदेशीचा पुरस्कार हा होता हे खरे नाही. (2) या व्याख्यानांमुळे सार्वजनिक काकांनी स्वदेशीची शपथ घेतली हेही असत्य आहे. प्रत्यंतर पुराव्यावरून सार्वजनिक काका आणि त्यांचे मित्र गोवंडे यानी स्वदेशीची शपथ 12 जानेवारी, 1872 च्या मकर संक्रांतीस घेतली असे शाबीत होते.[7] रानडे यांचे पहिले व्याख्यान होण्यापूर्वी जवळजवळ वर्षभर आधी ही शपथ झाली होती. तिचा आणि या व्याख्यानांचा काहीही संबंध नाही. (3) सुंठणकर म्हणतात तशी ही व्याख्याने वक्तृत्वोत्तेजक सभेच्यामार्फत झाली नव्हती. ती व्यापारोत्तेजक मंडळीतर्फे झाली होती. दोन्ही व्याख्याने ज्या दोन वाड्यात झाली त्याकडे पाहता या सभांना 50–60 पेक्षा जास्त श्रोते उपस्थित असण्याचा संभव नव्हता. पुणे शहर त्यावेळी 50–60 हजार वस्तीचे होते आणि सार्वजनिक सभा हा प्रकार त्याकाळी नवा होता. त्या सभांतून संघटित व लोकप्रिय स्वदेशीची चळवळ सुरू होऊन आजूबाजूच्या प्रदेशात पसरली हा कल्पनेचा विलास आहे, इतिहास नव्हे.

आता दुसऱ्या प्रकारच्या विपर्यासाकडे वळू. त्यापैकी काही केवळ अज्ञानामुळे झालेले दिसतात. पण त्यांचाच आधार घेऊन दुसऱ्यांनी त्यावर आपल्या विपर्यासाची इमारत उभारली म्हणून त्याची दखल घेणे भाग आहे. प्रधान व भागवत यानी 1956 साली टिळकांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ते त्यांचे एक चरित्र 1958 मध्ये इंग्रजीत लिहून प्रसिद्ध केले[8] त्यात या व्याख्यानांचा उल्लेख करून रानडे यानी "या ना त्या स्वरुपात हिंदुस्थानच्या राष्ट्रीय उत्पन्नापैकी तिसरा हिस्सा ब्रिटिश हडप करतात" (पृ. 8) असे विधान केले असे म्हटले आहे. ते सर्वस्वी चूक आहे. पूर्वीच्या चर्चेतील रानडे यांचे विधान पाहिल्यास त्यांनी हिंदुस्थान सरकारच्या प्रतिवार्षिक उत्पन्नापैकी (वसुलापैकी) तिसरा हिस्सा ब्रिटनला खंडणी म्हणून जातो असे म्हटले आहे. सरकारचे उत्पन्न व राष्ट्राचे उत्पन्न एक नसते हे त्या पुस्तकाच्या ग्रंथकारद्वयांना अज्ञात होते असे लक्षात येते.

आता या आधारावर पुढे काय अनर्थ झालेला आहे तो पाहू. ही व्याख्याने मुळात मराठीत आहेत. त्यांचे इंग्रजी भाषांतर गेल्यावर्षी मी प्रसिद्ध करीपर्यंत उपलब्ध नव्हते. मराठी न समजणारे पण या विषयावर इंग्रजीत चर्चा करणारे विचारवंत प्रधान–भागवत वगैरेंच्या इंग्रजी पुस्तकांवरून रानडे यांच्या या व्याख्यानांतील आशयासंबंधी आपल्या कल्पना बांधतात आणि मग त्यावर आपल्या विश्लेषणाची इमारत उठवितात असे आढळते. यातले बिनीचे लेखक जवाहरलाल नेहरू विद्यापीठाचे बिपनचंद्र हे साम्यवादी (मार्क्सवादी) इतिहासकार व विचारवंत आहेत. त्यानी 1969 साली प्रसिद्ध केलेल्या '**Rise and Growth of Economic Nationalism in India**'[9] या पुस्तकात आणि 1990 साली संपादित केलेल्या '**Ranade's Economic Writings**'[10] या पुस्तकाच्या प्रदीर्घ प्रस्तावनेत रानडे यांचे ऐतिहासिक दृष्टीने पुनर्मूल्यन केले आहे. त्या मूल्यनात या व्याख्यानांना अनन्यसाधारण महत्त्व देऊन आणि त्यासंबंधीची आपली माहिती प्रधान–भागवत वगैरे लेखकांच्या पुस्तकांवरून घेऊन विपर्यस्त विश्लेषण केले आहे. कसे ते पाहा.

बिपनचंद्र यांच्यापुढचा मुख्य प्रश्न रानडे हे साम्राज्यशाही विरोधी (कारण त्याशिवाय ते खरे राष्ट्रभक्त ठरत नाहीत) होते की नाही हा आहे. रानडे यांच्या इंग्रजी लिखाणावरून त्याबद्दल थोडीफार शंका येणे शक्य आहे. मार्क्स–लेनिनप्रणीत साम्राज्यशाहीच्या विश्लेषणाच्या निकषाप्रमाणे साम्राज्यशाहीला विरोध करणाऱ्याने दोन गोष्टी ठामपणे मानल्या पाहिजेत. एक, आपल्या देशाची साम्राज्यशाही राष्ट्राकडून आर्थिक

पिळवणूक होत आहे. दुसरे, विदेशी भांडवलाच्या आपल्या देशातील गुंतवणुकीस त्यांचा विरोध असला पाहिजे. पहिल्याबाबत त्याने हिंदुस्थानातून इंग्लंडला जाणाऱ्या खंडणीच्या सिद्धान्तावर विश्वास ठेवला पाहिजे. पण रानडे यांनी खंडणीचा सिद्धान्त जाहीरपणे धुडकावला हे आपण नोंदले आहे. त्यामुळे बिपनचंद्र याना पंचाईत पडली. त्यावेळी त्याना या पूर्वीच्या व्याख्यानांचा जो काही आशय मराठी जाणणाऱ्या पण इंग्रजीत लिहिणाऱ्या लेखकांच्या लिखाणावरून कळला त्याने त्यांची कठीण प्रश्नातून सोडवणूक केली आणि मग त्यांनी आपले विश्लेषण त्यावर उभारले.

बिपनचंद्र यांचे विश्लेषण असे की, त्यावेळच्या हिंदी विचारवंतांनी (ज्यात रानडे प्रमुख होते) ब्रिटिश राज्याविरुद्ध एक प्रखर अशी विचारसरणी उभारली. त्यांची प्रथम अशी समजूत होती की, बलाढ्य व संपन्न इंग्लंड आपले तंत्रविज्ञान, भांडवल वगैरे हिंदुस्थानात आणून तेथे औद्योगिक क्रान्ती घडवून आणील. म्हणून इंग्रजी राज्य हे ईश्वरी वरदान आहे असे मानले. पण प्रत्यक्षात जेव्हा त्यांची निराशा झाली तेव्हा तेच राज्य कसे आर्थिक शोषण करणारे आहे हे दाखविण्या-साठी त्यांनी खंडणीचा सिद्धान्त मांडला. खंडणी सिद्धा-न्तावर विश्वास ठेवणारे इंग्लंडच्या राज्याविरुद्ध होते.[11] पण त्यावर विश्वास न ठेवणारे हे इंग्रजधार्जिणे होते असा सरळ निष्कर्ष यावरून निघतो. बिपनचंद्र यांच्या मते 1872 च्या व्याख्यानांत रानडे यांनी खंडणी सिद्धान्ताची आक्रमक मांडणी केली होती आणि विदेशी भांडवलाच्या हिंदुस्थानातील गुंतवणुकीस विरोध केला होता. त्यावरून त्यावेळी ते खरे राष्ट्रभक्त (साम्राज्य-शाही विरोधी) होते. पण त्यांनी नंतर खंडणी सिद्धान्त झिडकारला हे कसे? बिपनचंद्र म्हणतात की, त्यांनी खरोखरी तो सिद्धान्त सोडला नाही, पण राजकार-णाच्या सोईसाठी तो सोडला असे खोटेखोटे दाखविले. एकंदर परिस्थितीकडे पाहता त्याना असे वाटले की, देशाच्या स्वातंत्र्याची चळवळ करण्याचे दिवस अजून आलेले नाहीत. म्हणून खंडणी सिद्धान्त मागे घेण्याची राजकीय खेळी त्यांनी केली. या विश्लेषणाने रानडे यांचे समर्थन तर होत नाहीच पण त्यांची प्रतिमा बद-नाम होते याचे या विद्वानांना भान राहिले नाही.

मुळातच या समर्थनाला आधार नाही. या दोन व्याख्यानांत खंडणीवर भर आहे हे खरे, पण त्यासंबंधी जे विवेचन पूर्वी केले आहे त्यावरून ती सर्वच मांडणी इतकी दोषपूर्ण होती की, अधिक विचारांती त्या सिद्धा-न्ताचे वैयर्थ रानडे याना पटले हे नैसर्गिक वाटते. राजकीय कारणांसाठी त्यांनी ते मागे घेतले असे म्हणणे हे रानडे याना आधुनिक राजकारण्यांच्यापैकीच एक समजणे होय. रानडे यांच्यावर हा खोटारडेपणाचा आरोप करून त्यांच्या प्रतिमेवर शिंतोडे उडविणे हे गर्ह्य आहे. तसेच रानडे हे या व्याख्यानांत विदेशी भांडवलाच्या विरुद्ध होते हे विधानही संपूर्णपणे असत्य आहे. असे काहीही त्या व्याख्यानांत नाही हे मागील चर्चेवरून लक्षात येईल. बिपनचंद्र पुढे जाऊन म्हणतात की, पुढेपुढे रानडे हे विदेशी भांडवलाच्या गुंतवणुकीस अनुकूल झाले होते. हेही खरे नाही. ते अनुकूल वा प्रतिकूल असे काहीच नव्हते. त्याना विदेशी भांडवल गुंतवणुकीमुळे होणाऱ्या अनिष्ट परिणामांची पुरेपूर जाणीव होती. 1883 मध्ये त्यांनी एका लेखात म्हटले आहे, "एका देशाचे दुसऱ्या देशावरील राजकीय वर्चस्व याकडे मुख्य लक्ष आकर्षित होते परंतु त्याहूनही बल-वान अशा दुसऱ्या देशाच्या भांडवल, औद्योगिक उपक्रम व उद्योग यांच्या वर्चस्वाकडे फारसे लक्ष जात नाही. हे दुसऱ्या प्रकारचे वर्चस्व त्या देशाच्या राष्ट्रीय जीव-नास आधारभूत किंवा प्राणासारख्या असणाऱ्या सर्व प्रक्रियांच्या मूळ स्रोतांना हतबल करीत असते."

बिपनचंद्र यांच्या विश्लेषणाचा पायाच असा असत्यावर उभारलेला आहे. ज्या मनुष्याचा रात्रंदिवस ध्यास माझ्या देशाची सर्वांगीण उन्नती कशी होईल हा होता त्याने स्वातंत्र्याच्या चळवळीचे दिवस अजून आलेले नाहीत अशी आपली समजूत करून घेतली यावर कोण विश्वास ठेवील! बिपनचंद्रासारख्या तत्त्व-ग्रस्तानाच ते शक्य होईल!!

## संदर्भ व टीपा

1 रानडे विलायतेस न जाण्याचे कारण त्याना सरकारने तशी परवानगी दिली नाही हे होते. 1897 मध्ये वेल्बी आयोगासमोर गोखले यांची साक्ष झाली. त्यावेळीही ही साक्ष न्यायमूर्तींनी द्यावी अशी दादाभाईंची इच्छा होती. परंतु त्यावेळीही सरकारने त्याना परवानगी नाकारली.

यासंबंधात य. दि. फडके यांनी न्यायमूर्तींचे दादाभाईंना 28 जुलै, 1896 रोजी लिहिलेले पत्र प्रसिद्ध केले आहे. त्यातला उतारा फडके यांच्याच शब्दांत (भाषांतरात) पुढील प्रमाणे :

न्यायमूर्ती लिहितात, "त्यांचे मन वळविणे सोपे नाही असा मला संशय होताच. 1872-73 मध्ये फॉसेट समिती पाहणी करीत होती. तेव्हा हिंदुस्थानात असलेले अॅशबर्नर यांनी साक्षीदार म्हणून माझे नाव सुचविले होते. मी इंग्लंडला जाण्यास तयार आहे आहे का याचा त्यांनी अंदाज घेतला होता. 1886 साली अर्थविषयक समितीचा एकच भारतीय सभासद म्हणून माझे नाव सुचविण्यात आले त्यावेळीही अशाच अडचणी आल्या होत्या. पण त्या समितीचे इल्बर्ट यांना सगळे अडथळे दूर करण्यात यश मिळाले. म्हणूनच तुम्ही व सर विल्यम वेडरबन यांनी केलेल्या प्रयत्नास सर जे. बी. सील यांनी दुजोरा दिलेला दिसत नाही याचे मला नवल वाटले नाही. त्यांच्या दृष्टीने त्यात सक्रार करण्याजोगेही काही नाही."

फडके, य. दि., 'गोपाळ कृष्ण गोखले" **महाराष्ट्र टाइम्स**, 19-2-1995, पृ. 5.

2 सोवनी, नी. वि. (संपा.), न्या. मा. गो. रानडे यांनी दिलेली व्यापारासंबंधी व्याख्याने (1872-73), गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे, 1963, पृ. 67.

3 या भागात आणि पुढे जेथे पानांचे क्रमांक दिले आहेत ते संदर्भ 2 मध्ये नोंदलेल्या पुस्तकातील आहेत.

4 Inaugural address to the First Industrial Conference, Poona, 1890 in ESSAYS IN INDIAN ECONOMICS, G. A. Nateshan & Co., Madras, 1966, p. 200.

5 फाटक, न. र., **महादेव गोविंद रानडे यांचे चरित्र**, 1924.

6 Sunthankar, B. R., MAHARASHTRA, 1858-1920, Popular Book Depot, Bombay, 1993, pp. 122 and 536.

7 दीक्षित, म. श्री. **सार्वजनिक काका (चरित्र आणि कार्य)**, पुणे सार्वजनिक सभा, पुणे, (खासगी वितरणाकरिता), 1993, पृ. 67.

8 Pradhan, G. P. & Bhagwat, A. K., LOKAMANYA TILAK : AUTOBIOGRAPHY, Jain Publishing House, Bombay, 1958, p. 8.

9 Bipan Chandra, RISE AND GROWH OF ECONOMIC NATIONALISM IN INDIA, 1966.

10 Bipan Chandra, RANADE'S ECONOMIC WRITINGS, Gyan Publishing House, New Delhi, 1990. या पुस्तकाचे विस्तृत परीक्षण मी JOURNAL OF THE INDIAN SCHOOL OF POLITICAL ECONOMY, जानेवारी-मार्च, 1992 च्या अंकात केले आहे. ते जिज्ञासूंना पाहता येईल.

11 Bipan Chandra, पूर्वोक्त, 1966, पृ. 698.

□ □

# भारतीय विद्यापीठांतील अर्थशास्त्राचे अध्ययन आणि संशोधन : वास्तवता

रवीन्द्र दोशी *

## 1

## उपोद्घात

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारताने नियोजनबद्ध आर्थिक विकासाची कास धरून देशाची आर्थिक-सामाजिक उन्नती करण्याच्या दिशेने प्रवास सुरू केला. या प्रवासात अनेक महत्त्वाचे अडथळे दूर करून प्रगतीचा वेग वाढता ठेवावयाचा होता. लोकांची निरक्षरता घालविण्याबरोबरच शिक्षणामधील नवीनवी क्षितिजे गाठण्यासाठीची व्यवस्था करावयाची होती. त्यामुळे प्राथमिक शिक्षणाच्या प्रसाराबरोबरच माध्यमिक, महाविद्यालयीन आणि विद्यापीठीय शिक्षणाचा भौगोलिक विस्तार करण्याचे धोरण अनुसरले गेले, असंख्य नव्या प्राथमिक आणि माध्यमिक शाळा अगदी खेडोपाडीही सुरू झाल्या. महाविद्यालये तालुक्यांपर्यंत पोचली. जिल्ह्यांच्या मदतीसाठी विद्यापीठेही अस्तित्वात आली. परिणामत: ज्या ठिकाणी शिक्षणाचे वारेही वाहात नव्हते, शैक्षणिक परंपरा नव्हत्या आणि शैक्षणिक वातावरणही नव्हते अशा ठिकाणी शिक्षण संस्था स्थापन झाल्या. त्याचबरोबर अशा संस्थांकरिता आवश्यक असणारी आर्थिक ताकद अपुरी असलेल्याच संस्था बहुतांशी होत्या. अनेक संस्था चालकांमध्ये अशैक्षणिक वृत्तीच अधिक होती. शिक्षणाचे काम पवित्र न राहता तो एक गल्लाभरू बाजार बनला. यातूनच स्वत:ला 'शिक्षणमहर्षी' म्हणवून घेणाऱ्यांची एक नवीन जमात निर्माण झाली. मात्र अपुऱ्या इमारती, शैक्षणिक साधनांचा तुटवडा, अपुरा व अकुशल अध्यापक वर्ग, ज्ञानार्जनाची आच कमी असलेला विद्यार्थी वर्ग वगैरे कारणाने विद्यादानाचे कार्य कालौघात पाणचट दुधासारखे उत्तरोत्तर पातळ होत चालले. याला पायबंद घालून शिक्षणाची पातळी उच्च राखण्यासाठी शासन, विद्यापीठ अनुदान आयोग वगैरेंनी हातपाय हलविले; त्यासाठी विविध योजना पुढे आणल्या. परंतु त्यांचा अंतर्यामी हेतू ध्यानात घेऊन त्या योजना स्वत:च्या अध्यापन व संशोधन कौशल्याच्या उन्नतीसाठी वापर-

* अर्थशास्त्र विभाग प्रमुख, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर आणि प्रमुख संपादक, 'अर्थसंवाद'.

ण्यासाठी मनोभावे प्रयत्न न करता केवळ बळजबरीचा रामराम म्हणूनच स्वीकारण्याची अध्यापकांची वृत्ती स्पष्टपणे प्रकट झाली आहे. काही योजना बंद कराव्यात म्हणून अधूनमधून मोर्चे आणि निदर्शनेही अध्यापकां-कडून आयोजिली जातात. हे घडते ते सर्वच पातळ्यांवर. याबाबतीत विद्यापीठांच्या अधिविभागांची (University Departments) स्थितीही चिंता करण्यासारखीच आहे. अलीकडच्या काही वर्षांत पदव्युत्तर वर्ग विविध महाविद्यालयांकडूनही चालविले जाताहेत. तिथली स्थिती तर आणखीनच शोचनीय आहे. ज्या पदव्युत्तर पातळीवर अध्यापन आणि संशोधन चालून ज्ञानाची नवी क्षितिजे गाठावयाची त्याच ठिकाणी उणीवांची प्रचंड विवरे पडलेली आहेत.

या पार्श्वभूमीवर विद्यापीठीय पातळीवर अर्थशास्त्र विषयाच्या अध्यापन आणि संशोधन क्षेत्रात सद्य:स्थिती काय आहे याचा राष्ट्रीय पातळीवरून मागोवा घेण्या-साठी विद्यापीठ अनुदान आयोगाने (University Grants Commission) एक संशोधन प्रकल्प आखून विकास चित्रे यांच्या अध्यक्षतेखालील एका गटाकडे ही जबाबदारी सोपविली. या तज्ज्ञांनी तयार केलेला अह-वाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे. 'Standard of Teaching and Research in Economics in Indian Universties (A Study Undertaken on Behalf of UGC Panel of Economists: 1991–93)' अशा शीर्षकाच्या या अहवालाचे लेखन प्रामुख्याने श्रीप्रकाश या अभ्यास गटातील एका सद-स्यांनी केले आहे. भारतातील विद्यापीठांच्या अर्थशास्त्र अधिविभागांतून अर्थशास्त्राचे अध्ययन आणि संशोधन कसेकाय चालले आहे आणि या अधिविभागांकडे आव-श्यक संरचनात्मक सुविधा कितीशा उपलब्ध आहेत याचा शोध घेण्याचा हा एक कौतुकास्पद उपक्रम म्हणावा लागेल. त्यातून निघालेल्या निष्कर्षांचा सर्व संबंधितांनी गांभीर्याने विचार करून परिस्थिती सुधार-ण्यासाठी ठोस पाउले टाकण्याची नितांत गरज असल्याचे त्यातून आवर्जून स्पष्ट करण्यात आले आहे. या अहवा-लाचा महत्त्वाचा भाग सर्वांना माहीत करून देण्याच्या उद्देशाने हा लेखनप्रपंच आहे.

## 2

## अभ्यासाचा आकृतीबंध

एक संशोधन प्रकल्प बनवूनच अभ्यास गटाने या अभ्यासाचा आकृतीबंध निश्चित केला. भारतातील विद्यापीठांचे अर्थशास्त्र अधिविभाग हा अभ्यासाचा केन्द्रबिंदू. सर्वच विद्यापीठांकडून माहिती घेऊन त्यानुसार अहवाल तयार करणे हे सर्वोत्तम ठरले असते. तथापि, त्यामुळे कामाचा आवाका फारच मोठा होऊन प्रकल्प पूर्ण करणे जिकिरीचे झाले असते. त्यातही वेळ आणि खर्चासाठी मर्यादित पैसा या अडचणी होत्याच. म्हणून सुकरतेसाठी नमुना सर्वेक्षणाचा (sample survey) मार्ग चोखाळणे अपरिहार्य होते. त्याकरिता देशातील विद्यापीठांची उत्तर, दक्षिण, पूर्व, मध्य आणि पश्चिम अशी भौगोलिकदृष्ट्या पाच गटांत गटवारी करून नमुना पद्धतीने 131 विद्यापीठांची निवड करण्यात आली. विस्तृत माहिती मिळविण्यासाठी मोठी प्रश्नावली बनवून या सर्व विद्यापीठांच्या अर्थशास्त्र अधिविभागां-कडे पाठविली गेली. या उपक्रमाकडे अनेक अधिविभा-गांनी पुरेशा गांभीर्याने पाहिलेच नाही. स्मरणपत्रांचा मारा करून तगादे लावल्यानंतर 59 विद्यापीठांनी प्रश्नावली भरून पाठविली. अपुऱ्या माहितीच्या कार-णाने 19 विद्यापीठांची प्रश्नावली विचारात घेतली नाही. उरली 40 विद्यापीठे. त्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारावर काढलेले निष्कर्ष म्हणजे उपरिनिर्दिष्ट अहवाल आहे. महत्त्वाचे म्हणजे, पदव्युत्तर वर्ग घेणाऱ्या महाविद्यालयांची संख्या बरीच मोठी असल्यामुळे त्यांचा अंतर्भाव या प्रकल्पात केला गेला नाही.

या अहवालाला आकार देणारी 40 विद्यापीठे पुढीलप्रमाणे : (1) अलाहाबाद, (2) शिवाजी, (3) कुरुक्षेत्र, (4) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा, (5) केरळ, (6) भावनगर, (7) राजस, (8) बरद्वान, (9) काश्मीर, (10) गुरू नरेंद्र देव, (11) जवाहरलाल नेहरू, (12) विक्रम, (13) अरुणाचल, (14) विद्यासागर, (15) रोहिलखंड, (16) चित्र-कूट, (17) वेंकटेश्वरा, (18) हिमाचल प्रदेश, (19) महाराजा सयाजीराव, (20) मद्रास, (21) मदर तेरेसा, (22) श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला, (23) मोहनलाल सुखाडिया, (24) बाक-तुल्ला, (25) त्रिपुरा, (26) मुंबई, (27) विश्व-भारती, (28) जम्मू, (29) उस्मानिया, (30) कल्याणी, (31) बनारस हिंदू, (32) कुमाऊँ, (33) मदुराई, (34) रवीशंकर शुक्ल, (35) कलकत्ता,

(36) राणी दुर्गावती, (37) जे. एन. व्ही., जोधपूर, (38) गुजरात, (39) डी. ओ. ई., पंजाब, (40) गुवाहटी. ही संख्या केवळ 40 असली तरी देशाची प्रातिनिधिक होण्याइतपत विविध भौगोलिक प्रदेशांचे प्रतिनिधित्व करतात हे सहज ध्यानात येईल. आता महत्त्वाच्या निष्कर्षांकडे वळू.

## 3

### अध्यापकवर्ग

प्राध्यापक, प्रपाठक, अधिव्याख्याते आणि इतर प्रवर्गातील अध्यापकांच्या नियोजित जागा किती आणि प्रत्यक्षात भरल्या आहेत किती, अध्यापकांची अर्हता व अनुभव अशा बाबींसंबंधीची वस्तुस्थिती प्रत्येक प्रवर्गानुसार (category) मांडलेली आहे.

### 3·1 प्राध्यापक (Professors)

या विद्यापीठांना सरासरी 2·75 प्राध्यापक नेमण्याची व्यवस्था करून दिलेली असताना प्रत्यक्षातील नेमणूक झालेल्या प्राध्यापकांची प्रतिविद्यापीठ सरासरी **2·08 होती. हे आकडे** एक अनुकूल बदल स्पष्ट करतात. **सत्तर आणि ऐंशीच्या** दशकात विद्यापीठांच्या **अर्थशास्त्र** अधिविभागांत प्राध्यापक पदाचा सामान्यतः एकच अध्यापक असावयाचा. नव्वदीमध्ये ती स्थिती बदलून ही संख्या वाढली आहे ही स्वागतार्ह घटना मानली पाहिजे. मात्र दुसऱ्या बाजूने पाहिल्यास, प्रत्यक्षात मंजूर जागांपेक्षा कमी जागा भरल्या गेल्या आहेत; त्या सरासरी 0·67 ने कमी आहेत. खरे तर, अर्थशास्त्र अधिविभागांच्या दृष्टिपथातील गरजा सुव्यवस्थितपणे भागवावयाच्या असतील तर प्राध्यापक पदाच्या सरासरीने आणखी 0·88 जागा भरल्या जाणे आवश्यक आहे. या पदाच्या जागा भरण्याच्या बाबतीतही विविध विद्यापीठांच्या अधिविभागांत बरीच तफावत आहे.

यासंदर्भातील आणखी माहिती सूत्र करणारी म्हणावी लागेल. सर्वेक्षणातील 40 पैकी 5 विद्यापीठांत (12·5 टक्के) प्राध्यापक पदाची तरतूद असूनदेखील एकही प्राध्यापक नेमला गेला नव्हता. इतर 14 विद्यापीठांत (35 टक्के) प्राध्यापकांच्या मंजूर पदांपेक्षा कमी पदे भरलेली होती. प्राध्यापक पदे देण्यातही विद्यापीठ अनुदान मंडळाने विषमता बरीच राखली आहे. अधिविभागात सरासरीने जेवढी प्राध्यापक पदे असावयाला पाहिजे असतात त्यापेक्षा कमी पदांना मान्यता असलेली 25 विद्यापीठे होती, आणि जास्त पदांना मान्यता असलेली उर्वरित 15 विद्यापीठे होती. या संदर्भातील प्रमाणित विचलन (**Standard deviation**) मूल्य 2·80 होते. पदे मिळाली असली तरी ती भरण्याच्या बाबतीत बरीच उदासीनता आढळली. फक्त 10 विद्यापीठांनी सर्वसामान्य सरासरीपेक्षा अधिक होतील इतक्या प्राध्यापक पदाच्या जागा भरल्या होत्या तर उर्वरित 30 विद्यापीठांनी (75 टक्के) त्या सरासरीपेक्षा कमी जागा भरण्यातच स्वतःला धन्य मानले होते.

पन्नास टक्के विद्यापीठांत (20 विद्यापीठांत) प्राध्यापक पदाच्या जेवढ्या मंजूर जागा होत्या, त्या सर्व भरलेल्या होत्या. विशेष म्हणजे, एका विद्यापीठात प्राध्यापक पदाची मंजूर जागा नसतानादेखील एका प्राध्यापकाची नियुक्ती केलेली होती! या सर्व माहितीवरून एक गोष्ट स्पष्ट होते की, सर्वेक्षणांतर्गत विद्यापीठांपैकी 50 टक्के विद्यापीठांतून प्राध्यापक पदावरील ज्येष्ठ व्यक्तींच्या मार्गदर्शनाअभावी आणि नेतृत्वाअभावीच अर्थशास्त्राचे अध्यापन आणि संशोधनकार्य चालू होते!! हे टाळावयाचे असेल तर पदासाठीची मान्यता अथवा पदाची रिक्तता आणि या पदावर होणारी भरती यामधील कालापव्यय कमीत कमी राहील याची दक्षता विद्यापीठ प्रशासनाने अगदी आवर्जून घेतली पाहिजे. या जागा न भरण्यातही काही राजकारण असते हेही ध्यानात घेतले पाहिजे. काही केन्द्रीय व राज्य विद्यापीठांनी काटकसरीच्या सबबीखाली प्राध्यापक पदांच्या जागा मंजूर असूनदेखील रिक्त ठेवल्या. जिथे प्रपाठक पदावरील व्यक्ती विभाग प्रमुख म्हणून काम करीत होती त्या व्यक्तीने यथाकाल स्वतःलाच प्राध्यापक पदावर बढती मिळविता यावी या हेतूने प्राध्यापक पद भरले जाणार नाही अशी व्यवस्था केलेली असते. अर्थशास्त्र अधिविभागातील कामाचा ताण कमी करण्यासाठी तसेच अध्ययन आणि संशोधन ही कामे सुरळितपणे मार्गी लावण्यासाठी सर्वेक्षणातील 24 विद्यापीठांतील अर्थ–

शास्त्र अधिविभागांत आणखी एक प्राध्यापकाचे पद वाढले पाहिजे. त्यांच्याकडे सद्यःस्थितीत एखादा प्राध्यापक आहे किंवा नाही याचा या शिफारशीशी संबंध नाही. ही अधिविभागांची दृष्टिपथातील गरज असल्याने तिच्याकडे विद्यापीठांनी काणाडोळा करू नये. थोडक्यात, विद्यापीठांतून प्राध्यापक पदासाठी जेवढ्या जागांची गरज आहे त्यापेक्षा कमी जागा उपलब्ध होतात आणि भरल्या जातात ही वस्तुस्थिती आहे.

### 3·2 **प्रपाठक** (Readers)

विद्यापीठांच्या अधिविभागांकरिता सरासरीने 4·6 प्रपाठकांच्या जागा मंजूर झालेल्या होत्या, त्यापैकी 3·95 जागाच भरल्यामुळे सरासरीने 0·65 जागा रिक्त होत्या. प्राध्यापक पदांशी तुलना करता, प्रपाठकांच्या भरलेल्या जागा 1·7 पट तर रिक्त जागा 1·9 **पट अधिक होत्या.** त्याचप्रमाणे प्राध्यापकांच्याप्रमाणेच **प्रपाठकांच्या बाबतीतही पदांना मान्यता देताना विद्यापीठ अधिविभागामध्ये विषमता आढळते. यासंदर्भातील प्रमाणित विचलनाचे** मूल्य 4·085 **इतके जास्त होते यावरून वस्तुस्थितीची जाणीव व्हावी. वास्तवात** प्रपाठकांच्या मंजूर जागांच्या सरासरीपेक्षा अधिक जागा 15 विद्यापीठांत मंजूर झालेल्या असून भरलेल्या जागांच्या सरासरीपेक्षा अधिक जागा 14 विद्यापीठांत भरलेल्या आहेत. हा तपशील विषमतेचा निदर्शक आहे.

याबाबतीत आणखी तपशील उद्बोधक आहे. अरुणाचल प्रदेश, मदुराई, चित्रकूट आणि गुजरात विद्यापीठ या चार विद्यापीठांमध्ये अर्थशास्त्र अधिविभागात प्रपाठक या पदावर कुणीच नव्हते. बाकी 36 विद्यापीठांपैकी 17 विद्यापीठांत (42·5 टक्के) मंजूर पदांपेक्षा कमी पदे भरलेली होती. ती लवकरात लवकर भरली जावीत अशीच अपेक्षा करणे उचित होईल. प्राध्यापकांची आणि प्रपाठकांची मंजूर पदे आणि प्रत्यक्षात भरलेली पदे यांच्या बाबतीत वस्तुस्थिती पूर्णपणे समाधानकारक नसली तरी प्राध्यापक पदांपेक्षा प्रपाठक पदांची स्थिती खूपच बरी होती असे म्हणावे लागते. प्रपाठक ही अध्यापक संरचनेच्या उतरंडीमधील मधली फळी असते. तिची काळजी प्राध्यापकांच्या तुलनेने बऱ्यापैकी घेतलेली होती असे म्हणता येईल. कारण, बऱ्हंशी विद्यापीठांतून मंजूर पदे आणि भरलेली पदे यांच्यातील फरक फारच थोडा होता. उदाहरणार्थ, राजस्थान विद्यापीठाने मंजूर 16 पदांपैकी 15 पदे भरलेली होती. बरद्वान, जवाहरलाल नेहरू, जे. एन. व्ही. (जोधपूर) आणि पंजाब (चंदीगढ) या विद्यापीठांतही अशीच स्थिती होती. मोहनलाल सुखाडिया आणि श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी ही विद्यापीठे मात्र अपवादात्मक म्हणावी लागतील. त्यांच्याकडे प्रपाठकांच्या मंजूर पदांपेक्षा भरलेली पदे जास्त होती. सुखाडियामध्ये प्रपाठकांची 4 पदे आणि नाथीबाई ठाकरसीमध्ये 2 पदे होती. त्याना मंजुरी नव्हती. सर्वेक्षणातील 40 पैकी 17 (42·5 टक्के) विद्यापीठांमध्ये मात्र सर्व मंजूर पदे भरलेली होती.

### 3·3 **अधिव्याख्याते** (Lecturers)

प्राध्यापक आणि प्रपाठक यांच्यापेक्षा अधिव्याख्यात्यांची परिस्थिती अधिक चिंताजनक आढळली. यासंबंधातील आकडेवारीवरून याचे प्रत्यंतर येईल. सर्वेक्षणातील 40 विद्यापीठांच्या अर्थशास्त्र अधिविभागांतील अधिव्याख्यात्यांच्या मंजूर पदांची सरासरी 5·7 असताना सरासरीने 3·7 पदेच भरली गेली होती. भरलेल्या पदांची ही सरासरी प्रपाठकांच्या अशा सरासरीपेक्षा कमी होती. विचाराधीन 40 विद्यापीठांपैकी केवळ 16 विद्यापीठांत अधिव्याख्यात्यांच्या पदांच्या सरासरीपेक्षा जास्त पदे होती. आणि 16 विद्यापीठांत भरलेल्या पदांच्या सरासरीपेक्षा जास्त पदे भरलेली होती. मंजूर पदे व भरलेली पदे यांच्याबाबतीत विद्यापीठांमध्ये बरीच विषमता होती हे या अनुषंगाने काढलेल्या 3·61 या प्रमाणित विचलनाच्या मूल्यावरून ध्यानात येईल. तीन विद्यापीठांत (7·5 टक्के) एकही अधिव्याख्याता नव्हता; त्यांच्याकडे फक्त प्रपाठक व प्राध्यापक होते. राहिलेल्या 37 विद्यापीठांपैकी 23 विद्यापीठांत (57·5 टक्के) मंजूर पदांपेक्षा कमी पदे भरलेली होती. तर 14 विद्यापीठांत भरलेली पदे एकतर मंजूर पदांएवढीच अथवा त्याहून अधिक होती. यासंदर्भात आश्चर्याची गोष्ट म्हणजे उस्मानिया विद्यापीठात मंजुरी नसतानादेखील अधिव्याख्यात्यांची 10 पदे भरलेली होती.

अधिव्याख्यात्यांची पदे भरण्याच्या बाबतीत

विचार करावयाला लावेल अशी प्रवृत्ती पुढे आलेली आहे. अध्यापकांना आपल्या सेवाकालात वरच्या पात-ळीवरील मंजूर व रिक्त पदे उपलब्ध नाहीत म्हणून प्रपाठक आणि अधिव्याख्याता पदावरच वर्षानुवर्षे अड-कून राहावे लागावयाचे. ही कोंडी फोडण्यासाठी आणि अध्यापकांना सहजपणे वरिष्ठ पदावर जाता यावे यासाठी विद्यापीठ अनुदान मंडळाने 'गुणवत्ता बढती योजना' (merit promotion scheme) पुढे आणली. त्यानु-सार अधिव्याख्यात्याला प्रपाठक बनण्याचा आणि प्रपाठकाला प्राध्यापक बनण्याचा मार्ग खुला झाला. मंजूर पदांशी याचा संबंध नव्हता. मात्र यात एक महत्त्वाची तरतूद करण्यात आली की, अशी शिडी चढून गेलेली व्यक्ती या अधिविभागातून कोणत्याही कारणाने बाहेर पडली की ते पद पुन्हा अधिव्याख्यात्याचे/प्रपाठकाचे गणले जाईल. या नव्या योजनेचा खुल्या बढतीच्या (open promotion) प्रस्थापित पद्धती-वर प्रतिकूल परिणाम झालेला आढळतो. खरे तर, खुल्या बढतीच्या प्रक्रियेत दोनतीन व्यक्तींचा लाभ होतो. प्रपाठकाला प्राध्यापक पदावर बढती मिळाली की प्रपाठकाचे एक पद रिक्त होते. त्या पदावर एखादा अधिव्याख्याता आला म्हणजे अंतिमतः एका नव्या व्यक्तीला अधिव्याख्याता पदावर येता येते. आता गुण-वत्ता बढतीच्या कारणाने प्रस्थापित साखळी तुटली गेली आहे आणि परिणामी वरिष्ठ श्रेणीतील अध्या-पकांच्या तुलनेने अधिव्याख्यात्यांची सरासरी घटली आहे. अधिव्याख्यात्याच्या पदावर येण्यासाठी एम. फिल., पीएच. डी. अशी अर्हता ऐंशीच्या दशकात अनिवार्य मानल्यामुळे ती मिळविलेले पदवीधर मोठ्या प्रमाणा-वर तयार झाले, मात्र त्यांना विद्यापीठांतील अर्थशास्त्र अधिविभागांत अधिव्याख्याता म्हणून रुजू होण्याची दारे जवळजवळ बंद झाली. याची परिणती अधिविभा-गांतील सर्व श्रेणींच्या एकंदर अध्यापकांमध्ये अधि-व्याख्यात्यांचे प्रमाण सरासरीने 40·96 टक्के एवढेच राहिले. एवढेच नव्हे तर, सर्व श्रेणींच्या भरलेल्या पदांमध्ये अधिव्याख्यात्यांच्या पदांचे प्रमाण 38·05 टक्के होते. संदर्भातील 40 विद्यापीठांत अधिव्याख्यात्यांची एकंदर 204 पदे मंजूर असताना प्रत्यक्षात 148 पदेच भरली गेली होती; 56 पदे (20·7 टक्के) रिक्त होती. या सगळ्या घडामोडींचा अंतिम परिणाम अर्थशास्त्र विषयात अर्हता मिळविलेल्या व्यक्तींना रोजगार नाकार-ण्यावर होतो आहे. अधिव्याख्यात्यांची बरीच पदे रिक्त राहतात, एम. ए. च्या वर्गात प्रवेश घेणाऱ्या विद्या-र्थ्यांची संख्या वाढते आहे, संशोधनाकडे जास्त विद्यार्थी वळताहेत आणि अधिव्याख्याता पदाची अर्हता प्राप्त करणाऱ्या व्यक्तींची संख्या वाढते आहे. यातूनच अर्हताप्राप्त व्यक्तींच्या बेकारीची समस्या गंभीर होते आहे.

अधिव्याख्यात्यांची सर्व पदे न भरण्याचा आणखी एक शैक्षणिक परिणाम आढळतो, त्याकडे दुर्लक्ष होता कामा नये. अधिव्याख्यात्यांची पदे रिक्त राहिली तर अध्ययनाच्या कामाचा प्राध्यापक व प्रपाठक यांच्या-वरील बोजा वाढून त्यांच्या संशोधन कामाला खीळ बसते, दर्जाही घसरतो. महत्त्वाचे म्हणजे, प्राध्यापक व प्रपाठक यांची पदे या ना त्या कारणाने रिक्त राहतात तेव्हा अधिव्याख्याता पदावर काम करणाऱ्या व्यक्तीं-मधून ती भरता येणे सोईस्कर असते. अधिव्याख्यात्यांची पदे मोकळी राहिली तर कामावर असलेल्या सर्वच श्रेणीतील अध्यापकांवर कामाचा ताण पडतो एवढेच नव्हे तर अध्यापनाचे विशेषीकरण, नवनवे अभ्यास-क्रमही शिकविण्याचा दुर्धर प्रसंग ओढवतो. संशोधनाचे काम सामान्यतः वरिष्ठ श्रेणीतील अध्यापकांकडून होत असते; शिकविण्याच्या कामाचा बोजा वाढल्यास त्यांना संशोधन कामाकडे पुरेसे लक्ष पुरविणे शक्य होत नाही.

अधिव्याख्यात्यांच्या समस्येला एक आर्थिक बाजूही आहे. अलीकडच्या काही वर्षांतील नवीन आर्थिक धोरणामुळे विद्यापीठांचे अर्थसंकल्प 1990–91 च्या पातळीवर गोठविलेले आहेत, त्यामुळे विद्यापीठांना पैशाची चणचण भासू लागली आहे. यातून बाहेर पडण्यासाठी विद्यापीठे काटकसरीचे उपाय अवलंबितात. त्याचा एक जोरदार फटका अध्यापक नियुक्तीला बसतो; तो शिरावर घेण्याचे पातक अधिव्याख्याता गटावर येते. काटकसरीचे उपाय म्हणून अधिव्याख्या-त्यांची काही पदे रिक्त ठेवली जातात. प्राध्यापक अथवा प्रपाठक यांची पदे रिक्त ठेवण्यापेक्षा अधिव्याख्यात्यांची पदे रिक्त ठेवणे विद्यापीठांनाही सोईचे असते. कारण सहज ध्यानात येईल. वरिष्ठ पदे रिक्त ठेवण्याचा विचार विद्यापीठ प्रशासनाने केला तर अधिव्याख्याता/प्रपाठक पदावर काम करणाऱ्या व्यक्तींच्या बढतीच्या संधी हिरावून घेतल्या जातात. ते घडू नये म्हणून

अध्यापक वर्गाकडून प्रशासनावर संघटित दबाव येतो. प्रशासनालाही या कटकटी टाळावयाच्या असतात. अधिव्याख्यात्यांच्या रिक्त पदांसाठी अशा आपत्तीला तोंड द्यावे लागत नाही. कारण, या पदांवर येऊ इच्छिणाऱ्या व्यक्ती विद्यापीठ व्यवस्थेच्या बाहेर असल्याने त्याना दबावतंत्राचा मार्ग उपलब्ध नसतो.

## 3·4 संशोधन सहकारी व सांख्यिकी सहायक

संशोधन सहकाऱ्यांची स्थिती अधिव्याख्यात्यांहूनही दयनीय आहे. विचाराधीन 40 विद्यापीठांपैकी केवळ 3 विद्यापीठांतच संशोधन सहकाऱ्याचे (Research Associate) पद मंजुरीनुसार भरलेले होते; 6 विद्यापीठांत हे पद मंजूर झालेले होते; बाकी 31 विद्यापीठांपैकी 12 विद्यापीठांत या पदाला मंजुरी नसतानाही ते भरलेले होते. याठिकाणी एक मुद्दा महत्त्वाचा आहे. विद्यापीठ अनुदान मंडळाच्या 1986 च्या धोरणानुसार बऱ्याच विद्यापीठांनी संशोधन सहायक पदाची दर्जात्मक पदोन्नती करून अर्हताप्राप्त व्यक्तींना अधिव्याख्याता पदावर नेमले आहे. आता यामुळे विद्यापीठ अधिविभागात अध्ययन व संशोधन करण्याची मनीषा बाळगून संशोधन सहायकाच्या पायरीवरून पुढे सरकू इच्छिणाऱ्यांना आता फारसा वाव राहिला नाही. त्यांच्या रोजगाराचा प्रश्न यातून सुटणार नाही. वास्तव धोरणात्मक बदलाची गरज आहे, तीही तातडीने.

संशोधन सहकाऱ्यांपेक्षा संशोधन सहायक (research assistant) व सांख्यिकी सहायक (statistical assistant) यांची स्थिती थोडी बरी आहे. या प्रवर्गातील व्यक्तींची संख्या तशी लहान आहे, कारण 23 विद्यापीठांत या प्रवर्गातील व्यक्तीच नाहीत आणि राहिलेल्या इतर विद्यापीठांपैकी अनेक विद्यापीठांत या पदासाठी मंजुरीदेखील नाही.

## 3·5 अध्यापक वर्गाचे साकलिक चित्र

प्राध्यापक पदापासून ते संशोधन सहायकापर्यंतची उतरंड विद्यापीठांतून कशा रीतीने रचलेली आहे त्याचा आढावा घेतल्यानंतर एक निष्कर्ष स्पष्ट होतो. विद्यापीठांच्या अर्थशास्त्र अधिविभागांमध्ये अध्यापकवर्ग गरजेपेक्षा कमी असून एकंदर संरचनेत वरिष्ठ पदांच्या बाजूने (प्राध्यापक व प्रपाठक) तो अधिक जड असा राखला गेल्याने तळाच्या बाजूकडे हलका झाला आहे. कनिष्ठ पदे जेवढी मंजूर होतात आणि भरली जातात त्यापेक्षा रिक्त असणारी आणि भरली जाणारी वरिष्ठ पदे संख्येने जास्त असतात. याची जाणीव पुढील तपशिलावरून होईल. प्राध्यापक पदांच्या बाबतीत भरलेल्या पदांचे मंजूर पदांशी गुणोत्तर 0·75 होते; याचा अर्थ, रिक्त पदांचा दर 25 टक्के होता. प्रपाठकांच्या बाबतीत हेच गुणोत्तर 0·86 असून रिक्त पदांचा दर 14 टक्के होता. याउलट, अधिव्याख्यात्यांच्या बाबतीतले गुणोत्तर 0·65 असून रिक्त पदांचा दर 35 टक्के होता. या रीतीने दर मंजूर पदामागे भरलेली पदे कनिष्ठ पदापासून वरिष्ठ पदांकडे वटत (?) गेलेली आढळतात. परिणामी, रिक्त पदांचा आपात (incidence) कनिष्ठ पदांपासून वरिष्ठ पदांकडे घटत जातो. मुळातच प्राध्यापक व प्रपाठक यांच्या संयुक्त पदसंख्येपेक्षा अधिव्याख्यात्यांची संख्या कमी आहे. त्यात भर म्हणून रिक्त पदांचा जास्त आपात अधिव्याख्यात्यांच्याच पदावर पडतो आहे. या कारणांमुळे अर्थशास्त्राचा शिक्षक बनण्यासाठी नव्यानेच या क्षेत्रात पदार्पण करू शकणाऱ्यांवर दुधारी शस्त्र चालते. पदे कमी आणि जी असतात त्यापैकी बरीच पदे रिक्त राहतात. यामुळे दीर्घकालात अध्ययन आणि संशोधन यांचा दर्जा खालावण्याचा बराच संभव आहे.

## 3·6 अध्यापकांचे शैक्षणिक चित्र

शिक्षणाच्या प्रक्रियेत शिक्षक हा अत्यंत महत्त्वाचा घटक असतो याबद्दल कुणाचेच दुमत होण्याचे कारण नाही. अर्थशास्त्राच्या पदव्युत्तर अभ्यास संरचनेत आर्थिक व्यवहारांच्या विविध पैलूंचे अध्यापन करावे लागते. त्या त्या पैलूमध्ये विशेषीकरण साध्य केलेले अध्यापक हेतुतःच अधिविभागात नेमले जातात. म्हणूनच असे विशेष अभ्यासक्रम शिकवू शकणारे अध्यापक पुरेशा संख्येने अधिविभागात असतील तसेच त्यांच्यामध्ये व्यावसायिक निष्ठा, बांधिलकी आणि उमेद असेल तरच त्यांच्याकडून चांगले विद्यार्थी निर्माण होऊ शकतात. त्याकारणाने या संदर्भात अध्यापकांची व्यावसायिक अर्हता व शैक्षणिक क्षेत्रातील कामगिरी एका बाजूने आणि त्या अध्यापकांच्या शिक्षण-कौशल्याचा अध्यापनकार्यात करून घेतला जाणारा उपयोग,

संशोधन कार्याचे आयोजन व मार्गदर्शन आणि अध्यापक व विद्यार्थ्यांचे संशोधन दुसऱ्या बाजूने, यावरूनच शिक्षणाच्या निर्मितीचा दर्जा ठरतो. विद्यार्थी शिक्षण संपवून बाहेरच्या जगात जाताना ज्ञानाची जी शिदोरी सोबत घेऊन जातात त्याचे स्वरूप, व्यापकता, सखोलता इत्यादींवरून त्या शिक्षणाचा दर्जा ठरतो. दुसऱ्या बाजूने, विद्यार्थ्यांची विषय समजून घेण्याची कुवत, मिळालेल्या ज्ञानाचे सटीक परीक्षण करण्याची सवय आणि समस्यांचे निराकरण करण्यासाठी तसेच धोरणांची आखणी करण्यासाठी सैद्धान्तिक साधनांचा वापर करण्याची कुवत यावरही शिक्षणाचा दर्जा अवलंबून असतो.

## 3·7 पीएच. डी. / एम फिल. पात्रतेचे अध्यापक

विशेषत: प्राध्यापक व प्रपाठक पदावर काम करणाऱ्या अध्यापकांची अर्हता आणि त्यांची शैक्षणिक कामगिरी यावरच प्रामुख्याने अर्थशास्त्र अधिविभागाचा नावलौकिक अवलंबून असतो. केवळ शैक्षणिक अर्हताच नव्हे तर त्यांच्या विशेषीकरणावरून आणि तज्ज्ञतेवरून अधिविभागातील अध्यापन आणि संशोधनाचा दर्जा काय आहे याचे मूल्यमापन केले जाते. या पार्श्वभूमीवर प्रस्तुत सर्वेक्षणामध्ये अध्यापकांची शैक्षणिक अर्हता आणि व्यावसायिक कामगिरी यांची माहिती संकलित केली गेली. पहिली आणि / अथवा त्यापेक्षा वरिष्ठ संशोधन पदवी असणे हा अध्यापकाच्या अध्यापन व संशोधन पात्रतेचा एक निकष ठरविण्यात आला. ज्या शिक्षकाने स्वत: काहीच संशोधन केलेले नसेल तो आपल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या संशोधन कार्यात योग्य रीतीने मार्गदर्शन करू शकणार नाही. संशोधनामुळे संशोधकाला त्याच्या विशेष क्षेत्रात सखोल ज्ञान मिळते एवढेच नव्हे तर त्याला क्लिष्ट तसेच बारकावे असलेल्या घटनांचे विश्लेषण करण्याचे कौशल्य प्राप्त होते. पर्यायाने या कौशल्याचा त्याच्या शिकविण्यावर जबरदस्त प्रभाव पडतो.

या विश्लेषणाच्या बैठकीनुसार सर्वेक्षणातील 40 विद्यापीठांच्या अर्थशास्त्र अधिविभागातील अध्यापक वर्गाची परिस्थिती कशी काय होती याचा मागोवा घ्यावयाचा आहे. चाळीसपैकी 5 विद्यापीठांच्या अर्थशास्त्र अधिविभागांत संशोधनाची पदवी नसलेल्या व्यक्ती प्राध्यापक पदावर काम करीत होत्या. या व्यक्ती ज्या काळात संशोधनापेक्षा हुशारी, शिकविण्याची क्षमता, ज्ञानाची खोली आणि प्राध्यापक पदासाठीची ज्येष्ठता या निकषांच्या आधारावर प्राध्यापक पदावर नेमणुका केल्या जात असत त्या काळातल्या होत्या अथवा त्यांना गुणवत्ता बढती योजनेखाली प्राध्यापक पदावर बढती मिळालेली असण्याची शक्यता आहे. इतर 35 विद्यापीठांत मात्र प्राध्यापक पदावर काम करणाऱ्या व्यक्तींनी त्याच अगर दुसऱ्या विद्यापीठाची पीएच. डी. पदवी मिळविलेली होती.

आता अधिविभागांतर्गतच विविध पदांसाठी माणसे तयार करण्याच्या (in-breeding) योग्यायोग्यतेचा विचार करू. या पद्धतीच्या आपाताची (incidence) प्रचीती या सर्वेक्षणातून मिळते. प्रथमत: प्राध्यापक पदाबद्दल. ज्या विद्यापीठांच्या अर्थशास्त्र अधिविभागांत प्राध्यापक काम करताहेत त्याच विद्यापीठांची पीएच. डी. पदवी मिळविलेल्यांची संख्या विदेशी विद्यापीठांतून पीएच. डी. पदवी मिळविलेल्या प्राध्यापकांच्या संख्येपेक्षा जास्त होती. तसेच काम करीत असलेल्या विद्यापीठाखेरीज इतर भारतीय विद्यापीठांतून पीएच. डी. पदवी मिळविणाऱ्यांपेक्षा विदेशी विद्यापीठांतून पीएच. डी. पदवी मिळविलेल्या प्राध्यापकांची संख्या मोठी होती. अधिविभागांतर्गतच माणसे तयार करण्याची पद्धतीच यातून प्रभावीपणे जाणवते. परंतु यामुळे दीर्घकालात अध्यापन व संशोधनाचा दर्जा खालावण्याचा संभव आहे. अलाहाबाद, लखनौ व बनारस हिंदु विद्यापीठांतील अर्थशास्त्र अधिविभाग एकेकाळी अग्रेसर होते आणि त्यांनी चांगला लौकिक मिळविला होता. परंतु त्यांनी आता आपला व्यावसायिक लौकिक गमावला आहे. अधिविभागांतर्गत पैदाशीच्या धोरणाचा कसा वाईट परिणाम होतो याचे ही विद्यापीठे म्हणजे बोलकी उदाहरणे आहेत. आपल्याच विद्यापीठाची पीएच. डी. पदवी मिळविलेल्या प्राध्यापक पदावरील व्यक्तींची संख्या खूप मोठी का असावी ? एक शक्यता अशी आहे की, या व्यक्ती प्रथमत: कनिष्ठ पदावर नियुक्त झाल्या असणार आणि तेव्हा त्यांच्याकडे पीएच. डी. पदवीची अर्हता नसणार. नोकरी करतानाच त्यांनी पीएच. डी. चा अभ्यास पूर्ण केला असणार तो अर्थशास्त्र अधिविभागातील शिक्षक-विद्यार्थी या भूमिकेतूनच. **अधिविभागांतर्ग पैदाशीचा**

हा प्रकार थांबविण्यासाठी एक महत्त्वाची उपाययोजना करावी लागेल. संबंधित अध्यापकाने ज्या विद्यापीठातून आपली पदवी प्राप्त केलेली असेल त्याखेरीज दुसऱ्या विद्यापीठातच त्याला पहिली नोकरी अथवा बढती मिळेल. असे केल्यानेच अध्यापक व विद्यार्थी यांची आंतर–विद्यापीठीय तसेच आंतर–प्रादेशिक व प्रदेशांतर्गत गतिक्षमता वाढविण्याचे महान उद्दिष्ट साध्य करता येऊ शकेलच परंतु त्याचबरोबर स्थानिक उमेदवाराचीच निवड करण्याबद्दलचा दबाव टाळता येईल.

अधिविभागांतर्गत पैदाशीचा परिणाम कसा झाला आहे ते आकडेवारीच्या साहाय्याने लक्षात यावे. ज्या विद्यापीठात प्राध्यापक काम करतात त्याच विद्यापीठाची पीएच. डी. पदवी प्राप्त केलेल्या प्राध्यापकांची सरासरी 1·325 होती, विदेशी विद्यापीठांची पदवी धारण करणाऱ्यांची सरासरी 0·525 होती तर इतर भारतीय विद्यापीठाची पदवी मिळविलेल्यांची सरासरी 0·675 होती.

हिमाचल प्रदेश, मदुराई, कलकत्ता व गुजरात विद्यापीठातील प्रत्येकी एक प्राध्यापक पदावरील व्यक्तीने त्याच विद्यापीठाची फक्त एम. फिल. पदवी मिळविलेली होती. बरद्वान विद्यापीठातील दोन प्राध्यापकांनी दुसऱ्या विद्यापीठातून एम. फिल. प्राप्त केली होती. कोणत्याही विद्यापीठातील प्राध्यापकाने विदेशी विद्यापीठाची एम. फिल. पदवी मिळविलेली नव्हती. प्राध्यापक पदासाठी व्यक्तींची निवड आणि बढती याबाबतीत कशा प्रकारे तडजोडी केल्या जातात हे यावरून ध्यानात येऊ शकेल.

आता प्रपाठक पातळीवरील अधिविभागांतर्गत पैदाशीचा विचार करू. चित्रकूट ग्रामीण विद्यापीठ व गुजरात विद्यापीठांत अर्थशास्त्रातील प्रपाठक नव्हते. उर्वरित 38 विद्यापीठांमध्ये त्याच विद्यापीठाची, इतर भारतीय विद्यापीठांची किंवा विदेशी विद्यापीठाची पीएच. डी. / एम. फिल. पदवी असलेले प्रपाठक काम करीत होते. यापैकी 27 विद्यापीठांत आपल्याच विद्यापीठाची पीएच. डी. पदवी घेतलेले प्रपाठक होते, 17 विद्यापीठांत इतर विद्यापीठांची पीएच डी. असलेले प्रपाठक होते आणि केवळ 7 विद्यापीठांतील प्रपाठकांकडे विदेशी विद्यापीठाची पीएच. डी. पदवी होती. यावरून स्वतःच्याच विद्यापीठातून पीएच. डी. मिळविलेल्यांची सरासरी 3, इतर भारतीय विद्यापीठांतून मिळविलेल्यांची सरासरी 0·625 तर विदेशी विद्यापीठांतून मिळविलेल्यांची सरासरी केवळ 0·25 होती.

त्याचप्रमाणे, केवळ चारच विद्यापीठांतील प्रपाठकांकडे त्यांच्याच विद्यापीठाची एम. फिल. पदवी होती, 5 विद्यापीठांतील प्रपाठकांनी इतर भारतीय विद्यापीठांची एम. फिल. घेतलेली होती तर कुणाकडेही विदेशी विद्यापीठाची पदवी नव्हती. म्हणजे यासंदर्भातही अधिविभागांतर्गत पैदाशीचाच प्रभाव आहे.

आता अधिव्याख्यात्यांकडे वळू. फक्त 5 विद्यापीठांनी एम. फिल. अथवा पीएच. डी. पदवी नसलेल्या व्यक्तींना अधिव्याख्याता पदावर नेमले होते. बाकी 35 विद्यापीठांपैकी 22 विद्यापीठांकडे स्वतःच्याच विद्यापीठाची पीएच. डी. असलेले अधिव्याख्याते होते, 7 विद्यापीठांकडे इतर भारतीय विद्यापीठाची पदवी धारण करणारे अधिव्याख्याते होते तर फक्त विश्वभारती विद्यापीठातच विदेशी विद्यापीठाची पीएच. डी. असलेले अधिव्याख्याते होते. त्याचप्रमाणे एम. फिल. पदवीधारक अधिव्याख्यात्यांची स्थिती पुढीलप्रमाणे होती : स्वतःच्याच विद्यापीठाची एम. फिल. असणारी विद्यापीठे – 8; इतर भारतीय विद्यापीठांची एम. फिल. असणारी विद्यापीठे – 7; विदेशी विद्यापीठांची एम. फिल. असणारी विद्यापीठे – 1 (विश्वभारती विद्यापीठ). याबाबतीतही अधिविभागांतर्गत पैदाशीचा प्रभाव स्पष्ट आहे.

संशोधन सहकाऱ्याच्या (research associate) पदाचे चित्र कसे आढळले ? फक्त कुरुक्षेत्र व रोहिलखंड विद्यापीठांत स्वतःच्याच विद्यापीठाची पीएच. डी. पदवी धारण करणाऱ्या व्यक्ती संशोधन सहायक पदावर काम करीत होत्या आणि केवळ कल्याणी विद्यापीठातील या पदावरील व्यक्तीकडे इतर भारतीय विद्यापीठाची पीएच. डी. पदवी होती. विदेशी विद्यापीठाचा पदवीधारक कुणाकडेही नव्हता. याखेरीज केवळ कल्याणी विद्यापीठानेच स्वतःच्याच एम. फिल. पदवीधारकाची संशोधन सहकारी पदावर नेमणूक केली होती इतर दोन प्रकारचे संशोधन सहकारी

कुठेही नव्हते. **अधिविभागांतर्गत पैदास आणि आंतर-विद्यापीठीय खुल्या गतिक्षमतेचा अभाव याचीच अनुभूती यातूनही मिळते.**

कुरुक्षेत्र, मुंबई, उस्मानिया, रवीशंकर व पंजाब या विद्यापीठांमध्ये स्वतःच्याच विद्यापीठाची पीएच. डी. मिळविलेले संशोधन व सांख्यिकी सहायक होते. इतर विद्यापीठाची पीएच. डी. / एम. फिल. असलेले सहायक कुठेही नव्हते. फक्त उस्मानियामध्ये स्वतःचाच एम. फिल. धारक सहायक होता.

## 3·8 विद्यार्थ्यांची नोंदणी

अध्ययन-अध्यापनाच्या प्रक्रियेत विद्यार्थी हा आवश्यक किंबहुना अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. या प्रक्रियेत त्याचे स्थान निविष्टी (input) व उद्‌विष्टी (output) या दोन्ही प्रकारांचे आहे. अध्ययन-अध्यापनाच्या कार्यातून निर्माण होणाऱ्या ज्ञानाचे वाहक विद्यार्थी असतात. म्हणूनच अधिविभागात किती विद्यार्थी प्रवेश घेतात यावरून पुढील गोष्टींवर प्रकाश पडतो: (अ) शिक्षणाच्या प्रक्रियेची स्थूल निर्मिती; (आ) शिक्षणाच्या विकासाचे संख्यात्मक आयाम; (इ) अध्यापन व संशोधनाचा दर्जा व पातळी आणि त्यामुळे अधिविभागाने मिळविलेला लौकिक आणि (ई) अधिविभागाची विद्यार्थी प्रवेशाची क्षमता आणि त्यावरून जाणवणारी अधिविभागाची शैक्षणिक शक्यता व आर्थिक समर्थता. यापुढे जाऊन विद्यापीठांच्या अर्थशास्त्र अधिविभागात किती विद्यार्थी प्रवेश घेतात हे पुढील बाबींवरून ठरते : (अ) विद्यापीठ कार्यक्षेत्रातील प्रवेशपात्र विद्यार्थ्यांची एकूण संख्या; (आ) विद्यापीठ कार्यक्षेत्रातील पदवीपर्यंतचे शिक्षण देणाऱ्या आणि पदव्युत्तर विद्यार्थ्यांचा पुरवठा करणाऱ्या महाविद्यालयांची संख्या; (इ) विद्यापीठ कार्यक्षेत्राबाहेरून आकर्षित केल्या जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या; सामान्यतः ज्या विद्यापीठांचा लौकिक कमी असतो अशा विद्यापीठ कार्यक्षेत्रातील विद्यार्थी लौकिक चांगला असलेल्या विद्यापीठात जाण्याची धडपड करतात; परिणामी कमी लौकिकाच्या विद्यापीठात साधारणतः ज्यांना बाहेरच्या ठिकाणी राहून शिक्षण घेणे परवडत नाही असेच विद्यार्थी प्रवेश घेतात; (ई) अभ्यासाचा विषय म्हणून अर्थशास्त्राची लोकप्रियता.

सर्व सामाजिक शास्त्रांमध्ये व मानव्य विद्यांमध्ये अर्थशास्त्र हा अधिक अमूर्त (abstract), काटेकोर व अवघड विषय आहे. अर्थशास्त्रीय विश्लेषणाची साधने म्हणून गणितीय, संख्याशास्त्रीय व अन्य सांख्यिकीय साधनांचा उपयोग जसा झपाट्याने वाढला तसा अर्थशास्त्र हा विषय अधिक क्लिष्ट बनला आहे. अलीकडचा अनुभव असा आहे की, गणितात चांगली गती असणारे विद्यार्थी हे माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरांवरच शास्त्र विद्याशाखेकडे वळतात. परिणामी सामाजिक शास्त्रांकडे वळणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मनात एकतर गणिताबद्दल भीती असते अथवा त्यामध्ये ते चांगले गुण मिळवू शकत नाहीत अथवा दोन्हीही घडते. परंतु गणितीय अर्थशास्त्र, अर्थमिती व संख्याशास्त्र हे विषय अर्थशास्त्राच्या विद्यार्थ्यांनी अर्थशास्त्राचा एक भाग म्हणून शिकलेच पाहिजे. असे असल्यामुळे अर्थशास्त्र हा कठीण पर्याय मानला जातो. याची परिणती म्हणजे, अलीकडच्या काही वर्षांत एक शास्त्र म्हणून अर्थशास्त्र अधिक समृद्ध झालेले असले तसेच त्याचा उपयोजित व सैद्धान्तिक शास्त्र म्हणून लौकिक वाढला असला तरी अभ्यासाचा एक विषय म्हणून लौकिक वाढला असला तरी अभ्यासाचा एक विषय म्हणून विद्यार्थ्यांमध्ये त्याची लोकप्रियता घटली आहे.

या संदर्भात अर्थशास्त्र अधिविभागांची स्वयंनिर्वाहिता (viability) कितपत आहे याचा शोध घेण्याचा खटाटोप केलेला आहे. सामान्यतः महाविद्यालयांची स्वयंनिर्वाहिता या संकल्पेचा बराच ऊहापोह झालेला आहे. तसेच स्वयंनिर्वाहिता नसल्यास त्याचा साधनसंपत्तीच्या परिव्ययावर काय परिणाम होतो यावर संशोधनही झालेले आहे. मात्र पदव्युत्तर अधिविभागातील विद्यार्थी संख्येच्या अनुषंगाने स्वयंनिर्वाहितेची अथवा संपूर्ण विद्यापीठाच्याच स्वयंनिर्वाहितेची कधीही चर्चादेखील झालेली नाही आणि त्यावर संशोधनही झालेले नाही. अलीकडच्या काही वर्षांत विद्यापीठांची तसेच अधिविभागांची संख्या वेगाने वाढलेली आहे. त्याचबरोबर नवीन आर्थिक धोरणाच्या कारणाने विद्यापीठातील अधिविभागांना साधनसंपत्तीची चणचण जाणवू लागली आहे आणि त्यातूनच अधिविभागातील स्वयंनिर्वाहितेपेक्षा कमी विद्यार्थी संख्या याची चर्चा अलीकडे प्रकर्षाने सुरू झाली आहे. एवढ्याकरिता प्रस्तुत सर्वेक्षणामध्ये प्रत्येक विद्यापीठातील अर्थशास्त्र

अधिविभागात एम. ए., एम. फिल. व पीएच. डी. अभ्यासक्रमासाठी किती विद्यार्थ्यांना प्रवेश दिला गेला याची गत तीन वर्षांची आकडेवारी गोळा करण्यात आली. त्यावरून त्या त्या अधिविभागाने पदव्युत्तर परिक्षेसाठी आणि संशोधन पदवीसाठी किती विद्यार्थ्यांना प्रवेश दिला याची स्वतंत्र सरासरी काढली गेली. त्यापुढे जाऊन या सर्वांची मिळून एक सरासरी काढण्यात आली. आता याचे निष्कर्ष काय मिळाले ते पाहू.

या निष्कर्षांसाठी नमुना 40 विद्यापीठांचा राहिला नाही. पदव्युत्तर वर्गासाठी किती विद्यार्थी संख्या होती याची माहिती 9 विद्यापीठांनी न दिल्याने या संदर्भातील नमुना आकार 31 विद्यापीठांचा झाला, तर एम. फिल. व पीएच. डी. संख्येची माहिती 5 विद्यापीठांकडून न मिळाल्याने या संदर्भातील नमुना आकार (sample size) 35 विद्यापीठांचा झाला हे लक्षात ठेवावे लागेल.

अर्थशास्त्र अथवा इतर कोणताही अधिविभाग विद्यापीठात सुरू करण्यासाठी कोणत्याही किमान विद्यार्थी संख्येचे बंधन घातलेले नाही. असे असले तरी, ही संख्या दोन वर्गामध्ये प्रत्येकी किमान 25 असावी असे सुचविले आहे यामागचे तर्कशास्त्र असे. प्रत्येक वर्गात किमान 25 विद्यार्थी मिळू शकत असतील तरच प्राथमिक शाळा सुरू करण्यास परवानगी मिळते. त्याचप्रमाणे जर एखाद्या शाळेतील विद्यार्थी संख्या सातत्याने प्रत्येक वर्गनिहाय 25 पेक्षा कमी राहिली तर ती शाळा बंद करण्याचा आदेश दिला जातो. या निकषावर केरळमध्ये 1990-91 पासून 293 शाळा बंद झालेल्या आहेत. याच धोरणानुसार बऱ्याच विद्यापीठ अधिविभागांमध्ये जर एखाद्या ऐच्छिक अभ्यासक्रमाकरिता (paper) विद्यार्थ्यांची संख्या किमान 5 नसेल तर तो अभ्यासक्रम सुरू करता येत नाही असे बंधन आहे. पदव्युत्तर शिक्षण देण्याचा परिव्यय प्राथमिक शिक्षणाच्या परिव्ययापेक्षा जास्त असतो. प्राथमिक शाळेला आवश्यक असणाऱ्या पायाभूत संरचना (infrastructure) पदव्युत्तर अधिविभागाच्या तुलनेने संख्यात्मकदृष्ट्या आणि व्याप्तीने कमी लागतात. म्हणून पदव्युत्तर वर्गातील प्रथम व द्वितीय वर्षातील किंवा प्रथम व तिसऱ्या सेमिस्टर अभ्यासकार्यातील विद्यार्थ्यांची किमान संख्या एकत्रितपणे 50 तरी असणे आवश्यक आहे. हा निष्कर्ष मानून अधिविभागांचा तपशील विचारात घेतल्यास यापेक्षा कमी विद्यार्थी संख्या असलेले अर्थशास्त्र अधिविभाग आर्थिकदृष्टया स्वयंनिर्वाही नाहीत असा निष्कर्ष काढता येईल.

या निकषांच्या आधारे पाहू गेल्यास 31 विद्यापीठांपैकी केरळ, रोहिलखंड, चित्रकूट, हिमाचल, मद्रास, मदर तेरेसा, त्रिपुरा व विश्वभारती या आठ विद्यापीठांच्या अर्थशास्त्र अधिविभागांत पहिल्या व तिसऱ्या सेमिस्टर अभ्यासकार्यातील एकंदर विद्यार्थी संख्या 50 पेक्षा कमी होती. मात्र या 31 विद्यापीठांतील विद्यार्थ्यांची प्रतिवर्ष सरासरी 1991, 1992 व 1993 मध्ये अनुक्रमे 58·56, 58·41 व 74·79 होती. विद्यार्थी संख्या 1991 व 1992 मध्ये 58 ला कुंठित झाली होती ती 1993 मध्ये एकदम वाढून 75 झाली. हे आकडे आपल्या किमान विद्यार्थी संख्येच्या निकषाला दुजोरा देतात. पदव्युत्तर वर्गात दोन्ही वर्षांत एकत्रितपणे किमान 50 विद्यार्थी संख्या असावी असा दंडक असणे हे चुकीचेही नाही किंवा असाध्यही नाही; कारण, नमुन्यातील विद्यापीठांची सरासरी संख्या 50 च्या निकषापेक्षा साधारणत: 20 टक्क्यांनी जास्त आहे. विद्यार्थी संख्येचा विचार अध्यापक संख्येच्या अनुषंगानेही करावयाला हवा. शिक्षक-विद्यार्थी गुणोत्तरामध्ये त्याचे प्रतिबिंब पडेल. याठिकाणी विद्यार्थी संख्या ही शिक्षकांच्या मंजूर पदांच्या संदर्भात विचारात घेतली पाहिजे. हा भाग पुढे येईलच. दरम्यान इथे नमुना सरासरीच्या संदर्भानुसार विद्यापीठातील विद्यार्थी संख्येचा विचार केल्यास 1991, 1992 व 1993 मध्ये अनुक्रमे 20, 20, 19 विद्यापीठांत विद्यार्थी संख्या नमुना सरासरीहून कमी होती. विद्यापीठांची ही टक्केवारी साधारणत: 66 येते.

आता एम. फिल. च्या वर्गाकडे वळू. तिथे किमान विद्यार्थी संख्या 5 ते 7 असणे अनुचित होणार नाही. कारण ही संशोधनाची पहिली पायरी आहे. प्रत्यक्षातील संख्या यापेक्षा कमी राहिली तर त्यामुळे विद्यापीठ अधिविभागाच्या विद्यापीठांतर्गत तसेच विद्यापीठांमधील लौकिकावर प्रतिकूल परिणाम होईल. अर्थशास्त्र विषयाची लोकप्रियताही घटेल. आणखी एक गोष्ट, योग्य अर्हता मिळविलेले पदव्युत्तर वर्गातील विद्यार्थी

नोकरीमध्ये गेले तर या पहिल्या संशोधन पदवीसाठी ते उपलब्ध होणार नाहीत. वास्तवात या अभ्यास–कार्यासाठी प्रवेश घेतलेल्यांपैकी बरेच विद्यार्थी नोकरी न मिळाल्यामुळे इकडे वळलेले असतात. त्यामुळे त्यांच्या दृष्टीने संशोधन पदवीचा हा अभ्यास म्हणजे नोकरी मिळेपर्यंतच्या दरम्यानच्या काळातील काला–पव्यय करण्याचा उद्योग असतो. या अभ्यासकार्यासाठी विद्यार्थी संख्या कमी असण्याचे आणखी एक कारण म्हणजे त्याच्या प्रवेश पात्रतेबाबत अधिविभागांनी वाढविलेली किमान गुणवत्ता आणि त्याची काटेकोर अमलबजावणी. या सर्व कारणांचा संकलित परिणाम पाहिल्यास, अध्ययन व संशोधन हे आपले जीवनकार्य ठरविण्याकडे पदव्युत्तर वर्गातील विद्यार्थ्यांचा कल कमी राहतो. एम.फिल. अभ्यासकार्यासाठीची नमुना विद्यापीठ अधिविभागांतील विद्यार्थ्यांची सरासरी संख्या 1991 1992 व 1993 मध्ये अनुक्रमे 8·53, 8·19 व 8·38 होती. या अनुषंगाने पाहिल्यास अनुक्रमे 21, 20 व 19 विद्यापीठांतील विद्यार्थी संख्या सामूहिक सरासरीपेक्षा कमी असल्याने ती विद्यापीठे याबाबतीत स्वयंनिर्वाही (viable) नव्हती. अर्थात विद्यापीठनिहाय विद्यार्थी संख्येत बरीच तफावत होती. त्यामुळे विद्यार्थी संख्येचे प्रमाणित विचलन (standard deviation) 1991 1992 व 1993 मध्ये अनुक्रमे 11·27, 10·44 व 8 86 होते.

पीएच. डी. अभ्यासकार्यासाठीची विद्यार्थी संख्येची वार्षिक सरासरी 1991, 1992 व 1993 मध्ये अनुक्रमे 4·97, 4·36 व 8·67 होती. यावरून नमुन्यातील 35 विद्यापीठांपैकी अनुक्रमे 23, 24 व 23 विद्यापीठे सरासरीपेक्षा खाली तर फक्त 12, 11 व 12 विद्यापीठे सरासरीच्या वर होती. याचे प्रमाणित विचलन अनुक्रमे 7·51, 6·54 व 12·81 होते. विद्या–पीठांच्या विद्यार्थी संख्येत कसा व किती फरक आहे याची यावरून कल्पना येईल.

किमान विद्यार्थी संख्येचे निकष ठरविले खरे, तथापि अर्थशास्त्राचे पदव्युत्तर अभ्यासकार्य पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांसाठीची मागणी समाजातूनच कमी झाली किंवा अध्यापन व संशोधनाची पातळी वाढल्याने विद्यार्थी संख्या घटली तर निकषापेक्षा कमी संख्येचे समर्थन करता येईल. सर्व सामाजिक शास्त्रांमध्ये अर्थ–शास्त्र हा विषय अधिक काटेकोर आणि समजण्याला काहीसा अवघड आहे. विशेषत: जे विद्यार्थी गणित विषयात कच्चे आहेत त्यांना आधुनिक अर्थशास्त्र पच–विणे कठीण जाते. अर्थशास्त्र विषयाच्या काटेकोरपणा–मुळे विद्यापीठातील इतर अधिविभागांच्या तुलनेने अर्थशास्त्र अधिविभागाला विशेष मानाचे स्थान मिळत असले तरी उपरिनिर्दिष्ट कारणामुळे विद्यार्थ्यांमध्ये अर्थशास्त्याबद्दलची ओढ कमी होण्याची शक्यता अधिक आहे. विशेषत: लहान शहरांतील विद्यापीठ अधि–विभागांत जिथेजिथे संख्यात्मक तंत्रे ( quantitative techniques ) हा अभ्यासक्रम अनिवार्य म्हणून शिक-विण्याचा अट्टाहास झाला तिथेतिथे अर्थशास्त्राची लोक-प्रियता उतरतीला लागली, परंतु त्याचबरोबर दुसऱ्या बाजूने अशा अधिविभागांतून पदवी घेऊन बाहेर पडले–ल्यांना नोकरी मिळविणे सहजसाध्य झाले. निदान नेहू ( NEHU ), शिलाँग, पंजाबी (पतियाळा) आणि एच. एस. गौर (सागर) या विद्यापीठांचा हा अनुभव आहे.

## 3·9 अध्यापक – विद्यार्थी गुणोत्तर

शिक्षण ही ज्ञानार्जन व अध्यापन अशी जोड प्रक्रिया आहे. विद्यार्थी ही ज्ञानार्जन प्रक्रियेतील निविष्टी असते याचा प्रभाव शिकविण्याचे प्रमाण आणि दर्जा यावर पडत असतो. वास्तव अध्यापक - विद्यार्थी गुणोत्तर किंवा दर अध्यापकामागे विद्यार्थी संख्या हा शिक्षण प्रक्रियांचा दर्जा दाखविणारा निर्देशक ठरतो. हे गुणो–त्तर शिक्षणाच्या सर्वच पातळ्यांवर समान ठेवलेले नाही. कारण, शिक्षणाच्या वरिष्ठ पातळीवर विशेषी–करण केलेल्या शिक्षकांची गरज असते, आणि कधीकधी तर अध्यापन व संशोधनासाठी अतिविशेषीकरणाचीही आवश्यकता असते. याची जाणीव ठेऊन, अर्थशास्त्र अधिविभागात विशेषीकृत अध्ययन व संशोधनाची गरज किंतपत आहे याचा एका बाजूने विचार करून आणि विद्यार्थी संख्या किती आहे याचा दुसऱ्या बाजूने विचार करून प्रत्येक अधिविभागात किती अध्यापकांची गरज आहे हे ठरविता येईल. अध्यापक – विद्यार्थी गुणोत्तर हे शिक्षणाच्या कनिष्ठ पातळीकडून वरिष्ठ पातळीकडे आणि सर्वसाधारण शिक्षणापासून व्यावसायिक शिक्षणा-कडे कमी होत जाते. भारतातल्या सर्वच विद्यापीठांतून अर्थशास्त्र विषयातील पदव्युत्तर अभ्यासकार्यासाठी वार्षिक परीक्षा पद्धतीमध्ये 8 अभ्यासक्रम (courses)

अथवा सेमिस्टर पद्धतीमध्ये 16 अभ्यासक्रम घेतलेले आहेत; त्यापैकी पहिल्या पद्धतीत 4 ते 6 आणि दुसऱ्या पद्धतीत 8 ते 12 अभ्यासक्रम अनिवार्य (compulsory) गटामधील आहेत. जरी ऐच्छिक अभ्यासक्रम शिकविण्यासाठी प्रत्येक अधिविभागात विशेषीकृत किंवा अतिविशेषीकृत अध्यापकांची आवश्यकता असली तरी अनिवार्य अभ्यासक्रम शिकविण्यासाठीसुद्धा विशेषीकृत अध्यापक असावे लागतात. म्हणून प्रत्येक अधिविभागाकडे किमान 6 ते 8 विशेषीकृत अध्यापक असणे ही त्या अधिविभागाची किमान गरज मानली पाहिजे.

आतापर्यंतच्या विश्लेषणामध्ये अधिविभागातील पदव्युत्तर विद्यार्थ्यांची किमान संख्या 50 असावी असे ठरविले. तसेच एम. फिल. व पीएच. डी. साठी एकत्रितपणे किमान 10 ते 15 विद्यार्थी नोंदविलेले असावेत असा निष्कर्ष काढला. एवढ्या संख्या असल्यास अधिविभाग आर्थिकदृष्ट्या स्वयंनिर्वाही बनतो. या पार्श्वभूमीवर अधिविभागातील अध्यापकांची संख्या सरासरीने 8 ते 10 असणे उचित होईल. नमुना सर्वेक्षणाचे अनुभव मात्र यापासून दूर जाणारे आढळतात. पदव्युत्तर वर्गाचे सरासरी अध्यापक–विद्यार्थी गुणोत्तर 19·06 होते. पूर्ण माहिती देणाऱ्या 32 विद्यापीठांची ही सरासरी आहे. तो आधार घेतल्यास, यापैकी 19 विद्यापीठांचे (59·38 टक्के) गुणोत्तर सरासरीपेक्षा कमी होते आणि 14 विद्यापीठांचे (40·62 टक्के) जास्त होते. दर अधिविभागामागे अध्यापकांची सरासरी 10·06 होती. त्यानुसार 35 पैकी 21 विद्यापीठांची सरासरी यापेक्षा कमी होती. मात्र आपण जर अधिविभागातील अध्यापकांची अपेक्षित संख्या आणि प्रत्यक्षातील संख्या यांची तुलना केली तर 5 विद्यापीठांमधील संख्या अपेक्षित संख्येपेक्षा कमी होती.

संशोधन विद्यार्थ्यांच्या बाबतीत, सरासरी अध्यापक–विद्यार्थी गुणोत्तर 5·21 होते. त्यानुसार 35 पैकी 21 विद्यापीठांत (57·14 टक्के) हे गुणोत्तर सरासरीपेक्षा कमी होते आणि 14 विद्यापीठात अधिक होते. दर अधिविभागामागे पीएच. डी. अध्यापकांची सरासरी संख्या 8.51 होती या आधारावर पाहिल्यास 35 पैकी 23 विद्यापीठांतील संशोधन मार्गदर्शकांची संख्या या सरासरीहून कमी होती. पदव्युत्तर तसेच संशोधन वर्गातील अध्यापक–विद्यार्थी गुणोत्तरात विद्यापीठनिहाय बरीच तफावत असल्याने त्यासंबंधीच्या दोन्ही प्रमाणित विचलनांचे मूल्य बरेच जास्त आहे. पदव्युत्तर व संशोधन पातळीवर प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची अलीकडच्या काही वर्षातील वाढती संख्या विचारात घेतल्यास प्रमाणित विचलनाच्या मोठ्या प्रमाणाकडे काळजीपूर्वक लक्ष देऊन त्यावर परिणामकारक इलाज केला पाहिजे.

## 4

## उच्च शिक्षणाचे दृश्य

### 4·1 उच्च शिक्षणाचे कार्य

विद्यापीठांच्या अर्थशास्त्र अधिविभागातील अध्यापनाचा व संशोधनाचा दर्जा सुधारावयाला हवा. परंतु हे करताना अधिविभागांकडून पुरविल्या जाणाऱ्या श्रमशक्तीचा दर्जा आणि समाजाकडून अपेक्षित असणारा श्रमशक्तीचा दर्जा यामधील दरी भरून काढली गेली पाहिजे. या सुधारणेच्या उपक्रमात पुढील स्वरुपाच्या तफावतींवर आपले लक्ष केन्द्रित करणे गरजेचे आहे. (1) वर्तमानकालात विद्यार्थ्यांना मिळणारे ज्ञान, ज्ञानामध्ये झालेल्या वाढीमुळे व प्रगतीमुळे वाढत जाणाऱ्या ज्ञानाच्या कक्षा आणि विद्यार्थ्यांना दिलेले आणि त्यांनी ग्रहण केलेले ज्ञान; (2) अर्थशास्त्राच्या शिक्षणाबद्दल लौकिकप्राप्त संस्थांमधून दिले जाणारे ज्ञान आणि इतर बहुतेक सर्व संस्थांमधून मिळत असलेले सर्वसामान्य ज्ञान. अधिविभागातील शिक्षणाचा दर्जा कसाकाय आहे त्याचा निकष म्हणजे एका बाजूने मुकर केलेला अभ्यासक्रम आणि दुसऱ्या बाजूने विद्यार्थ्यांना प्रत्यक्षात द्यावयाच्या ज्ञानसंभारातील तफावत. त्याचप्रमाणे अध्यापनकार्यातून दिलेल्या ज्ञानाचे स्वरूप व खोली आणि विद्यार्थ्यांच्या पदनी पडलेल्या ज्ञानाचे स्वरूप आणि व्याप्ती यामधील तफावत. या प्रकारच्या तफावतींचा मागोवा घेण्याचे साधन म्हणजे वेळोवेळी घेतल्या जाणाऱ्या चाचण्या व परीक्षा. यातून शिक्षणाच्या प्रक्रियेचे मूल्यमापन करता येते. अभ्यासक्रम बनविताना उच्च ज्ञानपातळी अपेक्षित ठेवली जाते आणि प्रत्यक्ष शिकविताना मात्र अध्ययनाची/अध्यापनाची पातळी खालची राहते असे अनेकदा घडते. याच पद्धतीने परि–

क्षेतील ज्ञानाची पातळी प्रत्यक्षात अभिप्रेत असलेल्या पातळीपेक्षा वरची/खालची राखली जाते. अशा वेळी परिक्षेतील अपेक्षित पातळी गाठण्यासाठी विद्यार्थ्यांना बरीच मेहनत घ्यावी लागते. एवढे करूनदेखील अध्ययन-अध्यापन आणि परीक्षा यांच्या पातळ्यांत तफावत राहून उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांची टक्केवारी कमी होते. मात्र गुणवत्ता मिळविणारे त्यातील मोजकेच विद्यार्थी चमकून दिसतात. दिल्ली विद्यापीठाचा विशेष अभ्यासक्रम (Honours programme) हे या संदर्भात एक नमुनेदार उदाहरण म्हणून सांगता येईल. या विद्यापीठात प्रवेश घेणारे अर्थशास्त्राचे विद्यार्थी सामान्यत: उच्च श्रेणीत पूर्वीची परिक्षा उत्तीर्ण झालेले असतानाही उच्च दर्जाच्या अभ्यासक्रमाला तोंड देता देता त्यांचीही दमछाक होऊन उत्तीर्णांची टक्केवारी कमीच राहते. उच्च शिक्षण हे अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्रांची मानवी भांडवलाची गरज भागविण्याच्या दृष्टीने उच्च विद्याविभूषित माणसे निर्माण करण्याच्या मर्यादित उद्दिष्टाने दिले जात नाही. सद्य:स्थितीतील तसेच भविष्यकालीन आव्हाने पेलण्यासाठी लोकांना माहिती व ज्ञान पुरविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य त्याला करावे लागते. सामाजिक-आर्थिक परिवर्तनाचा तो एक कारक घटक असतो. उच्च विद्याविभूषित माणसे समाजाची मते घडवीत असतात. अध्ययन व अध्यापनाच्या पातळ्या अनेक घटकांकडून ठरतात. पदव्युत्तर अभ्यासकार्याच्या दोन वर्षांत विद्यार्थ्यांना द्यावयाच्या आणि विद्यार्थ्यांनी पचवावयाच्या ज्ञानाचे स्वरूप आणि व्याप्ती हा सर्वांत महत्त्वाचा घटक म्हणून या संदर्भात उल्लेख करता येईल. द्यावयाच्या ज्ञानाची वेतणी ही निश्चित स्वरूपाच्या विशेषीकृत अभ्यासक्रमांतून (courses / papers) केलेली असते. प्रत्येक अभ्यासक्रमात गणितीय भागाचा समावेश असतो. अभ्यासक्रमांचे त्यामुळे तीन उपविभाग सांगता येतील : (1) सिद्धान्त, (2) विश्लेषणाची तंत्रे, पद्धती व प्रतिमाने, (3) भारतीय अर्थव्यवस्थेच्या विशिष्ट अंगाला स्पर्श करणारा अनुभवाधिष्ठित उपयोजित (applied) भाग. सिद्धान्तांचा अभ्यास हा गाभा असतो. यामध्ये व्यष्टीय अर्थशास्त्र (microeconomics), समष्टीय अर्थशास्त्र (macroeconomics), आंतरराष्ट्रीय व्यापार आणि सरकारी वित्त (public finance) यांचा प्रामुख्याने समावेश केला जातो, तसे करताना शेवटच्या दोन अभ्यासक्रमांत काही अंशी उपयोजित अंगाचाही समावेश केला जातो. अर्थात अभ्यासकार्याच्या संरचनेत विद्यापीठनिहाय फरकही आहेत.

दुसरा भाग विश्लेषणाची तंत्रे, पद्धती, संख्याशास्त्र, गणितीय अर्थशास्त्र, अर्थमिती (econometrics) व संक्रिया संशोधन (operational research) या घटकांचा समावेश केलेला असतो. तथापि यातील कोणता भाग किती प्रमाणात असावा तसेच याबाबतीत सक्तीचा भाग कोणता व किती प्रमाणात राहावा यासंबंधी विद्यापीठांमध्ये विविधता आढळते. उपरोक्त घटकांव्यतिरिक्त विकासाचे अर्थशास्त्र, आर्थिक नियोजन असे विषयदेखील या संदर्भात समाविष्ट केलेले असतात.

तिसरा भाग हा उपयोजित अभ्यासक्रमांचा असतो. यामध्ये उद्योगाचे अर्थशास्त्र, कृषी अर्थशास्त्र, सहकारी विपणन, शिक्षणाचे अर्थशास्त्र, श्रमशक्तीचे नियोजन, भारतीय अर्थव्यवस्थेतील समस्या, लोकसंख्याशास्त्र, अधिकोषण (banking), इत्यादी अनेकविध विषय मोडतात.

विविध अभ्यासक्रमांनी युक्त अशी संरचना प्रत्येक विद्यापीठाने आपापल्या पद्धतीने केलेली असली तरी त्या अभ्यासक्रमांचे घटक आणि त्यांचा आवाका याबाबतीत फार मोठी तफावत आढळत नाही. कारण, अर्थशास्त्राचा गाभा म्हणून समजल्या गेलेल्या अभ्यासक्रमांचा समावेश अनिवार्य अभ्यासक्रमांत सर्वच विद्यापीठांनी केलेला आहे. विशेष लक्षात घेण्यासारखी बाब म्हणजे, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेगवेगळ्या अभ्यास गटांनी वेळोवेळी शिफारस केलेल्या अभ्यासक्रमांच्या संरचनेचा अध्यापकांवर दूरान्वयानेच परिणाम झालेला आढळतो. जो काही अभ्यासक्रम आणि अभ्यासकार्याची संरचना बेतली जाते त्यामध्ये विद्यापीठांमध्ये तफावत आढळते याचे कारण म्हणजे संबंधित विषय भाग शिक्षणाच्या आकृतीबंधात कोणत्या टप्प्यावर असावा, परिक्षेत विचारले जाणारे प्रश्न किती सोपे किंवा क्लिष्ट असावेत आणि उत्तरपत्रिकांचे मूल्यमापन किती काटेकोरपणे करावे याबाबतीत विद्यापीठांचे दृष्टिकोन वेगवेगळे आहेत.

वास्तवातील अनुभव असा आहे की कधीकधी परिक्षेची पातळी उच्च राखली जाते मात्र तशाच पातळीवर अध्यापनाचे काम केले जात नाही. वर्गातील विद्यार्थी संख्या मोठी असेल तर अध्यापनकार्य आणखी पातळ होते अशी उदारणे आहेत. अध्यापन आणि परीक्षा या दोन्हींच्याही पातळ्या खालच्या असल्याचीही उदाहरणे सापडतात. विशेषतः अर्थशास्त्राचा सैद्धान्तिक भाग इतक्या अमूर्तपणे शिकविला जातो की त्याचा व्यावहारिक जीवनाशी काही संबंध असतो हे सोदाहरण दाखवून देण्याचा प्रयत्नच केला जात नाही. किंमत सिद्धान्त हे एक नमुनेदार उदाहरण म्हणून या संदर्भात सांगता येईल. बाजारातील अग्रेसर व्यवसाय संस्थाकडून होणारे किंमत निर्धारण, नव्या व्यवसाय संस्थांना उद्योगातील प्रवेश टाळण्यासाठीचे किंमत निर्धारणाचे धोरण, वगैरे विषय शिकविणे हा केवळ फळ्यावर मांडण्यापुरता मर्यादित विषय समजला जातो. खरे तर अशा विषय घटकांवर संशोधनातून बरीच माहिती उपलब्ध झालेली आहे; तिचा उपयोग करून उपयोजित व्यष्ठीय अर्थशास्त्राचा (applied microeconmics) आकृतीबंध तयार करावयाला पाहिजे. त्यामुळे अर्थशास्त्राच्या अध्यापनातील बऱ्याच उणीवा दूर होऊन अर्थशास्त्राचा अभ्यास वास्तववादी व रोचक होईल.

## 4·2 कार्यालयीन कर्मचारी वर्ग

अर्थशास्त्र अधिविभागातील अध्ययन-अध्यापनाच्या कामाचा दर्जा ठरविण्यात उपलब्ध असलेल्या व्यवस्थापकीय कौशल्याचाही हातभार लागत असतो. प्रशासकीय पाठबळ योग्य वेळेत मिळणे आणि योग्य प्रकारे मिळणे याला अधिविभागाच्या शैक्षणिक कामकाजात महत्त्वाचे स्थान आहे. शैक्षणिक प्रशासन ढिसाळ असल्यामुळे भारतातील विद्यापीठांचा दर्जा खालावला तर आहेच परंतु त्याचबरोबर काही विद्यापीठे सातत्याने आजारी झाली आहेत. शैक्षणिक प्रशासन हेदेखील एक कौशल्यपूर्ण काम असते याकडे दुर्लक्ष केल्याचा हा परिपाक आहे. कुलगुरू, प्र-कुलगुरू व कुलसचिव यांच्या नेमणुका बऱ्याचदा त्यांच्या कुवतीचा व कौशल्याचा विचार न करता राजकीय स्नेहसंबंधातून केल्या जातात. यामुळे लौकिक मिळविलेल्या विद्यापीठांचे तर प्रचंड नुकसान झालेलेच आहे परंतु त्याचबरोबर नव्या विद्यापीठांच्या शैक्षणिक अभिवृद्धीच्या आणि आपल्या क्षेत्रात पाय घट्ट रोवून उभारण्याच्या प्रयत्नांनाच खीळ बसली आहे. पुरेशी अर्हता, अनुभव, कौशल्य आणि दूरदृष्टी असलेल्या व्यक्तीच त्यांची जबाबदारी चांगल्या रीतीने पार पाडतात. कुलगुरू अध्यापक वर्गाचा विश्वास व आदर मिळवू शकले पाहिजेत शैक्षणिकदृष्ट्या समर्थ व संशोधनाकडे ओढा असलेल्या व्यावसायिक मंडळींना राजकारण्यांच्या मागे लागून अशा प्रशासकीय जागा मिळविण्याला वेळ नसतो, इच्छा नसते आणि अनेकदा यासंबंधीचे तंत्रही अवगत नसते. साहजिकच, जी मंडळी राजकारण्यांच्या मागेमागे राहून अशा प्रकारची उच्च पदे मिळवितात ती सर्वच त्या पदांसाठी लायक असतातच असे नाही.

बऱ्याचदा विद्यापीठांतील अध्यापक आणि कर्मचारी वर्ग यांच्यात तेढ असते असा अनुभव आहे. प्रत्येक घटक स्वतंत्र गटाप्रमाणे काम करतो, मात्र दोन्हींमध्ये सुसंवाद नसतो. प्रशासक वर्ग आपल्या संख्येच्या जोरावर आणि नियमांच्या चौकटीचा बाऊ दाखवून आपला वरचष्मा राखण्याचा प्रयत्न करतो. प्रशासनाकडून पुरेसे पाठबळ मिळत नाही, महत्त्वाचे कागदपत्र प्रशासकीय अधिकाऱ्यांकडे स्वतःच पोचविण्याची पाळी येते आणि अधिविभागाकडे उपलब्ध कर्मचारी वर्ग अपुरा आहे, अशा प्रकारच्या तक्रारी अध्यापक वर्गाकडून सातत्याने केल्या जातात. साध्या टंकलेखन व छायाप्रती मिळविण्याच्या सुविधाही पुरेशा मिळत नाही. याचा परिणाम अध्यापकांच्या संशोधनातील कार्यदक्षतेवर होतो. कारण, या गोष्टी एक तर त्यांना स्वतःला कराव्या लागतात अथवा पैसे खर्चून बाहेरून करून घ्याव्या लागतात.

वरील सर्व विवेचनाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठांतील अर्थशास्त्र अधिविभागांची माहिती संकलित करण्यात आली. त्यातून उघड झालेले महत्त्वाचे निष्कर्ष उद्बोधक ठरतील. अध्यापकांच्या कनिष्ठ पदांप्रमाणेच कारकुनांच्या पदांवरही जागा भरताना तेवढ्या सर्व पदांना मंजुरी नव्हती असे 40 पैकी 30 विद्यापीठांच्या बाबतीत आढळले. दहा विद्यापीठांत अर्थशास्त्र अधिविभागात एकाही कारकुनाची नियुक्ती केलेली नव्हती आणि या बहुतेक सर्व विद्यापीठांत नजिकच्या भविष्यात तरी अशी नियुक्ती होण्याची चिन्हे नव्हती. उस्मानिया व गुजरात विद्यापीठात कारकुनांची अनुक्रमे 3 व 2

पदे भरलेली होती, मात्र त्याना मंजुरी नव्हती. या परिस्थितीत अध्यापक व विद्यार्थी याना स्वतःच कारकुनी कामे करून घ्यावी लागतात.

चाळीसपैकी 23 विद्यापीठांच्या अधिविभागांत टंकलेखक नव्हता. त्यामुळे अध्यापक व विद्यार्थ्यांना एक तर आपल्या टंकलेखन कामाची स्वतःच व्यवस्था करावी लागते नाही तर विद्यापीठांतील टंकलेखनाच्या केन्द्रित व्यवस्थेतून काम करून घ्यावे लागते. बाकी 17 विद्यापीठांपैकी उस्मानिया व गुजरात विद्यापीठांत मंजुरी नसतानाही टंकलेखकाची नियुक्ती केलेली आहे. महत्त्वाचे म्हणजे, अधिविभागात किती अध्यापक, संशोधन विद्यार्थी, पदव्युत्तर विद्यार्थी आहेत याचा विचार न करता एकापेक्षा अधिक टंकलेखक कोणत्याही अधिविभागात नव्हता. याला काश्मीर व उस्मानिया ही दोनच विद्यापीठे अपवाद होती; त्यांच्याकडे प्रत्येकी 2 टंकलेखक होते. खरे तर, सर्वच विद्यापीठांच्या अधिविभागात किमान 2 टंकलेखकांची आवश्यकता आहे. एकच टंकलेखक अधिविभागाची टंकलेखनाची कामे सांभाळून अध्यापकांच्या टंकलेखनाच्या कामाला वेळ देऊ शकत नाही. यातून मार्ग काढण्यासाठी प्राप्त परिस्थितीत अर्धवेळ काम करणाऱ्या ज्यादा माणसाची नियुक्ती करावी लागेल किंवा पूर्णवेळ माणसे नेमून त्यांनी काही अधिविभागांची कामे वाटून घ्यावीत अशी व्यवस्था करावी लागेल. त्याचप्रमाणे, अधिविभागामध्ये ज्या ज्या वेळी कामाचा जास्त ताण असेल त्या त्या वेळी मध्यवर्ती प्रशासनाकडून अधिविभागाला माणसे उपलब्ध व्हावीत, यासाठी त्या प्रशासनात पुरेशी लवचिकता असली पाहिजे.

सर्वेक्षणाचा यासंदर्भातील महत्त्वाचा निष्कर्ष म्हणजे अर्थशास्त्र अधिविभागांकडे पुरेसा कर्मचारी वर्ग उपलब्ध नाही. जो आहे त्याचा बहुतेक वेळ अधिविभागाच्या प्रशासकीय कामातच जातो; अध्यापकांना त्यांच्या सेवा सामान्यतः मिळत नाहीत. मिळाल्याच तर त्या केवळ विभाग प्रमुखाला मिळतात, इतरांना नाही. संशोधनापेक्षा शिकविणे हेच अधिविभागांचे प्रमुख काम मानण्याचा एक काळ होता. आता संशोधनकार्यावरील भर वाढला आहे. त्यादृष्टीने पुरेसा कर्मचारी वर्ग मिळणे गरजेचे आहे.

### 4·3 संगणित्र व तत्सम सुविधा

रोहिलखंड व महाराजा सयाजीराव विद्यापीठांचा अपवाद वगळता कोणत्याही विद्यापीठात संगणित्र कर्मचारी ( computer operator ) नव्हता. सध्याच्या काळात अर्थशास्त्राच्या अध्यापन व संशोधनात सांख्यिकीय तंत्रांचा होत असलेला सर्रास वापर आणि उपयोजित संशोधनावर दिला जाणारा भर यामुळे संगणित्राचा वापर या कामासाठी झपाट्याने वाढत आहे. तथापि वास्तवातील परिस्थिती यादृष्टीने अत्यंत निराशाजनक आहे.

छायाप्रती काढण्याची सुविधा फक्त उस्मानिया विद्यापीठातच होती, मात्र यासाठी मंजुरी नव्हती. याउलट, नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठात मंजुरी असूनही ही सुविधा उपलब्ध झालेली नाही.

## 5

## शैक्षणिक कार्यक्रम

अध्यापक – विद्यार्थी व अध्यापक – अध्यापक यांच्यात वैचारिक देवाणघेवाण होत राहणे हे ज्ञानदानाच्या कामात आवश्यक आहे. हे फक्त विद्यापीठाच्या अधिविभागांतर्गत करून भागणार नाही. याला आंतर–विद्यापीठीय आयामही असला पाहिजे. याकरिताच अधिविभागात विविध प्रकारचे अभ्यास–पूरक कार्यक्रम राबवावयाला हवेत. यादृष्टीने माहिती संकलित करून वस्तुस्थितीवर प्रकाश टाकला आहे.

### 5·1 कार्यशाळा, चर्चासत्रे इत्यादी

चर्चासत्रे, अधिवेशने, निमंत्रितांची व्याख्याने, सर्वेक्षणे वगैरेंच्या माध्यमांतून अर्थशास्त्र अधिविभागातील अध्यापकांना व संशोधकांना आपल्या संशोधनाची मांडणी करण्याची आणि तज्ज्ञांशी विचारांची देवाणघेवाण करण्याची संधी लाभते. त्यामुळे संशोधन कार्याचा दर्जा उंचावण्यास मदत होते. जेव्हा असे उपक्रम बाहेरच्या संस्थांकडून / विद्यापीठांकडून आयो–

जित केले जातात तेव्हा त्यात सहभागी होण्यासाठी मुळातच फार थोड्या संशोधकांना निमंत्रणे मिळतात. त्यातही पुरेशा आर्थिक अनुपलब्धतेमुळे सर्वजण उपस्थित राहू शकत नाहीत. अधिविभागाने स्वतःच असे उपक्रम हाती घेतले तर मात्र तिथल्या सर्वच संशोधकांना सहभागी होता येते. आणखी महत्त्वाचे म्हणजे, त्यामुळे अधिविभागातील संशोधन कामाचा परिचय उपस्थितांना होऊन त्यातून अधिविभागाला अधिमान्यता मिळून त्याचा लौकिक वाढतो. अध्यापक–संशोधकांचेही नाव होऊन त्यांच्याकडे मार्गदर्शनासाठी नव्याने संशोधक येऊ लागतात. यादृष्टीने अर्थशास्त्र अधिविभागांतून असे उपक्रम 1991, 1992 व 1993 या तीन वर्षांत किती आयोजित झाले आणि यामध्ये तेथील अध्यापकांचा सहभाग किती होता याचा तपशील मिळवून त्यातून काही निष्कर्ष काढलेले आहेत.

सर्वेक्षणातील 40 विद्यापीठांपैकी 14 विद्यापीठांतील अर्थशास्त्र अधिविभागांनी उपरोक्त 3 वर्षांत कार्यशाळा / चर्चासत्रे आयोजित केली होती. यापैकी 3 विद्यापीठांनी राष्ट्रीय पातळीवरील, 6 विद्यापीठांनी प्रादेशिक पातळीवरील आणि 5 विद्यापीठांनी केवळ विद्यापीठ पातळीवरील कार्यशाळांचे आयोजन केले होते. या सर्वांमध्ये फक्त 8 विद्यापीठांतील अध्यापकांनी आपले शोधनिबंध सादर केले.

फक्त विश्वभारती व गुजरात विद्यापीठांच्या अर्थशास्त्र अधिविभागांनी प्रत्येकी एका आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन केले होते. काही विद्यापीठांनी राष्ट्रीय / प्रादेशिक पातळीवरील तसेच विद्यापीठ पातळीवरील अशा दोन्हीही प्रकारची चर्चासत्रे घेतली. तथापि बव्हंशी विद्यापीठांनी आपले कार्य अधिविभाग व विद्यापीठ पातळीवरील चर्चासत्रांपुरतेच मर्यादित ठेवले होते. सव्वीस विद्यापीठांची चर्चासत्रे त्यांच्याच अधिविभागापुरती मर्यादित होती. त्यांनी आंतरराष्ट्रीय / राष्ट्रीय / प्रादेशिक पातळीवरील चर्चासत्रे घेण्याचा प्रयत्न केला नाही. आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, प्रादेशिक, स्थानिक व विद्यापीठ पातळीवरील चर्चासत्रांचे दर विद्यापीठामागे सरासरी अनुक्रमे 0·05, 1·25, 0·92, 0·57 व 2·75 होती. फक्त 15 विद्यापीठांच्या अर्थशास्त्र अधिविभागांतील अध्यापकांनी त्यांच्या अधिविभागाच्या आणि / अथवा विद्यापीठातीलच इतर अधिविभागांच्या चर्चासत्रांत आपले शोधनिबंध सादर केले. याचा अर्थ, उर्वरित (26 पैकी) 11 विद्यापीठांतील अध्यापकांनी आपल्याच अधिविभागात झालेल्या चर्चासत्रातदेखील शोधनिबंध वाचण्याची तसदी घेतली नाही.

मोठ्या चर्चासत्रांचे आयोजन यशस्वीपणे करण्यासाठी मोठ्या संस्था, आर्थिक व मानवी पाठबळ, संरचनात्मक सुविधा व प्रशासकीय पाठबळ आवश्यक असते हे सर्वांना परिचित आहेच. त्यामुळेच फक्त 16 विद्यापीठांनीच (40 टक्के) अशा उपक्रमाला हात घातला याचे आश्चर्य वाटावयाचे कारण नाही. याचाच अर्थ, बव्हंशी विद्यापीठांचे अधिविभाग आवश्यक त्या संरचनात्मक सुविधा व आर्थिक पाठबळ यापासून वंचित आहेत. परंतु खरी चिंता करावी लागेल ती दुसऱ्याच एका गोष्टीची. अशा चर्चासत्रांमध्ये अधिविभागातील अध्यापकांचा कमी सहभाग. यामधून त्यांच्या संशोधनाचा कच्चा पाया, संशोधनाच्या ऊर्मीचा अभाव, प्रलोभनांची वानवा व संशोधन सुविधांचा अपुरेपणा ही यामागची कारणे म्हणून सांगता येतील. खरे तर, सर्वच अधिविभागांतून एम. फिल. व पीएच. डी. साठीचे संशोधनकार्य चालू असते. असे असूनही चर्चासत्रांतील अध्यापकांचा सहभाग निराशाजनक असावा याचे आश्चर्य वाटते. याबरोबर ध्यानात घेण्याची आणखी एक गोष्ट म्हणजे, बरेच अध्यापक फक्त आपल्या विद्यार्थ्यांच्या संशोधनकार्यात मार्गदर्शन देण्यातच गुंतलेले असून त्यांचे वैयक्तिक संशोधनकार्य शून्यच आहे. याची दखल घेतल्यास, **संशोधन मार्गदर्शक म्हणून मान्यता देण्यासंबंधीचे निकष बदलले पाहिजेत** हे स्पष्ट आहे. **या मान्यतेसाठी पीएच. डी. पदवीनंतर तीन वर्षे संशोधनाचा अनुभव आणि स्वतंत्र संशोधनावर आधारित शोधनिबंधांचे प्रकाशन असे निकष अनिवार्य करावेत अशी सूचना आहे.**

एकंदरित, शोधनिबंधांची उपरोल्लेखित अल्प संख्या ही अध्यापक व विद्यार्थी यांच्या संशोधनासंबंधीच्या प्रयत्नांबद्दल फारसे चांगल सांगून जात नाही. ही मरगळ निपटून काढण्याकरिता अधिविभागातील चर्चासत्रे हा अभ्यासाचाच एक अनिवार्य भाग बनवावा तसेच संशोधनावर आधारित चर्चासत्रे आयोजित करण्याला प्रोत्साहन द्यावे अशी शिफारस आहे. त्यासाठी विद्यापीठातील प्रत्येक अधिविभागाला 25,000 रुपये

उपलब्ध करून द्यावेत. त्यातूनच प्रत्येक शिक्षकाला चर्चासत्राच्या शोधनिबंधाच्या तयारीकरिता कराव्या लागणाऱ्या खर्चापोटी प्रतिवर्षी 2,500 रुपये द्यावेत. प्रत्येक अधिविभागात सरासरीने 10 अध्यापक असतात या गृहितावर ही शिफारस मांडली आहे. अशा तऱ्हेच्या उपाययोजनेमुळे अधिविभागांतर्गत स्वायत्तता निर्माण होऊन संशोधनकार्याला चालना मिळेल.

आता अधिवेशनांच्या आयोजनाबद्दल. चाळीस–पैकी 14 अर्थशास्त्र अधिविभागांनी आंतरराष्ट्रीय परिषदा, 7 अधिविभागांनी राष्ट्रीय परिषदा, 5 अधि–विभागांनी प्रादेशिक परिषदा आणि 2 अधिविभागांनी विद्यापीठ पातळीवरील परिषदा भरविल्या. फक्त 5 विद्यापीठांमधील अध्यापकांनी त्यांच्याच अधिविभागाने भरविलेल्या परिषदांमध्ये आपले शोधनिबंध सादर केले. आपल्या अधिविभागांचा संशोधनाचा पाया किती तोकडा आहे आणि संशोधनकार्यातील अध्यापकांचा सहभाग किती अल्प आहे यावर यातून प्रकाश पडतो. अर्थशास्त्र अधिविभागांनी पुरेशी चर्चासत्रे, कार्यशाळा, परिषदा घेतल्या नाहीत हाच याचा निष्कर्ष आहे. त्याचप्रमाणे या आयोजनासंबंधीचा संघटनात्मक पुढाकार, आर्थिक व मनुष्यबळ हे सर्व काही मोजक्याच अर्थशास्त्र अधि–विभागांपुरते मर्यादित होते. अशा परिषदांमधील सक्रिय सहभाग आणि शोधनिबंधांचे वाचन हे तर फारच थोड्या अधिविभागांत केंद्रित झालेले होते. अर्थशास्त्र अधिविभागांतील विचारांच्या आदानप्रदान प्रक्रियेतील सहभाग निराशाजनक आहे याची जाणीव या तपशि–लावरून होते.

## 5·2 एम. फिल / पीएच. डी. प्रबंधांचे प्रकाशन

अध्यापकांना शिकविण्यापलीकडे जाऊन संशोधन कामातही लक्ष घालून दर्जेदार संशोधन प्रकाशित करा–वयाचे असते. संशोधन कामातून नवे ज्ञान निर्माण करण्याबरोबरच त्याच्या प्रकाशनातून हे ज्ञान सर्वदूर पसरण्यास मदत होते. सध्यःस्थितीत एम. फिल. व पीएच. डी. साठी मोठ्या प्रमाणात संशोधन कार्य अर्थशास्त्र अधिविभागांतून चाललेले आहे. असे संशोधन हा सर्व अधिविभागांच्या संशोधन प्रयत्नांचा फार मोठा भाग आहे. याचा परिणाम संशोधन पात्रता असलेल्या व्यक्तींच्या संख्यावाढीवर होत असतो. म्हणून अधिवि–भागातून पूर्ण झालेल्या व पदवी प्रदान केलेल्या प्रबंधांची संख्या हा एक अधिविभागाच्या संशोधन प्रयत्नांचा निर्देशक मानलेला आहे. हे प्रबंध एक तर पुस्तकरूपाने नाही तर अनेक शोधनिबंधांच्या रूपाने प्रकाशित होतात. काही प्रबंध चांगले असूनही प्रकाशित होत नाहीत तर कित्येकदा प्रकाशित झालेले प्रबंध चांगले नसतात. असे असले तरी, प्रबंध प्रकाशित होतो याचा अर्थ त्यामध्ये प्रकाशित करण्याइतपत काही तरी दर्जा असतो असे मानावयाला हरकत नाही. तसेच, कोणता प्रकाशक तो प्रबंध प्रकाशित करतो यालादेखील वजन असते. प्रबंध प्रकाशनासाठी विद्यापीठ अनुदान मंडळ, विद्या–पीठ, भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद (ICSSR), इत्यादींकडून अनुदान मिळण्याची सुविधा आहे. मात्र ते मंजूर करण्यापूर्वी संबंधित प्रबंध त्या विषयातील तज्ज्ञांकडे पाठवून अनुकूल अभिप्राय आल्यास प्रकाशन अनुदान मंजूर केले जाते. अशा रीतीने प्रका–शित झालेल्या प्रबंधांना काही दर्जा असतो.

अध्यापक व विद्यार्थी यांच्याकडून एम. फिल. व पीएच. डी. साठी ज्या विशिष्ट क्षेत्रात संशोधन कार्य केलेले असते त्यामुळे व्यक्तिगत त्यांना आणि त्यामुळे विद्यापीठालाही शैक्षणिक वर्तुळात मान्यता मिळते. हे संशोधन जसे पुस्तकरूपाने बाहेर येऊ शकते तसेच आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय पातळीवरील नियतकालिकां–तून आणि स्वतंत्र लेखांच्या स्वरुपात जगासमोर आणता येते. या पुस्तकांमुळे / शोधनिबंधांमुळे त्या विशेष क्षेत्रा–तील ज्ञानाच्या कक्षा वाढण्याला मदत होते आणि त्यातूनच भावी संशोधनासाठीचे विषय पुढे येतात. संशोधन मूलगामी असल्यास त्यामुळे ज्ञानाची नवी कवाडे खुलतात. पुस्तक, लेख, पुस्तिका वगैरे स्वरुपात जेव्हा संशोधन कामाला प्रसिद्धी मिळते तेव्हा अशा कामासाठी आर्थिक पाठबळ पुरविण्याची आवश्यकता स्पष्ट होते एवढेच नव्हे तर या प्रकाशनांमुळे संशोध–काला मान्यता मिळते, व्यवसायात बढती मिळते आणि आपल्या संशोधनाबद्दलचा विश्वास बळावतो. ज्या नियतकालिकात शोधनिबंध / लेख प्रसिद्ध होतो आणि जो प्रकाशक संशोधन काम प्रकाशित करतो यावरून देखील त्या संशोधनाचा दर्जा काय आहे याची कल्पना येते. यापुढे जाऊन या संशोधनाचे संदर्भ दुसऱ्या संशो–धकांच्या संशोधनपर कामात आले तर त्यामुळे (अ)

या संशोधनाची व्यावसायिकांनी दखल घेतली आहे, (आ) ते समकालीन संशोधनासाठी सुसंबद्ध आहे आणि (इ) त्यातील तपशिलाचा दर्जा तो उद्धृत करण्याइतपत आणि त्याचा संदर्भ देण्याइतपत उंच आहे, या सर्वांची खातरजमा होते. यातून एका परीने समव्यावसायिकांकडून त्या संशोधन कामाचे मूल्यमापन होऊन संशोधकाला त्याच्या संशोधन क्षेत्रात मान्यता मिळते. त्यातूनच संबंधित अर्थशास्त्र अधिविभागाचाही लौकिक वाढतो. असे कितपत घडले आहे याची माहिती सर्वेक्षणाच्या प्रश्नावलीतून मिळविण्याचा प्रयत्न झाला, परंतु त्याला योग्य प्रतिसाद विद्यापीठांच्या अर्थशास्त्र अधिविभागांकडून मिळाला नाही.

आता वास्तवाकडे वळू. चाळीसपैकी 25 अर्थशास्त्र अधिविभागांतील अध्यापक व विद्यार्थ्यांनी 26 पुस्तके प्रकाशन अनुदान घेऊन प्रकाशित केलेली आहेत तर 17 अधिविभागांनी अनुदानाविना 65 पुस्तके प्रकाशित केली आहेत. सर्वेक्षणाच्या तीन वर्षकालात (1991 ते 93) एकंदर 19 पुस्तके प्रकाशित झाली. याची प्रतिवर्ष व प्रतिविद्यापीठ सरासरी 0·75 पुस्तके अशी येते; त्यामुळे प्रतिअध्यापक सरासरी नगण्य आहे.

बारा अधिविभागांनी 38 संशोधन पुस्तिका (monograms) प्रकाशित केल्या आहेत. पाच अधिविभागांतील अध्यापक व संशोधकांनी 37 शोधनिबंध प्रकाशित केले. फक्त 7 अधिविभागांनी 47 प्रासंगिक लेख (occasional papers) प्रकाशित केले. एकंदरित, 3 वर्षांत 40 विद्यापीठांतून 122 प्रकाशने या विविध रूपात पुढे आली. याची प्रतिवर्ष प्रतिअधिविभाग सरासरी फक्त 1 येते. फक्त 28 विद्यापीठांतील अध्यापक व संशोधकांनी लेखांचे मूल्यमापन करून आणि न करता छापणाऱ्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नियतकालिकांतून 756 संशोधनपर लेख प्रसिद्ध केले. त्यापैकी 290 लेखांसाठी अर्थसाहाय्य मिळाले तर 466 लेखांसाठी ते नव्हते. तेरा अधिविभागांतील अध्यापक व विद्यार्थ्यांनी विविध वृत्तपत्रांतून 106 लेख लिहिले; त्यापैकी 21 लेखांना अर्थसाहाय्य मिळाले आणि 85 लेखांना नाही. तीन अधिविभागांतील संशोधकांनी 10 लेख विविध नियतकालिकांतून लिहिले, मात्र त्या लेखांसाठी अर्थसाहाय्य नव्हते. फक्त 3 अधिविभागांनी रेडिओवर व्याख्याने दिली आणि त्यासाठीही अर्थसाहाय्य नव्हते. या सर्व तपशिलाचा निष्कर्ष म्हणजे, अर्थशास्त्र अधिविभागांतील अध्यापक वर्ग संशोधनाचे काम करून थांबत नाही तर ते प्रसिद्ध करण्याचाही प्रयत्न करतो. तथापि, बऱ्याच संशोधन लेखांच्या तयारीसाठी अर्थसाहाय्य मिळालेले नाही. ते मिळाले असते तर संशोधकांना अधिक माहितीचा अंतर्भाव आपल्या लेखात करता आला असता आणि अधिक संशोधनकार्य हाती घेता आले असते.

## 5·3 प्रशिक्षण वर्गांचे आयोजन

नेहमीच्या अध्यापन व संशोधन कामाच्या जोडीनेच काही अधिविभागांनी अर्थशास्त्राच्या विशिष्ट क्षेत्रात प्रशिक्षण देण्यासाठी उद्बोधन वर्गांचेही आयोजन केले होते. अशा उपक्रमांमुळे त्या विशिष्ट क्षेत्रातील नव्या ज्ञानाची जाणीव होते तसेच त्या क्षेत्रातील तज्ज्ञ आणि उद्बोधन वर्गातील सहभागी व्यक्ती यांच्यात विचारांचे आदानप्रदान होण्यासाठी संधी मिळते; काही व्यक्तींना यातूनच नव्या संशोधनाची प्रेरणा मिळते. नवे ज्ञान मिळाल्याने सहभागी होणाऱ्या अध्यापकांच्या अध्यापनाचा दर्जा सुधारतो. नव्या विषयांचा अंतर्भाव अभ्यासक्रमात करण्याचा प्रयत्न प्रशिक्षितांकडून केला जातो. असे उपक्रम राबविणाऱ्या अधिविभागांच्या लौकिकात भर पडते त्याचप्रमाणे ज्या ज्या संस्थांमधून प्रशिक्षणार्थी येतात त्यांच्यामध्ये अर्थशास्त्र अधिविभागाबद्दलची चांगली प्रतिमा निर्माण होते.

सन 1991, 1992 व 1993 या तीन वर्षांत फक्त शिवाजी व त्रिपुरा विद्यापीठांनीच दोनतीन दिवसांचे प्रशिक्षणाचे उपक्रम राबविले. शिवाजी विद्यापीठाच्या विद्यापीठ अनुदान आयोगाकडून अर्थसाहाय्य लाभलेल्या उपक्रमात विद्यापीठ अधिविभागाबाहेरील 20 प्रशिक्षणार्थी सहभागी झाले होते. यावेळी तज्ज्ञ म्हणून अधिविभागातील फक्त एकच आणि अधिविभागाबाहेरून 4 व्यक्तींना पाचारण करण्यात आले. यातून अधिविभागाकडे तज्ज्ञांची चणचण असल्याचे स्पष्ट होते. त्रिपुरा विद्यापीठानेही विद्यापीठ अनुदान आयोगाच्या आर्थिक पाठबळावर एक प्रशिक्षणाचा उपक्रम हाती घेतला होता. यामध्ये अधिविभागातील 5 आणि बाहेरील 20 प्रशिक्षणार्थी सहभागी होते. प्रशिक्षणाची

जबाबदारी अधिविभागातील 5 आणि बाहेरील 6 तज्ज्ञांनी पेलली होती.

प्रबोधन वर्गांच्या बाबतीत पाहिल्यास, 40 पैकी फक्त 10 विद्यापीठांनी (25 टक्के) एकंदर 19 प्रबोधन वर्गांचे (Refresher Courses) आयोजन केले. प्रत्येक वर्गाचा सरासरी काल 9·48 दिवसांचा होता. या सर्व प्रबोधन वर्गांचे प्रायोजन कोणत्या ना कोणत्या संस्थेकडून झालेले होते. यासाठीच्या प्रशिक्षणार्थींची अधिविभागातील संख्या सरासरीने 2·45 आणि अधिविभागाबाहेरील 11·43 होती. तज्ज्ञ मार्गदर्शकांच्या संख्येची सरासरी अधिविभागातून 2·05 आणि अधिविभागाबाहेरून 3·25 होती.

चाळीस विद्यापीठांच्या अर्थशास्त्र अधिविभागांपैकी 15 अधिविभागांतील अध्यापकांनी बाहेरच्या विद्यापीठांतून उद्बोधन वर्गांसाठी (orientation programmes) हजेरी लावली. या वर्गांचे दिवस सरासरीने 8·95 होते आणि दर वर्गामागे प्रशिक्षणार्थींची संख्या सरासरीने 2·65 होती. सर्व वर्गांचे प्रायोजन सरकारी अथवा बिगर-सरकारी संस्थांनी केले होते. दुसऱ्या विद्यापीठांतील अध्यापकांसाठी 16 विद्यापीठांनी 19 प्रबोधन वर्ग (refresher courses) आयोजित केले. त्यांचा कालावधी सरासरी 9·47 दिवसांचा होता. त्यात सहभागी झालेल्या अध्यापकांची सरासरी 2·4 होती. सर्व वर्गांचे प्रायोजन बहिस्थ संस्थांकडून झाले होते.

## 5·4 पदवीकरिता नसलेले अध्यापकांचे संशोधन

एम. फिल. व पीएच. डी. पदवीकरिता संशोधन होते तो एक भाग. याखेरीज कोणतीही पदवी न मिळविण्याकरिताही अध्यापकांकडून संशोधन चालू असते. ते दोन प्रकारांत मोडते : (अ) विशिष्ट प्रकल्पाशी निगडित संशोधन, (आ) प्रकल्पाशी निगडित नसलेले संशोधन. काही संशोधन प्रकल्प हे राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय संस्थांनी प्रायोजिलेले अथवा अर्थपुरवठा केलेले असतात. पदवीशी संबंधित संशोधनातून संशोधकाला संशोधन पद्धतीमध्ये तयार करून भावी काळात एक चांगला संशोधक म्हणून तो पुढे यावा या उद्देशाने तयारी करवून घेतली जाते. असे संशोधन सामान्यतः अधिविभागातील ज्येष्ठ संशोधक अध्यापकाच्या मार्गदर्शनाखाली चालते. मात्र संशोधन, मग ते प्रकल्पाशी निगडित असो वा नसो, संशोधकाला स्वतःच करावे लागते.

पदवीशी संबंधित संशोधन कामात तडजोडी केलेल्या असतात, त्याची कारणे पुढीलप्रमाणे : (अ) संशोधकाला नोकरी मिळणे सुलभ होण्यासाठी संशोधनाचे काम लवकर पूर्ण करण्यासाठी दबाव; (आ) संशोधकाची तौलनिकदृष्टया कमी परिपक्वता, ज्ञानभांडाराची कमतरता आणि संशोधनातील कौशल्यामधील कमीपणा; (इ) संशोधकाचे मार्गदर्शकावरील अवलंबित्व. या कारणांमुळे संशोधकाचे ज्ञानभांडार, परिपक्वता आणि व्यावसायिक अनुभव यांचा जबरदस्त प्रभाव प्रबंधाच्या दर्जावर पडतो. संशोधन पदवीनंतरच्या संशोधन कामात या सर्व मर्यादा निघून जातात.

या पार्श्वभूमीवर 1991-93 या तीन वर्षांत अर्थशास्त्र अधिविभागांतून संशोधन पदवीनंतरचे (post-doctoral) संशोधन कितपत व कसे चालले याचा मागोवा घेऊ. दहा अधिविभागांनी विद्यापीठ अनुदान मंडळ पुरस्कृत 13 संशोधन प्रकल्प पूर्ण केले. आणि 14 अधिविभागांमध्ये अशा प्रकारचे प्रकल्प चालू होते. विद्यापीठ अनुदान मंडळाने 18 विद्यापीठांच्या अर्थशास्त्र अधिविभागांत एकाही संशोधन प्रकल्पाचे प्रायोजन केले नव्हते. याचा अर्थ विद्यापीठ अनुदान मंडळ विद्यापीठांमध्ये भेदाभेद करते असा मात्र नाही. एकतर या अधिविभागांनी मंडळाच्या मंजुरीसाठी असे प्रकल्प सादरच केले नसतील अथवा सादर केलेल्या प्रकल्पांची पातळी अपेक्षेइतकी नसल्याचा तज्ज्ञांचा अभिप्राय असावा.

दहा विद्यापीठांच्या अर्थशास्त्र अधिविभागांनी ICSSR प्रायोजित 20 संशोधन प्रकल्प पूर्ण केले होते तर 5 अधिविभागांत 8 प्रकल्प चालू होते. ICSSR ने 25 विद्यापीठांच्या अर्थशास्त्र अधिविभागांना कोणत्याही संशोधन प्रकल्पाकरिता अर्थपुरवठा केलेला नव्हता. फक्त उस्मानिया विद्यापीठानेच भारतीय रिझर्व्ह बँकेने पुरस्कृत केलेला 1 प्रकल्प पूर्ण केला. इतर कोणत्याही विद्यापीठाला रिझर्व्ह बँकेकडून अर्थपुरवठा झाला

नाही. विश्वभारती व पंजाब या दोनच विद्यापीठांना भारतीय नियोजन मंडळाकडून एकूण 4 संशोधन प्रकल्प मिळाले आणि त्यांनी ते पूर्ण केले. नऊ विद्यापीठांच्या अधिविभागांनी भारत सरकारच्या विविध अधिविभागांकडून / मंत्रालयांकडून प्रायोजित झालेले 15 प्रकल्प पूर्ण केले. मद्रास व गुवाहटी विद्यापीठांतील 2 प्रकल्प पूर्ण व्हावयाचे होते. राज्य सरकारांनी प्रायोजित केलेले 12 प्रकल्प 5 अधिविभागांनी हातावेगळे केले, 3 अधिविभागांमध्ये अजून काम चालू होते. विद्यापीठांनी आपल्या निधीतून प्रायोजित केलेले 11 प्रकल्प 3 अधिविभागांनी पूर्ण केले आणि 5 अधिविभागांत प्रकल्पांचे काम चालू होते. राष्ट्रीय पातळीवरील अनामिक संस्थांकडून मिळालेल्या निधीमधून 4 अधिविभागांमध्ये 6 प्रकल्प पूर्ण झाले आणि फक्त कल्याणी विद्यापीठातच 2 प्रकल्प अजून पूर्ण व्हावयाचे होते. आंतरराष्ट्रीय संस्थांकडून निधी घेऊन 3 अधिविभागांनी 4 प्रकल्प पूर्ण केले असून 2 अधिविभागांकडे काम चालू होते. महत्त्वाचे म्हणजे, कोणत्याही अर्थशास्त्र अधिविभागाकडे खाजगी संस्थांकडून प्रकल्पांसाठी निधी उपलब्ध झाला नाही. तीन अधिविभागांमध्ये अप्रायोजित असे 8 प्रकल्प चालू होते.

## 5·5 अध्यापकांचा अध्यापनाचा अनुभव

कोणत्याही शैक्षणिक संस्थेचा अध्यापनाचा व संशोधनाचा दर्जा तिथल्या अध्यापकांच्या अध्यापन व संशोधनाच्या अनुभवावर अवलंबून असतो. नैसर्गिक शास्त्रांच्या बाबतीत उत्तम दर्जाचे संशोधन कार्य तरुण शास्त्रज्ञांकडून केले जाते कारण ते आपल्या कार्याचा उच्च बिंदू वयाच्या 35 ते 40 दरम्यानच गाठतात. सामाजिक शास्त्रांतील संशोधकांची परिस्थिती मात्र याहून वेगळी असते. त्यांना त्यांच्या संशोधन घटकांवर नियंत्रण ठेवता येत नाही, त्यांच्याकडे प्रयोगासाठीच्या सुविधा उपलब्ध नसतात, सामाजिक–आर्थिक घटकांमध्ये क्लिष्टता व गुंतागुंत असते; त्यामुळे तरुण संशोधकांना परिस्थितीचे आकलन सहजपणे होत नाही. याकारणाने नैसर्गिक शास्त्रांच्या क्षेत्रातील संशोधक आपला उत्तम संशोधनाचा टप्पा उलटून गेल्यानंतरच्या वयामध्ये सामाजिक शास्त्राच्या क्षेत्रातील संशोधकांच्या कामाला बहर यायला लागतो. म्हणून अध्यापकाचे वय व संशोधन यांचा त्याच्या अध्यापनाच्या व संशोधनाच्या दर्जावर प्रभाव पडत असतो. यादृष्टीने वास्तवाची स्थिती पाहावयाची आहे.

जम्मू व राजस्थान विद्यापीठे वगळता उर्वरित 38 विद्यापीठांतील प्राध्यापकांना 10 वर्षांपेक्षा अधिक अनुभव आहे. त्यातही 32 विद्यापीठांतील (80 टक्के) प्राध्यापकांचा अनुभव 16 वर्षांपेक्षा जास्त आहे. ज्यांना 5 ते 7 वर्षे, 8 ते 10 वर्षे, 11 ते 13 वर्षे, 14 ते 16 वर्षे आणि 16 हून जास्त वर्षे अनुभव आहे अशा प्राध्यापकांची सरासरी अनुक्रमे 0·075, 0·05, 0·15, 0·175 आणि 2·05 होती. यावरून लक्षात येते की, 16 वर्षांहून अधिक अनुभव असणाऱ्या प्राध्यापकांची संख्या 16 वर्षे किंवा त्याहून कमी अनुभवाच्या प्राध्यापक संख्येपेक्षा जास्त होती. प्रपाठकांच्या बाबतीतही असेच होते. अध्यापनाचा अनुभव 0 ते 3 वर्षे, 4 ते 5 वर्षे, 6 ते 8 वर्षे, 9 ते 10 वर्षे, 11 ते 13 वर्षे, 14 ते 16 वर्षे आणि 16 वर्षांपेक्षा अधिक वर्षे असलेल्या प्रपाठकांची सरासरी अनुक्रमे 0·05, 0·05, 0·05, 0·15, 0·35, 1·2, 0·5 आणि 1·775 होती. यावरून अनुभव वाढेल तशी सरासरीही वाढली आहे.

या सांख्यिकी माहितीवरून एक गोष्ट स्पष्ट होते. कनिष्ठ पातळीवरील अध्यापकाला वरिष्ठ पातळीवर जाण्याची संधी कमी आहे. त्यामुळे प्रपाठक पदावरून प्राध्यापक पदावर जाण्यासाठी प्रपाठकांना 8 ते 10 वर्षे लागली आहेत तर अधिव्याख्यात्यापासून प्रपाठकांपर्यंत पोचण्यासाठी अधिव्याख्यात्याला 11 ते 13 वर्षे थांबावे लागले आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाने अध्यापकांचे एकंदर कामाचे तास निश्चित करताना याचे भान ठेवावे. पाच विद्यापीठांत अर्थशास्त्र अधिविभागात अधिव्याख्याता पदावर कुणीच नव्हते आणि जिथे अधिव्याख्याते होते त्याना, ते नुकतेच या पदावर रुजू झाले असल्याने, अध्यापनाचा पूर्वानुभव नव्हता. ज्या अधिव्याख्यात्यांना अध्यापनाचा 0 ते 3 वर्षे, 4 ते 5 वर्षे, 6 ते 8 वर्षे, 8 ते 10 वर्षे, 11 ते 13 वर्षे, 14 ते 16 वर्षे आणि 16 वर्षांपेक्षा जास्त अनुभव होता अशांची सरासरी अनुक्रमे 0·475, 0·35, 0·8, 0·775, 0·425, 0·175 आणि 0·325 होती. यावरून, वाढत्या अनुभवाबरोबर अधिव्याख्यात्यांची सरासरी संख्या घटत गेल्याचे आढळते याचा अर्थ असा की, अधिव्याख्यात्यांना बराच काळ वाट पाहिल्यानंतर

प्रपाठक पदावर बढती मिळण्याची संधी उपलब्ध झाली.

केवळ चित्रकूट विद्यापीठातच 3 वर्षांहून कमी अध्यापनाचा अनुभव असलेला संशोधक सहकारी होता. आणि उस्मानिया विद्यापीठात 3 ते 5 वर्षांचा अनुभव असलेले 2 संशोधक सहकारी होते. कुरुक्षेत्र व पंजाब विद्यापीठात प्रत्येकी दोन संशोधन व सांख्यिकीय सहायक असून त्यांच्या अध्यापनाचा अनुभव अनुक्रमे 0 ते 3 वर्षे आणि 10 ते 13 वर्षे होता.

## 5·6 अध्यापकांचा संशोधनाचा अनुभव

अध्यापकांना अध्यापनाबरोबरच एम. फिल. व पीएच. डी. संशोधनासाठी मार्गदर्शन करणे आणि स्वतःचे संशोधन करणे यासाठीही वेळ द्यावा लागतो. संकलित केलेल्या माहितीवरून निदर्शनास येते की, 9 विद्यापीठांतील प्राध्यापकांना संशोधनाचा काहीच अनुभव नव्हता. संशोधन कामात मार्गदर्शक म्हणून 0 ते 5 वर्षे, 6 ते 10 वर्षे, 11 ते 15 वर्षे आणि 15 वर्षांपेक्षा अधिक अनुभव असलेल्या प्राध्यापकांची सरासरी अनुक्रमे 0·025, 0·125, 0·675 आणि 1·25 होती. बव्हंशी प्राध्यापकांना 15 वर्षांपेक्षा अधिक कालावधीचा संशोधन मार्गदर्शनाचा अनुभव होता हेच यावरून ध्यानात येते. याउलट परिस्थिती मात्र स्वतःच्या संशोधनाची आहे; ती फारशी समाधानकारक नाही. बहुतेक प्राध्यापकांना स्वतःच्या संशोधनाचा अनुभव 5 वर्षांपेक्षा कमी आहे. स्वसंशोधनाचा अनुभव 5 वर्षांपेक्षा कमी, 6 ते 10 वर्षे, 11 ते 15 वर्षे आणि 15 वर्षांपेक्षा जास्त असलेल्या प्राध्यापकांची सरासरी संख्या अनुक्रमे 1·25, 0·05, 0·075 आणि 0·275 होती, संशोधनाची आच असलेल्या प्राध्यापकांची उणीवच यावरून स्पष्ट होते. जे स्वतः संशोधन करतात तेच आपल्या संशोधन विद्यार्थ्यांमध्ये चेतना निर्माण करून चांगले मार्गदर्शन करू शकतात. जे प्राध्यापक एक व्यावसायिक दुखणे म्हणून संशोधन मार्गदर्शकाचे काम पत्करतात त्यांच्याकडून त्यांच्या विद्यार्थ्यांचा एम. फिल. व पीएच. डी. संशोधनाचा चांगला दर्जा गाठला जाणे दुरापास्त असते; याची कारणे सहजपणे ध्यानात येतील.

आता प्रपाठकांबद्दल. संशोधन मार्गदर्शक म्हणून 5 वर्षांपेक्षा कमी, 6 ते 10 वर्षे, 11 ते 15 वर्षे आणि 15 वर्षांहून अधिक काल मार्गदर्शक म्हणून काम केलेल्या प्रपाठकांची सरासरी संख्या अनुक्रमे 0·475, 1·25, 1·075 आणि 0·475 होती. स्वयंशोधनाचा अनुभव 5 वर्षांपेक्षा कमी, 5 ते 10 वर्षे, 10 ते 15 वर्षे आणि 15 वर्षांपेक्षा जास्त कालासाठी असलेल्या प्रपाठकांच्या संख्येची सरासरी अनुक्रमे 0·05, 1·025, 0·8 आणि 1·125 होती म्हणजे प्रपाठकांच्या स्वसंशोधनाच्या कालावधीबरोबर त्यांची संख्याही वाढती आहे. बव्हंशी प्रपाठकांना 10 वर्षांपेक्षा अधिक कालावधीचा स्वसंशोधनाचा अनुभव होता. तशीच गोष्ट बव्हंशी अधिव्याख्यात्यांच्या बाबतीत. प्राध्यापकांपेक्षा प्रपाठक व अधिव्याख्याते यांचे योगदान जास्त होते. भविष्याच्या दृष्टीने हा एक आशेचा किरण आहे.

केवळ उस्मानिया विद्यापीठातील एका संशोधक सहकाऱ्याला 5 वर्षांहून अधिक काल संशोधनासाठी मार्गदर्शन करण्याचा अनुभव होता. वेंकटेश्वर विद्यापीठात असा अनुभव 5 वर्षांपेक्षा कमी असलेला एक संशोधन सहकारी होता. पंजाब विद्यापीठात 10 वर्षांहून अधिक काल संशोधन मार्गदर्शकाचा अनुभव असलेला 1 संशोधन व सांख्यिकी सहायक होता. कुरुक्षेत्र विद्यापीठात याच पदावरील एका व्यक्तीला स्वसंशोधनाचा 5 वर्षांपेक्षा कमी कालावधीचा अनुभव होता.

## 5·7 संशोधनातील समस्या आणि त्यांचे निराकरण

विद्यापीठांच्या अर्थशास्त्र विभागांमध्ये संशोधनासाठी उपलब्ध सुविधा, अडचणी, मर्यादा यांबरोबर संशोधनासाठी घेतले जाणारे विषय / क्षेत्रे आणि संशोधनकार्यात सुधारणा करण्यासाठी अध्यापकांच्या सूचना याविषयींची माहिती सर्वेक्षणाच्या प्रश्नावलीतून प्रकाशात आली होती. मात्र 12 विद्यापीठांनी या भागाला प्रतिसाद न दिल्याने नमुना विद्यापीठांची संख्या 28 वर घसरली.

संशोधनाचा दर्जा नेमका कोणता आहे हे सांगणे किंवा त्याचे नेमके मोजमाप करणे अवघड असते. तथापि विविध निर्देशकांचा उपयोग करून त्याचे मूल्य–

मापन करणे शक्य आहे. संशोधक विद्यार्थ्याने संशोधनासाठी दिलेला वेळ, घेतलेले परिश्रम आणि केलेले कष्ट यातून त्याची संशोधनावरील श्रद्धा, स्फूर्ती व बौद्धिक पातळी यांचे दिग्दर्शन होऊ शकते. याचा परिणाम संशोधनाच्या दर्जावर खचितच होतो. संशोधन कामाच्या या निविष्टी (inputs) असून प्रत्यक्ष अहवाल ही उद्‌विष्टी (output) असते. संशोधकाने संदर्भासाठी वापरलेले निबंध, लेख, प्रकल्प अहवाल, संशोधन पुस्तिका, पुस्तके यांच्या संख्येवरून निविष्टींचे आयाम स्पष्ट होतात. विश्लेषणातील काटेकोरपणा, संशोधनपद्धतीतील अत्याधुनिक तंत्रांचा वापर व अभ्यासासाठी तयार केलेला सैद्धान्तिक आकृतीबंध यावरून संशोधकाची बौद्धिक कुवत समजून येते. जमविलेल्या माहितीच्या आधारे केलेले भाष्य, काढलेले निष्कर्ष आणि धोरणासंबंधीच्या सूचना या बाबी संशोधकाच्या अंतर्यामी दृष्टीच्या निर्देशक ठरतात. या सर्वांवर प्रभाव पडतो तो संशोधकाच्या मार्गदर्शकाचा, संशोधन कार्यातील सहभागाचा आणि मार्गदर्शकाच्या बौद्धिक पातळीचा. याखेरीज ग्रंथालय / प्रयोगशाळा यांच्या पुरेशा सुविधांची उपलब्धता, सर्वेक्षणासाठी वित्तीय पाठबळ, संगणित्राच्या कामाची उपलब्धता आणि संबंधित विषयावर पूर्वी झालेल्या संशोधनाबद्दलची माहिती या सर्वांचा संशोधनाच्या दर्जावर परिणाम होत असतो. अर्थात सरतेशेवटी संशोधनाच्या अहवालाच्या दर्जावरच त्या संशोधनाचा दर्जा ठरतो.

संशोधनाचा दर्जा ठरविण्यासाठी पुढील बाबींसंबंधी मूल्यमापन केले पाहिजे : (1) विश्लेषणातील काटेकोरपणा, (2) संशोधन पद्धतीतील अत्याधुनिकता आणि तिच्या उपयोजनातील काटेकोरपणा, (3) प्रबंधात मांडलेल्या मुद्यांची तर्कसंगती, (4) ज्ञानाची सखोलता व वर्धिष्णुता आणि (5) विश्लेषणासाठी आणि निष्कर्ष प्रस्थापित करण्यासाठी उपलब्ध माहितीचा योग्य उपयोग.

## 5·8 संशोधन विषयांची निवड

सर्वेक्षणातून उपलब्ध झालेल्या तपशिलावरून एक सर्वसाधारण निष्कर्ष निघतो की, विद्यापीठांतून संशोधनाच्या विषयांची निवड अगदी सरधोपटपणे होत असते. त्यामुळे या संशोधनाचा राष्ट्रीय / प्रादेशिक / स्थानिक अर्थव्यवस्थेच्या प्रश्नांशी संबंधच राहात नाही; धोरणात्मक प्राधान्यक्रम आणि त्या विषयातील पोकळी याकडे दुर्लक्ष होते; ICSSR/UGC यांनी संशोधनासाठी अग्रक्रमाने सुचविलेल्या विषयांचा विचारच होत नाही. सैद्धान्तिक पोकळी भरून काढण्याच्या दृष्टीने आपण संशोधनाचे विषय निवडतो असा काही विद्यापीठांचा दावा आहे. तसे असेल तर असे संशोधन प्रकर्षाने पुढे येऊन नव्या संकल्पना / सिद्धान्त मांडणाऱ्यांमध्ये निदान काही भारतीयांना स्थान मिळावयाला हवे होते. असे न घडल्यामुळे एक तर हा दावा फोल असावा अथवा संशोधन त्या पातळीपर्यंत पोचणारे नसावे. धोरणात्मक गरजांची पूर्तता करण्याच्या दृष्टीने आपण संशोधनाचे विषय निवडतो असा 20 विद्यापीठ अधिविभागांचा दावा आहे तर 2 अधिविभागांचा प्रयत्न माहितीची पोकळी भरून काढण्याचा आहे. सिद्धान्तांचे अनुभवाधिष्ठित परीक्षण करण्याचे काम 14 विद्यापीठे करतात आणि 10 विद्यापीठांतील संशोधनातून पूर्णतया नवीन माहिती पुढे आणण्याचा प्रयत्न होतो. अशा प्रकारचे संशोधन पुनरावृत्तीच्या स्वरूपाचे असते. त्यातून विदेशी अर्थशास्त्रज्ञांनी ज्या परिस्थितीच्या संदर्भात आणि ज्या गृहितांच्या आधारावर आपले सिद्धान्त मांडले त्यांच्या वास्तवतेकडे दुर्लक्ष करून भारतीय अर्थव्यवस्थेच्या बाबतीत ते सिद्धान्त कितपत लागू पडतात हे शोधण्याचा नाहक प्रयत्न केला जातो. प्रच्छन्न बेकारी (disguised unemployment), धान्यपुरवठ्याचा मागे वळणारा वक्र, श्रमपुरवठा वक्राचा उलटा 'S' आकार, लहान शेतीची जास्त उत्पादकता, वेतन–वस्तू प्रतिमान, इत्यादी प्रकारच्या संकल्पनांच्या आधारे अर्थशास्त्रीय वाङ्मयाला समृद्ध करणाऱ्या भारतीय अर्थशास्त्रज्ञांची प्रगल्भ पिढी ही पूर्वकाळात होऊन गेली. इतर अर्थव्यवस्थांसाठी केलेल्या अभ्यासांसारखेच अभ्यास सहा विद्यापीठे करतात; त्यातून राष्ट्रीय/प्रादेशिक वस्तुस्थिती पडताळून पाहिली जाते. इतर कुणीतरी केलेल्या संशोधनाचा विस्तार करण्यासाठी सैद्धान्तिक वा अनुभवाधिष्ठित (empirical) संशोधनाकडे वळतात. सर्व विद्यापीठे वर उल्लेख केलेल्या संशोधन प्रकारांपैकी दोनतीन प्रकार निवडतात. ICSSR, UGC, भारतीय नियोजन मंडळ, भारत सरकारची व राज्य सरकारांची मंत्रालये, वगैरेंनी अग्रक्रमाचे विषय म्हणून ज्यांचा उल्लेख केलेला असतो त्यांपैकीच विषय सामान्यतः संशोधनासाठी निवडलेले

असतात असे सर्वच विद्यापीठांनी समर्थन दिले आहे. बहिस्थ संस्थांकडून मिळालेल्या निधीच्या उपयोगातून केलेल्या संशोधनाच्या बाबतीत हे खरे आहे. या अर्थ–पुरवठा करणाऱ्या संस्थांचा पदवीसाठी अगर बिगर–पदवीसाठी केल्या जाणाऱ्या संशोधनाबद्दल तसा आग्रहही असतो. ज्यावेळी संशोधकाला अशा कोणत्याही संस्थेकडून आर्थिक साहाय्य मिळत नसते त्यावेळी मात्र तो संशोधक निधी देणाऱ्या संस्थांनी ठरविलेल्या अग्रक्रमांचा आदर करीलच याची शाश्वती नसते; त्यासाठी त्याला तयार करणेही सोपे नसते.

विदेशी अर्थशास्त्रज्ञांनी मांडलेल्या आणि मान्यता पावलेल्या प्रमेयांचे परीक्षण करण्याच्या इरादानेच बहुतेक सर्व विद्यापीठांतून संशोधनकार्य चालते; धोरणाच्या दिशेने जाणारे संशोधन विरळाच. या दिशेने हेतुपुरस्सर संशोधकांना वळवावयाला पाहिजे आहे. असे केल्याने संशोधक रुळलेल्या वाटेने जाण्याऐवजी नव्या कल्पना पुढे आणतील आणि त्यांच्यामध्ये राष्ट्रीय/प्रादेशिक दृष्टिकोनातून संशोधन करण्याची प्रवृत्ती वाढेल. नव्या संशोधन पद्धती विकसित करण्याचा प्रयत्नही फारसा होत नाही.

## 5·9 संशोधन कार्याच्या मर्यादा

अर्थशास्त्र अधिविभागात संशोधनकार्य चालविण्यात सर्वात मोठी अडचण अपुऱ्या निधीची असल्याचे मत एकसुराने सर्वच विद्यापीठांनी मांडले आहे. अर्थात सर्वच विद्यापीठांच्या वित्तीय अडचणी सारख्याच प्रकारच्या नाहीत. प्रकल्प/संशोधन अनुदान, प्रकल्पेतर संशोधन अनुदान, ग्रंथालय अनुदान, उपकरणांच्या देखभालीसाठीचे अनुदान, पूरक कर्मचाऱ्यांसाठी अनुदान, सर्वेक्षणासाठी कराव्या लागणाऱ्या प्रवास व दैनिक भत्त्यासाठी अनुदान, वगैरेसाठी मिळणाऱ्या अनुदानाची अनुपलब्धता किंवा अपुरेपणा यांच्याशी वित्तीय अडचणी बांधलेल्या आहेत. माहितीचे संकलन व त्यावर प्रक्रिया करण्यासाठी कराव्या लागणाऱ्या अनुषंगिक खर्चाकरिता पुरेल एवढे देखील अनुदान मिळत नसल्याची तक्रार 28 पैकी 22 विद्यापीठांनी केली आहे. अकरा विद्यापीठांना ग्रंथालय अनुदान अपुरे पडते. विदेशी तसेच भारतीय पुस्तकांच्या आणि नियतकालिकांच्या भरमसाठ वाढलेल्या किमती हा गेल्या दहा वर्षातील मोठा अडसर बनलेला आहे; याच काळात ग्रंथालय अनुदान जवळपास गोठले आहे. त्याकारणाने ग्रंथालयांमध्ये राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय नियतकालिके, अहवाल, सांख्यिकी माहिती देणारी प्रकाशने यांचा तुटवडा जाणवतो आहे. परिणामी, संशोधन कामासाठी संदर्भ कमी पडतात आणि सांख्यिकी माहितीचा आधार दुबळा राहतो. राज्य पातळीवरील काही विद्यापीठांकडे नियतकालिके मागविण्यासाठी आणि पुस्तके खरेदी करण्यासाठी पैसाच नसतो. संशोधनाच्या या संख्यात्मक व दर्जात्मक मर्यादा बनून राहिल्या आहेत. नेहमीचे अध्यापन व संशोधन कार्य चालविण्यासाठी किमान आवश्यक अध्यापक व कर्मचारी नेमण्याइतकेही अनुदान मिळत नाही अशी 28 पैकी 5 विद्यापीठ अधिविभागांची स्थिती होती. त्याकारणाने अध्यापनाचा विषयभाग व विशेषीकरण यांचा मेळ बसत नव्हता. यातूनच अध्यापनाचा अधिभार झाल्याने संशोधनाची कामेही रेंगाळली आणि दर्जाही सुमार राहिला.

नऊ विद्यापीठांच्या मतानुसार विद्यार्थ्यांमध्ये तळमळीचा अभाव आणि पदव्युत्तर व संशोधनाच्या पातळीवरील सदोष अभ्यासक्रम व संशोधन पद्धती यामुळे संशोधनाची पातळी अलीकडे खालावलेली आहे. यामध्ये सुधारणा करण्यासाठी या विद्यापीठांनी पुढील उपाययोजना सुचविल्या आहेत.

(1) संशोधनाच्या पद्धतीमध्ये सुधारणा व्हावी असा 10 विद्यापीठांचा अभिप्राय आहे. संशोधकांसाठी अधिक सखोल प्रबोधन वर्ग तसेच संशोधन पद्धतीचे वर्ग आयोजित करावयाला हवेत. पीएच. डी. साठी जे संशोधन केले जाते त्याचा एक अविभाज्य घटक म्हणून अनिवार्य असा काही अभ्यासक्रम असावा. अशी पद्धती देशातल्या सर्व इंडियन इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी–मध्ये आहे. यामुळे पदव्युत्तर शिक्षणातील बऱ्याच उणीवा कमी होऊ शकतील.

(2) संशोधन विद्यार्थ्याला अधिविभागातील ज्येष्ठ अध्यापक आणि दुसऱ्या संस्थांमधील अध्यापक यांच्याशी नियमितपणे विचारांचे आदानप्रदान करण्याची संधी उपलब्ध असली पाहिजे ही सहा विद्यापीठांची सूचना आहे. याकरिता अधिविभागात वरचेवर चर्चासत्रे व कार्यशाळांचे आयोजन करावे लागेल. हे

वारंवार करणे शक्य नसेल तर ठराविक कालखंडानंतर तरी करावे. अशा विद्यार्थ्यांना अधिविभाग / विद्यापीठ बाहेरील चर्चासत्रांमध्येही सहभागी होता यावे आणि त्याकरिता त्यांना प्रवास व दैनिक भत्ता देण्याची व्यवस्था व्हावी. सद्य:स्थितीत अध्यापकांना चर्चासत्रांत सहभागी होण्यासाठी संस्थात्मक निधीची व्यवस्था आहे. काही संशोधक विद्यार्थ्यांना छात्रवृत्तीचा लाभ मिळा-लेला असतो. या दोघांना पैशाची अडचण नाही मात्र ज्या संशोधकांना असा कोणताच लाभ मिळत नसतो त्यांना स्वबळावर चर्चासत्रात सहभागी होता येत नाही. प्रकल्पाशी निगडित संशोधनाच्या बाबतीत प्रवास व दैनिक भत्त्यासाठी जास्त तरतूद असेल तरच अध्याप-कांना दुसऱ्या अनेक संस्थांना भेटी देऊन पुरेशी माहिती संकलित करता येईल, तज्ज्ञांशी चर्चा करता येतील आणि चर्चासत्रे / परिषदा यामध्ये आपले संशोधन मांडून त्यावरील प्रतिक्रिया जाणून घेता येतील. या रीतीनेही संशोधनाचा दर्जा वाढविणे शक्य आहे. प्रकल्प-निगडित संशोधनातील आणखी एक अडचण म्हणजे त्या कामात स्वत:ला झोकून देऊन काम कर-णारा पूरक व्यक्तींचा ताफा उपलब्ध होत नाही. यातून एक वाट काढावयाची झाली तर एम. फिल./पीएच. डी. करता प्रकल्पाशी निगडित विषय विद्यार्थ्यांनी निवडावा म्हणून त्यांना छात्रवृत्ती देण्याची मुभा प्रकल्प संचाल-काला द्यावी. या विद्यार्थ्यांना प्रकल्पाच्या कामातून उपलब्ध झालेली माहिती आपल्या प्रबंधामध्ये वापरता यावी. 'नेहू' चा ( North East Hill University ) याबाबतीतला अनुभव चांगला आहे.

(3) कोणत्याही संशोधन कामाचे, मग ते सैद्धा-न्तिक असो वा अनुभवाधिष्ठित, पीएच. डी. पदवीसाठी असो वा केवळ संशोधनासाठीचे असो, उच्चस्तरीय तज्ज्ञ मंडळाकडून काटेकोरपणे मूल्यमापन व्हावे. त्यातून त्या संशोधनातील माहितीवरील भाष्ये, निष्कर्षांची यथा-र्थता, धोरणात्मक निर्णयासाठी उपयुक्तता, पुढील संशोधनासाठी दिग्दर्शन, विषयाची समज, इत्यादी बाबी काटेकोरपणे पारखून घेता येतील. या मूल्यमापनाचा पीएच. डी. पदवीच्या परीक्षेशी काहीही संबंध असणार नाही. या दोन्ही गोष्टी स्वतंत्र राहतील. अशा प्रका-रच्या त्रयस्थ मूल्यमापनामुळे संशोधनाच्या कामाच्या दर्जाचे योग्य ते मूल्यमापन होईल, त्यातील उणीवा भरून काढता येतील. हा प्रयत्न संशोधनाचा दर्जा वाढविण्याला हातभार लावील.

(4) संशोधकाने आपले संशोधन पुस्तक व लेखांच्या रूपाने प्रकाशित करण्याचे त्याच्यावर बंधन असावे. त्यामुळे समव्यावसायिकांना त्या संशोधनाची गुणवत्ता जोखता येते. ज्याचे संशोधन प्रसिद्ध झाले नसेल त्यांना नोकरीमध्ये संधी देताना खालच्या क्रमांकावर ठेवावे व त्यांच्या संशोधनाची मान्यता कमी समजावी. या मार्गाने गेल्यास संशोधनाचा तपशील सर्वदूर पसरून ज्ञानसंभार वाढण्यास मदत होईल आणि त्याचवेळी संशोधकदेखील आपले काम दर्जेदार करण्यासाठी खास परिश्रम घेतील.

(5) काही अर्थशास्त्र अधिविभागांना संशोधन अनुदानाचा वापर करताना अनेक अडथळे पार करण्याचे कष्ट घ्यावे लागतात. निधी देणाऱ्या संस्थांकडून निधी वेळेवर उपलब्ध न झाल्याने प्रकल्पाचे काम रेंगाळते. यापुढचा टप्पा म्हणजे, जर आवश्यक तो निधी त्या संस्थेकडून विद्यापीठाकडे वेळेत आलेला असेल तर विद्या-पीठ प्रशासनाच्या अनेकविध प्रशासकीय पद्धतींमुळे अर्थशास्त्र अधिविभागाच्या किंवा प्रकल्प संचालकाच्या हाती तो पैसा वेळेत येत नाही. यामुळेही विविध समस्या उभ्या राहून प्रकल्पाच्या कामातील अडचणी वाढत जातात. यातून मार्ग काढण्यासाठी प्रकल्पाचा निधी वापरण्याच्या बाबतीत अर्थशास्त्र अधिविभागाला/प्रकल्प संचालकाला वित्तीय व प्रशासकीय स्वातंत्र्य देण्याची सूचना काही विद्यापीठ अधिविभागांनी केली आहे. खरे तर यापुढचा योग्य मार्ग म्हणजे प्रकल्पासाठीची विशिष्ट रक्कम संबंधित अध्यापकाकडेच सरळ उपलब्ध करून द्यावी. यासाठीची एखादी चांगली व्यवस्था निर्माण करण्याचा विचार व्हावा. प्रकल्पाच्या संशोधन निधीचे वाटप अधिविभागातील काही संशोधक अध्यापकांमध्ये करण्याच्या पद्धतीमुळे मात्र अधिविभागांतर्गत कलह निर्माण होतात आणि काही वेळा काही व्यक्तींची दादागिरीही चालते. हे टाळले पाहिजे.

## 9

## संशोधनासंबंधी अधिक काही

स्वातंत्र्यपूर्व काळात विश्वासार्ह दुय्यम सांख्यिकी

माहितीची बरीच कमतरता होती. त्यामुळे संशोधकांनी आपल्या पीएच. डी. प्रबंधाकरिता तसेच संशोधन अभ्यासाकरिता प्राथमिक माहितीवरच भर दिलेला होता. स्वातंत्र्योत्तर काळात दुय्यम सांख्यिकी माहितीची कमतरता बरीच दूर झालेली आहे. त्यामुळे आता संशोधक राष्ट्रीय व दर डोई उत्पन्न, बचती व भांडवलनिर्मिती, उपभोग व गुंतवणुकी, सरकारी महसूल व खर्च, सरकारी कर्जे, उसनवारी व तुटी, निर्यात, आयात आंतरराष्ट्रीय व्यवहार ताळेबंद (balance of payments) व वस्तुव्यापार शेष (balance of trade), कृषी व औद्योगिक उत्पादन, रोजगार वगैरेसंबंधी समष्टीय पातळीवर अगदी 30–40 वर्षांच्या कालखंडासाठीची कालश्रेणीबद्ध ( time–series ) सांख्यिकी माहिती सहजसुलभ रीतीने मांडू शकतात. हे राष्ट्रीय पातळीप्रमाणेच राज्य पातळीवरही मांडता येते. विशेषत: 1970–71 पासूनची राज्यांची माहिती आता सहजपणे उपलब्ध आहे. साहजिकपणेच, संशोधकांचा कल प्राथमिक सांख्यिकीकडून दुय्यम सांख्यिकी माहिती वापरण्याकडे वळला आहे.

याचबरोबर दुय्यम सांख्यिकी माहिती वापरण्याच्या काही मर्यादा आहेत याकडे दुर्लक्ष होऊ नये. अशी माहिती विविध संस्थांकडून उपलब्ध झाल्यामुळे माहितीमध्ये फरक असतो. आणि विसंगतीही असते. महत्त्वाचे म्हणजे, अशी माहिती उपलब्ध होण्याला बराच अवधी लागतो; ती खूप उशीरा उपलब्ध होते. एका बाजूने अशी परिस्थिती असताना दुसऱ्या बाजूने अजूनदेखील संशोधक व्यक्तिश: स्थानिक व प्रादेशिक पातळीवरील सांख्यिकी माहिती स्वत: निर्माण करण्यावर भर देतात. मात्र असे करताना, एक तर संशोधकाने नमुना निवड योग्य प्रकारे केलेली नसते अथवा याविषयी प्रबंधात काहीच उल्लेख केलेला नसतो. परिणामी, अशा प्रकारचे बव्हंशी संशोधन अभ्यास 'दाखला अभ्यास' ( case study ) या स्वरूपानेच बाहेर पडतात. त्यांच्या निष्कर्षांचे सामान्यीकरण (generalisation) करणे अवघड असते. एवढ्याकरिता संशोधकांना नमुना चाचणीच्या पद्धतीशास्त्राचे (methodology of sampling ) सखोल शिक्षण देणे अत्यंत महत्त्वाचे आहे. सर्वेक्षणातील विविध टप्पे, प्रश्नावली बनविणे व तिची पूर्व चाचणी घेणे, प्रतियोग्याची ( respondent ) मुलाखत घेण्याची पद्धती, नमुना आकार ठरविण्याची शास्त्रोक्त पद्धती, वगैरे बाबतीत संशोधकांना काळजीपूर्वक तयार केले पाहिजे. बव्हंशी विद्यापीठ अधिविभागांमध्ये होणाऱ्या संशोधन कामात हे अंग अतिदुबळे असते. याच संस्थांमधून मोठ्या प्रमाणात संशोधन मार्गदर्शक आणि त्यांचे विद्यार्थी प्राथमिक सांख्यिकी माहिती वापरून संशोधन करणे पसंत करतात.

स्वातंत्र्यपूर्व कालातील प्राथमिक माहितीवर आधारलेले पीएच. डी. साठीचे संशोधन वर्णनात्मक –निर्माणकारी अशा प्रवर्गातले होते. त्यामुळे माहितीतील पोकळी भरून काढण्यास मदत व्हावयाची यादृष्टीने ते चांगले होते. अनेकदा विश्लेषणात्मक तंत्राला अंत:–प्रेरणा व काटेकोर विश्लेषणाची जोड दिली जावयाची. हे करताना संकल्पनात्मक आकृतीबंधाची चौकट सांभाळली जावयाची. जिथेजिथे हा आकृतीबंधच अपुरा वाटावयाचा तिथेतिथे त्याची भरपाई करण्यासाठी भारतीय संशोधकांनी प्रच्छन्न बेकारी, धान्यपुरवठ्याचा मागे वळणारा वक्र, विक्रेय (marketable) व विक्रीत (marketed) वाढावा, अशा प्रकारच्या संकल्पनांचा वापर त्या सैद्धान्तिक आकृतीबंधात केला. अशा पद्धतीच्या अंत:प्रेरणा व काटेकोर विश्लेषण या गोष्टी सद्य:कालीन पीएच. डी. प्रबंधात आढळणे विरळाच. (अ) अर्थशास्त्रासाठी गणित ( Mathematics for Economics), (आ) गणितीय अर्थशास्त्र / संख्याशास्त्र, (इ) अर्थमिती (Econometrics), संक्रिया संशोधन ( Operational Research ) अशा प्रकारच्या संख्यात्मक तंत्रांच्या शाखांचा उदय पन्नासच्या दशकाच्या उत्तरार्धात आणि साठाच्या दशकाच्या पूर्वार्धात झाल्यामुळे अर्थशास्त्रीय विश्लेषणपद्धतीत पद्धतीमीमांसात्मक क्रान्ती (methodological revolution) घडून आलेली आहे. त्यामुळे आता ही तंत्रे केवळ पदव्युत्तर अभ्यासक्रमात शिकविली जातात एवढेच नव्हे तर त्यांचा व्यापक प्रमाणावर संशोधन कार्यात वापर होऊ लागला आहे. या तंत्रांची संशोधकांवर इतकी मोहिनी पडली आहे की, त्यांच्या वापराविना कोणत्याही प्रबंधाला दर्जा प्राप्त होत नाही अशी व्यापक समजूत झालेली आहे. त्यामुळे चालू पिढीतील प्राध्यापकांना संशोधकांनी रेषीय प्रायोजना (linear programming), निविष्टी–उद्विष्टी प्रतिमान (input–output model), अर्थमिती प्रतिमान (econometric model) अशा प्रकारच्या जटिल

(sophisticated) पद्धती वापरण्याच्या सूचना देण्याचा मोह आवरत नाही. मग त्या पद्धतींचे यथा-योग्य आकलन न होताच त्या वापरल्या जातात आज-काल हा रोग बऱ्याच व्यापक प्रमाणावर बोकाळला आहे.

याहीपेक्षा अधिक व्यापक प्रमाणावर सध्या लोक-प्रिय आहे ते समाश्रयण प्रतिमान (regression model). संशोधकाला हे प्रतिमान पूर्णपणे आकलन झालेले नसतानाही त्याचा वापर होतो आणि त्या प्रति-मानातून प्राप्त होणाऱ्या उत्तरांचा नेमका काय अर्थ लावावयाचा हे त्याला उमगतच नाही. अशा परिस्थि-तीत, समाश्रयण (regression) व सहसंबंध (correlation) यांच्या गुणांकांचे (coefficients) चिन्ह आणि अर्थपूर्णता (significance) यांचे वर्णन करण्या-पर्यंतच फक्त मजल मारली जाते; त्यांच्या मूलगामी व सखोल महत्त्वाकडे पूर्णपणे डोळेझाक होते. यापुढे जाऊन, अनेकदा मिळालेल्या उत्तराच्या आधारावर लावलेले अर्थ आणि प्रस्थापित केलेले निष्कर्ष त्या उत्तरांमधून जेवढे काही आणि ज्या प्रकारे ध्वनित करावयाचे असते त्यापेक्षा अत्यंत तोकडे पडतात. या कारणाने संशोधनाचा मूळ हेतूच पूर्णतया साध्य केला जात नाही.

## 7

## अहवालाबाबत थोडेसे भाष्य

भारतीय विद्यापीठांच्या अर्थशास्त्र अधिविभा-गांचे चित्र सामान्यतः कसेकाय आहे ते वरीलप्रमाणे या अहवालाने उघड केले आहे. अशा प्रकारचे हे पहि-लेच सर्वेक्षण आहे. निवडलेल्या नमुन्यातील सर्वच 131 विद्यापीठांनी जागरुकता दाखवून प्रश्नावली भरून पाठवावयाला हवी होती. परंतु या बाबतीत त्यातील बहुसंख्यांनी संशोधकांची निराशाच केली आहे. एवढ्या साध्या कामाच्या बाबतीतही विद्यापीठांचे अधिविभाग निष्क्रियता दाखवीत असतील तर अध्यापन व संशोधन या दोन्ही कामांत त्यांचे लक्षणीय योगदान कसे लाभ-णार? किंवा ही प्रश्नावली भरून पाठविणे त्यांना निरर्थक तर वाटले नसेल ना? त्यांनी प्रश्नावली भरून पाठविण्याचे का टाळले याचाही मागोवा घेणे उद्बोधक ठरेल. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या या समितीने हाही एक उपक्रम करून पाहावा असे सुचवावेसे वाटते. पाहू या कसा प्रतिसाद मिळतो ते आणि कोणती कारणे पुढे येतात ते. संशोधन करणाऱ्यांनीच संशोधन कामाला हातभार लावावयाचा नाही अशी ही स्थिती होती. सर्वांकडूनच परिपूर्ण उत्तरे मिळाली असती तर हे सर्वे-क्षण अधिक प्रातिनिधिक बनून त्यातील निष्कर्षांना जास्त वजन प्राप्त झाले असते. ही मोलाची संधी अनेकांनी हुकविली आणि लहान नमुन्याच्या आधारे मांडलेल्या निष्कर्षांना आपोआपच मर्यादा निर्माण झाल्या.

जे काही निष्कर्ष समोर आलेले आहेत त्यातून बऱ्याच अधिविभागांतील शोचनीय स्थिती प्रकर्षाने पुढे आली आहे, मग ते अध्यापन असो की संशोधन. अध्यापक वर्गाची पुरेशी संख्या अधिविभागात नसणे हे मूळ दुखणे आहे. याला अनेक आयाम आहेत. मूलतः विद्यापीठ अनुदान आयोगाकडून पुरेशी पदे मान्य होऊन मिळत नाहीत. ती मिळाली तर पाच वर्षांनंतर त्या पदांची पूर्ण आर्थिक जबाबदारी राज्य सरकारांनी स्वीकारावयाची असते अशी त्यासोबत अट असते. अनेकदा राज्य सरकारे याला तयार नसतात, किंवा त्यातील फक्त थोड्याच पदांची आर्थिक जबाबदारी स्वीकारण्यास होकार देतात. या परिस्थितीत विद्यापीठ अनुदान आयोगाकडून पदे मिळण्याला अर्थच उरत नाही. या संबंधात राज्यांची धोरणे वेगवेगळी आहेत. महाराष्ट्र शासनाने तर राज्यातील सर्व विद्यापीठांना आदेश दिला आहे की, विद्यापीठ अनुदान आयोगाकडून पदे मंजूर करवून घेण्यापूर्वी त्या पदांचे प्रस्ताव प्रथम महाराष्ट्र शासनाकडे पाठवावयाचे. त्यातील जेवढ्या पदांना शासन मान्यता देईल तेवढ्याच पदांसाठी विद्यापीठ अनुदान आयोगाकडे मागणी करावयाची. ही पहिली चाळणच मोठ्या भोकांची असल्याने मुळातच फारशी पदे अधिविभागांच्या हाती लागत नाहीत. आठव्या योजनेचा अनुभव सर्वच विद्यापीठांचा ताजा आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाने सर्वच विद्यापीठांना विविध पदे मंजूर केली, परंतु महाराष्ट्र शासनाने पुढील जबाबदारी घेण्यास नकार दिल्याने शिवाजी विद्या-पीठाचा अपवाद वगळता इतर विद्यापीठांना आपल्या पदांवर पाणी सोडावे लागले. साहजिकच ही सर्व न घेतलेली पदे इतर राज्यांतील क्रियाशील विद्या-पीठांच्या वाट्याला गेली. अधिविभागांतील मंजूर

पदांच्या बाबतीत बरीच विषमता आढळल्याचे अहवालात भाष्य आहे. परंतु त्यामागे वर वर्णन केलेली परिस्थिती हा एक महत्त्वाचा घटक आहे याकडे पूर्ण दुर्लक्ष झाले आहे. आता नवव्या पंचवार्षिक योजनाकालासाठी विद्यापीठे आपल्या योजना आखू लागली आहेत त्या आखताना महाराष्ट्र सरकारच्या प्रतिकूल धोरणामुळे नवी पदे मागण्याला अगदी खालचा क्रमांक दिला जात आहे. असे घडले तर, निदान महाराष्ट्रात तरी, विद्यापीठांच्या अर्थशास्त्र अधिविभागांतील (तसेच सर्वच विषयांच्या अधिविभागांतील) विविध स्तरांवरील अध्यापकांची संख्या वाढणार नाही, त्यामुळे कनिष्ठ पदावरून वरिष्ठ पदावरील वाटचाल थांबेल, नव्यांना अधिव्याख्याता पदाची कवाडे बंद राहतील, नवनवे विषय सुरू करता येणार नाहीत. असे घडल्यास अध्यापन आणि संशोधनकार्याला सक्रिय व अद्ययावत कसेकाय बनविणार? अहवालाने या दूरगामी परिणामांची अजिबात दखल घेतलेली नाही.

जी काही पदे उपलब्ध असतात ती भरण्याबद्दल विद्यापीठांच्या पातळीवर अनेक घडामोडी घडत असतात. यामध्ये विद्यापीठांतर्गत राजकारण हा एक महत्त्वाचा घटक असतो. कोणाची तरी वर्णी लावण्यासाठी नियमांना मुरड घातली जाते, वाकडेतिकडे मार्ग शोधले जातात, दबावाचा खेळ खेळला जातो, यातून बचाव करण्यासाठी पदे भरण्याचे काम शक्य तेवढे पुढे ढकलले जाते, आरक्षणाच्या तरतुदींचे सोईस्करपणे अर्थ लावले जातात, कोर्टकचेऱ्यांची प्रकरणे झडतात, आणि असेच बरेचसे. सद्यःस्थितीत पदे आरक्षणाच्या शासनाच्या सातत्याने बदलणाऱ्या धोरणांमुळे उच्च पदांवर विशिष्ट विशेषीकरणाची माणसे मिळत नाहीत. अशा वेळी वर्ष सहा महिन्यांसाठी इतर प्रवर्गातील माणसे घेण्याचा प्रयत्न होतो. अशा अल्पावधीसाठी आणि अनिश्चित पदावर काम करण्यासाठी ज्येष्ठ अध्यापक मिळत नाहीत. म्हणून तात्पुरत्या स्वरुपाच्या नेमणुका अधिव्याख्याता म्हणून केल्या जातात. या पदाकरिताही अनुभवी व्यक्ती मिळत नाहीत. अनेकदा तर अगदी नवखी माणसे घेऊन शिकविण्याचे काम उरकावे लागते. यामुळे दुहेरी नुकसान. अननुभवी व्यक्तींना घेऊन अध्यापनाचा गाडा ओढावा लागतो त्यात विद्यार्थ्यांचे नुकसान होते. ज्येष्ठ पदे न भरल्याने अध्यापन आणि संशोधन या दोन्हींकडूनही अधिविभाग पांगळा बनतो.

संशोधनाला चालना देऊन प्रतिष्ठाही मिळवून देता आली पाहिजे याबद्दल कोणाचेही दुमत नसावे. नव्या पिढीतून संशोधक उभे करता आले पाहिजे संशोधनासाठी सर्वात मोठी अडचण पैशाची असते. सर्वच संशोधकांना निधी पुरविणाऱ्या संस्थांकडून अनुदाने मिळू शकत नाहीत. अशा वेळी विद्यापीठ पातळीवर काहीतरी प्रयत्न व्हावेत हे ओघानेच आले. अलीकडेच शिवाजी विद्यापीठाने यादृष्टीने एक स्वागतार्ह पाऊल उचलले आहे. विद्यापीठाने स्वतःच्या निधीतून विद्यापीठाच्या सर्व अधिविभागांकरिता प्रत्येकी एका संशोधन छात्रवृत्तीची व्यवस्था केली आहे. संशोधकाला महिना 1,000 रुपये याप्रमाणे दोन वर्षासाठी छात्रवृत्ती मिळेल आणि अपवादात्मक परिस्थितीत त्या संशोधकाला तिसऱ्या वर्षासाठीही ती उपलब्ध होईल. पूर्णवेळ संशोधन काम करणाऱ्यालाच याचा लाभ मिळेल. संशोधकाला विद्यापीठ अधिविभागातच आपले काम करावे लागेल. त्याला एकदोन तास अध्यापनाचे कामही देण्याची तरतुद या योजनेत आहे.

संशोधनाला प्रतिष्ठा मिळणे हाही कळीचा विषय आहे. प्रथमतः एम. फिल./पीएच. डी. चा विचार करू. सध्यःस्थितीत ज्या प्रकारचे संशोधन या पदव्यांसाठी सादर होते त्याबद्दल सार्वत्रिक असमाधान आहे. याचे एक कारण म्हणजे संशोधन मार्गदर्शक म्हणून मान्यता देताना विद्यापीठांकडून पुरेशी काळजी घेतली जात नाही. विशेषतः पीएच. डी. करिता मार्गदर्शकाच्या मान्यतेसाठी विद्यापीठांचे निकष अतिशय पातळ आहेत आणि प्रत्यक्षात त्यांचेही काटेकोरपणे पालन होत नाही. अगदी काल पीएच. डी. पदवी मिळाली की आज त्याला मार्गदर्शक म्हणून मान्यता दिली जाते. अशा व्यक्तीच्या लेखी स्वतःचा पीएच. डी. व्यतिरिक्त संशोधनाचा व्यापक अनुभव असावयाला पाहिजे. दर्जेदार विद्वानिष्ठ नियतकालिकांत एकही लेख प्रकाशित न केलेली व्यक्ती जेव्हा संशोधन मार्गदर्शकाची भूमिका करू लागते तेव्हा पुढील संशोधन कामाचा सगळाच पाया कच्चा राहतो. संशोधनाचा आराखडा अनेक उणिवांनी भरलेला असतो. त्यात अनेकदा सुधारणा सुचवाव्या लागतात. विद्यार्थी हा मार्गदर्शकावर पूर्ण अवलंबून असतो. संशोधक व विद्यार्थी याना संशोधन पद्धतीचे मूलभूत ज्ञान जवळजवळ नसतेच. या पार्श्वभूमीवर प्रबंध कसाबसा बेतला गेला म्हणजे त्याच्या

मूल्यमापनासाठी परस्परहिताय भूमिका घेणारे परीक्षक नेमून घेण्यावरच सारी भिस्त असते त्यामध्ये अनेकजण यशस्वी होतात. या प्रक्रियेतून पीएच. डी. मिळविलेली व्यक्ती लगोलग मार्गदर्शक बनण्यासाठी विद्यापीठाकडे अर्ज पाठविते, आणि यातून गुणक परिणाम (multiplier effect) जाणवू लागतो. तेव्हा जोपर्यंत विद्यापीठे संशोधन मार्गदर्शकांना मान्यता देताना काटेकोर बनत नाहीत आणि बहुजनहिताय भूमिका घेतात तोपर्यंत पीएच. डी. चे प्रबंध दर्जेदार बनविण्याची हाकाटी व्यर्थ आहे, आणि अशी दुबळी अर्हता असलेल्या अध्यापकांकडून भरीव प्रकारचे, उच्च पातळीचे आणि त्याहीपुढे जाऊन अर्थशास्त्रात लौकिकपूर्ण भर घालणारे संशोधन कार्य होईल अशी पुसटशीही अपेक्षा बाळगणे हे मृगजळ आहे. महत्त्वाचे म्हणजे अशा अनेक दुबळ्या पीएच. डी. पदवी धारकांच्या दृष्टीने ही पदवी म्हणजे आयुष्याची इतिश्री असते. ती मिळविल्यानंतर स्वतःला कृतकृत्य मानून संशोधन कामाला पूर्णविराम देणारेच अधिक संशोधक सापडतील.

संशोधनाला प्रसिद्धी देण्याबद्दल वास्तव चित्रही काहीसे भकास आहे. वरच्याच परिच्छेदातील शेवटच्या विचाराचा धागा पकडून प्रथम सांगावयाचे म्हणजे, जे दुबळे पीएच. डी. प्रबंध परस्परहिताय भूमिकेतून सहिसलामत बाहेर पडतात त्यांचे लेखक व मार्गदर्शक तो प्रबंध प्रकाशित करण्याच्या भानगडीतही पडत नाहीत; त्यांना स्वतःलाच प्रबंधाची पातळी माहीत असते. राहिले ते बऱ्यापैकी असलेले प्रकाशनीय प्रबंध. लेखक व मार्गदर्शक दोघांनाही ते प्रकाशित व्हावेत अशी मनोमन इच्छा असते. मात्र त्यांना प्रकाशक सापडत नाही. प्रबंध प्रकाशनासाठी UGC / ICSSR यांच्याकडून साधारणतः 5 ते 10 हजार रुपयांपर्यंत अनुदान देण्याची व्यवस्था आहे. त्या चाकोरीतून पुढे जाऊन अनुदान मिळविले तरी विविध कारणांनी प्रकाशक मंडळी प्रबंध छापण्याचे नाकारतात. त्यामुळे काही प्रबंध प्रकाशनीय असूनही प्रकाशनाविनाच राहतात. दुसरे, प्रकाशकांनी आजकाल सावकारी वृत्ती स्वीकारली आहे. अनुदान घेतात पण पुस्तकाच्या किमती चढ्या ठेवतात. लेखकाला स्वामित्वधन (royalty) म्हणून पुस्तकाच्या विक्रीतून मिळणारा हिस्सा अजिबात दिला जात नाही. त्या बोलीवरच प्रकाशनासाठी प्रबंध स्वीकारला जातो. पैसे नाही मिळाले तरी किमानपक्षी आपले संशोधनकार्य उजेडात येते अशा तडजोडीने तोही मुकाटपणे सर्व प्रतिकूल अटी स्वीकारतो. याहीपुढे जाऊन, पुस्तक प्रकाशनानंतर लेखकाला फक्त 3 ते 5 प्रती देतात. अधिक हव्या असतील तर त्यानेही विकत घ्यावयाच्या. जो कोणी प्रकाशक स्वामित्वधन देण्याची तयारी दाखवितो तो ते रोखीने न देता पुस्तकरूपाने देण्याचा एक नवा प्रघात रूढ होऊ लागला आहे. स्वामित्वधनापोटी लेखकाला त्या पुस्तकाच्या 40–50 प्रती देऊन टाकावयाच्या. आणि मग तो लेखक एक तर त्या प्रती कोणाला तरी भेट देऊन हळूहळू संपवितो किंवा त्याचे पैसे करण्यासाठी शिक्षण संस्थांकडे गळ घालतो. बऱ्याचदा अशा प्रती ओळखीच्या स्थानिक ग्रंथालयांमध्येच विकल्या जातात. ते पुस्तक वापरणारे तिथे कुणीच नसतात. वास्तव चित्र हे असे आहे. याची जाणीव प्रथितयश संशोधन संस्थांमधील संशोधकांना कधीच येणार नाही. कारण, त्यांना अशा परिस्थितीला कधीच सामोरे जावे लागत नाही. त्यांच्यासाठी प्रकाशक थांबलेले असतात. परंतु विद्यापीठ पातळीवरील बऱ्याच प्रबंधांच्या प्रकाशनाच्या बाबतीतील वस्तुस्थिती ध्यानात घेतली तर अहवालाने प्रबंध प्रकाशनाची सक्ती करण्याची केलेली सूचना प्रत्यक्षात कशी उतरविणार ?

अर्थात अहवालाने पर्याय म्हणून सुचविलेला लेख, निबंध, संशोधन पुस्तिका, इत्यादींचा मार्ग मात्र आवर्जून विचारात घ्यावा. प्रबंधातील संशोधन या माध्यमांतून प्रसिद्ध होण्यात पुस्तकासारख्या अडचणी नाहीत, हा मार्ग खुला आहे. याबाबतीत संशोधकांची निष्क्रियताच जास्त कारणीभूत असते. अनेकांची पदवी मिळविल्यानंतर अधिक जोमाने लिहिण्याची ऊर्मी संपलेली असते. संशोधनपर लेख लिहून प्रसिद्ध करण्याच्या बाबतीत अध्यापकांमध्ये भयानक स्वरूपाचे जडत्व व निष्क्रियता आहे हे कटुसत्य पचवावे लागेल. प्रबंधाचे प्रकाशन लेखमालांच्या स्वरूपात विद्यानिष्ठ नियतकालिकातून करता येते. त्याखेरीज प्रबंधोत्तर संशोधनपर लेखही पुढे यावयाला पाहिजेत. अशा प्रकाशनांचा विचार विद्यापीठांनी विविध संदर्भात करूनच अध्यापकांच्या बढत्या वगैरेबद्दल निर्णय घ्यावेत. याच अनुषंगाने शिवाजी विद्यापीठात कित्येक वर्षांपासून एक योजना राबविली जाते. मान्य अशा प्रतिष्ठित विद्यानिष्ठ परिषदांना विद्यापीठाचे प्रतिनिधी म्हणून विद्या–

पीठ खर्चाने अध्यापकांना पाठविताना त्यांचा निबंध परिषदेसाठी स्वीकारलेला असावा अशी पूर्वअट घातलेली आहे. दुसरे, सन 1994 पासून पदव्युत्तर अधिविभागांतील अध्यापकांमधून 'गुणवंत अध्यापक' निवडून त्यांचा जाहीर सत्कार करण्याचा उपक्रम अनुसरला आहे. या निवडीच्या वेळी अध्यापकांच्या अध्यापन व संशोधन कामाला बरेच महत्त्व दिले जाते.

निधी पुरविणाऱ्या राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय, वगैरे संस्थांकडून निधी मिळवून वेगवेगळे प्रकल्प राबविताना अर्थशास्त्र अधिविभागाला (आणि सर्वच अधिविभागांना) निधीच्या वापरामध्ये विद्यापीठ प्रशासनाच्या कामकाज पद्धतीच्या जाळ्यामधून सातत्याने मार्ग काढावा लागतो. सर्व प्रक्रिया वेळकाढू असते. खुलासे आणि प्रतिखुलासे यामध्ये अध्यापकांची शक्ती आणि वेळ खर्च होतो. कालापव्ययामुळे नियोजित खर्च वेळेत होत नाही आणि त्यातून निधीचा उपयोग वेळापत्रकाप्रमाणे होत नसल्याबद्दल निधी पुरविणाऱ्या संस्थांकडून ठपका येत राहतो. प्रशासकीय चाकोरीमध्ये सुलभता आणण्याचा विचारही त्यासंबंधीच्या अधिकारी–कर्मचारी मंडळींना मानवत नाही. महत्त्वाचे म्हणजे, निधीचा उपयोग अपुरा होतो आहे ते आढळल्यामुळे संबंधित संस्थेकडून निधीप्रवाह आटतो एवढेच नव्हे तर संबंधित कार्यक्रमाखाली पुढील तीन–पाच वर्षांसाठी निधी मिळविण्यावर त्याचा प्रतिकूल परिणाम होतो. याचे सोयरसुतक प्रशासन यंत्रणेला नसते. संशोधन कार्याच्या प्रगतीमधील हा एक दुर्धर अडथळा आहे. हे सर्व ठिकाणचे दुखणे आहे. जिथे अधिविभागांना स्वायत्तता देण्याची तरतूद असते, त्याबाबतीतही शक्य तेवढी चालढकल चालते.

शेवटी, अहवालातील तपशिलाविषयी थोडेसे. छपाईच्या बाबतीत थोडी काळजी घ्यावयाला हवी होती. जागोजागी आकड्यांच्या व शब्दांच्या स्पेलिंगच्या चुकांबरोबरच वाक्यरचनेतील चुकाही राहून गेल्या आहेत. प्रकरण 4 च्या अगदी प्रारंभीचा 31 ते 33 या पानांवरील तोच मजकूर अक्षरशः पुन्हा 'Role of Higher Education' या उपशीर्षकाखाली 33 ते 35 या पानांवर छापला आहे. उपलब्ध माहितीचे विश्लेषण करून निष्कर्ष मांडताना संबंधित माहिती देणाऱ्या विद्यापीठ अधिविभागांची संख्या कमी असली तरी सरासरी काढताना ती 40 विद्यापीठ संख्या धरून काढलेली आहे. उदाहरणार्थ, पान 46 वर विद्यापीठांच्या प्रबोधन वर्गाबद्दल शेवटच्या परिच्छेदात निष्कर्ष मांडले आहेत. असे वर्ग 40 पैकी 10 अधिविभागांनीच भरविले. ते UGC प्रायोजित असतात. त्यांचा कालावधी 3 ते 4 आठवड्यांचा असतो आणि सहभागी अध्यापकांची संख्या 35 ते 45 असावी लागते हे सर्वज्ञात आहे. असे असताना अहवालाचा निष्कर्ष सांगतो की, प्रत्येक प्रबोधन वर्गाचा सरासरी कालावधी 9·48 दिवस, विद्यापीठ अधिविभागाबाहेरील सहभागींची सरासरी संख्या 11·43, अधिविभागातील संख्या 2·45, अधिविभागाबाहेरील तज्ज्ञांची सरासरी संख्या 3·25 आणि अधिविभागातील संख्या 2·05 होती. हे वास्तवतेला सोडून आकडे कसे निर्माण झाले? अहवालकर्त्यांनी 10 विद्यापीठांच्या आकड्यांना 40 च्या संख्येने भागले. हे चुकीचे आहे. असाच प्रकार आणखीही काही जागी आहे. त्यामुळे ही सर्व मांडणी चुकीची झाली आहे. अशा प्रकारच्या महत्त्वाच्या त्रुटी या पातळीवरील संशोधन अहवालात असू नयेत अशी सर्वसामान्य अपेक्षा आहे. अहवालकर्त्यांनी या अहवालावर आणखी एक हात फिरवून तो अचूक बनेल याची काळजी घ्यावी.

## संदर्भ सूची

Shri Prakash, Nilakantha Mohenty, Ranita Datta, STANDARD OF TEACHING AND RESEARCH IN ECONOMICS IN INDIAN UNIVERSITIES (A Study Undertaken on Behalf of UGC Panel of Economists: 1991–93), Educational Planning Unit, National Institute of Educational Planning and Administration, New Delhi, June 1996, pages 88.

[**महत्त्वाची दुरुस्ती :** या लेखाच्या शीर्षकामध्ये 'अध्ययन' या शब्दाऐवजी 'अध्यापन' असे वाचावे.]

□ □

# खतासाठीच्या अर्थसाहाय्याचे अर्थशास्त्र

**वसंत जुगळे ***

## 1

### प्रस्तावना

अर्थसाहाय्य ( subsidy ) देण्याची पद्धती ही नियोजित आर्थिक विकासाच्या प्रक्रियेतील एक महत्त्वाची प्रथा बनली आहे. अलीकडच्या सर्वच कल्याणकारी राज्यांमध्ये अर्थसाहाय्य देण्याची पद्धती अस्तित्वात आहे. विशेषतः न्यूनविकसित राष्ट्रांमध्ये अर्थसाहाय्याचे धोरण हे अधिक न्याय्य आणि सयुक्तिक आहे. कारण अशा अर्थव्यवस्थांमध्ये सामाजिक न्याय, सर्वांना समान संधी, आर्थिक विकासाचा समान वेग, समतोल विभागीय व क्षेत्रीय विकास यासारखी महत्त्वाची उद्दिष्टे अर्थ-साहाय्याच्या माध्यमातून साकार करता येऊ शकतात.

अर्थसाहाय्य वितरणाच्या अनेक पद्धती अमलात आहेत. काही पद्धतींना सैद्धान्तिक पार्श्वभूमी आहे तर काही पद्धती व्यावहारिक दृष्टिकोनातून विकसित केल्या गेल्या आहेत. कोणत्या वस्तूवर कोणत्या दराने अथवा कोणत्या पद्धतीने अर्थसाहाय्य देता येईल याचा विचार सामाजिक न्यायाच्या चौकटीतून धोरण निर्धारित करणाऱ्या सरकारी अधिसत्तेला करावा लागतो. तसेच निर्धारित केलेल्या पद्धतीद्वारे अर्थसाहाय्याचा लाभ अंतिम लाभार्थीपर्यंत पोहोचविण्याची योग्य यंत्रणाही उभी करावी लागते. अर्थसाहाय्याच्या वितरणामध्ये सर्व टप्प्यांत आर्थिक व सामाजिक न्यायाचे तत्त्व अखेरपर्यंत अबाधित ठेवणे महत्त्वाचे ठरते. किंबहुना अर्थसाहाय्याची परिणामकारकता त्यातूनच व्यक्त होत असते.

भारतात 1991 पासूनच्या आर्थिक सुधारणांच्या प्रारंभकालात राजकोषीय व महसुली तूट पराकोटीला पोहोचली होती. त्याची कारणमीमांसा शोधण्याचे पुष्कळ प्रयत्नही झाले. अर्थव्यवस्थेतल्या समष्टीय चलांतील समतोलासाठी बहुसंख्य राजकोषीय तज्ज्ञांनी अर्थसाहाय्य रद्द करण्याचा सल्ला दिला होता, कारण

* प्रपाठक, अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

अर्थसाहाय्य हे अनुत्पादक असून त्याच्या वाटपामध्ये अनेक विसंगती आणि त्रुटी आहेत. अर्थात या सल्याला विरोध होणे साहजिक होते, कारण ग्रामीण व कृषी क्षेत्राशी संबंधित राजकीय नेतृत्वाला आणि कल्याण–कारी अर्थशास्त्रज्ञांना हे पटणारे नव्हते.

प्रस्तुत लेखामध्ये खतासाठीच्या अर्थसाहाय्याची न्याय्य बाजू तपासून त्याच्या वितरणातल्या विसंगतीवर प्रकाश टाकलेला आहे. खतासाठीचे अर्थसाहाय्य रद्द केल्याने हा विषय दोन वर्षांपूर्वी चर्चेला आला होता. आता अर्थसाहाय्य पुन्हा चालू केल्यामुळे तो पुन्हा चर्चेला आला आहे. संयुक्त आघाडी सरकारने कृषी अर्थसाहाय्यावर पुन्हा भर दिला आहे. त्यानिमित्ताने या विषयासंबंधी सविस्तर चर्चा या लेखात केली आहे.

## 2

## मिश्र अर्थव्यवस्था आणि सामाजिक न्याय

मिश्र अर्थव्यवस्थेत खाजगी, सरकारी व सहकारी क्षेत्रांचे अस्तित्व असते. या तिन्ही क्षेत्रांद्वारे वस्तू व सेवांच्या उत्पादनाचे व वितरणाचे कार्य होते. खाजगी व सहकारी क्षेत्रे ही बिनसरकारी क्षेत्रे आहेत. सामाजिक न्यायाच्या तत्त्वाने या क्षेत्रांतल्या कमकुवत घटकांना अनुदान अथवा करवसुलीच्या संदर्भातल्या सवलती आणि प्रत्यक्ष वित्तीय मदतीची तरतूद सरकारच्या अर्थसंकल्पात (आयव्यय या दोन्ही बाजूस) केलेली असते. काही वेळा विशिष्ट प्रलोभने दिलेली असतात. ज्या वस्तू व सेवांच्या उत्पादनासाठी अर्थसाहाय्य दिले जाते त्यांच्या उत्पादनातील सुलभतेसाठी निविष्टी पुरविणे अथवा उद्दिष्टींच्या विक्रीची हमी देणे यासारख्या सवलतीही अर्थसाहाय्यामध्ये समाविष्ट असतात.

आर्थिक, सामाजिक आणि सर्वसाधारण सेवा अशा तीन गटांमध्ये सरकारी सेवांची वर्गवारी करता येते. सरकारी क्षेत्रातून पुरविल्या जाणाऱ्या वस्तू व सेवा या गुणवस्तू अथवा गुणसेवा असतात. सामाजिकदृष्ट्या महत्त्वाच्या सेवा अथवा वस्तूंच्या किमती पूर्णतः बाजाराच्या किंमत यंत्रणेवर सोडल्यास त्यांचा उपभोग सर्व नागरिक आवश्यक त्या प्रमाणात घेतील याची खात्री नसते. अशा वस्तू व सेवांच्या किमती काही लोकांच्या कुवतीबाहेर जातील. शिवाय असे लोक अशिक्षित, रोगी, पीडित, दरिद्री, बेघर, लाचार राहण्याची शक्यता निर्माण होते. अशा वस्तू व सेवा सवलतीच्या दराने पुरविणे अथवा लाभार्थींना मोफत पुरविणे अथवा त्यांच्या उपभोगात सुलभता आणणे म्हणजे त्या वस्तू व सेवा, गुणवस्तू (सेवा) ( merit goods ) आहेत असे म्हटले जाते. गुणवस्तूंच्या उपभोगासाठी अनेक सवलती दिलेल्या असतात. सामाजिक न्यायाच्या दृष्टीने अशा सवलतीचे योगदान महत्त्वाचे असते. अर्थसाहाय्याच्या व्यापक अर्थाच्या संदर्भात अशा सवलतींचे प्रत्यक्ष मूल्य आणि त्या वस्तू व सेवांचा बाजार दर यातील फरकाला अर्थसाहाय्य असे संबोधिले जाऊ शकते. याच वस्तू व सेवांच्या आंतरराष्ट्रीय किंमत आणि स्वदेशातील वस्तूंच्या मुद्दामहून कमी ठेवलेल्या प्रशासित किमती (administered prices) यातील फरकाला आंतरराष्ट्रीय परिभाषेत 'आधाराची सरासरी मोजणी' (Average Measure of Support) असे म्हणतात.

वस्तुतः खाजगी व मिश्र क्षेत्रांनी तयार केलेल्या वस्तू व सेवांना अर्थसाहाय्याची संकल्पना लागू होते. सरकारी क्षेत्राद्वारे पुरविल्या जाणाऱ्या वस्तू व सेवांना किंमत नियम लागू करता येत नाही. किंमत निर्धारणाचा अधिकार सरकारकडे असतो. सरकारी क्षेत्राकडून पुरविल्या जाणाऱ्या वस्तू व सेवांना पर्याय नसतो तसेच त्यावरच्या खर्चालाही पर्याय नसतो; तो सक्तीचाच असतो. अशा वस्तू व सेवांचे उत्पादन व वितरण मध्यवर्ती मत यंत्रणेमार्फत ( voting mechanism ) घेतलेल्या निर्णयाला अनुसरून होत असते. त्यामुळे त्याची तरतूद सरकारच्या अर्थसंकल्पात असावी लागते. म्हणजे, ज्या वस्तू व सेवांचा खर्च बाजार दराने मोजता येतो आणि ज्यांची किंमत ग्राहक अदा करू शकतो अशांच्या बाबतीतच अर्थसाहाय्य मोजता येते.

अर्थसाहाय्य हे प्रामुख्याने कमकुवत आणि महत्त्वाच्या खाजगी उपक्रमाला दिले जाते. भारतामध्ये सहकारी क्षेत्राचे प्राबल्य असल्यामुळे, आणि हे क्षेत्र ग्रामीण विकास व शेती या प्राधान्य क्षेत्राला स्पर्श करीत असल्यामुळे, सहकारी क्षेत्राला मिळणारे अर्थसाहाय्य अधिक आहे. अर्थसाहाय्याच्या व्यापक अर्थाने,

त्या पद्धतीमध्ये अनेक स्थूल संकल्पना उदयाला आलेल्या आहेत. म्हणुन कोणत्याही प्रकारचे अर्थसाहाय्य ते कोणासाठी आहे, त्याचे स्वरूप कोणते आहे आणि त्या वस्तू व सेवांची वितरण व्यवस्था कोणत्या स्वरुपाची आहे यावर अवलंबून असते. अर्थसाहाय्य न देता आणि प्रत्यक्ष दिल्यानंतर वस्तुस्थिती कशी असू शकेल याचा अर्थशास्त्रीयदृष्टचा अभ्यास होणे आवश्यक असते. ज्या हेतूने अर्थसाहाय्य दिले जाते तो हेतू सफल झाला पाहिजे तरच सामाजिक न्याय प्रस्थापित होईल. आर्थिक विकासातील आणि उत्पन्न विषमतेतील दरी नष्ट करण्यासाठी अर्थसाहाय्याची संकल्पना योग्यच आहे. अर्थसाहाय्याच्या काही प्रकारांमध्ये वस्तू व सेवांच्या उपभोगासाठी प्रत्यक्ष पैशाची तरतूद केलेली असते. वस्तू व सेवा पुरविणारे खाजगी लोक असल्यामुळे त्या लोकांना अर्थसाहाय्याचा लाभ मिळतो. कारण बाजार दराने वस्तू व सेवांच्या किमती निर्धारित झाल्यास गोरगरिबांना त्याचा भुर्दंड सहन करावा लागतो. म्हणून उत्पादकांनी आपल्या मालाची किमत वाढवू नये याकरिता त्याना त्यांच्या ज्यादा खर्चापोटी अर्थसाहाय दिले जाते. सामाजिक न्याय आणि विकासाच्या वितरणातील न्याय प्रस्थापित करण्यासाच्या संदर्भात अर्थसाहाय्याची कल्पना योग्यच आहे.

## ३

## अर्थसाहाय्याचे अर्थशास्त्रीय विश्लेषण

आर्थिक न्यायातूनच सामाजिक न्याय निर्माण होत असतो. अर्थसाहाय्याचे वितरण हे अर्थशास्त्रीय तत्त्वांवर अवलंबून असते, कारण अर्थसाहाय्याचा प्रत्यक्ष संबंध पैशाशी आणि उत्पादन परिव्ययाशी येतो. तसेच दिल्या जाणाऱ्या अर्थसाहाय्यामध्ये अनेक घटक साहाय्यभूत होत असल्यामुळे त्यांच्या वितरणातील न्याय्य वाटाही लक्षात घ्यावा लागतो. त्याची परिणामकारकता त्याच्या वितरणातील न्यायावर आधारित असते. खतासाठीच्या अर्थसाहाय्याच्या संदर्भात हे विशेष लक्षात घेणे गरजेचे असते.

अर्थशास्त्रीय दृष्टिकोनातून अर्थसाहाय्याचे विश्लेषण करताना एकंदर चार गोष्टी लक्षात घ्याव्या लागतात: (अ) वस्तू व सेवांचा स्थूल उत्पादन परिव्यय, (आ) त्यांचा कार्यदक्ष उत्पादन परिव्यय, (इ) त्या वस्तूंना बाजारात असलेली मागणी आणि (ई) त्या वस्तूंची वसूल किंमत. कार्यदक्ष उत्पादन परिव्यय ही सापेक्ष संकल्पना आहे, म्हणून तिची मोजदाद तुलनेनेच करावी लागते. बाजारातील मागणी किमतीवर अवलंबून असते. म्हणजे वस्तूचा एकंदर उत्पादन परिव्यय आणि उत्पादकांच्या पदरात पडणारी किमत यातील फरक हे अर्थसाहाय्य अथवा कर या स्वरुपाचे असते. उत्पादन परिव्यय जास्त असेल तर, तो वाढीव परिव्यय अर्थसाहाय्य म्हणून दिला जातो आणि जर खुल्या बाजारात प्रत्यक्ष मिळू शकणारी वसूल किमत ही उत्पादन परिव्ययापेक्षा ज्यादा असेल तर ते अर्थसाहाय्य कर ( tax ) असते. याला उणे अर्थसाहाय्य असे म्हणतात. 1986–87 ते 1988–89 या कालात निर्यात केल्या गेलेल्या 22 प्रकारच्या शेतीमालांपैकी 17 शेतीमालाला सुमारे 242 अब्ज रुपयांचे उणे अर्थसाहाय्य मिळाले. एकंदर शेती उत्पादन मूल्याच्या 27·74 टक्के इतके हे शेती उत्पादनाचे मूल्य होते (गुलाटी व शर्मा, 1995). शरद जोशी (1994) यांच्या हिशोबाने ही टक्केवारी 68·88 पर्यंत जाते. भारतातील शेतीमालाच्या किमती वाढू नयेत म्हणून सरकारने प्रयत्न केल्यामुळे भारतीय शेती हे निव्वळ कर देणारे (net taxed) क्षेत्र बनले आहे. याउलट औद्योगिक मालाच्या किमती मात्र खुल्या बाजार दराने वाढू दिल्या. त्यामुळे शेती व उद्योग क्षेत्रांमधील मूल्यतुल्यता दर (terms of trade) विसंगत बनला; शेतीवर प्रतिकूल मूल्यतुल्यता दर लादलेला आहे (गुलाटी व शर्मा, 1995).

ज्या वस्तू व सेवांना अर्थसाहाय्य दिले जाते त्यांचा स्थूल उत्पादन परिव्यय आणि त्यांच्या विक्रीपासून मिळणारे प्रत्यक्ष उत्पन्न यातील फरकामध्ये सर्वसाधारणपणे तीन प्रकारचे अर्थसाहाय्य गृहीत धरलेले असते (मुंडले व राव, 1991).

(अ) उत्पादकांना त्यांच्या अकार्यदक्ष उत्पादन पद्धतीला दिलेले अर्थसाहाय्य हे स्थूल उत्पादन परिव्यय व कार्यदक्ष अथवा काटेकोरपणे केलेला आवश्यक उत्पादन परिव्यय यातील फरकाइतके असते. या प्रकारात उत्पादकांनी मनमानेल त्या पद्धतीने, म्हणजेच अकार्यदक्ष आणि निष्काळजीपणे, केलेल्या ज्यादा खर्चाला

अर्थसाहाय्य दिले जाते. हे अर्थसाहाय्य उत्पादकांना दिले जाते (आकृती 1 मधील ABDC).

(आ) वरील प्रकारच्या उत्पादकांना द्यावयाच्या अर्थसाहाय्यामध्ये स्थुलपणे त्यांच्या अकार्यदक्षतेला (ज्यादा परिव्ययाला) अर्थसाहाय्य दिले जाते. पण प्रत्यक्षात त्याला अर्थसाहाय्य मिळणार म्हणून त्याची अकार्यदक्षता वाढलेली असते. प्रत्यक्ष विल्हेवारक्षम अर्थसाहाय्य (allocative subsidy) आणि अकार्यदक्षतेसाठी द्यावयाचे अर्थसाहाय्य अशा दोन भागात अर्थसाहाय्य विभागता येईल. (आकृती 1 मधील ABDC आणि CDGH).


(इ) वितरणात्मक अर्थसाहाय्य (distributive subsidy) हे प्रामुख्याने उपभोक्त्याला दिलेले असते. वस्तू व सेवांचा खप वाढावा म्हणून या पद्धतीचे अर्थसाहाय्य दिलेले असते. खुल्या बाजारात ज्या दराने वस्तू व सेवा विकता आल्या असत्या तो दर आणि वस्तूंच्या किमती वाढू नयेत आणि त्यांचा खप (उपभोग) वाढावा म्हणून प्रशासित किमतीला त्या वस्तू व सेवांची विक्री करण्याचा सरकार आग्रह धरते.

वरील तिन्ही संकल्पना आकृति 1 मध्ये स्पष्ट केल्या आहेत (मुंडले व राव, 1991)

OY ही सरकारने उपलब्ध केलेली सेवा (वस्तू) आहे. YB हा प्रत्येक नगाचा प्रत्यक्ष परिव्यय आहे. YD हा कार्यदक्ष पद्धतीने केलेला प्रतिनग परिव्यय आहे. EF ही प्रत्यक्ष वसूल किंमत आहे. XX हा मागणी वक्र आहे.

ABFE हे स्थूल अर्थसाहाय्य आहे. त्यापैकी ABDC हे उत्पादकांच्या अकार्यदक्षतेला दिलेले अर्थसाहाय्य आहे, तर प्रत्यक्ष विल्हेवारक्षम अर्थसाहाय्याचा हिस्सा CDHG इतका आहे. GHFE हे OY इतक्या सेवांच्या (वस्तूंच्या) उपभोगासाठी दिलेले वितरणात्मक अर्थसाहाय्य आहे. EFYO एवढी वसूल किंमत आहे.

वितरणात्मक अर्थसाहाय्याचा दुसरा एक प्रकार म्हणजे, आयात केलेल्या रासायनिक खतांच्या वितरणासाठी येणाऱ्या ज्यादा परिव्ययावर अर्थसाहाय्य दिले जाते. आंतरराष्ट्रीय बाजारात रासायनिक खतांची खरेदी करून ते स्वदेशात वितरित करण्यासाठी वाहतूक, हमाली, इतर हाताळणीचा खर्च वगैरे परिव्यय वितरकाला करावे लागतात. शिवाय त्याचा नफा असतोच. आंतरराष्ट्रीय बाजारातील खरेदी किमतीपेक्षा ज्यादा किंमत वितरकाला आकारावी लागते. या ज्यादा किंमतीची भरपाई म्हणून वितरकाला अर्थसाहाय्य दिले जाते. भारतात आयात खताच्या वितरणाचे कंत्राट मिनरल्स अॅन्ड मेटल्स ट्रेडिंग कॉर्पोरेशन यांना दिले आहे.




आकृती 1

वरील प्रकारचे अर्थसाहाय्य देताना परिव्यय व वसुली मूल्याचा (किमतीचा) वेगवेगळ्या रीतीने विचार करावा लागतो. त्यासाठी वेगवेगळ्या पद्धती अनुसरल्या जातात. उत्पादन परिव्यय व वसुली मूल्य या दोन्ही संकल्पना स्पष्ट झाल्या की, अर्थसाहाय्याचे प्रमाण मोजणे सोपे आहे. उत्पादन परिव्यय मोजताना

बऱ्याच गोष्टी लक्षात घ्याव्या लागतात. उदाहरणार्थ बदलता परिव्यय, भांडवली परिव्यय, गुंतवणूक परिव्यय, कर्ज, बाहेरची देणी, व्याज, घसारा नफ्याचे प्रमाण, इत्यादीवरील खर्चाच्या बाबी लक्षात घेऊन वस्तू व सेवांची बाजारातील किंमत ठरत असते. सरकारला जर या वस्तू व सेवांची किंमत वाढू नये असे वाटत असेल तर परिव्ययाच्या प्रमाणात आणि भांडवली गुंतवणुकीच्या नफ्याच्या प्रमाणात वस्तू व सेवांच्या किमती वाढवू न देता त्यावरचा ज्यादा परिव्यय अर्थसाहाय्य म्हणून द्यावयाला सरकार तयार होते. याबाबतीत सरकारला केवळ अर्थसंकल्पात अर्थसाहाय्याची तरतूद करून चालत नाही तर त्यासाठी उत्पादन परिव्यय मोजण्याच्या दृष्टीने राष्ट्रीय हिशोब पद्धतीही विस्तृत व स्पष्ट करावी लागते. उदाहरणार्थ, परिव्यय कसा मोजावा, कशाचा मोजावा, घसारा किती धरावा, मूल्यवृद्धी कशी मोजावी, उत्पन्नाचे अथवा परिव्ययाचे मूल्य चालू किमतीने मोजावे की स्थिर किमतीने मोजावे, यासारख्या अनेक गोष्टी राष्ट्रीय हिशोब पद्धतीमध्ये दिलेल्या असतात. ते लक्षात घेऊन, ज्या वस्तू व सेवांना अर्थसाहाय्य द्यावयाचे आहे त्यांचा उत्पादन परिव्यय मोजता आला पाहिजे. तात्पर्य, ज्या उद्देशाने आणि ज्या पद्धतीने अर्थसाहाय्य दिले जाते त्याचा ते देण्यापूर्वी साकल्याने विचार होणे आवश्यक असते. प्रत्येक वस्तू अथवा सेवेला दिल्या जाणाऱ्या अर्थसाहाय्याला एकच पद्धती लागू करून चालत नाही आणि तशी केलेली नसते. अनेक देशांमध्ये अनेक वस्तू व सेवांना, अनेक पद्धतींनी आणि अनेक दरांनी अर्थसाहाय्य दिले जाते. म्हणूनच अर्थसाहाय्याची संकल्पना जास्त व्यावहारिक आहे. दुर्बलांना मदत करणे हा कल्याणकारी राज्यातला सामाजिक न्याय आहे.

कृषी क्षेत्राला दिल्या जाणाऱ्या अर्थसाहाय्याची तीन गटात वर्गवारी करता येईल.

(1) शेतीमालाला किफायतशीर किमती देण्याच्या उद्देशाने सरकारी यंत्रणेद्वारा आधार किमती देणे, जकाती, कोटा निर्यातवर्धक कार्यक्रम आखणे, किमत स्थिरीकरणाचे उपाय योजणे, आयात अनुज्ञप्ती पद्धती अवलंबिणे, इत्यादी उपायांची अंमलबजावणी होते. मुक्त व्यापाराच्या परिस्थितीत आंतरराष्ट्रीय बाजारातील किमती आणि स्वदेशातील शेतीमालांच्या किमती लक्षात घेऊन वरील कार्यक्रमांमध्ये बदल केला जातो. आधार किमतीचा विचार करताना इतर अनेक गोष्टींबरोबर उत्पादन परिव्ययाचाही विचार करावा लागतो.

(2) दुसऱ्या गटात कृषी निविष्टींवर दिल्या जाणाऱ्या अर्थसाहाय्याचा समावेश आहे. निविष्टींच्या पुरवठा परिव्ययापेक्षाही त्या कमी दराने पुरविण्याची जबाबदारी सरकार स्वीकारते. ज्यांचा व्यापार करू शकतो अशा वस्तूंच्या आयात अथवा किंमत आणि निर्यातीतील तुल्यता (parity) तत्त्वावरून आणि ज्याचा व्यापार करू शकत नाही अशा वस्तूंच्या बाबतीत त्या वस्तूंचा उत्पादन परिव्यय लक्षात घेऊन अर्थसाहाय्य मोजले जाते. त्यामध्ये बीज, पतपुरवठा, खत, वाहतूक, जलसिंचन, इंधन, जनावरांचे खाद्य आणि पीक विमा इत्यादीसाठी दिल्या जाणाऱ्या अर्थसाहाय्यांचा समावेश होतो.

(3) शेतीमालाच्या उत्पादन वाढीसाठी प्रत्यक्ष अर्थसाहाय्य दिले जाते. उदाहरणार्थ, कृषी व्यवहारांतील तूट भरून काढण्यासाठी अर्थसाहाय्य देताना कृषी व्यवहारांचा ताळेबंद पाहून तूट मोजावी लागते; तसेच अपवाहन (diversion) आणि आपत्कालीन (disaster) मदत म्हणूनही अर्थसाहाय्य दिले जाते. सवलतीच्या व्याज दराने (DIR) कर्जपुरवठा केल्या जाणाऱ्या उपक्रमांचा समावेश या प्रकारात करता येईल.

गुलाटी आणि शर्मा (1992) यांनी वेगळ्या व्यावहारिक तीन पद्धती विकसित केल्या आहेत. कुणाला किती प्रमाणात अर्थसाहाय्य देता येईल हे यावरून ठरविता येते. या पद्धतींचा व्यावहारिक उपयोग खूप मोठा आहे.

(1) **नाममात्र संरक्षण गुणांक** (Nominal protection coefficient)

नाममात्र संरक्षण हा अर्थसाहाय्याचा एक प्रकार आहे. शेतकऱ्याला आपल्या शेतीमालाला प्रत्यक्षात मिळणारी किंमत आणि मुक्त व्यापारामुळे शेतकऱ्याला मिळू शकली असती अशी किंमत यातील फरक म्हणजे

## तक्ता 1

### शेतकरी संघटनेच्या गणिताप्रमाणे शेतीमालाला मिळणारे अर्थसाहाय्य

| | पीक | देशांतर्गत प्रशासित किंमत (रुपये / टन) | | | खुल्या बाजारातील किमती (रुपये / टन) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1986–87 | 1987–88 | 1988–89 | 1986–87 | 1987–88 | 1988–89 |
| 1 | ज्वारी | 1,320 | 1,350 | 1,476 | 2,145 | 2,945 | 2,945 |
| 2 | तांदूळ | 2,190 | 2,250 | 2,400 | 3,520 | 3,520 | 3,520 |
| 3 | गहू | 1,660 | 1,730 | 1,830 | 3,540 | 3,540 | 3,540 |
| 4 | मका | 1,320 | 1,350 | 1,450 | 3,121 | 3,121 | 3,121 |
| 5 | तूर | 3,200 | 3,250 | 3,600 | 5,243 | 5,243 | 5,243 |
| 6 | हरभरा | 2,800 | 2,900 | 3,250 | 4,128 | 4,128 | 4,128 |
| 7 | उडीद | 3,200 | 3,250 | 3,600 | 4,385 | 4,365 | 4,385 |
| 8 | मूग | 3,200 | 3,200 | 3,600 | 4,782 | 4,782 | 4,782 |
| 9 | भुईमूग | 3,700 | 3,900 | 4,300 | 6,900 | 6,900 | 6,900 |
| 10 | सोयाबीन | 2,900 | 3,000 | 3,200 | 3,081 | 3,081 | 3,081 |
| 11 | कापूस | 5,400 | 5,500 | 6,000 | 17,333 | 17,333 | 17,333 |
| 12 | राई व मोहरी | 4,150 | 4,300 | 4,600 | 6,884 | 6,884 | 6,884 |
| 13 | कच्चा ताग | 2,250 | 2,400 | 2,500 | 5,599 | 5,599 | 5,599 |
| 14 | तंबाखू | 12,000 | 12,200 | 12,800 | 12,240 | 12,240 | 12,240 |
| 15 | ऊस | 170 | 185 | 195 | 156·16 | 156·16 | 156·16 |
| 16 | बाजरी | 1,320 | 1,350 | 1,450 | 2,704 | 2,704 | 2,704 |
| 17 | सातू | 1,350 | 1,350 | 1,450 | 4,024 | 4,024 | 4,024 |
| | एकूण | | | | | | |

टीपा : ✻ उत्पादन ( दशलक्ष टन ) X ( देशांतर्गत प्रशासित किंमत रुपये/टन – खुल्या बाजारातील किंमत रुपये/टन ) = एकंदर अर्थसाहाय्य

✻✻ [ एकंदर अर्थसाहाय्य ÷ ( वार्षिक सरासरी किंमत ( दशलक्ष रुपये ) ] X 100

| उत्पादन (दशलक्ष टन) | | | किमत (दशलक्ष रुपये) | | | एकूण किमत (दशलक्ष रुपये) | वार्षिक सरासरी किमत (दशलक्ष रुपये) | एकंदर अर्थसाहाय्य (दशलक्ष रुपये) * | एकंदर अर्थसाहाय्याची वार्षिक सरासरी किमतीशी टक्केवारी ** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1986-87 | 1987-88 | 1988-89 | 1986-87 | 1987-88 | 1988-89 | 1986-89 | | | |
| 9·19 | 12·20 | 10·17 | 12,131 | 16,470 | 14,980 | 43,581 | 14,527 | –16,454 | –113·26 |
| 60·56 | 56·86 | 70·49 | 1,32,626 | 1,27,935 | 1,69,176 | 4,29,737 | 1,43,245 | –77,235 | –53·92 |
| 46·15 | 54·11 | 49·65 | 76,642 | 96,610 | 90,859 | 2,61,112 | 87,037 | –8,988 | –103·27 |
| 7·5 | 5·72 | 8·23 | 10,019 | 7,722 | 11,933 | 29,674 | 9,891 | –12,517 | –126·54 |
| 2·27 | 2·28 | 2·72 | 7,264 | 7,410 | 9,792 | 24,466 | 8,155 | –4,550 | –55·79 |
| 3·63 | 5·13 | 4·23 | 10,164 | 14,877 | 13,747 | 38,788 | 12,929 | –4,945 | –38·25 |
| 1·24 | 1·29 | 1·54 | 3,968 | 4,192 | 5,724 | 13,884 | 4,628 | –1,394 | –30·12 |
| 1·08 | 1·22 | 1·42 | 3,456 | 3,965 | 5,112 | 12,533 | 4,174 | –1,752 | –41·94 |
| 5·88 | 5·85 | 19·66 | 21,756 | 22,815 | 41,538 | 86,109 | 28,703 | –20,494 | –71·40 |
| 0·89 | 0·90 | 1·55 | 2,581 | 2,700 | 4,960 | 10,240 | 3,413 | –16 | –0·47 |
| 1·17 | 1·08 | 1·49 | 6,318 | 5,940 | 8,940 | 2,119 | 7,066 | –14,543 | –205·82 |
| 2·61 | 3·46 | 4·38 | 10,832 | 14,878 | 20,148 | 45,857 | 15,286 | –8,694 | –56·83 |
| 1·32 | 1·04 | 1·21 | 2,970 | 2,496 | 3,025 | 8,491 | 2,830 | –3,833 | –135·43 |
| 0·11 | 0·057 | 0·11 | 1,320 | 695 | 1,408 | 3,423 | 1,141 | 11 | 0·96 |
| 85·22 | 93·94 | 85·69 | 14.487 | 17378 | 16,709 | 48,575 | 16,192 | 2,405 | 14·85 |
| 4·51 | 3·30 | 7·78 | 5,953 | 4,455 | 11,281 | 21,689 | 7,730 | –6,822 | –94·36 |
| 1·58 | 1·720 | 1·47 | 2,133 | 2,322 | 2,131 | 6,586 | 2,196 | –4,203 | –191·44 |
| | | | **3,04,403** | **3,26,615** | **4,03,073** | **1,03,4091** | **3,44,697** | **–2,37,437** | **–68·88** |

(1) अर्थसाहाय्य = प्रशासित किंमत – खुल्या बाजारातील किंमत (1986–89 ची सरासरी).

(2) 'गॅट'च्या शेतीविषयक वाटाघाटींच्या संदर्भात भारत सरकारने सादर केलेली आकडेवारी.

स्रोत : शेतकरी संघटक, 6 जुन 1994, पृष्ठे 6–7.

शेतकऱ्याला दिलेले नाममात्र संरक्षण होय. या प्रकारामध्ये केन्द्र सरकारने शेतीमालाला दिलेल्या आधार किमतींचा समावेश करता येईल. पण शेतकऱ्याला मिळणारी आधार किंमत मुक्त बाजारातील किमती–पेक्षा जास्त असावी म्हणून सरकारला आधार किमतींचे संरक्षण द्यावे लागते. मुक्त बाजारातील किमती जर जास्त असतील तर शेतकऱ्यांना आधार किमतींचा, म्हणजे नाममात्र संरक्षणाचा, फायदा मिळत नाही. कृषी परिव्यय व किंमत आयोगामार्फत निर्धारित होणाऱ्या शेतीमालाच्या किमतींचा तसा फायदा भार–तीय शेतकऱ्यांना होत नाही. तरीसुद्धा नाममात्र संरक्षण गुणांक मोजताना वरील पद्धतीचा अवलंब केला जातो.

(2) **परिणामकारक संरक्षण गुणांक** ( Effective protection coefficient )

परिणामकारक संरक्षण हे कृषी निविष्टींच्या किमतींच्या संदर्भात विचारात घेतले आहे. कृषी निवि–ष्टींच्या किमतीतील चढउतारामुळे शेती क्षेत्रावर त्याचे प्रतिकूल परिणाम होतात म्हणून निविष्टींच्या किमती–तील वाढीवर मर्यादा घालण्यासाठी अर्थसाहाय्य देण्याची पद्धती अस्तित्वात आहे. मुक्त व्यापाराच्या तत्त्वाने कृषी निविष्टींची निर्धारित होणारी किंमत आणि शेत–करी त्या निविष्टींसाठी प्रत्यक्ष देत असलेली किंमत यातील फरक हे परिणामकारक अर्थसाहाय्य असते. शेतकऱ्यांना स्वस्त दरात कृषी निविष्टी मिळाव्यात हा त्यामागे हेतू असतो. वरील परिस्थितीतच हे अर्थ–साहाय्य देता येते. शेती औजारांच्या खरेदीसाठी दिलेल्या अर्थसाहाय्याचा समावेश या प्रकारात करता येईल. या संरक्षणामुळे कृषी निविष्टींचा वापर वाढतो. ठिबक सिंचन व छोट्या ट्रॅक्टरच्या खरेदीवर रु. 30,000 अर्थसाहाय्य देण्याची केन्द्र सरकारची योजना ही या प्रकारातीलच आहे. अशा सवलतींमुळे वस्तूंचा जो निव्वळ उपभोग वाढेल अथवा उत्पादन वाढेल तो त्या सवलतींचा अथवा संरक्षणाचा परिणाम असतो.

(3) **परिणामकारक अर्थसाहाय्य गुणांक** ( Effective subsidy coefficient )

कोणत्याही प्रकारची सरकारी सवलत अथवा अर्थसाहाय्य दिल्यामुळे त्याचा लाभार्थीवर नेमका कोणता परिणाम होतो हे मोजण्यासाठी या गुणांकाचा उपयोग होतो. सर्व प्रकारचे अर्थसाहाय्य रद्द केल्यास शेतकऱ्यांचे किती नुकसान होऊ शकते त्याची मोजदाद करून अर्थसाहाय्य निर्धारित केले जाते. या पद्धतीला 'उत्पादकांचे अर्थसाहाय्य सममूल्य' (producers' subsidy equivalent ) असे म्हणतात. ( FAO, 1975 ) शेती व उद्योग क्षेत्राला दिलेल्या अर्थसाहा–य्याचा अभ्यास स्कँडिझो आणि ब्रुस (1980) यानी केला आहे. बिन्स्वंगार आणि स्कँडिझो (1984) यांच्या एका अभ्यासामुळे नव्याने काही राष्ट्रांचा अभ्यास झाला. तसेच कृगर, स्किफ व वाल्डेस (1991) यानी 18 राष्ट्रांनी दिलेल्या सवलतींचा आणि अर्थसाहाय्यांचा अभ्यास केला. पण बिन्स्वंगार आणि स्कँडिझो (1984) वगळता भारताच्या संदर्भात कृणी अभ्यास केला नाही. ही पोकळी काही अंशी भगवती आणि श्रीनिवासन (1976) यानी भरून काढली. पण त्यानी फक्त 16 प्रकारच्या शेतीमालाच्या संदर्भात अभ्यास केला आणि त्यांच्या अभ्यासाचा कालावधी 1 63–65 आणि 1968–6 ) असा होता. महत्त्वाच्या अर्थसाहाय्याचा त्यांच्या अभ्यासात उल्लेख नाही. गुलाटी आणि शर्मा (1992) यानी ही पोकळी भरून काढली आहे.

उत्पादकांचे अर्थसाहाय्य सममूल्य मोजण्यासाठी गुलाटी आणि शर्मा यानी पुढील सूत्राचा उपयोग केला आहे.

$$\text{उत्पादकांचे अर्थसाहाय्य मूल्य} = \frac{\text{एकंदर हस्तांतरण}}{\text{उत्पादकांना मिळालेले मूल्य}}$$

$$= \frac{Q * (P_d - P_w * X) D + 1}{Q * P_d + D}$$

याठिकाणी –

Q = उत्पादित नगसंख्या

$P_d$ = स्वदेशी पैशातील उत्पादकाची किंमत

$P_w$ = विदेशी चलनातील जागतिक किंमत

X = विनिमय दरातील बदलाचा घटक

D = प्रत्यक्ष सरकारी देयके

I = अप्रत्यक्ष हस्तांतरणे (सरकारी धोरणामुळे) (उदा., निविष्टींना मिळणारे अर्थसाहाय्य, विक्री सवलत, वगैरे)

(4) **एकंदर आधार मोजणी** ( Aggregate Measure of Support )

'उत्पादक अर्थसाहाय्य सममूल्य' हा 'एकंदर आधार मोजणी'चा एक घटक आहे. एकंदर आधार मोजणी पद्धती जगभर सारखी नाही. तिला वेगवेगळ्या नावांनी ओळखले जाते. उदाहरणार्थ, जपानमध्ये सरकारी आधाराचे आणि उदारीकरणाचे मूल्यमापन करण्यासाठी 'एकंदर आधार मोजणी' केली जाते. अमेरिका आणि केर्न्स गटातील राष्ट्रांमध्ये 'उत्पादक अर्थसाहाय्य सममूल्य' मोजले जाते. नॉर्डिक गटातील राष्ट्रांमध्ये कॅनडाचे 'व्यापार विरूपण सममूल्य' ( trade distortion equivalent ) लक्षात घेतले जाते तर ऑस्ट्रेलियामध्ये 'किंमत समायोजन अंतर' ( Price Adjustment Gap ) मोजले जाते (गुलाटी व शर्मा, 1992). 'एकंदर आधार मोजणी' ही पूर्णतया पैसावादी संकल्पना आहे आणि ती वस्तूनुरूप मोजता येते. ज्या वस्तूला सरकारी आधार दिलेला आहे [ बाजारातील आधार किमती, प्रत्यक्ष पैशातील मदत, इतर अन्य सवलती ], त्या वस्तूंची 'एकंदर आधार मोजणी' करता येऊ शकते. बाजारातील आधार किमती – खुल्या बाजारातील त्याच वस्तूंच्या किमती X वस्तूंची नगसंख्या = अर्थसंकल्पात तरतूद केलेले अर्थसाहाय्य असते. आयात व निर्यात व्यवहारातील FOB (freight on board) अथवा CIF ( Cost, insurance, freight ) यामुळे आंतरराष्ट्रीय किमतीच्या तुलनेने देशी किंमत वाढते. हा फरक अर्थसाहाय्याच्या माध्यमाने काढून टाकला जातो. तसेच काही वस्तूंच्या उत्पादनासाठी लागणाऱ्या निविष्टींच्या खरेदीसाठी सवलती दिल्या जातात. त्या सवलतींच्या मूल्याची बेरीज 'एकंदर आधार मोजणी' मध्ये गृहीत धरलेली असते.

भारतामध्ये शेतीमालाच्या खुल्या बाजारातील देशी व आंतरराष्ट्रीय किमती, त्याच वस्तूंच्या प्रशासित किमतींपेक्षा जास्त असल्यामुळे कृषी अर्थसाहाय्य उणे असल्याचा दावा शेतकरी नेते शरद जोशी करतात तो याच आधारे. 1986–89 या कालातील काही शेतीमालांच्या सरासरी किमती आणि त्या शेतीमालाला दिलेले अर्थसाहाय्य यांच्या आधारे 'शेतकरी संघटक'च्या 6 जून 1994 च्या अंकामध्ये तक्ता 1 प्रमाणे आकडेवारी दिलेली आहे.

## 4

### अर्थसाहाय्याला विरोध का ?

अर्थसाहाय्य देण्याची पद्धती सबंध जगभर पसरलेली असून ते विविध प्रकारे दिले जाते. उद्योग क्षेत्राचे अतिरिक्त उत्पन्न (उत्पादन मूल्य) शेती क्षेत्राला अर्थसाहाय्य म्हणून देण्याची पद्धती अमेरिकेत प्रचलित आहे. अमेरिकेत 1990 साली सुमारे 47 अब्ज डॉलरचे अर्थसाहाय्य शेती क्षेत्राला दिले होते ( Economic Times, 12 एप्रिल, 1993 ). याशिवाय कृषी मालाच्या उपभोक्त्यांना सुमारे 28 अब्ज डॉलरचे अर्थसाहाय्य दिले.

एकंदर जागतिक कृषी उत्पादन मूल्याच्या सुमारे 18 टक्के मूल्याइतके अर्थसाहाय्य कृषी क्षेत्राला दिले जाते ( गुलाटी व शर्मा, 1992 ). जपानमध्ये एकूण कृषी उत्पादन मूल्याच्या सुमारे 72.5 टक्के कृषी उत्पादन मूल्य अर्थसाहाय्य म्हणून दिले जाते. कोलंबियामध्ये सन 1982 ते 1987 या पाच वर्षांमध्ये कृषी उत्पादन मूल्याच्या सरासरी 54·7 टक्क्यांइतके कृषी मूल्य अर्थसाहाय्य म्हणून शेती क्षेत्राला दिले गेले. याच पद्धतीने अर्थसाहाय्य शेतीमालाच्या निर्यात करणाऱ्या देशांमध्ये दिले जाते. कृषी क्षेत्रालाच अर्थसाहाय्य देण्यामागचे महत्त्वाचे कारण नैसर्गिक आहे. कृषी क्षेत्र हे निसर्गावर अवलंबून असल्यामुळे कृषी उत्पादनात सतत चढउतार होत असतात. त्यामुळे या क्षेत्राची अवस्था नाजूक बनते, म्हणून त्याला अर्थसाहाय्य दिले पाहिजे. पण संरचनात्मक समायोजन दृष्टिकोनाचा पुरस्कार करणाऱ्या काही तज्ज्ञांनी आणि आंतरराष्ट्रीय संस्थांनी अर्थसाहाय्याच्या पद्धतीला विरोध केला आहे. त्या विरोधामागची भूमिका काही अंशी अर्थशास्त्रीय, काही अंशी व्यावहारिक तर काही अंशी राजकीय आहे. ऑगस्ट 1992 मध्ये अर्थसाहाय्य देण्याच्या भारत सरकारच्या धोरणाबाबत जागतिक बँकेने जोरदार आक्षेप घेतला होता. (Indian Express, 26 सप्टेंबर 1993). या धोरणानुसार पोटॅशयुक्त व फॉस्फेटयुक्त खतांच्या किमतीवरचे नियंत्रण उठविले आणि युरियावर अर्थसाहाय्य चालू ठेवले. त्याआगोदरच्या धोरणानुसार अर्थसाहाय्य देण्याची पद्धती रद्द करण्यात

आली होती. परंतु सामाजिक व राजकीय दबावामुळे अर्थसाहाय्याची पद्धती पुन्हा सुरू केली गेली.

संरचनात्मक समायोजन कार्यक्रमांचा पुरस्कार करणाऱ्यांनी अर्थसाहाय्याला विरोध केला आहे. त्याची कारणे पुढीलप्रमाणे आहेत.

(1) खुलेपणाच्या आंतरराष्ट्रीय व्यापार-व्यवहारामध्ये काही वस्तूंना अर्थसाहाय्य दिल्यास त्या वस्तूंची विक्री वाढेल आणि हे मुक्त व्यापाराच्या विरुद्ध आहे. खुलेपणाच्या नीतीमध्ये अर्थसाहाय्य हा अडथळा आहे.

(2) अर्थसाहाय्यामुळे राजकोषीय तूट वाढत जाते. तूट वाढत ठेवणे हे समष्टीय चलांतील समतोलाच्या दृष्टीने योग्य नाही.

(3) अर्थसाहाय्य हे अनुत्पादक आहे; ते अतार्किक (irrational) आहे. त्यामुळे सुप्त कार्यदक्षता वाया घालविण्यासारखे आहे.

(4) अर्थसाहाय्यामुळे स्पर्धावृत्ती नष्ट होते अथवा तिचे खच्चीकरण होते. मुक्त बाजार व मुक्त व्यापार तत्त्वामध्ये स्पर्धेचे खच्चीकरण हे तत्त्व बसत नाही.

(5) अकार्यदक्षतेला महत्त्व मिळाल्यामुळे साधनसामग्रीचा अपव्यय होतो. मर्यादित प्रमाणात उपलब्ध असणाऱ्या साधनसामग्रीचा योग्य आणि पुरेपूर वापर होणे आवश्यक असते.

(6) उत्पादनातील अथवा वितरणातील ज्यादा परिव्ययावर अर्थसाहाय्य मिळत असल्यामुळे उत्पादनातील अथवा वितरणातील परिव्यय अधिक प्रमाणात दाखविण्याचा उत्पादकांना व वितरकांना मोह होतो. उत्पादनाचा अथवा वितरणाचा परिव्यय वाढल्यास वस्तूंच्या किमतीही वाढतात. त्यामुळे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय किमत पातळीमध्ये तफावत निर्माण होते आणि उत्पादनापेक्षा व्यापार महत्त्वाचा बनतो.

(7) नियोजन आणि नियंत्रणामुळे नोकरशाहीचा प्रभाव वाढतो आणि ती भ्रष्ट होऊन व्यापाऱ्यांना त्रास देते.

(8) स्पर्धेमुळे वस्तूंमध्ये गुणवत्ता येते आणि त्या स्वस्त दरामध्येही उपलब्ध होतात. अर्थसाहाय्यामुळे स्पर्धेचे फायदे मिळत नाहीत.

तथापि अर्थसाहाय्यामुळे किंमत स्थिरीकरण शक्य होते. सामाजिक न्याय प्रस्थापित होऊन दुर्बलांना सवलतीचे फायदे घेता येतात. आर्थिक व सामाजिक सुबत्ता नियोजित आणि नियंत्रित अर्थव्यवस्थेमध्ये सुलभपणे साध्य होते. अर्थसाहाय्य हे वस्तुतः स्थल-काल-व्यक्तीसापेक्ष आहे. सामाजिक व आर्थिक उद्दिष्टांपेक्षा राजकीय उद्दिष्टचे अर्थसाहाय्याच्या माध्यमातून साध्य करण्याचा प्रयत्न होतो हे मात्र यातील मोठे दुर्दैव आहे.

## 5

## खतासाठीचे अर्थसाहाय्य

भारतात रासायनिक खतांसाठी अर्थसाहाय्य देण्याच्या प्रमुख दोन पद्धती अस्तित्वात आहेत : (अ) आयात खतासाठी दिले जाणारे अर्थसाहाय्य. (आ) देशी खत उद्योगाला दिले जाणारे अर्थसाहाय्य. आयात खताच्या किमतीसह इतर सर्व प्रकारांचा मिळून येणारा परिव्यय त्या खताच्या प्रशासित किमतीपेक्षा जितका जास्त असेल तेवढ्या फरकाची रक्कम अर्थसाहाय्य म्हणून दिली जाते. हे अर्थसाहाय्य खत आयात करून त्याचे वितरण करणाऱ्या कंत्राटदाराला दिले जाते. जागतिक बाजारात खते खरेदी करणारी भारत व चीन ही दोन मोठी राष्ट्रे आहेत. या राष्ट्रांच्या बाजारातील प्रवेशामुळे जागतिक बाजारातील खतांच्या किमती नेहमी बदलत असतात.

जागतिक बाजारातील खतांच्या किमतींपेक्षा भारतातील किमती अधिक आहेत (तक्ता 2 पाहा). तरीसुद्धा खतासाठीच्या अर्थसाहाय्याचे प्रमाण वाढले आहे. 1980 साली एक किलोग्रॅम नायट्रोजन मिळविण्यासाठी 4·58 किलोग्रॅम भात आणि 3·72 किलोग्रॅम गहू मोबदल्यात द्यावे लागत होते. त्याच वर्षामध्ये

जागतिक सरासरी मात्र एक किलो नायट्रोजनच्या मोबदल्यात 1·64 किलोग्रॅम भात आणि 2·53 किलोग्रॅम गहू असे प्रमाण होते. 1988 पर्यंत हे प्रमाण भारताच्या तुलनेत कमी होते. भारतात गहू व भाताचे प्रमाण कमी होत असले तरी जागतिक सरासरीपेक्षा अजूनही ते अधिकच आहे.

**तक्ता 2**

**गहू व भात पिकांच्या आधार किमतींशी एक किलोग्रॅम नायट्रोजनच्या किमतीचे प्रमाण**

| वर्ष | एक किलो नायट्रोजनच्या किमतीचे प्रमाण (किलोग्रॅम) | | | |
|---|---|---|---|---|
| | भात | | गहू | |
| | भारत | जग | भारत | जग |
| 1980 | 4·58 | 1·64 | 3·72 | 2·53 |
| 1981 | 4 87 | 1·43 | 3·93 | 2 38 |
| 1982 | 4·44 | 1·73 | 3·60 | 2·08 |
| 1983 | 3·54 | 1·53 | 3·09 | 1·73 |
| 1984 | 3·42 | 2·18 | 3·07 | 2·25 |
| 1985 | 3·41 | 2·01 | 2·97 | 2·01 |
| 1988 | 3·19 | 1·97* | 2·95 | 2·82** |

टीप : * भारत, पाकिस्तान, द. कोरिया, अमेरिका फिलिपाईन्स, जपान, फ्रान्स यांची सरासरी.

** भारत, पाकिस्तान, द कोरिया, अमेरिका जपान, जर्मनी, फ्रान्स यांची सरासरी.

स्रोत : (1) 'Commodity Prices and Fertiliser News', ASIAN DEVELOPMENT REVIEW, Vol. 5, No. 1.

(2) FERTILISER STATISICS, 1989-90, Fertiliser Association of India.

आयात खतांच्या मूळ किमतीमध्ये वाहतूक, हमाली व इतर किरकोळ परिव्ययामुळे वाढ होणे साहजिक आहे, पण त्यामुळे आयात खत महाग वाटू नये म्हणून त्यावर अर्थसाहाय्य द्यावे ही खत आयातदारांची अपेक्षा असते. न दिल्यास आयात खतांच्या किमती वाढून त्यांची मागणी कमी होण्याची शक्यता असते. आंतरराष्ट्रीय बाजारातील खतांच्या किमती भारताच्या तुलनेने जास्त असल्याने भारतातील काही खत कारखानदारांनी आंतरराष्ट्रीय बाजारातील खत खरेदी करून त्याचे भारतामध्ये वितरण केले. या व्यवहारात प्रत्यक्ष उत्पादनापेक्षा व्यापारातून नफा अधिक मिळाला. शिवाय आयात खतासाठीचे अर्थसाहाय्य आणि उत्पादन परिव्ययातील ज्यादा परिव्ययापोटी दिलेले अर्थसाहाय्य अशा दोन्ही बाजूने अर्थसाहाय्य कमविले.

1980 नंतर भारत सरकारने खतांच्या किमती स्थिर ठेवण्याचा निर्णय घेतला. खत उद्योगाला खत उत्पादनातील अतिरिक्त परिव्यय अर्थसाहाय्य म्हणून देण्याची योजना सरकारने राबविली. तेव्हापासून खतासाठीच्या अर्थसाहाय्याचा दुसरा प्रकार अस्तित्वात आला. या प्रकारात वीज, जलसिंचन, शेती औजारे, अन्न, शिक्षण, आरोग्य, निवास, सामाजिक सेवा अशा अनेक महत्त्वाच्या बाबींसाठी अर्थसाहाय्य देण्याची पद्धती अस्तित्वात आली. खत उत्पादनासाठी वापरल्या जाणाऱ्या निविष्टींच्या किमती वाढल्या की खतांच्या अंतिम ग्राहक (शेतकरी) किमती वाढतात. या किमती वाढू नयेत, शेतकऱ्यांना स्वस्त दरात खते मिळावीत म्हणून सरकार खत उत्पादकांना त्यांच्या खतांच्या

**तक्ता 3**

**केन्द्र व राज्य सरकारांची चालू महसुलातील अर्थसाहाय्याची टक्केवारी**

| वर्ष | केन्द्र सरकार | राज्य सरकारे |
|---|---|---|
| 1980–81 | 12·0 | 6·3 |
| 1981–82 | 10·1 | 5·1 |
| 1982–83 | 9·9 | 5·0 |
| 1983–84 | 11·2 | 5·7 |
| 1984–85 | 14·2 | 7·5 |
| 1985–86 | 15·0 | 7·4 |
| 1986–87 | 14·2 | 7·2 |
| 1987–88 | 13·8 | 7·0 |
| 1988–89 | 15·6 | 8·0 |
| 1989–90 | 18·1 | 8·8 |

तक्ता 4

खतासाठीचे अर्थसाहाय्य

(दशलक्ष रुपये)

| वर्ष | आयात खतांसाठी अर्थसाहाय्य | देशी खतांसाठी अर्थसाहाय्य | एकूण अर्थसाहाय्य | वार्षिक अभिवृद्धी दर (टक्के) | राष्ट्रीय उत्पन्नातील हिस्सा (टक्के) |
|---|---|---|---|---|---|
| 1971–72 | –200 | – | –200 | – | – |
| 1972–73 | –180 | – | –180 | –10·00 | – |
| 1973–74 | –330 | – | –330 | 83·33 | 0·06 |
| 1974–75 | 3,710 | – | 3,710 | 1,024·24 | 0·55 |
| 1975–76 | –2,420 | – | 2,420 | –34·77 | 0·34 |
| 1976–77 | –520 | 600 | 1,120 | –53·72 | 0·15 |
| 1977–78 | –1,590 | 1,070 | 2,660 | 137·50 | 0·30 |
| 1978–79 | 1,690 | 1,730 | 3,420 | 28·57 | 0·36 |
| 1979–80 | 2,820 | 3,210 | 6,030 | 76·31 | 0·59 |
| 1980–81 | 3,350 | 1,700 | 5,050 | –16·25 | 0·41 |
| 1981–82 | 1,000 | 2,810 | 3,810 | –24·55 | 0·29 |
| 1982–83 | 530 | 5,500 | 6,030 | 58·26 | 0·38 |
| 1983–84 | 1,410 | 9,000 | 10,410 | 72·63 | 0·56 |
| 1984–85 | 7,270 | 12,000 | 19,270 | 85·11 | 0·96 |
| 1985–86 | 4,500 | 16,000 | 20,500 | 6·38 | 0·82 |
| 1986–87 | 1,970 | 17,000 | 18,970 | –7·46 | 0·73 |
| 1987–88 | 1,600 | 20,500 | 22,100 | 16·50 | 0·74 |
| 1988–89 | 2,500 | 30,000 | 32,500 | 47·05 | 0·93 |
| 1989–90 | 8,300 | 37,718 | 46,018 | 41·59 | 1·77 |
| 1990–91 | 6,590 | 37,300 | 43,890 | –4·62 | 0·92 |
| 1991–92 | 13,000 | 35,000 | 48,000 | 9·36 | 0·88 |
| 1992–93 | 9,960 | 48,000 | 57,960 | 20·75 | 0·78 |
| 1993–94 | 6,000 | 38,000 | 44,000 | –24·08 | 0·82 |
| 1994–95 | 11,660 | 40,750 | 52,410 | –19·11 | 0·52 |
| 1995–96 | 16,500 (B) | 37,500 (B) | 63,250 (R) | 20·68 | NA. |
| 1996–97 | 17,240 (B) | 61,480 (B) | 88,720 (B) | 40·26 | NA. |

**टीप :** B = अर्थसंकल्पीय तरतूद, R = सुधारित, NA = उपलब्ध नाही.

**स्रोत :** (1) देसाई, सेगुरा व इतर

(2) आर्थिक सर्वेक्षण, 1980–81 ते 1995–96.

(3) अर्थसंकल्प 1990 ते 1996.

(4) अशोक गुलाटी व जी. डी. कालरा

किमती वाढवू देत नाही. वाढीव परिव्ययाची भरपाई करण्यासाठी केन्द्र सरकार खत उत्पादकांना अर्थसाहाय्य देते. केन्द्र सरकारप्रमाणेच बहुतेक राज्य सरकारेसुद्धा खतावर काही सवलती देतात. 1990 साली केन्द्र व राज्यांनी मिळून रु. 43,000 कोटीचे अर्थसाहाय्य कृषी क्षेत्राला दिले. त्यातला बहुतांश हिस्सा खता-साठीच्या अर्थसाहाय्याचा होता.

तक्ता 3 मध्ये केन्द्र व राज्य सरकारांचा चालू महसुलातील अर्थसाहाय्याचा हिस्सा दर्शविलेला आहे. दोन्ही पातळयांवर महसुलातील अर्थसाहाय्याचा हिस्सा सातत्याने वाढत गेल्याचे आढळते. राजकोषीय तूट वाढण्याच्या अनेक कारणांमध्ये हे एक महत्त्वाचे कारण आहे असा दावा काही राजकोषीय तज्ज्ञांनी 1986 मध्येच केला होता. त्यामुळे अर्थसाहाय्याची योजना बंद करावी असा आग्रह धरला जात होता. या आग्रहाच्या प्रभावामुळेच 1991 मध्ये अर्थसाहाय्य रद्द केल्याची घोषणा झाली होती. परंतु लोकदबावामुळे ते पुन्हा सुरू करावे लागले.

1974-75 ते 1996-97 या कालखंडामध्ये एकंदर सुमारे रु. 60,222 कोटीचे खतासाठीचे अर्थ-साहाय्य दिले गेले (तक्ता 4 पाहा). 1971-72 ते 1973-74 या काळात आयात खतांच्या किमती कमी असल्यामुळे शेतकऱ्यांनी बाजार दरापेक्षा जास्त दराने खते खरेदी केली. 1975-76 ते 1976-77, 1980-81 ते 1981-82 आणि 1993-94 ते 1994-95 या वर्षांमध्ये पूर्वीच्या तुलनेने अर्थसाहा-य्याचा वार्षिक अभिवृद्धी दर दोन्ही वर्षांमध्ये घटलेला आढळतो. 1986-87 व 1990-91 या वर्षांमध्ये किरकोळ घट आहे. इतर सर्व वर्षांमध्ये वार्षिक अभिवृद्धी दर वाढलेला आढळतो. राष्ट्रीय उत्पन्नाच्या संदर्भात अर्थसाहाय्याची टक्केवारी वाढण्याची प्रवृत्ती आढळून येते.

एकंदर अर्थसाहाय्यामध्ये खतासाठीच्या अर्थसा-हाय्याचा हिस्सा नेहमी सर्वाधिक राहिला आहे एवढेच नव्हे तर, त्याचे प्रमाण वाढत गेल्याचे आढळते. (तक्ता 5). विशेष म्हणजे, 1996-97 मध्ये एकंदर अर्थसा-हाय्यामधील केवळ खतासाठीच्या अर्थसाहाय्याचा हिस्सा 50 टक्यांच्या वर जाईल असा अंदाज आहे.

**तक्ता 5**

**खतासाठीच्या अर्थसाहाय्याचा हिस्सा**

| वर्ष | हिस्सा (टक्के) |
|---|---|
| 1987-88 | 36·19 |
| 1988-89 | 41·39 |
| 1989-90 | 43·36 |
| 1990-91 | 36·09 |
| 1991-92 | 39·17 |
| 1992-93 | 48·32 |
| 1993-94 | 34·69 |
| 1994-95 | 40·37 |
| 1995-96 | 46·02 |
| 1996-97 (अंदाजित) | 62·32 |

तक्ता 4 मध्ये दर्शविलेल्या अर्थसाहाय्याला 'अर्थसंकल्पीय अर्थसाहाय्य' (budgetary subsidy) म्हणतात. केन्द्र शासनाने निर्धारित केलेल्या कारखाना पातळीवरील प्रतिधारण किमतीला (retention price) शेतकरी खत खरेदी करतो. प्रत्यक्ष खतांच्या उत्पादन परिव्ययातून ही किंमत वजा केल्यास (वितरकांचा गाळा व विक्री कर सोडून) जो फरक आढळतो तेवढी रक्कम अर्थसाहाय्य म्हणून खत उत्पा-दकांना दिली जाते. त्याचा उल्लेख अर्थसंकल्पात केलेला असतो, म्हणून त्याला 'अर्थसंकल्पीय अर्थसाहाय्य' म्हणतात. कारखानी प्रतिधारण किमतीचा तपशील पुढील भागात चर्चिला आहे.

## 6

## प्रतिधारण किंमत योजना

( Retention price scheme )

मराठे समितीच्या शिफारशीनुसार प्रतिधारण किंमत योजना अस्तित्वात आली. उत्पादन परिव्ययावर आधारित खतांच्या किमती न आकारता खत उत्पाद-कांनी खतांच्या किमती स्थिर ठेवाव्यात आणि वाढलेल्या उत्पादन परिव्ययाइतके अर्थसाहाय्य केन्द्र सरकारने

देण्याची व्यवस्था करावी अशी महत्त्वपूर्ण शिफारस मराठे समितीने केली होती. या योजनेनुसार सरकारकडून प्रत्येक खत उत्पादन करणाऱ्या संयंत्रासाठी ( plant ) आणि प्रत्येक उत्पादनासाठी कारखानी प्रतिधारण किंमत (ex-factory retention price) निर्धारित केली जाते. या प्रकारच्या किंमत निर्धारणामध्ये अर्थसाहाय्याच्या संदर्भातील काही प्रमाणकांचे ( norms ) एकत्रीकरण आणि प्रत्यक्षातील उत्पादन परिव्यय आणि समीकृत वाहतूक खर्चाचा ( equated freight charges ) विचार होतो. कारखानी किमतीमध्ये, व्यवसाय संस्थेच्या निव्वळ मत्तेच्या ( net worth ) करपश्चात 12 टक्के प्रत्याय गृहीत धरलेला असतो. व्यवसाय संस्थेची 80 टक्के (दुसऱ्या वर्षानंतर 90 टक्के) स्थापित क्षमता वापरात आहे, असे गृहीत धरलेले असते. याबरोबरच प्रतिधारण किंमत निर्धारित करीत असताना पुढील बाबींचाही विचार केला जातो.

(1) अमोनिया उत्पादन करणाऱ्या कारखान्यांसाठी 80 टक्के आणि फॉस्फेटिक ॲसिड व मिश्र खत उत्पादनासाठी 70 टक्के उत्पादनक्षमता गृहीत धरलेली असते.

(2) प्रत्येक संयंत्राच्या तांत्रिक अभ्यासावरून निविष्टींच्या उपयोगाचे युक्त प्रमाण लक्षात घ्यावे लागते.

(3) वस्तुनिर्मिती परिव्यय

(4) प्रत्यक्ष विक्री परिव्यय

(5) विधी निर्धारित किमान बोनस

(6) सरळ पद्धतीवर आधारित (straight-line besed) घसारा दर

(7) निव्वळ मत्तेच्या 12 टक्के करपश्चात प्रत्याय (किंवा 25·50 टक्के करपूर्व प्रत्याय)

(8) समीकृत सरासरी वाहतूक खर्च

(9) संयंत्राच्या आधुनिकीकरणासाठी, त्याच्या एकूण कमातील विशिष्ट हिस्सा किमान सहा वर्षांसाठी वापरात आणला जात नाही असे गृहीत धरून कारखाना प्रतिधारण किंमत काढली जाते.

1980 नंतर खतांच्या किमती उत्पादन परिव्ययाबरोबर वाढवू दिल्या नाहीत. कारण खतांच्या उपयोगावर त्याचा विपरित परिणाम होऊन शेती उत्पादनात घट होईल याची सरकारला भीती होती. म्हणून खत उत्पादकांना खतांच्या वाढीव उत्पादन परिव्ययाइतके अर्थसाहाय्य देण्याची पद्धती अस्तित्वात आणली. ही सवलत देशी खत उत्पादकांना देण्यात येऊ लागली. या प्रकारच्या अर्थसाहाय्यामुळे 1980 च्या दशकामध्ये खत प्रकल्पांतील गुंतवणूक प्रचंड वेगाने वाढली. काही खत उत्पादकांनी खत उत्पादनाची क्षमता वाढविली. अर्थसाहाय्य मिळावयाला सुरुवात झाल्यानंतर 11 दशलक्ष टन वार्षिक उत्पादन असणाऱ्या प्रकल्पाला 100 अब्ज किमतीची भांडवल उभारणी करावी लागली. कारखानी किंमत निर्धारित करण्यासाठी भांडवली गुंतवणूक लक्षात घ्यावी लागते. भांडवली गुंतवणुकीच्या सयुक्तिक प्रमाणाचा विचार कुणी केला नाही. कार्यदक्षता व सयुक्तिक कसोट्यांच्या आधारावर कारखानी किमतीचा संबिंदू ( break-even-point ) काढला पाहिजे असा आग्रही मुद्दा काही अर्थशास्त्रज्ञांनी दरम्यानच्या काळात व्यक्त केला होता. शिवाय वरील निकषांची तीन वर्षांची स्थिती लक्षात घेऊन त्याच्या सरासरीवर कारखानी प्रतिधारण किंमत काढावी अशी सूचना केली होती. निव्वळ भांडवली गुंतवणुकीच्या आधारावर प्रतिधारण किंमत सांगणे इष्ट नाही. याउलट भांडवलाच्या कार्यदक्ष वापराच्या कसोट्यांवर अर्थसाहाय्य मोजले जावे असे तज्ज्ञांचे मत होते. तसेच अतिरिक्त उत्पादनक्षमतेच्या विस्ताराबाबत प्रतिधारण किंमत योजना स्पष्टपणे मार्गदर्शन करीत नव्हती. कारखान्याची जागा, स्थानिकीकरण, उत्पादन प्रमाण, कार्यदक्षता इत्यादीसंबंधीचा पुरेसा विचार प्रतिधारण किमतींमध्ये केला जात नाही. या सगळ्या प्रकारात शेतकरी हा घटक वगळलेला होता. एका विशिष्ट पद्धतीने सर्व प्रकार हाताळून खत कारखानदारांचे खिसे भरणारी ही योजना आहे असेच म्हणावे लागेल. म्हणून याला अर्थशास्त्रज्ञांचा विरोध होता.

1980–90 या दशकात खत उद्योगाला 15,884 कोटी रुपयांचे अर्थसाहाय्य दिले गेले. खत कारखान्यांच्या निविष्टींच्या किमती वाढल्या की, प्रतिधारण किमती वाढविल्या जातात. कारण सरका–

रला शेतावरच्या किमती (farmgate prices) वाढवावयाच्या नसतात. ही योजना सध्याही चालू आहे. या स्वरुपाच्या प्रत्यक्ष सवलतीशिवाय खत उत्पादनासाठी लागणाऱ्या काही निविष्टीदेखील सवलतीच्या दराने दिल्या जातात; उदाहरणार्थ, गॅस, इंधन तेल, नाफ्ता, इत्यादी. काही अभ्यासांच्या (प्रताप, 1991) संदर्भावरुन असे स्पष्ट झाले आहे की, खतांच्या किमती 40 टक्क्यांनी वाढल्यास पिकांचे उत्पादन 12 टक्क्यांनी घटते. खतांच्या किमतींच्या संदर्भातील शेतीमालाची उत्पादन लवचिकता – 0·3 टक्के असते. (प्रताप, 1991). 1991 मध्ये खतांच्या किमती वाढविल्यामुळे वरील हिशोबांनी उत्पादनाची लवचिकता स्पष्ट झाली. तसे पाहिल्यास शेतीमालाच्या उत्पादनासाठी लागणाऱ्या बहुतेक निविष्टी सवलतीच्या दरांनी अथवा पूर्णतः आर्थिक मदतीनी पुरविलेल्या असतात, त्यामुळे दुहेरी स्वरुपाची विरुपणे निर्माण होतात. (साहोटा, 1991). शिवाय अर्थसाहाय्यामुळे सामाजिक न्याय प्रस्थापित होत नसून उलट त्यामुळे आर्थिक विषमता वाढवयाला मदत होते. अर्थसाहाय्यामुळे श्रीमंत शेतकरी अधिक श्रीमंत आणि अकार्यदक्ष होतो. खतासाठीच्या अर्थसाहाय्याचे सीमान्त उत्पादकता मूल्य (value of marginal product) त्याच्या किमतीपेक्षा जर कमी असेल तर अर्थसाहाय्य देण्यात अर्थ नाही (साहोटा, 1991) आणि ते जास्त असेल तर त्याचा उपयोग फायदा मिळविण्यासाठी होईल. अर्थसाहाय्याचा मूलभूत उद्देश सफल होणे गरजेचे असेल तर सध्याच्या वितरण व्यवस्थेतील त्रुटी काढून टाकाव्या लागतील. गणितीय पडताळ्यापेक्षा व्यक्तिगत आर्थिक परिस्थितीच्या निकषावर सवलती देणे इष्ट ठरेल अथवा दुसऱ्या मापदंडाने अर्थसाहाय्य देण्याची व्यवस्था करावी लागेल.

## 7

## खतासाठी आर्थिक अर्थसाहाय्य

अशोक गुलाटी व शर्मा (1990) यांनी खत

तक्ता 6

खतासाठीचे आर्थिक अर्थसाहाय्य

(दशलक्ष रुपये)

| | तपशील | त्रैवार्षिक अखेर 1983–84 | त्रैवार्षिक अखेर 1986–87 | त्रैवार्षिक अखेर 1989–90 | 1981–82 ते 1989–90 ची सरासरी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | आंतरराष्ट्रीय किमत दृष्टिकोनानुसार अर्थसाहाय्य | 1,599 | 8,450 | 16,710 | 8,920 |
| 2 | मध्यवर्ती सरकारच्या अर्थसंकल्पातील आर्थिक अर्थसाहाय्य | 6,740 | 19,157 | 7,30,217 | 18,704 |
| 3 | शेतकऱ्याला न मिळणारे अर्थसाहाय्य (खत उत्पादक व वितरकाला मिळणारे अर्थसाहाय्य) | 5,141<br>(76·27) | 10,707<br>(55·89) | 13,506<br>(44·70) | 9,785<br>(52·31) |

**टीप** : कंसातील आकडे एकूण अर्थसाहाय्याशी टक्केवारी दर्शवितात.

**स्रोत** : गुलाटी व शर्मा, 1990.

तक्ता 7

खतासाठीच्या सरासरी आर्थिक

| तपशील | 1981–82 | 1982–83 | 1983–84 |
|---|---|---|---|
| (1) युरिया (46 टक्के N ) | | | |
| (अ) CIF किंमत (जहाजावरची) | 1,743·59 | 1,379·74 | 1,396·04 |
| (आ) हाताळणी खर्च(1) | 791·36 | 1,063·89 | 878·10 |
| (इ) वितरकाचा गाळा(7) | 120·00 | 120·00 | 130·00 |
| (ई) देशांतर्गत किंमत | 2,350·00 | 2,350·00 | 3,150·00 |
| (उ) शेतकऱ्याला मिळालेले अर्थसाहाय्य ( अ + आ + इ – ई ) | 304·95 | 213·63 | 254·14 |
| (2) डाय–अमोनियम फॉस्फेट (18–46–0) | | | |
| (अ) CIF किंमत ( जहाजावरची ) | 2,240·15 | 2,010·48 | 2,045·48 |
| (आ) हाताळणी खर्च(1) | 791·36 | 1,063·89 | 878·10 |
| (इ) वितरकाचा गाळा(7) | 145·00 | 145·00 | 190·00 |
| (ई) देशांतर्गत किंमत | 3,600·00 | 3,600·00 | 3,350·00 |
| (उ) शेतकऱ्याला मिळालेले अर्थसाहाय्य ( अ + आ + इ – ई ) | –423·49 | –380·63 | –236·42 |
| (3) पोटॅश [ K (60 टक्के $K_2O$) ] | | | |
| (अ) CIF किंमत (जहाजावरची किंमत) | 1,716·00 | 933·24 | 998·94 |
| (आ) हाताळणी खर्च(1) | 387·53 | 400·96 | 401·97 |
| (इ) वितरकाचा गाळा(7) | 90·00 | 90·00 | 95·00 |
| (ई) देशांतर्गत किंमत | 1,300·00 | 1,300·00 | 1,200·00 |
| (उ) शेतकऱ्याला मिळालेले अर्थसाहाय्य (अ + आ + इ – ई ) | 893·53 | 124·20 | 295·91 |

टीपा : (1) हाताळणी खर्चामध्ये प्रामुख्याने बंदरावरील हाताळणीचा खर्च, बंदरावरील देणी, साठवणूक व हाताळ--णीतील नुकसान, डेपोतील हाताळणीचे खर्च, वित्तीय खर्च, साठवणूक खर्च, प्रतिधारण खर्च, पोत्यांचा खर्च, प्रशासकीय खर्च आणि इतर खर्चांचा समावेश होतो.

(2) जानेवारी 31, 1986 चे दर आहेत.

(3) 1989–90 सालात ( डिसेंबर 1989 पर्यंत ) युरियाची आयात केली नाही. त्यामुळे त्याच्या CIF ( cost, insurance, freight ) किमती काढलेल्या आहेत. त्या किमतींमध्ये प्रतिटन 25 डॉलर इतका वाहतूक खर्च आणि मध्य पूर्वेकडील FOB ( free on board ) ची जूनमधील (1989) किंमत लक्षात घेतली आहे.

(4) 1987–88 साली DAP ची आयात झाली नाही. त्यामुळे त्याची CIF किंमत काढलेली आहे. त्यामध्ये प्रतिटन 35 डॉलर इतका वाहतूक खर्च आणि अमेरिका, आखाती देशांची FOB ची जून 1987 मधील किंमत ( 170·5 डॉलर प्रतिटन ) लक्षात घेतली आहे.

(रुपये / टन)

| 1984–85 | 1985–86 | 1986–87 | 1987–88 | 1988–89 | 1989–90 (डिसेंबर 31 पर्यंत) |
|---|---|---|---|---|---|
| 2,000·00 | 2,157·00 | 1,350·00 | 1,589·66 | 1,940·80 | 2,362·80(3) |
| 882·55 | 956·88 | 782·59 | 927·38 | 927·38(6) | 927·38(6) |
| 130·00 | 130·00 | 130·00 | 130·00 | 130·00 | 130·00 |
| 2,150·00 | 2,150·00(2) | 2,350·00 | 2,350·00 | 2,350·00 | 2,350·00 |
| 862·55 | 1,093·88 | –87·41 | 297·04 | 648·18 | 1,070·18 |
| | | | | | |
| 2,550·00 | 2,487·00 | 2,500·00 | 2,650·94(4) | 2,532·64 | 3,787·10 |
| 1,041·54 | 1,163·36 | 840·97 | 996·55(5) | 1,061·20 | 944·67 |
| 190·00 | 190·00 | 190·00 | 190·00 | 190·00 | 190·00 |
| 3,350·00 | 3,350·00(2) | 3,600·00 | 3,600·00 | 3,600·00 | 3,600·00 |
| 431·54 | 490·36 | –69·03 | 237·50 | 1,183·34 | 1,371·77 |
| | | | | | |
| 1,200·00 | 1,347·00 | 1,185·00 | 1,200·57 | 1,832·20 | 2,149·13 |
| 401·92 | 416·02 | 450·99 | 515·05 | 514·99 | 515·00 |
| 95·00 | 95·00 | 95·00 | 95·00 | 95·00 | 95·00 |
| 1,200·00 | 1,200·00(2) | 1,300·00 | 1,300·00 | 1,300·00 | 1,300·00 |
| 496·92 | 658·02 | 430·99 | 510·61 | 1,142·19 | 1,459·13 |

(5) DAP चा हाताळणी खर्च 1986–87 च्या तुलनेने 18·5 टक्क्यांनी वाढला असे गृहीत धरले आहे. कारण, युरियाच्या बाबतीत तेवढीच वाढ आहे.

(6) खाजगी वितरकाचा गाळा लक्षात घेतला आहे. सहकारी संस्थांच्या बाबतीत त्याचे प्रमाण किंचित जास्त असते.

(7) सर्व खतांच्या CIF किमती अधिकृत विनिमय दराने काढलेल्या आहेत. जर कुणी विनिमय दराची छाया किंमत (shadow price) घेऊन अर्थसाहाय्य मोजले तर ते वेगळे येईल.

स्रोत : अशोक गुलाटी (1990) यांच्या लेखातून.

उत्पादकाला मिळणाऱ्या अर्थसाहाय्याचे मोजमाप केले आहे. त्याला ते 'आर्थिक अर्थसाहाय्य' (economic subsidy) म्हणतात. सरकारी यंत्रणेकडून कोणत्याही प्रकारचे अर्थसाहाय्य उपलब्ध नसताना, खतांची जी किमत बाजारात अस्तित्वात आली असती ती किमत आणि शेतकऱ्यांच्या शेतावरील खतांची प्रत्यक्ष किमत यातील फरकाला 'आर्थिक अर्थसाहाय्य' म्हणतात. तीन ते पाच वर्षांची सरक सरासरी (moving average) लक्षात घेऊन बाजारातील किमत काढलेली असते. कारण खतांच्या खरेदीसाठी एखादा देश ज्यावेळी जागतिक बाजारात प्रवेश करतो त्यावेळी खतांच्या किमतीमध्ये बदल संभवतात.

1981-82 ते 1989-90 या कालखंडात दिल्या गेलेल्या एकूण अर्थसाहाय्यापैकी 52 टक्के हिस्सा खत उत्पादकांना द्यावा लागला. (तक्ता 6). 1980-81 ते 1983-84 या तीन वर्षांत सुमारे 76·27 टक्के अर्थसाहाय्य खत उद्योग व खत वितरकांना दिले गेले. यानंतरच्या त्रैवार्षिक सरासरीमध्ये घट झाली. ही घट प्रामुख्याने विनिमय दरातील बदलामुळे झाली, विनिमय दर बदलल्यामुळे परिव्यय-विमा-वाहणावळीसह किमतीतही (CIF price) बदल होत असतात. तसेच हाताळणी परिव्ययातही बदल होतो.

आर्थिक अर्थसाहाय्य खऱ्या अर्थाने परिणामकारक अर्थसाहाय्य असते. अर्थसाहाय्य मोजताना खतांच्या आंतरराष्ट्रीय किमती लक्षात घेतलेल्या असतात. कारण त्या किमती मुक्त किमत निर्धारणाचे प्रातिनिधिक म्हणून कार्य करतात. भारतामध्ये या किमतींचा आधार घेऊनच परिणामकारक अर्थसाहाय्य मोजले जाते. याअगोदर उल्लेखिल्याप्रमाणे भारतातील खतांच्या किमती आंतरराष्ट्रीय खतांच्या किमतीपेक्षा जास्त आहेत याचे महत्त्वाचे कारण म्हणजे, खत उत्पादकांना उत्पादन परिव्ययाच्या आधारावर अर्थसाहाय्य दिले जाते. अर्थसाहाय्याची सवलत सामाजिक न्यायाकडे न झुकता तिने उलटा प्रवास केला आहे. सामाजिक न्यायाच्या नावाखाली सरकारी सवलती मात्र बड्या लोकानाच मिळत गेल्या.

तक्ता 7 मध्ये खतांच्या प्रकारानुसार सरासरी आर्थिक अर्थसाहाय्याचे मोजमाप केले आहे. (अशोक गुलाटी, 1990). डाय-अमोनियम फॉस्फटला (18-46-0) दिलेले अर्थसाहाय्य 1981-82 ते 1983-84 आणि 1986-87 मध्ये उणे होते. सन 1988-89 ते 1989-90 या वर्षांमध्ये यावरच्या अर्थसाहाय्याचे प्रमाण वाढले. हीच अवस्था युरिया व पोटॅशच्या बाबतीत आहे. युरियावरचे अर्थसाहाय्य 1986-87 या वर्षामध्ये उणे होते.

वितरकांचा गाळा जवळपास स्थिर राहिला. कदाचित वितरकांना मिळणारा गाळा वाढविलेला नाही हे त्याना आवर्जून दाखवावयाचे असेल. हाताळणी खर्च व इतर प्रकारच्या खर्चांमध्ये त्याना निश्चितपणे अधिक गाळा मिळतो. तक्ता 7 मधील आर्थिक अर्थसाहाय्याचे मोजमाप अत्यंत शास्त्रीय पद्धतीने केले आहे. केन्द्र सरकारच्या अलीकडच्या धोरणानुसार युरिया खताला अधिक सवलती दिल्या आहेत त्यामुळे जमिनीचा कस बिघडून ती अधिक क्षारयुक्त होण्याची भीती आंतरराष्ट्रीय नाणे निधीपासून अनेक कृषी शास्त्रज्ञांपर्यंत सर्वांनी व्यक्त केली आहे.


दोन वर्षांपूर्वी प्रतिधारण किमत योजना रद्द केली होती. त्यामुळे खत कारखानदारांना आपल्या खतांच्या किमती निर्धारित करणे अवघड झाले होते. कारण कोणत्या दराला शेतकऱ्यांकडून कसा प्रतिसाद मिळेल याचा अंदाज त्यांना लागत नव्हता. याशिवाय किमत स्पर्धा सुरू होईल याचीही भीती खत उत्पादकांना होती. शेवटी बाजार दराने खतांच्या किमती जाहीर झाल्या. 1992-93 या वर्षामध्ये खतांच्या किमती बाजार दराने ठरविल्यामुळे खतांचा उपयोग 3·7 टक्क्यांनी कमी झाला. विशेषतः फॉस्फेटयुक्त आणि पोटॅशयुक्त खतांचा उपभोग कमी झाला. कारण यावरचे अर्थसाहाय्य रद्द करून फक्त युरियावरचे चालू ठेवले होते. 1991-92 या वर्षातील खतांचा उपभोग 12·73 दशलक्ष टनांचा होता तो 1992-93 मध्ये 12·25 दशलक्ष टनांपर्यंत घटला. ही घट अगदीच नगण्य आहे. तथापि फॉस्फेटयुक्त खतांचा उपभोग 13·5 टक्क्यांनी कमी झाला. पोटॅशचा उपभोग 30·7 टक्क्यांनी कमी झाला. नायट्रोजनला दिलेल्या सवलतीमुळे त्याचा उपभोग 4·8 टक्क्यांनी वाढला. खतांच्या उपभोगातील घट हा गेल्या 18 वर्षांतील पहिलाच अनुभव होता. शेणखत, गोबर गॅसपासून मिळणारे

कंपोस्ट खत, जीवाणु खते, गांडूळ शेती या पद्धतीकडे शेतकरी वळला. त्यामुळे रासायनिक खतांचा खप कमी झाला. सप्टेंबर 1992 मध्ये डी. ए. पी. ची आयात खुली केली. याच सुमारास आंतरराष्ट्रीय बाजारात या खताचे भाव पडले आणि काही विदेशी उत्पादकांनी भाव पाडून निर्यात सुरू केली. अमोनिया आणि फॉस्फरिक ॲसिडची आयात करून डी. ए. पी. उत्पादन करण्यापेक्षा त्याची आयात करून विक्री करणे सोयीचे झाले. मंगलोर केमिकल्स, सदर्न पेट्रोचा विभाग, पारादीप फॉस्फेटस्, गोदावरी, इफ्को यानी डी. ए. पी. चे उत्पादनच थांबविले. भारतामध्ये दर हेक्टरी 72 किलोग्रॅम (1991–92) रासायनिक खते वापरण्याचे प्रमाण आहे. 1981-82 मध्ये हे प्रमाण फक्त 34·27 किलोग्रॅम होते. 1999–2000 पर्यंत खताला असलेली मागणी N+P+K साठी अनुक्रमे 127·5 + 58·0 + 20 6 एवढी राहील असा अंदाज आहे.

रासायनिक खत वापरणारा शेतकरी हा बहुतेक जास्त धारण क्षेत्र असलेला शेतकरी आहे. शेतकऱ्यांच्या धारण क्षेत्रानुसार आणि पिकानुसार अर्थसाहाय्य मोजल्यास असेही दिसते की, अर्थसाहाय्याचा हिस्सा नगदी पिकांनी जास्त प्रमाणात घेतला आहे. कारण त्यांच्या उत्पादनासाठी तुलनेने अधिक खते दिली जातात. अन्नधान्याच्या उत्पादनासाठी रासायनिक खतांचा वापर कमी असतो.

तक्ता 8 मध्ये भात, गहू व कापूस यांचे पीक–खत–किमत प्रमाण मोजले आहे. हे मोजमाप खुल्या व नियंत्रित व्यापार स्थितीत केले आहे. पिकांची किमत खतांच्या किमतीपेक्षा (एकापेक्षा) नेहमीच कमी आहे. विशेषत: खुल्या आणि नियंत्रित व्यापारातील कापसाचे पीक–खत–किमत प्रमाण एकापेक्षा अधिक आहे. अशा रीतीने इतर पिकांचे पीक–खत–किमत प्रमाण मोजता येते. म्हणून असे म्हटले जाते की, खतांच्या किमती बाजार दराने (खुल्या) वाढल्या असत्या तरी त्यापोटी दिल्या जाणाऱ्या अर्थसाहाय्याची रक्कम निश्चितच तेवढी जास्त प्रमाणात गेली नसती (गुलाटी, 1990). त्यासाठी परिणामकारक अर्थसाहाय्याच्या तत्त्वाने अर्थसाहाय्य आणि लाभ दोन्ही मोजावे लागतील.

साहोटा (1991) यानी आकृती 2 मध्ये 1981



आकृती 2

व 1991 या वर्षांतील अर्थसाहाय्याच्या वितरणाची स्थिती दर्शविलेली आहे.

(अ) a b c d = 1981 चे देशी अर्थसाहाय्य

(आ) a f g b = आयात खतावरचे अर्थसाहाय्य

(इ) a b c d + q f g b = 1981 मधील अर्थसाहाय्य

(ई) a b t u + q f g b = 1991 मधील अर्थसाहाय्य

(उ) j c d k = उत्पादकांचे अर्थसाहाय्य

(ऊ) e q n j k + g f n = उपभोक्त्यांचे अर्थसाहाय्य

(ए) v b c = सामाजिक परिव्यय, 1981

(ऐ) a b t m = सामाजिक परिव्यय, 1991

(ओ) o r b a = खत उद्योगाचा संधी खर्च

## 8

## अर्थसाहाय्य मोजण्याच्या पद्धतीतील विसंगती

सन 1965–66 सालापासून अर्थसाहाय्य देण्याची पद्धती अस्तित्वात आली. हरित क्रान्तीचा तो एक

महत्त्वाचा कार्यक्रम होता. शेतकऱ्यांनी रासायनिक खतांचा वापर करावा ही भूमिका या कार्यक्रमामध्ये होती. 'अधिक धान्य पिकवा' या मोहिमेअंतर्गत खतांचा वापर वाढविला जावा आणि अन्नधान्याचे अधिक उत्पादन व्हावे ही भूमिका घेऊन रासायनिक खत वापरणाऱ्या शेतकऱ्यांना सवलतीच्या दराने खत पुरवठा केला गेला.

सन 1973–74 साली आयात खतावर अर्थसाहाय्य देण्यात आले. कारण त्या दरम्यान अशोधित तेलाच्या (crude oil) किमती वाढलेल्या होत्या. वाहतूक आणि आनुषंगिक परिव्ययांचे प्रमाण वाढल्याने आयात खतांच्या देशी किमती वाढवू दिल्या नाहीत. वाढीव परिव्ययाची पूर्तता अर्थसाहाय्याच्या माध्यमाने केली गेली. या पद्धतीमुळे आयात केलेल्या खतांच्या वितरणाचा परिव्यय फुगवून सांगितला जाऊ लागला. केलेल्या परिव्ययाच्या भरपाईबाबत अर्थसाहाय्य मिळणार असल्याने हे गैरप्रकार अस्तित्वात आले. याशिवाय 1973–74 पासून आयात खतांच्या किमती वाढल्यामुळे सरकारला अर्थसाहाय्य देणे भाग पडले. 1973–74 ते 1989–90 या कालखंडात आयात केलेल्या खतावर 45,510 दशलक्ष रुपयांचे आणि देशी खतावर 1,58,838 दशलक्ष रुपयांचे अर्थसहाय्य देण्यात आले. परिणामी, खतासाठीचे एकंदर अर्थसाहाय्य रु. 2,04,348 दशलक्ष होते. 1973–74 साली 33 कोटी रुपयांचे अर्थसाहाय्य दिले होते. युरियाची किंमत 90 टक्क्यांनी वाढवूनसुद्धा अर्थसाहाय्याचे प्रमाण कमी झाले नाही. कारण त्यातील किंमत वाढ आयात परिव्ययाच्या वाढीच्या तुलनेने कमी होती. तसेच देशी खतांच्या किमती त्यांच्या उत्पादन परिव्ययापेक्षा जास्त होत्या. म्हणून तत्कालिन परिस्थीतीत भारत सरकारने देशी खत उत्पादकांवर 'खत किमती समानीकरण भार' (fertilizer prices equalisation charges) लागू केला. बदललेल्या आंतरराष्ट्रीय (अशोधित तेलाच्या किमती वाढलेल्या होत्या) आर्थिक परिस्थितीचा अकल्पित लाभ खत प्रकल्पांना मिळू नये असा सरकारचा दृष्टिकोन होता. पण या धोरणामुळे खताचा उपभोग मात्र 10 टक्क्यांनी घटला. देशी खतांचा उपभोग वाढविण्याच्या उद्देशाने 1975 ते 1977 आणि 1979 या वर्षांमध्ये देशी खतांच्या किमती कमी केल्या. त्यामुळे किरकोळ किंमत आणि उत्पादन परिव्यय यातील फरक कमी झाला. याबरोबर खत–किंमत–समानीकरण भार कमी केला आणि पुढे जून 1980 पासून तो पूर्णतः रद्द करण्यात आला. पण याचा परिणाम म्हणून खतासाठीच्या अर्थसाहाय्यात वाढ झाली. 1980 नंतर प्रतिधारण किमत योजना लागू झाली.

प्रतिधारण किमत योजनेप्रमाणे खत उत्पादन करणाऱ्या संयंत्रासाठी प्रत्येक उत्पादन प्रकारासाठी सरकार कारखानी किमत निर्धारित करते. प्रत्येक संयंत्राचा उत्पादन परिव्यय वेगवेगळा असणे साहजिक आहे. प्रत्येक कारखान्याचा आकार, चांगल्या उत्पादनाचा कालखंड, स्थान, आवश्यक निविष्ठांची उपलब्धता कालपरत्वे भिन्नता असते. अगदी एकाच प्रकारच्या खत उत्पादन करणाऱ्या अनेक कारखान्यांचा उत्पादन परिव्यय वेगवेगळा असू शकतो. यासंबंधीचा सविस्तर अभ्यास देसाई (1986) यांनी केला आहे. वरील घटकांचा दर तीन वर्षांनी आढावा घेतला जातो आणि प्रतिधारण किमती निश्चित केल्या जातात. वरील घटकांच्या मानक परिव्ययाचा (standard cost) मात्र पुरेसा अभ्यास झालेला नाही.

खत उत्पादन करणाऱ्या देशी कारखान्यांना प्रत्यक्ष दिल्या जाणाऱ्या अर्थसाहाय्याशिवाय सवलतीच्या दराने गॅस, कोळसा, इंधन तेल, नाफ्ता, इत्यादी कच्चा माल पुरविण्याची सोय सरकारने उपलब्ध करून दिली आहे. भारतातल्या 25 खत प्रकल्पांपैकी 11 खत प्रकल्प नाफ्त्यावर चालतात, 5 प्रकल्प इंधन तेलावर, 5 प्रकल्प वायूवर, 2 प्रकल्प कोळशावर, एक प्रकल्प नाफ्ता व इंधन तेल आणि एक प्रकल्प नाफ्ता व वायू यावर आधारलेला आहे. या 25 खत प्रकल्पांनी उत्पादित केलेल्या युरियाचा परिव्यय प्रतिटन रु. 1,795 ते रु. 4,506 या दरम्यान होता. एकंदर खत प्रकल्पांपैकी 17 व्यवसाय संस्थांच्या ऊर्जेवरचा परिव्यय 52·2 टक्के, भांडवल व व्याज यावरचा परिव्यय 21·8 टक्के, प्रक्रिया परिव्ययाचे प्रमाण 12·1 टक्के, घसारा 10·1 टक्के आणि पिशव्या अथवा पोती यावरचा परिव्यय 3 टक्के होता. ऊर्जेवरच्या परिव्ययामध्येही व्यवसाय संस्थेनुसार तफावत होती. उदाहरणार्थ, एक टन युरिया तयार करण्यासाठी वायूवर आधारलेल्या प्रकल्पाचा ऊर्जेवरचा सरासरी परिव्यय रु. 1,063 होता तर कोळशावर आधारलेल्या प्रकल्पांचा सरासरी परिव्यय प्रतिटन 12,255 रुपये होता. यातील तफावत

लक्षात घेण्यासारखी आहे. अशा प्रकारचा फरक वीज, कोळसा, तेल यासारख्या निविष्टींवर होणाऱ्या परिव्ययामध्येही आढळून येतो. काही खत प्रकल्पांचा विजेचा एक किलोवॉटचा परिव्यय रु. 0·42 होता तर काही प्रकल्पांचा रु. 0·82, म्हणजे जवळजवळ दुप्पट, होता (गुलाटी व कालरा, 1 92). वायूच्या परिव्ययाची सरासरीसुद्धा अशीच वेगवेगळी होती. 1,000 SM³ ( Standard Cubic Metre ) इतक्या वायूच्या परिव्ययाचा विस्तार ( range ) रु. 301 ते रु. 2,068 होता. हिन्दुस्थान फर्टिलायझर कॉर्पोरेशन व नामरूप यांचा वायूचा ( 1000 SM³ ) परिव्यय रु. 267, इफ्को व कलोलचा रु. 342, राष्ट्रीय केमिकल फर्टिलायझर युनिट– 5 चा रु. 1,791 आणि युनिट– 2 चा रु. 1,637 होता.

नाफ्त्याचा दर टनाच्या परिव्ययाचा विस्तार रु. 2,048 ते रु. 2,332 इतका होता. नाफ्ता वायू, तेल, कोळसा या सर्वांच्या किमती केन्द्र सरकार निर्धारित करीत असते. त्यामुळे खताच्या अर्थसाहाय्याला 'कृषी अर्थसाहाय्य' कसे म्हणावयाचे हा खरा प्रश्न आहे. वरील वस्तूंच्या सवलतीच्या दराने किमती निर्धारित करणे हा निव्वळ कृषी अर्थशास्त्राशी संबंधित विषय नाही तर समष्टीय चलांशी त्याचा अधिक संबंध येतो. 1991 साली खत उद्योगाला पुरविलेल्या नाफ्त्याची सवलतीची किमत दर टनाला रु. 2,725 होती. त्याचवर्षी त्याची बाजारातील किमत प्रतिटनाला रु. 4,415 होती. म्हणजे खत उद्योगाला नाफ्त्याचा पुरवठा 38 टक्के कमी दराने केला होता. या सवलती 1980 पासून मिळत होत्या. पण एकंदरित नाफ्त्याचा आणि इंधन तेलाचा सवलतीच्या दराने झालेला पुरवठा अर्धा टक्क्याच्या आसपास होता ( तक्ता 9 ). एवढ्या सवलती देऊनसुद्धा खत उत्पादनाचा परिव्यय वाढतच

तक्ता 9

**खत उत्पादनासाठी आणि बिगर खत उत्पादनासाठी वापरल्या जाणाऱ्या नाफ्ता व इंधन तेलाच्या किमती ( मुंबईस्थित साठा )**

( रुपये / प्रतिटन )

| तारीख | नाफ्त्याचे दर | | | इंधन तेलाचे दर | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | खतासाठी | बिगर खतासाठी | प्रमाण | खतासाठी | बिगर खतासाठी | प्रमाण |
| 1– 3–1975 | 586 | 1,000 | 0·59 | उ. ना. | 683 | – |
| 14– 7–1975 | 586 | 1,012 | 0·58 | उ. ना. | 763 | – |
| 1–12–1975 | 596 | 1,012 | 0·59 | उ. ना. | 883 | – |
| 1– 3–1978 | 596 | 1,012 | 0·59 | उ. ना. | 889 | – |
| 17– 7–1979 | 596 | 2,482 | 0·24 | 829 | 1,209 | 0·69 |
| 8– 6–1980 | 1,071 | 2,692 | 0·40 | 829 | 1,859 | 0·45 |
| 31– 1–1981 | 1,380 | 2,800 | 0·49 | 1,040 | 2,190 | 0·47 |
| 18– 3–1983 | 1,723 | 2,792 | 0·62 | 1,274 | 2,524 | 0·50 |
| 17– 3–1985 | 1,982 | 3,211 | 0·62 | 1,320 | 2,903 | 0·45 |
| 20– 3–1987 | 1,912 | 3,211 | 0·60 | 1,320 | 2,903 | 0·45 |
| 28– 8–1991 | 2,725 | 4,415 | 0·62 | 1,815 | 3,992 | 0·45 |

टीप : * (1) 17–7–1979 पूर्वी इंधन तेलाची खतासाठी म्हणून वेगळी किंमत नव्हती.
(2) वायूची खतासाठी म्हणून वेगळी किंमत नाही.
(3) प्रमाण = खतासाठी ÷ बिगर खतासाठी.

स्रोत : (1) Fertiliser statistics, 1989-90.
(2) Economic Times July 25, 1981.
(3) अशोक गुलाटी व जी. डी. कालरा ( 1992 ).

तक्ता 8

पीक–खत–किंमत प्रमाण ( नियंत्रित व खुल्या दराने)

| व्यापाराचे स्वरुप | पीक व खत | 1981–82 | 1982–83 | 1983–84 | 1984–85 | 1985–86 | 1986–87 | 1981–82 ते 1986–87 सरासरी | N P K चे भार |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| खुला व्यापार | **भाताच्या किमतीचे प्रमाण** | | | | | | | | |
| | N | 0·64 | 0·47 | 0·58 | 0·47 | 0·42 | 0·60 | 0·53 | 0·71 |
| | P | 0·79 | 0·55 | 0·64 | 0·55 | 0·53 | 0·52 | 0·60 | 0·23 |
| | K | 1·01 | 1·11 | 1·22 | 1·10 | 0·95 | 1·03 | 1·07 | 0·06 |
| | भारांकित किंमत | 0·70 | 0·53 | 0·63 | 0·53 | 0·48 | 0·61 | 0·58 | |
| नियंत्रित व्यापार | **भाताच्या किमतीचे प्रमाण** | | | | | | | | |
| | N | 0·37 | 0·39 | 0·46 | 0·48 | 0·50 | 0·47 | 0·44 | 0·71 |
| | P | 0·32 | 0·34 | 0·39 | 0·41 | 0·42 | 0·41 | 0·38 | 0·23 |
| | K | 0·87 | 0·92 | 1·07 | 1·12 | 1·16 | 1·10 | 1·04 | 0·06 |
| | भारांकित किंमत | 0·39 | 0·41 | 0·48 | 0·50 | 0·52 | 0·49 | 0·46 | |
| खुला व्यापार | **गव्हाच्या किमतीचे प्रमाण** | | | | | | | | |
| | N | 0·31 | 0·30 | 0·34 | 0·30 | 0·29 | 0·36 | 0·32 | 0·73 |
| | P | 0·38 | 0·35 | 0·38 | 0·35 | 0·37 | 0·31 | 0·36 | 0·22 |
| | K | 0·48 | 0·71 | 0·72 | 0·70 | 0·67 | 0·61 | 0·65 | 0·05 |
| | भारांकित किंमत | 0·33 | 0·33 | 0·37 | 0·33 | 0·33 | 0·36 | 0·34 | |
| नियंत्रित व्यापार | **गव्हाच्या किमतीचे प्रमाण** | | | | | | | | |
| | N | 0·25 | 0·28 | 0·32 | 0·32 | 0·34 | 0·32 | 0·30 | 0·73 |
| | P | 0·22 | 0·24 | 0·28 | 0·28 | 0·29 | 0·28 | 0·26 | 0·22 |
| | K | 0·60 | 0·65 | 0·75 | 0·76 | 0·78 | 0·75 | 0·71 | 0·05 |
| | भारांकित किंमत | 0·26 | 0·29 | 0·33 | 0·33 | 0·35 | 0·33 | 0·31 | |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| खुला व्यापार | **कापसाच्या (बियाणाचे) किमतीचे प्रमाण** | | | | | | | | |
| | N | 0·94 | 1·10 | 1·70 | 1·16 | 0·84 | 1·41 | 1·19 | 0·69 |
| | P | 1·17 | 1·27 | 1·89 | 1·35 | 1·06 | 1·20 | 1·32 | 0·23 |
| | K | 1·49 | 2·58 | 3·57 | 2·69 | 1·91 | 2·40 | 2·44 | 0·08 |
| | भारांकित किंमत | 1·04 | 1·26 | 1·89 | 1·33 | 0·98 | 1·44 | 1·32 | |
| नियंत्रित व्यापार | **कापसाच्या (बियाणाचे) किमतीचे प्रमाण** | | | | | | | | |
| | N | 1·0 | 0·98 | 1·31 | 1·20 | 1·09 | 1·13 | 1·12 | 0·69 |
| | P | 0·87 | 0·86 | 1·12 | 1·03 | 0·93 | 0·99 | 0·47 | 0·23 |
| | K | 2·35 | 2·32 | 3·05 | 2·81 | 2·55 | 2·66 | 2·62 | 0·08 |
| | भारांकित किंमत | 1·08 | 1·06 | 1·40 | 1·29 | 1·17 | 1·22 | 1·20 | |

**स्रोत** : अशोक गुलाटी (1990).

राहिला ही विशेष बाब आहे. फक्त वायूच्या किमती अलीकडे वाढल्या, त्यामुळे वायूवर आधारलेल्या व्यवसाय संस्था नाराज आहेत. इतर राष्ट्रांच्या तुलनेने भारताचा नाफ्ता व वायू उत्पादनाचा परिव्यय जास्त आहे. संयुक्त अरब अमिराती (UAE) व सौदी अरेबिया या देशांमध्ये नाफ्ता व वायू उत्पादन परिव्यय 30 सेंट आहे, अमेरिकेत एक डॉलरच्या आसपास आहे तर भारतात 4 डॉलर आहे ( जी. व्ही. के राव समिती, 1987 ). खतासाठी वापरावयाच्या नाफ्त्याच्या किमतीचे प्रमाण वाढते आहे तर इंधन तेलाचे प्रमाण घटते आहे. पैशातील अर्थसाहाय्याबरोबरच वस्तूरूपाने मिळणारे अर्थसाहाय्यही लक्षात घेतले पाहिजे. निविष्टींचा पुरवठा कमी दराने करूनसुद्धा खत उत्पादनाचा परिव्यय वाढतच गेला. 1992 साली पेट्रोलजन्य पदार्थांच्या आणि वायू व नाफ्त्याच्या किमती वाढविण्यात आल्या. 1996 च्या अर्थसंकल्पपूर्व परिस्थितीतही पेट्रोलजन्य पदार्थांच्या आणि वायूच्या किमती वाढविण्यात आल्या. उत्पादनाच्या किमती आंतरराष्ट्रीय पातळीवर आणण्यासाठी किंमत वाढ केली असा सरकार दावा करते. शिवाय उत्पादन, वितरणाचा परिव्ययदेखील वाढला आहे, त्यामुळे निविष्टींसाठी सवलती देणे सरकारला न परवडणारे झाले आहे.

आयात खतावर दिल्या जाणाऱ्या अर्थसाहाय्यामध्ये अनेक घोटाळे आहेत. आयातीचे आणि वितरणाचे हक्क कंत्राटी पद्धतीने दिलेले असतात. खतांच्या आयातीचे आणि वितरणाचे कंत्राट मिनरल्स अँन्ड मेटल्स ट्रेडिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया ( MMTC ) या कंपनीकडे दिलेले आहे. आयात किंमत वगळता इतर सर्व परिव्यय वितरक करीत असतात. हा परिव्यय नेहमी जास्त दाखवून अधिक अर्थसाहाय्य मिळविण्याचा प्रयत्न होतो. 1981 ते 1986 या कालखंडात MMTC ने आयात केलेल्या खतांचा इतर परिव्यय व वाहतूक खर्च प्रतिटन युरियासाठी रु. 957 आणि डी. ए. पी. साठी रु. 1,163 इतका दाखविलेला होता. वितरकाचा गाळा युरियासाठी सर्वात जास्त, म्हणजे प्रतिटन रु. 130 आणि डी. ए. पी. साठी सर्वात जास्त, म्हणजे रु. 190 प्रतिटन दाखविलेला होता. यावरून हाताळणीचा परिव्यय व गाळा यांचे प्रमाण युरियासाठी 40 टक्के आणि डी. ए. पी. साठी 51 टक्के असे होते. हे दर बाजार दरांपेक्षा खूप जास्त होते. याशिवाय आयात खतांच्या विक्रीचा परिव्यय देशांतर्गत खतांच्या तुलनेने 1980–81 साली 34 टक्क्यांनी आणि 1982–83 साली 21 टक्क्यांनी जास्त होता (गुलाटी व कालरा, 1992). हे सरकारच्या लक्षात आणून दिल्यावर 1986–87 पासून सरकारने टेंडर पद्धतीचा स्वीकार केला आहे.

तक्ता 10 थोडा तपशीलवार अभ्यासल्यास अनेक

**तक्ता 10**

**अर्थसाहाय्यामधील शेतकऱ्यांचा हिस्सा**

| वर्ष | NPK साठी आर्थिक अर्थसाहाय्य (दशलक्ष रुपये) | अर्थ–संकल्पातील अर्थसाहाय्य (दशलक्ष रुपये) | शेतकऱ्यांचा हिस्सा (टक्के) (1 ÷ 2) |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1981–82 | 219·27 | 375 | 58·47 |
| 1982–83 | 66·25 | 605 | 10·95 |
| 1983–84 | 180·38 | 1,042 | 17·31 |
| 1984–85 | 1,137·66 | 1,927 | 59·04 |
| 1985–86 | 1,462·37 | 1,923 | 76·07 |
| 1986–87 | –65·52 | 1,897 | –3·45 |
| 1987–88 | 512·22 | 2,164 | 23·67 |
| 1988–89 | 1,777 69 | 3,250 | 54·70 |
| 1989–90 | 2,723·13 | 3,651 | 74·59 |
| 1981–82 ते 1989–90 ची सरासरी | 891·98 | 1,870·44 | 47·69 |

**टीप :** (1) 1981–82 ते 1983–84 आणि 1986–87 सालामध्ये पोटॅशवरचे अर्थसाहाय्य 439·51 दशलक्ष रुपयांनी उणे होते.

(2) 1986–87 मध्ये डि. ए. पी. साठीचे अर्थसाहाय्य 61·50 दशलक्ष रुपयांनी उणे होते.

(3) NPK साठी आर्थिक अर्थसाहाय्य हे आयात केलेले खत शेतावर पोहोचविण्यासाठी आयात किमतीसह येणारा परिव्यय आणि देशांतर्गत खताची किंमत यातील फरक X उपभोग या सूत्राने मोजले आहे.

**स्रोत :** अशोक गुलाटी ( 1990 ).

गोष्टी स्पष्ट होतात. NPK खतांच्या [युरिया 46 टक्के, नायट्रोजन (N), डाय–अमोनियम सल्फेट 18–46–0 आणि पोटॅश 60 टक्के $K_2O$ ] एक टन वजनाच्या आधारे अर्थसाहाय्य मोजले जाते. 1981 ते 1989 अखेरपर्यंत सुमारे 48 टक्के अर्थसाहाय्य प्रत्यक्ष शेतकऱ्यांपर्यंत पोहोचले. तथापि या टक्केवारीमध्ये बरेच चढउतार आहेत. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे विनिमय दरातील अस्थिरता. सन 1981 ते 1983–84 आणि 1986–87 मध्ये डी. ए. पी. साठीचे अर्थसाहाय्य उणे होते; 1986–87 मध्ये युरियावरचे अर्थसाहाय्यदेखील उणे होते.

सन 1981–82 ते 1983–84 या कालात शेतकऱ्यांना मिळणारे अर्थसाहाय्य खूपच कमी झाले. त्यानंतरच्या दोन वर्षांत शेतकऱ्यांना मिळणाऱ्या अर्थसाहाय्याचे प्रमाण वाढले; 1986–87 साली ते 3·45 टक्क्यांनी उणे झाले.

ज्या कंपन्यांना आयात खताच्या वितरणात कंत्राट मिळाले त्या सर्व कंपन्यांचा हाताळणीचा परिव्यय वेगवेगळा आहे आणि तो सरकारने मान्य केला आहे. शिवाय डी. ए. पी. व पोटॅश या प्रकारच्या खतांसाठी वेगवेगळा हाताळणी परिव्यय मान्य केला आहे. 1983–84 पर्यंत सर्व प्रकारच्या खतांचा हाताळणी परिव्यय एकसारखा होता. त्या वर्षापर्यंत इंडिया पोटॅश, एस. पी. आय. सी., एम. सी. एफ., एच. सी. एफ. व आर. सी. एफ. या कंपन्या खत वितरण करीत होत्या. त्यामध्ये 1986-87 पर्यंत आणखी 7 कंपन्यांची भर पडली. 1 एप्रिल, 1986 पासून टेंडर पद्धती अस्तित्वात आली. या पद्धतीतही संगनमताने निविदा भरल्या जातात आणि प्रत्येकाच्या सोयीनुसार कामाची वाटणी होत असते.

खत उपभोगाच्या वर्गवारीनुसार असे दिसते की (N C A E R. 1988–89), एकंदर खत उपभोगापैकी अत्यल्प व अल्प भूधारकांचा हिस्सा 33·94 टक्के आहे तर मध्यम व मोठ्या शेतकऱ्यांचा हिस्सा 66·06 टक्के आहे. यावरून शेतकऱ्यांना मिळणाऱ्या अर्थसाहाय्याचा बराचसा हिस्सा मोठ्या शेतकऱ्यांकडे गेला हे स्पष्ट आहे. यातूनच सहजपणे निघणारा तार्किक निष्कर्ष म्हणजे अर्थसाहाय्याचा कमी हिस्सा शेतकऱ्यांच्या मोठ्या संख्येमध्ये (75·67 टक्के) विभागला गेला तर बराच मोठा हिस्सा संख्येने कमी असणाऱ्या बड्या शेतकऱ्यांना (24·33 टक्के) मिळाला हे स्पष्ट आहे.

भारतीय शेतीसाठी N, $P_2O_5$, व $K_2O$ चे प्रमाणित उपभोगाचे प्रमाण 4 : 2 : 1 असे आहे. पण प्रत्यक्षात खत वितरित केलेले प्रमाण 1990–91 साली 6 : 2·4 : 1 असे होते, तर 1993–94 मध्ये खत उपभोगाचे प्रमाण 9·6 : 2·9 : 1 होते. तात्पर्य, नायट्रोजनचे वितरण प्रमाण गरजेपेक्षा 1990–91 साली दोनने आणि खत उपभोगाचे प्रमाण 1993–94 साली 5 6 ने वाढले. त्यामुळे शेतीचा कस बिघडून शेतजमिनीची उत्पादकता कालांतराने कमी होणार हे स्पष्ट आहे.

पिकानुसार खतांच्या वापराचे प्रमाण गरजेपेक्षा खूपच जास्त आहे. उदाहरणार्थ, पंजाबसारख्या राज्यामध्ये भात पिकासाठी दर हेक्टरी 90 ते 120 किलोग्रॅमपर्यंत नायट्रोजन लागते, पण प्रत्यक्षात इ. स. 1993–94 मध्ये त्या राज्यात दरहेक्टरी 126·2 किलोग्रॅम नायट्रोजनचा वापर झाला. या पार्श्वभूमीवर युरियासाठी अर्थसाहाय्य कमी करणे गरजेचे वाटते. उपलब्ध खतांपैकी भात, गहू व ऊस या पिकांना जास्त रासायनिक खते वापरली गेली.

राज्यनिहाय अर्थसाहाय्याचे वितरणही विषम आहे. ज्या राज्यांचा खतांचा उपभोग अधिक आहे त्या राज्यांना खतासाठीच्या अर्थसाहाय्याचा हिस्सा अधिक मिळणे साहजिक आहे. उत्तर–पूर्व राज्ये, ओरिसा, आसाम, हिमाचल प्रदेश, केरळ, जम्मू व काश्मीर या राज्यांचा रासायनिक खतांचा उपभोग खूप कमी आहे. उत्तर प्रदेश, आंध्र प्रदेश, तामीळ नाडू, महाराष्ट्र, पंजाब व हरियाणा राज्यांचा उपभोग जास्त आहे. सर्व प्रकारच्या अर्थसाहाय्याच्या वितरणातील न्यायासंबंधीचे विश्लेषण मुंडले व राव (1991) यांच्या अभ्यासामध्ये केलेले आहे.

खताबरोबर मिळणाऱ्या इतर प्रकारच्या अर्थसाहाय्यामुळे (वीज, जलसिंचन, इत्यादी) शेती क्षेत्रावर वेगळ्या पद्धतीचे अरिष्ट येण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर अर्थसाहाय्य हे जरी महत्त्वाचे आणि

आवश्यक असले तरी त्याच्या वितरण पद्धतीमध्ये बदल केले पाहिजेत हे उघड आहे. संयुक्त संसदीय समितीच्या (प्रतापराव भोसले समिती, 1992) शिफारशीनुसार खत किमतविषयक नवे धोरण ऑक्टोबर 1992 मध्ये केन्द्र सरकारने जाहीर केले. त्याच पद्धतीचे नवे खत व किमतविषयक धोरण सध्याच्या देवेगौडा सरकारने जाहीर केले आहे.

## 8

## उपसंहार

सध्या दिले जाणारे अर्थसाहाय्य कारखान्यातून प्रत्यक्ष खत बाहेर पडल्यानंतर दिले जावे आणि हे अर्थसाहाय्य राज्य सरकारमार्फत वितरित केले जावे असे धोरण मध्यंतरी जाहीर झाले होते. दिले जाणारे अर्थसाहाय्य शेतकऱ्यांपर्यंत पोहोचावे ही सरकारची भूमिका आहे. परंतु सध्याची वितरण पद्धती सदोष असल्यामुळे सामाजिक न्यायाच्या भूमिकेतून तयार केलेली अर्थसाहाय्याची योजना काही थोड्या लोकांचेच खिसे भरणारी आहे. अर्थसाहाय्याच्या अर्थकारणापेक्षा त्यातले राजकारण अधिक प्रभावी आहे. शेतकऱ्यांच्या आणि शेती क्षेत्राच्या स्वयंपोषणक्षम विकासाच्या दृष्टीने आवश्यक अशी पर्यायी नीती शोधून काढावी लागेल हेच यातून सूचित होते.

### संदर्भ टीपा

[टीप : या लेखासाठी अशोक गुलाटी (NCAER) यांनी केलेल्या मार्गदर्शन व शंका निरसनाबद्दल लेखक त्यांचा आभारी आहे ]


1 Kutty, Thomas K , ' Fetilizer Issues in Pricing and Subsidising, ECONOMIC TIMES, 7-11-1990.

2 ' Mid-week Review on Fertilizer Industry,' ECONOMIC TIMES, 22-3-1990.

3 ' Mid-week Review on Budgetary Policy,' ECONOMIC TIMES, 19-4-1990.

4 Shirohi, A. S. ( 1985 ), ' Impact of Agricultural Subsidies and Procurement Prices on Production and Income Distribution in India', Presidential Speech, ISAE, 7-1-1985.

5 Sahod, G. S., ' Fertilizer Must not be Subsidised', FINANCIAL EXPRESS, 1-9-1991.

6 Gulati, Ashok (1989), ' Input Subsidies in Indian Agriculture : Statewise Analysis', ECONOMIC AND POLITICAL WEEKLY, 24-6-1989.

7 Gulati, Ashok and Sharma, A. N. (1992), ' Subsidising Agriculture : A Crosscountry Review,' ECONOMIC AND POLITICAL WEEKLY, 26-9-1992.

8 Gulati, Ashok and Kalra, G. D. (1992), ' Fertilizer Subsidy : Issues Related to Equity and Efficiency,' ECONOMIC AND POLITICAL WEEKLY, 28-3-1992.

9 Gul ti, Ashok (1990), ' Fertilizer Subsidy : Is the Cultivator Net Subsidised?' INDIAN JOURNAL OF AGRICULTURAL ECONOMICS, Vol. XLV, No 1, Jan-Mar. 1990.

10 Gulati, Ashok and Sharma, Anil (1995), ' Subsidy Syndrome in Indian Agriculture,' ECONOMIC AND POLITICAL WEEKLY, 30-9-1995.

11 Bhosale, Prataprao (1992), JOINT PARLIAMENTARY COMMITTEE REPORT, Government of India.

12 Bhatty I. Z. and Pal, S. D , ' Food and Fertilizer : Reducing Subsidies - I & II ', ECONOMIC TIMES, 12 and 13 March, 1991.

13 Lakshaman Rao, H. K., ' Forecasting Fertilizer Consumption ', ECONOMIC TIMES, 23-3-1989.

14 ____(1992), ' Fertilizers : Irrational

Practices,' ECONOMIC AND POLITICAL WEEKLY, 15-2-1992.

15 'Fertilizer Productivity 'COMMERCE ( Special Issue ), 25-12-1982.

16 'Fertilizer Industry : A Survey', COMMERCE, 22-12-1983.

17 Mundle, Sudipto and Govindrao, M. (1991), 'Volume and Composition of Government Subsidies in India, 1987-88', ECONOMIC AND POLITICAL WEEKLY, 4-5-1991.

18 Krissof, Sullivan Bary John, Waino, John and Johnston, Brain (1990), AGRICULTURAL TRADE LIBERALISATION AND DEVELOPING COUNTRIES, USDA Staff Report No. 9042.

19 Roningen Vernen O. and Dixit, Praveen M. (1989), ECONOMIC IMPLICATIONS OF AGRICULTURAL POLICY REFORMS IN INDUSTRIAL MARKET ECONOMIES, USDA Staff Repert, AGES, 89-36.

20 Das, Debendra (1992), STRUCTURAL ADJUSTMENT IN INDIAN ECONOMY, Deep & Deep Publications, New Delhi.

21 Binswanger, Hans P. and Scandizzo, Pasquale L. (1984), 'Pattern of Agricultural Protection', Paper presented in the Silver Jubilee National Seminar, Institute of Economic Growth, New Delhi.

22 National Bureau of Economic Research (1976), FOREIGN TRADE REGIMES AND ECONOMIC DEVELOPMENT.

23 Jugale, V. B. (1991), THEORIES OF AGRICULTURAL FINANCE, Atlantic Publishers & Distributors, New Delhi.

24 ____(1992), CO-OPERATIVE CREDIT IN INDIAN AGRICULTURE : ITS SOCIO-ECONOMIC AND TECHNOLOGICAL IMPACT, Mittal Publications, New Delhi.

25 Madhav Rao, K. and Subbarao, 'The Hidden Side of Subsidy', ECONOMIC TIMES, 8-7-1996.

26 'Subsidy Bonanza to get Industry Back on its Feet', ECONOMIC TIMES, 18-7-1996.

27 'Industry Watch : Fertilizer', ECONOMIC TIMES, 6-3-1996.

28 Acharya, Sarathi (1992), 'Rate of Return in Indian Agriculture', ECONOMIC AND POLITICAL WEEKLY, 18-1-1992.

29 Government of India (1986), AGRICULTURAL PRICE POLICY : A LONG-TERM PERSPECTIVE, Ministry of Agriculture.

30 ____(1988), INDIA : EFFECTIVE INCENTIVES FOR AGRICULTURE, The World Bank, New Delhi.

31 ____(1992), NEW FERTILIZER PRICE POLICY, DAVP New Delhi.

32 ____(1992), AGRICULTURAL WELFARE, DAVP, New Delhi.

33 जुगळे, वसंत (1993), **सबसिडीचे अर्थशास्त्र,** समाजवादी प्रबोधिनी, इचलकरंजी.

34 ____(1994) **शेती विकासाच्या समस्या,** समाजवादी प्रबोधिनी, इचलकरंजी.

35 मराठे समितीचा अहवाल.

36 Pratap, K. V., 'Fertilizer Subsidies : Facts and Myths', FINANCIAL EXPress, 13-9-1991.

37 Deshpande, R. S. and Reddy, Ratna, 'Are they Dispensable? - I', ECONOMIC TIMES, 7-1-1992.

□ □

# आर्थिक वार्ता

सु. गो. भानुशाली *

## 1

### मतदानाचा हक्क नसलेले भाग

26 जुलै, 1996 रोजी लोकसभेत अर्थसंकल्प सादर करताना वित्तमंत्र्यांनी व्यवसाय संस्थांना पुरेशा प्रमाणात भांडवल गोळा करता यावे म्हणून भाग–धारकांना मतदानाचा हक्क नसलेले भाग (non-voting shares) विक्रीला काढण्याची अनुमती दिली. 1956 च्या कंपनी कायद्याच्या 80, 85 आणि 87 (2) कलमान्वये व्यवसाय संस्थेला अधिमान भाग (preference shares) आणि समभाग (equity shares) विक्रीला काढता येतात. भागधारकांमध्ये असा फरक राहू नये म्हणून अधिमान भाग हळूहळू कमी करण्यात आले. कलम 87 (1) अन्वये समभाग धारकांना व्यवसाय संस्थेच्या सर्व प्रकारच्या प्रस्तावांवर मतदान करण्याचा अधिकार असतो. पण कलम 87 (2) प्रमाणे अधिमान भागधारकांना त्यांच्या अधिकाराशी प्रत्यक्षात संबंध असलेल्या प्रस्तावांवरच मतदान करता येते. कलम 87 (1) मधील तरतुदीमुळे व्यवसाय संस्थांना भागभांडवल पुरविणाऱ्या भारतीय औद्योगिक विकास बँकेसारख्या वित्तीय संस्थांना मतदानाचा अधिकार प्राप्त होतो. 1996–97 च्या वित्त विधेयकातील (finance bill) तरतुदीप्रमाणे परस्पर निधींना (mutual funds) असा मतदानाचा हक्क बहाल करण्यात आला. या मतदानाच्या हक्कामुळे भागधार–कांना व्यवसाय संस्थेच्या व्यवस्थापक मंडळावर वचक ठेवता येतो. त्यादृष्टीने विविध प्रकारचे भागधारक असणे अहितकारक ठरते.

असे असूनसुद्धा वित्तमंत्र्यांनी वित्त विधेयकाद्वारे व्यवसाय संस्थांना मतदानाचा हक्क नसलेले भाग विक्रीला काढण्याची अनुमती दिली आहे. गेल्या चार वर्षांत व्यवसाय संस्थांच्या व्यवस्थापकांना भागधार–कांच्या रेट्यामुळे आपले निर्णय / प्रस्ताव मागे घ्यावे लागले होते अथवा त्यात बदल करावे लागले होते.

* साहाय्यक संपादक, 'अर्थसंवाद', कोल्हापूर.

त्यामुळे मतदानाचा हक्क नसलेले भाग विक्रीला काढ-ण्याची अनुमती मिळावी म्हणून उपक्रमी आणि त्यांच्या प्रतिनिधी संस्था प्रयत्न करीत होत्या आणि वित्त मंत्र्यांबरोबरच्या अर्थसंकल्पपूर्व बैठकीत आग्रहाने प्रति-पादन करीत होत्या.

वास्तविक पाहता सुरेश नाडकर्णी 'सेबी'चे अध्यक्ष असताना त्या संस्थेने व्यवसाय संस्थांना मतदा-नाचा हक्क नसलेले भाग विक्रीला काढण्याची अनुमती देण्याची वित्त मंत्रालयाला शिफारस केली होती. व्यवसाय संस्थांना त्यांच्या भागभांडवलाच्या 25 टक्के भागभांडवल अशा प्रकारच्या भागांच्या विक्रीतून उभारू द्यावे आणि हे भाग लोकप्रिय करण्याच्या दृष्टीने त्यावर साधारणपणे दोन टक्के अधिक लाभांश देण्याची मुभा द्यावी अशी शिफारस केली होती. सावधगिरीची सूचना म्हणून 'सेबी'ने असेही मांडले होते की, एखादी व्यव-साय संस्था सलग दोन वर्षे लाभांश देऊ न शकल्यास भागधारकांना मतदानाचा दर्जा आपोआप प्राप्त होऊन व्यवसाय संस्थेच्या कारभारासंदर्भात त्यांना आपले म्हणणे मांडता येईल.

मतदानाचा अधिकार नसलेले भाग विक्रीस काढण्यास व्यवसाय संस्था उत्साह दाखवीत असल्या तरी भाग बाजार आणि गुंतवणूकदारांमध्ये तसा उत्साह दिसून येत नाही. वित्तीय संस्था, गुंतवणूक संस्था, पर-स्पर निधी आपला मतदानाचा हक्क सोडून नवीन प्रकारचे भाग विकत घेण्याची शक्यता नाही. विदेशी गुंतवणूक संस्थासुद्धा या भागांमध्ये भांडवल गुंतविण्याला अनुकूल नाहीत. गुरुवार, दिनांक 22 ऑगस्ट, 1996 रोजी वित्तमंत्र्यांबरोबर भांडवल बाजार प्रतिनिधींच्या झालेल्या बैठकीत हे स्पष्ट करण्यात आले आहे. अधिक लाभांशाच्या अपेक्षेने सर्वसाधारण गुंतवणूकदार कदा-चित या भागांमध्ये गुंतवणूक करतील. पण तेही होण्याची फारशी शक्यता नाही. व्यवसाय संस्थांच्या वार्षिक सर्व-साधारण सभेला गर्दी करणाऱ्या व्यक्तिगत गुंतवणूक-दारांच्या संख्येवरून हे भागधारक आपल्या मतांच्या हक्काबद्दल किती जागरूक आहेत ते दिसून येते.

भांडवल बाजारातील जाणकारांचे मत असे आहे की, मतदानाचा हक्क नसलेले भाग विकण्यासाठी भाग बाजारावर खूप दबाव आणण्यात येईल. मतदानाचा हक्क नसलेले भाग विकले जावेत म्हणून सर्वसाधारण भागांच्या भाग बाजारातील किमती आणखी खालच्या पातळीवर आणल्या जातील आणि अशा कमी किमतीला सर्वसाधारण भाग विकत घेण्याची संधी विदेशी संस्थात्मक गुंतवणूकदार हातची जाऊ देणार नाहीत.

मतदानाचा हक्क नसलेल्या भागांचे खुल्या बाजा-रात फारसे स्वागत होण्याची शक्यता नसल्यामुळे असे भाग हक्क भाग ( rights issue ) म्हणून बाजारात आणले जाण्याची शक्यता असली तरी त्यांना मिळणारा प्रतिसाद अल्प असेल. प्राथमिक बाजारातील गुंतवणूक परिस्थिती उत्साहजनक नसली तरी सर्वसाधारण भाग आणि हक्कभाग विक्री आपले लक्ष्य ओलांडताना दिस-तात. त्यावरून काही जाणकारांचा अंदाज असा आहे की, मतदानाचा हक्क नसलेले भाग प्राथमिक बाजारात आल्याआल्या गुंतवणूकदारांच्या त्यांच्यावर उड्या पड-तील. त्याचबरोबर हेही लक्षात घेतले पाहिजे की, प्राथमिक बाजारातील भाग विक्रीच्या हमीचे (under-writing) प्रमाण घटत चालले आहे. 1991–92 मध्ये विक्रीस आलेल्या 196 भाग प्रस्तावांपैकी 185 प्रस्तावांत (94·39 टक्के) हमी स्वीकारण्यात आली होती. 1992–93 मध्ये 528 पैकी 518 प्रस्तावांत (98·11 टक्के) हमी घेण्यात आली होती. 1995-96 मध्ये 1,428 प्रस्तावांपैकी 440 प्रस्तावांत (30·81 टक्के) हमी स्वीकारण्यात आली होती. एप्रिल–जुलै 1996 या चार महिन्यांत हमी घेतलेल्या भाग विक्री प्रस्तावांचे प्रमाण फक्त 12 टक्के होते. या विश्लेषणा-वरून असे स्पष्ट होते की, प्राथमिक भाग बाजारात गुंतवणूकदार सक्रीय आहेत त्यामुळे भाग विक्री कर-णाऱ्या व्यवसाय संस्था हमी स्वीकारून हमी देणाऱ्या संस्थांना अडत ( commission ) देण्यास तयार नाहीत.

महत्त्वाचा मुद्दा हा की, मतदानाचा हक्क नस-लेले भाग बाजारात येणे ही बाब व्यवसाय संस्था जग-तातील लोकशाहीवर आघात करणारी ठरेल. त्यामुळे व्यवसाय संस्थांची भागधारकांप्रती असलेली जबाबदारी ( accountability ) कमी होईल. व्यवसाय संस्थांचे व्यवस्थापन मात्र आपल्या सुरक्षिततेसाठी मतदानाचा हक्क नसलेले भाग विक्रीला काढण्यावर भर देतील.

मुख्य समस्या अशी आहे की, भारतीय भाग बाजार आपल्या पौगंडावस्थेतून बाहेर पडण्याची कोणतीही शक्यता नसताना अशा प्रकारची गुंतवणूक साधने बाजारात सादर करण्यासाठी ही योग्य वेळ आहे का?

## 2

## सार्वजनिक वितरण व्यवस्था आणि दारिद्र्यनिर्मूलन

संयुक्त आघाडी शासनाने 5 जून, 1996 रोजी स्वीकारलेल्या किमान सहमती कार्यक्रमात (1) प्रत्येक बेकाराला वर्षभरात किमान 100 दिवस रोजगाराची हमी, (2) दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांना सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील जीवनावश्यक वस्तूंचा निम्म्या दरात पुरवठा आणि (3) सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा लाभ यापुढे धनवंतांना नाही, अशी त्रिसूत्री योजना स्वीकारण्यात आली. या कार्यक्रमात काही नावीन्य नसले तरी त्यातून आंतरराष्ट्रीय नाणे निधीचे 'लक्ष्य गट' निर्धारित करून त्यांच्यापर्यंत पोहोचेल अशी व्यवस्था विकसित करण्याचे तत्त्व स्वीकारल्याचे दिसून येते. त्यासाठी देशभरात लागू होणारे अन्न धोरण, अन्न किंमत धोरण आणि दारिद्र्य रेषेखालील सर्वांना निम्म्या दरात जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करण्याचे समष्टीय धोरण (macro-level policy) आखून त्याची अमलबजावणी सुरू करण्यात येत आहे. रोजगाराची हमी आणि सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे पुनर्संघटीकरण (revamping) या दोन्ही गोष्टी करण्यात येणार असल्या तरी त्यामध्ये समन्वय साधण्याचे अथवा त्या परस्परपूरक करण्याचे शासनाने ठरविल्याचे दिसून येत नाही.

दारिद्र्यनिर्मूलन कार्यक्रमाचा एक भाग म्हणून सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे पुनर्संघटीकरण आणि एकात्मिक ग्रामीण विकास योजना यामध्येही समन्वय निर्माण करण्याची चर्चा शासकीय पातळीवर झाल्याचे दिसून येत नाही.

गरिबी, दारिद्र्य आणि कंगालपणा या घटत्या राहणीमानाच्या चढत्या पायऱ्या असल्या तरी त्यामधील फरक केवळ अंशात्मक नसून प्रकारात्मकही आहे. आपण आता विवेचनात गरिबी ही संकल्पना मागे टाकली असून दारिद्र्य या संकल्पनेपर्यंत पोहोचलो आहोत. वास्तविक पाहता दारिद्र्य ही संकल्पना बरीच अस्पष्ट आहे. दरडोई उत्पन्न, दरडोई उपभोग खर्च तसेच दरडोई अथवा कुटुंबाचे जिंदगी धारण करणे (asset holding) अशा वेगवेगळ्या निकषांवर दारिद्र्याचे मापन करण्याचे प्रयत्न झाले आहेत. यापैकी कोणत्याही पद्धतीने भारतासारख्या वैविध्य असलेल्या देशातील वेगवेगळ्या भौगोलिक विभागांतील, व्यक्तींमधील तसेच व्यवसायातील दारिद्र्याच्या स्थितीचे आकलन होत नाही. या सर्व दरिद्री लोकांजवळ 'श्रम' हीच एकमेव विक्रीक्षम जिंदगी असली तरी त्यामधील साधर्म्य येथेच संपते. लोकसंख्येतील विविध घटकांतील दारिद्र्य ठरविणारी पातळी वेगवेगळी असते हे सर्वज्ञात आहे. शिवाय तिला नागरी आणि ग्रामीण असे परिमाणही आहे. वेगवेगळ्या भूप्रदेशांतील नागरी तसेच ग्रामीण कुटुंबांच्या निर्वाहाच्या साधनांच्या आधारे त्यामधील फरक जाणून घेणे महत्त्वाचे ठरते. राष्ट्रीय नमुना सर्वेक्षणाच्या (NSS) त्रेचाळीसाव्या फेरीत ग्रामीण शेतमजूर, शेती प्रक्रियेतील स्वयंरोजगार असलेल्या व्यक्ती, इतर मजूर आणि इतर ग्रामीण कुटुंबे तसेच नागरी स्वयंरोजगार असलेल्या व्यक्ती, नियमित मजुरी/वेतन असलेल्या व्यक्ती, नैमित्तिक श्रमिक आणि इतर अशी विभागणी केलेली आहे. ती विचारात घेणे आवश्यक आहे. या पद्धतीने दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांची एकाच राज्यातील तसेच वेगवेगळ्या राज्यांतील केवळ संख्या व लोकसंख्येतील प्रमाणच वेगवेगळे असलेले दिसून येत नाही तर त्यांची दारिद्र्य रेषेची पातळीही वेगवेगळी असल्याचे आढळून येते. भारत सरकारने 1993 मध्ये स्थापन केलेल्या दारिद्र्य प्राक्कलनासाठीच्या तज्ज्ञ गटाने (Expert Group on Poverty Estimation) 1987–88 साठी महाराष्ट्रातील ग्रामीण आणि नागरी विभागांसाठी दारिद्र्य रेषा अनुक्रमे 115·61 रुपये आणि 184·45 रुपये तर पश्चिम बंगालमधील ग्रामीण आणि नागरी विभागासाठी अनुक्रमे 129·21 रुपये आणि 148·95 रुपये अशी सूचित केली होती.

वेगवेगळ्या राज्यांतील लोकसंख्येमधील दारिद्र्य रेषेखालील लोकांचे प्रमाणही वेगवेगळे असते. तज्ज्ञ गटाच्या अहवालाप्रमाणे ओरिसात 55·61 टक्के,

बिहारमध्ये 53·61 टक्के, महाराष्ट्रात 40·1 टक्के, केरळात 32·01 टक्के लोक दारिद्र्य रेषेखाली होते. दारिद्र्याचा आघात ग्रामीण भागात सर्वात जास्त प्रमाणात शेतमजुरांमध्ये (महाराष्ट्र 57·3 टक्के) व नागरी भागात नैमित्तिक श्रमिकांमध्ये (महाराष्ट्र 82·6 टक्के) असल्याचे दिसून येते. ग्रामीण भागात सर्वसाधारणपणे 50 टक्के शेतमजूर असल्याचे तर नागरी भागात 21 टक्के नैमित्तिक श्रमिक असल्याचे आढळून येते.

या विश्लेषणात आणखी एक परिमाण विचारात घ्यावयास हवे. बेकारी आणि दारिद्र्य यामधील संबंध सरळ नाही; त्यांची व्याप्ती परस्परव्यापी आहे किंवा नाही हा वादाचा मुद्दा आहे. अखिल भारतीय श्रम अर्थशास्त्र परिषदेच्या 1977 च्या अधिवेशनात अध्यक्षीय भाषणात डी. टी. लकडावाला यांनी दारिद्र्य आणि बेकारी यात संबंध नसल्याचे प्रतिपादन केले होते. राजकृष्ण यांनी 'Unemployment in India' या 'Economic and Political Weekly' (March 3, 1973) मध्ये प्रकाशित झालेल्या लेखात बेकार असणाऱ्या लोकांपेक्षा दारिद्र्यरेषेखाली असणाऱ्या लोकांचे प्रमाण जास्त असल्याचे विवेचन केले होते. याविरुद्ध प्रवीण विसारिया तसेच तेंडुलकर, एस. डी. के. सुंदरम आणि एल. आर. जैन यांनी व्यक्ती बेकार असलेल्या दिवसांची संख्या आणि दारिद्र्याचा आघात यामध्ये धन संबंध असल्याचे सिद्ध केले आहे.

या विश्लेषणावरून असे दिसून येते की, भारतातील दारिद्र्य ही घटना एकजिनसी नसून बहुजिनसी आहे. दारिद्र्य रेषेखालील लोकांच्या गरजा त्यामुळे वेगवेगळ्या आहेत. एकाच राज्यातील वेगवेगळ्या व्यवसायात असलेल्या गरिबांच्या गरजा तर वेगवेगळ्या आहेतच परंतु वेगवेगळ्या राज्यातील एकाच व्यवसायात असलेल्या गरिबांच्या गरजाही वेगवेगळ्या आहेत. ग्रामीण गरीब आणि नागरी गरीब यांच्या गरजांमध्ये केवळ स्थानपरत्वे अथवा व्यवसायपरत्वे भिन्नता येत नसून नागरी भागातील प्रदर्शनी परिणामामुळेही भिन्नता येते. या सर्वांसाठी एकजिनसी सार्वजनिक वितरण व्यवस्था आवश्यक वस्तूंचा पुरवठा करून दारिद्र्यनिर्मूलनाच्या कार्यक्रमात महत्त्वाचा वाटा उचलू शकेल का ?

सार्वजनिक वितरण व्यवस्था गेली 50 वर्षे अस्तित्वात आहे 4·35 लक्ष रास्त किंमत दुकानांमार्फत तिची कार्यवाही होते. असे असूनसुद्धा ती भारतात 40 टक्के लोकांपर्यंतसुद्धा पोहोचू शकली नाही. देशभर ही योजना राबविण्याच्या प्रयत्नांतून या व्यवस्थेत अंगभूत संरोध निर्माण झाले आहेत. लोकांनी धान्य कमी प्रमाणात विकत घेणे, धान्य खरेदीचे हक्क सोडून देणे रास्त किंमत दुकानांना होणारा धान्याचा अनियमित पुरवठा, दुहेरी किंमत व्यवस्थेमुळे धान्याचे साठे खुल्या बाजाराकडे वळविले जाणे, खोटी रेशन कार्डे असे अनेक दोष या व्यवस्थेत शिरले आहेत. असे असले तरी या व्यवस्थेने साधलेली उपलब्धी वाखवाणण्याजोगी आहे कार्यदक्ष स्थानिक स्वराज्य संस्था आणि सुशिक्षित तसेच जागरूक लोक असलेल्या तामिळ नाडू आणि आंध्र प्रदेशात सार्वजनिक वितरण व्यवस्था यशस्वी झालेली आहे सार्वजनिक वितरण व्यवस्थेमुळे निरनिराळ्या राज्यातील उपभोग पातळीतील तफावत कमी झाली आहे. ग्रामीण भागातील गरिबांपेक्षा नागरी भागातील गरिबांना या व्यवस्थेचा जास्त लाभ झाला आहे. ही व्यवस्था कार्यान्वित राहण्यासाठी केन्द्र सरकारला दरवर्षी 5,884 कोटी रुपये खर्च करावे लागत आहेत. असे असले तरी, या व्यवस्थेच्या समर्थकांना तसेच टीकाकारांना ही व्यवस्था चालू राहणे आवश्यक वाटते.

धान्य आणि जीवनावश्यक वस्तूंची प्रामुख्याने गरज असलेल्या लोकांना 'लक्ष्य' म्हणून निर्धारित करून लोकसंख्येतील दारिद्र्य रेषेखाली असलेल्या चाळीस टक्के लोकांवर सार्वजनिक वितरण व्यवस्था रोखण्याचा शासनाचा निर्णय किंमती स्थिर राखून लोकसंख्येच्या या घटकाला जीवनावश्यक वस्तू उपलब्ध करून देऊ शकत असला तरी त्यातून धान्य सुरक्षितता (food security) देऊ शकणार नाही. दारिद्र्य रेषेखालील लोकांना विशिष्ट रेशन कार्डे देऊन हे साध्य करता येईल अशी कल्पना आहे. प्रत्यक्षात देशात सार्वजनिक वितरण व्यवस्था फक्त 36 टक्के कुटुंबांपर्यंतच पोहोचलेली आहे. ही सर्वसाधारण सरासरी देशाच्या विविध भागांतील अशा कुटुंबांच्या प्रमाणातील असमानता स्पष्ट करीत नाही. सार्वजनिक वितरण व्यवस्था बिहारमध्ये फक्त पाच टक्के कुटुंबांपर्यंत पोहोचलेली आहे आणि तेथेच दारिद्र्य रेषेखालील

कुटुंबांचे प्रमाण 53·61 टक्के आहे. अशा कुटुंबांचे देशात सर्वात जास्त प्रमाण असलेल्या (55·61 टक्के) ओरिसांत ही व्यवस्था फक्त 6 टक्के लोकांपर्यंत तर उत्तर प्रदेशात 7 टक्के लोकांपर्यंत पोहोचलेली आहे. याविरुद्ध दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांचे प्रमाण केवळ 32·01 टक्के असलेल्या केरळात 80 टक्के कुटुंबांना सार्वजनिक वितरण व्यवस्था उपलब्ध आहे. तामिळ नाडूमध्ये 83 टक्के, कर्नाटकात 78 टक्के आणि आंध्र प्रदेशात 69 टक्के कुटुंबांपर्यंत सार्वजनिक वितरण व्यवस्था पोहोचली आहे.

धान्योत्पादनाच्या बाबतीत देश जरी स्वयंपूर्ण झाला असला तरी धान्यशेतीचा विकास असमान आहे. बिहार, आसाम, ओरिसा ही राज्ये धान्योत्पादनाच्या बाबतीत तुटीची राज्ये आहेत. सेंटर फॉर मॉनिटरिंग इंडियन इकॉनॉमी या संस्थेने अलीकडे प्रकाशित केलेल्या आकडेवारीवरून असे स्पष्ट होते की, गेल्या 25 वर्षांत देशातील धान्योत्पादन आणि दर हेक्टरी उत्पादन यात भरघोस वाढ झाली असली तरी ईशान्येकडील राज्ये या दोन्ही बाबतीत देशाच्या सरासरीच्या बरीच मागे आहेत. देशातील दरहेक्टरी सरासरी धान्योत्पादन 1,547 किलोग्रॅम (1994–95) पर्यंत वाढले असले तरी 1994–95 मध्ये आसाममध्ये दरहेक्टरी उत्पादन 1,310 किलोग्रॅम इतके होते. या राज्यात खतांचा दरहेक्टरी वापर 10·90 किलोग्रॅम इतकाच आहे. अरुणाचल प्रदेशात 1994–95 मधील दरहेक्टरी धान्योत्पादन केवळ 990 किलोग्रॅम इतके होते. इकॉनॉमिक टाइम्सच्या 24 ऑगस्ट, 1996 च्या अंकात आलेल्या बातमीप्रमाणे भारतीय अन्न महामंडळाला गेल्या वर्षीच्या 35·6 लक्ष टन गव्हाच्या खरेदीच्या पार्श्वभूमीवर 1 जुलै, 1996 पर्यंत फक्त 27 लक्ष टन गहू खरेदी करता आला. महामंडळाच्या अंदाजानुसार सार्वजनिक प्रापण संस्थांना (public procurement agencies) या हंगामात 12 लक्ष टन गव्हाची खरेदी करता येणे शक्य होते. प्रत्यक्षात खरेदीचा हंगाम संपत आला असताना ही खरेदी 8 लक्ष टन एवढीच होऊ शकली. हिमाचल प्रदेश आणि हरियाणामधील महामंडळांची गोदामे रिकामी असल्यामुळे खुल्या बाजारातील विक्रीसाठी गहू वितरित करता आला नाही. पंजाब शासनाने भारतीय अन्न महामंडळाला पंजाबमधील गहू तुटीच्या राज्यांकडे अथवा निर्यातीकडे वळविण्यास मनाई केली आहे.

राष्ट्रीय पातळीवर धान्याचे असलेले अतिरिक्त साठे बाजारात विकण्याची कल्पना अल्पकालावधीसाठी शक्य वाटत असली तरी महामंडळातर्फे असे साठे निर्माण करून धान्य सुरक्षितता निर्माण करण्याची संकल्पनाच दीर्घकालात मोडीत निघेल. धान्य तुटीच्या राज्यांचा तसेच सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा खूप विस्तार झालेल्या राज्यांचा असे अतिरिक्त साठे बाजारात विकण्याला विरोध आहे त्यांची भीती अशी आहे की, या विक्रीसाठी सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील धान्य वळविण्यात येईल.

दोन ऑक्टोबर, 1996 पासून नवीन संरचना असलेली सार्वजनिक वितरणप्रणाली अस्तित्वात येणार असून त्याअंतर्गत दारिद्र्य रेषेखालील प्रत्येक कुटुंबाला अर्ध्या किमतीत दरमहा 10 किलो धान्य वितरित करण्यात येणार आहे. या वितरण व्यवस्थेच्या यशानुसार हे प्रमाण नंतर दर कुटुंबासाठी दरमहा 15 किलो इतके वाढविण्यात येणार आहे. फेब्रुवारी, 1994 पासून धान्याच्या आधार किमतीत वाढ करण्यात आली असली तरी या वितरण प्रणालीतील धान्याच्या किमतीत वाढ करण्यात आली नाही आणि ती वाढविण्याचा शासनाचा सध्यातरी मानस नाही. या नवीन संरचित व्यवस्थेत दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांवर लक्ष केंद्रित करण्यात येणार असून टप्प्याटप्प्याने संपन्न वर्गाला या प्रणालीतून वगळण्यात येणार आहे. गेल्या वर्षीच्या अर्थसंकल्पात धान्य अनुदानाची रक्कम 5,500 कोटी रुपये होती ती या वर्षीच्या अर्थसंकल्पात वाढवून 5,884 कोटी करण्यात आली आहे. त्यात सध्यातरी वाढ न करता वाढविलेल्या आधार किमती, गुदामे बांधणे, आदिवासी भागात रास्त किमतीची दुकाने उघडणे, फिरती भांडारे स्थापन करणे यावर होणारा खर्च भागविता येईल. अगदीच आवश्यकता भासल्यास पूरक मागण्या संसदेत सादर करून मान्य करून घेता येतील.

अशा प्रकारच्या राष्ट्रीय पातळीवरील समष्टीय अन्न धोरणाची चर्चा करीत असताना एम. ए. महमद सली यांनी संपादित केलेल्या आणि नुकत्याच प्रकाशित झालेल्या " Inducing Food Security : Perspective on Food Policies in Eastern and

Southern Africa " या ग्रंथाची आठवण येते. वारं-वार पडणारे दुष्काळ आणि पूर, जमिनीची धूप आणि पर्यावरणात्मक धोके अशा आपल्या देशात असलेल्या परिस्थितीशी मिळतीजुळती परिस्थिती युगांडा, सुदान, झांबिया, झिम्बाब्वे, बोटस्वाना या आफ्रिकेतील देशांत आढळून येते. या देशांतील परिस्थितीचे गांभीर्य भारता-पेक्षा जास्त असले तरी त्यात प्रकारात्मक फरकापेक्षा अंशात्मक फरक जास्त असल्याचे दिसून येते. अन्न धोरण महत्त्वाचे असले तरी परस्पर संबंधित धोरणे व्याव-हारिकदृष्टया आखून कार्यदक्षतेने राबविल्याशिवाय अन्न सुरक्षितता निर्माण करू शकत नाही. अन्न धोरणात अंतर्गत आणि बाह्य संरोध असल्यामुळे धान्योत्पादन, वितरण आणि उपभोग यामध्ये गुंतागुंत निर्माण करते. धान्योत्पादन देशाला आत्मनिर्भर बनविण्याइतके होत असले तरी त्याचे गरजेनुसार, गरजांमधील विविधते-नुसार वितरण न झाल्यास एका बाजूस धान्याचे व्यव-स्थापन करण्याच्या क्षमतेपलीकडे साठे निर्माण होत जातात तर त्याचवेळी दुसऱ्या बाजूला धान्यासाठी लोक आटापीटा करताना आढळतात. गरीब लोकांमधील परंपरा, सवयी यामुळे निर्माण झालेल्या उपभोग आकृतीबंधाशी ( consumption pattern ) पुरवठा आकृतीबंध ( supply pattern ) जुळला नाही तर वितरण व्यवस्थेवरील कष्ट आणि पैसा कूचकामी ठरतो.

आफ्रिकेतील देशांप्रमाणेच भारतातही अत्यल्प ( marginal ) शेतकरी दारिद्र्य रेषेखाली आहेत. सार्व-जनिक वितरण व्यवस्थेतून त्यांना धान्यपुरवठा करण्या-पेक्षा अन्न सुरक्षितता निर्माण करण्याच्या दृष्टीने शेती-साठी त्यांना लागणाऱ्या निविष्टी पुरवून, नवीन तंत्र-विज्ञान शिकवून त्यांची उत्पादनक्षमता वाढविणे आव-श्यक आहे. आफ्रिकेतील देशांप्रमाणे भारतातही यातील दुसऱ्या भागावर पुरेसे लक्ष केन्द्रित केले जात नाही. म्हणून सार्वजनिक वितरण व्यवस्था यशस्वी आणि परिणामकारक करण्यासाठी या व्यवस्थेइतकेच इतर उपायही कार्यदक्षतेने आणि प्रामाणिकपणे अमलात आणणे जरुरीचे आहे.

निम्म्या किमतीत धान्य पुरविताना या किम-तीलासुद्धा धान्य विकत घेण्याइतकी क्रयशक्ती नसेल तर सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या हेतूलाच तडा जाईल. म्हणून एस. महेंद्रदेव यांनी ' Food Secu-rity : PDS Vs EGS ' या ' Economic and Political Weekly ' मधील लेखात (Vol. XXXI, No. 27, जुलै 6, 1996 पृष्ठे 1752-64 ) म्हटल्या-प्रमाणे सार्वजनिक वितरण व्यवस्था आणि रोजगार हमी योजना एकत्रितरित्या परस्परपूरक होतील अशा पद्धतीने राबविल्या पाहिजेत.

दारिद्र्य रेषेखालील लोकांना / कुटुंबांना धान्य आणि इतर गरजेच्या वस्तू पुरविणे ही राष्ट्रीय पातळी-वरील समस्या असली तरी त्यातील प्रादेशिक, नागरी, ग्रामीण, व्यवसायनिहाय फरक पूर्णपणे विचारात घेणे जरुरीचे आहे. त्यासाठी राष्ट्रीय पातळीवर किमान स्वरुपाचे सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे स्वरूप निश्चित करून या प्रणालीच्या संघटनात, व्यवस्थापनात आणि कार्यवाहीत स्थानिक संस्थांना, स्वयंसेवी संस्थांना जास्तीत जास्त सहभाग आणि आपले म्हणणे मांड-ण्याची संधी देणे जरुरीचे आहे. नाहीतर पुनर्संघटित सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे भवितव्य अस्तित्वातल्या व्यवस्थेपेक्षा वेगळे असणार नाही.

□ □

## संवाद

# कन्झुमरिझम

**जयंत राईलकर** *

'कन्झुमरिझम' या संज्ञेची व्युत्पत्ती व व्याप्ती या संदर्भाची एक टिपणी (श्रीनिवास खांदेवाले) एप्रिल-जून 1995 च्या अंकात वाचली. त्यानंतर 'The Inexact and Separate Science of Economics' या शीर्षकाचा डॅनिअल एम हाऊसमन यांचा ग्रंथ वाचनात आला (केंब्रिज युनिव्हर्सिटी प्रेस, प्रथमावृत्ती 1992). त्यामध्ये पृष्ठे 30–31 वर हाऊसमन यानी 'कन्झुमरिझम'चा अर्थ पुढीलप्रमाणे दिला आहे.

उपयोगिता सिद्धान्तामधील तीन नियमांपैकी 'कन्झुमरिझम' हा एक आहे. अन्य दोन : (अ) रॅशनॅलिटी – तर्कसंगतता, (आ) सीमान्तिक पर्यायितेचा घटता दर. 'कन्झुमरिझम'चे तीन पैलू आहेत : (1) प्रत्येक 'अ' व्यक्तीच्या निवडीचे विषय, म्हणजे 'अ'ने उपभोगिलेल्या वस्तूंचे संच; (2) विविध व्यक्तींच्या निवडीमध्ये परस्परावलंबित्व नसले; (3) तृप्तीच्या विशिष्ठ मर्यादेपर्यंत (खास करून पूर्ण तृप्तीचा बिंदू गाठला जात नाही तोपर्यंत) छोटयापेक्षा मोठा वस्तूसंच व्यक्ती पसंत करते. जर 'य' या वस्तूसंचामध्ये 'क्ष' संचामधील सर्व वस्तू व सेवा आहेतच परंतु कोणत्या तरी वस्तू–सेवेचे आधिक्यही आहे, तर 'य' हा संच 'क्ष' पेक्षा मोठा (व पसंत) म्हणता येईल. 'कन्झुमरिझम' म्हणजे स्वहिताचा विचार.

पुढे हाऊसमन यानी असे स्पष्टीकरण केले आहे की, 'उपयोगिता सिद्धान्त' 'कन्झुमरिझम' द्वारे (व्यक्तीचे) आर्थिक वर्तन व्यक्त करू शकतो. "दुसऱ्या अधिक सोईस्कर संज्ञेच्या अभावी मी 'कन्झुमरिझम' ही संज्ञा येथे वापरली आहे" असे सांगून ते पुढे म्हणतात. "'अतृप्तता', 'स्वहित', 'हाव' अशा पर्यायी संज्ञा मला काहीशा असमाधानकारक वाटतात. 'कन्झुमरिझम'द्वारे हे स्पष्ट होते की, लोकाना सर्वच वस्तू व सेवांचे प्रमाण अधिकाधिक हवे असते."

वरील विवेचनावरून असे लक्षात येते की, 'कन्झुमरिझम'ला उपयोगिता अथवा उपभोक्तावाद म्हणता येत नाही. येथे 'इझम' या अनुप्रत्ययाचा अर्थ, अन्यत्र केला जातो तसा, 'वाद' म्हणजे 'विचारप्रणाली' असा घेता येत नाही. 'कन्झुमरिझम' म्हणजे केवळ उपभोक्ता नीती, वर्तन अथवा वृत्ती. इतकाच तो मर्यादित आहे. हाऊसमन यांचा हा ग्रंथ एकूणच अर्थशास्त्राच्या संदर्भात शास्त्रीय (वैज्ञानिक) सिद्धान्त व पद्धतीमीमांसा या विषयांचा ऊहापोह करणारा आहे. यास्तव त्यानी 'कन्झुमरिझम' ही संज्ञा विचारपूर्वक व काळजीपूर्वक वापरली आहे. तेव्हा त्यानी केलेले वरील स्पष्टीकरण मान्य व्हावे.

* अर्थशास्त्राचे निवृत्त प्राध्यापक, गोरेगाव (पूर्व), मुंबई

# अर्थमीमांसा

मो. स. भावे**

'अर्थमीमांसा–वैज्ञानिक की कलात्मक ?' या नी. वि. सोवनी यांच्या लेखसंग्रहातील लेखांमधील प्रतिपादन चाकोरीबाहेरचे आहे. काही लेख प्रदीर्घ आहेत. त्यातील विषयांची अपुरी जाण आणि काटेकोर शास्त्रीय परिभाषा यामुळे प्रथमच वाचताना सामान्य अभ्यासकाला ते कठीण वाटण्याचा संभव आहे. सोवनींनी प्रत्येक लेखात समर्पक तर्कशुद्ध युक्तिवादाने प्रतिपाद्य विषयासंबंधी प्रचलित रूढ समजुती किती विपरित आणि चुकीच्या आहेत हे स्पष्ट केले आहे.

या संग्रहातील दोन लेख ऐतिहासिक घटितांबद्दल आहेत. त्यापैकी 'आशियाई उत्पादन व्यवस्था व हिंदुस्थान' या लेखात इंग्रजी राज्य येण्यापूर्वी हजारो वर्षे भारतातील अर्थव्यवस्था 'आउव्य' प्रमाणे होती हा मार्क्स व एंगेल्स यांचा दावा ब्रेन्डन ओलिअरी यांच्या 1989 मध्ये प्रसिद्ध झालेल्या पुस्तकातील चर्चेच्या आधारे फोल ठरविला आहे. एवढेच नव्हे तर 'आउव्य' ही कधीही अस्तित्वात नसलेली केवळ काल्पनिक व्यवस्था होती असा निष्कर्ष काढला आहे.

'ब्रिटनमधील औद्योगिक क्रान्ती–एक पुनर्विचार' या लेखात दुसऱ्या महायुद्धानंतर याबाबत जे नवे संशोधन झाले आहे ते विचारात घेतले आहे. औद्योगिक क्रान्तीचा काळ, तथाकथित कारणे आणि परिणाम यांचा तपशिलाने ऊहापोह करून ही घटना क्रान्ती नसून दीर्घकाल चालू असलेली उत्क्रान्ती होती आणि शेतीतील क्रान्ती, आंतरराष्ट्रीय व्यापाराची वाढ, तंत्रवैज्ञानिक नवप्रवर्तन, मोठी भांडवल गुंतवणूक, वाफेच्या इंजिनाचा शोध, कारखाना पद्धती यापैकी कोणत्यातरी एकाच कारणामुळे ती झाली असे म्हणणे चुकीचे आहे असे मत मांडले आहे. औद्योगिक क्रान्ती या जैव घटनेचे न्यूटनीय पद्धतीने केलेले विश्लेषण असमाधानकारक ठरावे हे स्वाभाविक आहे. याच लेखात औद्योगिक क्रान्ती हिंदुस्थानातून आणलेल्या लुटीवर उभारलेली होती या मताचा परामर्श घेऊन 1757 ते 1780 या कालखंडात ब्रिटनमधील भांडवल गुंतवणुकीत लुटीमुळे 11 टक्के तर 1783 ते 1793 या काळात 5 टक्के भर पडली असे नमूद करून ही भर लक्षणीय प्रमाणात होती असे म्हणता येणार नाही असा युक्तिवाद केला आहे. औद्योगिक क्रान्ती देशकालातीत साचेबंद घटना नसल्याने ती निर्यातनीत होती म्हणून तोच एक अभिवृद्धीचा मार्ग आहे असे म्हणणे अज्ञानीपणाचे आहे, असा इशारा दिला आहे.

'स्त्राफा यांच्या विचारसरणीवरील विदारक टीका' आणि 'प्रत्यायाचे सिद्धान्तन व भांडवलाच्या मूल्यनासंबंधीच्या सिद्धान्तावरील प्रदीर्घ वादविवाद' या दोन लेखांमध्ये अनुक्रमे सॅम्युअल्सन आणि सायनॉस लॅबिनी यांच्या युक्तिवादाची ओळख करून दिली आहे. पूर्ण स्पर्धेच्या अभ्यासाकडून अपूर्ण स्पर्धेच्या अभ्यासाकडे वाटचाल सुरू झाली म्हणून पिअरो स्त्राफा यांचा 'पूर्ण स्पर्धेच्या परिस्थितीत अनुमाप प्रत्यायाचे सिद्धान्त' हा 1926 मध्ये प्रसिद्ध झालेला निबंध आणि ज्या ग्रंथामुळे नवरिकार्डोवादाचा उदय झाला तो 1960 मध्ये प्रकाशित झालेला 'वस्तूंच्या साहचार्ये वस्तूंचे उत्पादन' हा ग्रंथ हे दोन्ही क्रान्तीकारक मानले जातात. परंतु (1) प्रत्यक्षात वस्तूंच्या किमती त्यांच्या उत्पादन परिव्ययावरूनच ठरतात हे रिकार्डो यांच्या श्रममूल्य सिद्धान्ताच्या प्रभावामुळे स्त्राफा यांच्या मनात खोलवर रुजलेले मत आणि (2) मार्शल यांचे पूर्ण स्पर्धेच्या परिस्थितीतील आंशिक समतोलाचे

** अर्थशास्त्राचे निवृत्त प्राध्यापक, जळगांव

सिद्धान्तन स्थिर प्रत्यायांच्या स्थितीशी सुसंगत असते हे प्रतिपादन पूर्णत: अयोग्य आहे असे सॅम्युअलसन यांचे म्हणणे आहे. धान्याची किंमत फक्त सीमान्तिक उत्पादनाच्या संदर्भात ठरत नसून एकूण मागणी–पुरवठ्याने ठरते. तसेच एकमेकांशी स्पर्धा करणाऱ्या कोणत्याही दोन वस्तूंच्या उत्पादनात भूमी, भांडवल, श्रमशक्ती वगैरे उत्पादन घटकांची निरनिराळी मिश्रणे लागत असतील तर प्रत्याय कोणतेही असले तरी एका वस्तूच्या उत्पन्नातील बदलाचा दुसऱ्या वस्तूचा उत्पादन परिव्यय, मागणी वगैरेंवर परिणाम होतोच आणि त्यामुळे आंशिक समतोलाची विश्लेषणपद्धती स्थिर प्रत्यायाच्या स्थितीशी सुसंगत असत नाही असे आपल्या म्हणण्याचे समर्थन केले आहे. सॅम्युअल्सन यांची टीका तर्कशुद्ध आहे असे शिफारसपत्र सोबनी देतात. तथापि सॅम्युअल्सन ज्या सार्वत्रिक समतोलाची भलामण करतात, त्याचे वास्तवाशी असलेले नाते स्राफा यांच्या विश्लेषणाप्रमाणेच दूरान्वयाचे असल्याने या टीकेची तर्करेषेवर केलेली कसरत अशीही संभावना करतात.

प्रत्यायाच्या आणि भांडवलाच्या मूल्यनासंबंधीच्या सिद्धान्तनाबाबत प्रदीर्घ वादानंतरही बहुतेक अर्थ–शास्त्रज्ञ जुनीच पठडी कायम ठेवण्याची अशास्त्रीय भूमिका घेतात हे सायलॉस लॅविनी याना (आणि सोबनींनासुद्धा) निषेधार्ह वाटते. लॅविनी यांच्या मतानुसार उत्पादनाला व उत्पादन विभाजनाला सीमान्तिक संकल्पना वापरणारे सिद्धान्त पुढील दोन कारणांनी संपूर्णपणे कोसळतात. पहिले कारण असे की, कोणतेही उत्पादनतंत्र काही उत्पादन घटकांचे विशिष्ट मिश्रण असते. त्यामुळे उत्पादन वाढविण्यासाठी एक उत्पादन घटक वाढविला तर इतरही निविष्टी वाढतात. परिणामी वाढलेले उत्पादन एकाच घटकाचे सीमान्तिक उत्पादन नसते. शिवाय उत्पादन घटक एकमेकांना संपूरक असतात हे लक्षात घेतल्यास त्यांच्या मिश्रणात फेरफार शक्य नसतो. त्यामुळे कोणत्याही उत्पादन घटकाची सीमान्तिक उत्पादकता प्रत्यक्षात काढता येत नाही. दुसरे कारण असे की, स्थिर अनुमाप प्रत्याय कोणत्याही उत्पादन–तंत्राचे लक्षण असते त्यामुळे सीमान्त संकल्पनेत मांडलेल्या घटत्या प्रत्यायाच्या सिद्धान्ताला वास्तवात कोणतेच मूर्त स्वरूप नसते. हे अनेक प्रत्यक्ष सर्वेक्षणांमधून अनेकवार सिद्ध झाले आहे. अविरत होणाऱ्या तंत्रवैज्ञानिक प्रगती–मुळे उत्पादनतंत्रे बदलली तर सरासरी उत्पादकता वाढते. परंतु हे गतीशील वाढते प्रत्याय असल्याने अल्पकालात प्रत्याय सर्वसाधारणपणे स्थिर असतात या विधानास बाधा येत नाही. अनेक उद्योगांच्या सांख्यिकी माहितीच्या अन्वेषणात बहुतेक ठिकाणी अल्प व दीर्घकालीन सीमान्तिक परिव्यय स्थिर–किंवा घटते असतात असे आढळले तरी जुन्या सिद्धान्तनाच्या पकडीतून मुक्त न झालेले अर्थशास्त्रज्ञ ती गोष्ट मानत नाहीत. नवअभिमत अर्थशास्त्रात उत्पन्नवितरणाच्या प्रश्नाची उकल करण्यासाठी समुच्चित उत्पादन अनुवर्ताची संकल्पना वापरताना भांडवल म्हणजे अस्तित्वात असलेले स्थिर व चल भांडवल आणि त्याची किंमत म्हणजे व्याजाचा दर मानली जाते. भांडवलाच्या सीमान्तिक उत्पादकतेला या अर्थशास्त्रात मध्यवर्ती भूमिका दिली जाते. व्याजाचा दर कमी झाला तर उत्पादन–तंत्रातील भांडवलाचे प्रमाण वाढते आणि श्रमाचे कमी होते असा निष्कर्ष काढला जातो. परंतु केन्सप्रणीत अपेक्षित लाभाचा सीमान्तिक दर लक्षात घेतला तर वास्तवात व्याजाचे दर कमी झाल्याने गुंतवणुकीची राशी वाढते आणि अधिक श्रमराशी वापरण्यास उत्तेजन मिळते असे दिसते. त्यामुळे अर्थशास्त्रज्ञांनी भांडवल गुंतवणुकीवरी अपेक्षित प्रत्यायाचा विचार केला पाहिजे अशी लॅविनी यांची अपेक्षा आहे.

'अभिमत अर्थशास्त्रातील घटत्या प्रत्यायाचा सिद्धान्त वैद्य आहे का?' या लेखात वरील स्वरूपाचेच प्रतिपादन आढळते. नवअभिमत अर्थशास्त्राच्या पायाभूत प्रतिमानात हा सिद्धान्त मूलभूत आहे. उत्पादनघटक अंशत: पर्यायी असतात. तंत्रबदल होत नाही आणि होणारे उत्पादन सर्व प्रकारे एकसारखे असते ही या सिद्धान्ताची गृहिते असून या प्रमेयात पर्यायनाच्या तत्त्वाला कारक भूमिका दिलेली आहे. ही गृहिते वास्तव नाहीत. वास्तवात कोण–त्याही उत्पादनतंत्राला उत्पादन घटकांच्या विशिष्ट संयोगाशिवाय दुसरा संयोग चालत नाही. त्यामुळे बदलत्या घटकाची एक मात्रा कमीजास्त करण्यास मुळीच वाव नसतो. ज्यावेळी आपण अनेक तंत्रांचा विचार करतो त्याच वेळी उत्पादनघटकांच्या निरनिराळ्या मिश्रणाचा विचार करता येतो. शिवाय घटकांच्या मिश्रणाचे बदलते प्रमाण उत्पादनाच्या गुणात प्रतिबिंबित होते. या वस्तुस्थितीमुळे उत्पादन सर्व प्रकारे तेच राहावयाचे असेल तर उत्पादन घटकांचे तेच मिश्रण असावे लागते. असे असेल तर उत्पादन घटकाचे प्रत्याय सीमान्तिक भाषेत सांगताच येत नाहीत.

म्हणून घटक प्रत्यायाचा सिद्धान्त अर्थशून्य ठरतो. परिणामस्वरूप वॉलराचा सिद्धान्त, 'यू' आकाराचे परिव्यय वक्र, पैसा व वास्तव वेतन दर एकमेकांच्या विरुद्ध दिशेने बदलतात हे केन्स यांचे प्रमेय हे सर्व गडगडतात परंतु वास्तवाकडे पाठ फिरवून आत्मवंचना करण्याची अर्थशास्त्रज्ञांची शक्ती अमर्याद असल्याने प्रत्यक्षात ते गडगडतील असा विश्वास सोवनींना वाटत नाही.

'मार्क्स यांचे अर्थशास्त्र हे वैज्ञानिक शास्त्र आहे का ?' हा सोवनी यांनी चर्चिलेला आणखी एक महत्त्वाचा प्रश्न आहे. मार्क्स यांचा आपलेच विवेचन शास्त्रीय आहे असा आग्रह होता. त्यांच्या लिखाणात विज्ञान म्हणजे वैज्ञानिक अन्वेषणपद्धती हे मत अनेक ठिकाणी सूचित झालेले दिसते. परंतु अन्वेषणेतून उभारल्या जाणाऱ्या सिद्धान्त कल्पना निगमनाने व विगमनाने सिद्ध झाल्याखेरीज त्यांना वैज्ञानिक सिद्धान्ताची पदवी शोभत नाही हे नमूद करून तार्किक सुसंगती, अनुभवानुसारण आणि पूर्वानुमान करण्याचे सामर्थ्य या कसोट्यांवर सोवनींनी मार्क्स यांचा (1) मूल्य सिद्धान्त, (2) नफ्याच्या दराच्या घटत्या प्रवृत्तीचा सिद्धान्त आणि (3) विस्तारित पुनरुत्पादनाचा सिद्धान्त यांचे परीक्षण केले. या परीक्षणातून त्यांना असे दिसले की, (1) मूल्यांचे किमतीत रुपांतर कसे होते याचे मार्क्स यांनी 'भांडवल' (खंड 3) मध्ये अंकगणितातील उदाहरणाच्या साहाय्याने केलेल्या विवेचनाच्या तर्कशुद्धते बद्दल प्रदीर्घ काल कसून व कडवट चर्चा झालेली असून तिचा निष्कर्ष मार्क्स यांना प्रतिकूल लागला आहे. (2) भांडवलशाही आपल्या आंतरिक विरोधातूनच कशी कोसळणार हे दाखविण्याच्या मुळाशी नफ्याच्या दराची घटण्याची प्रवृत्ती आहे' हे मार्क्स यांचे प्रमेय आहे. निगमनीय तर्कशास्त्राप्रमाणे प्रवृत्तीविषयक विधान सिद्धान्त पदवीस पोचू शकत नाही, कारण प्रवृत्ती ही विशिष्ट स्थलकालनिबद्ध आहे म्हणून तिला सर्वसाधारणत्वाचे गुण प्राप्त होत नाहीत आणि जे सर्वसाधारण नसते त्याला सिद्धान्त म्हणणे चूक आहे. शिवाय मार्क्स यांनी याविरुद्ध काम करणाऱ्या किमान सहा प्रवृत्तींमुळे जो नियम निष्प्रभ होण्याचा धोका आहे तो मुळातच नियम या संज्ञेस योग्य नाही. (3) विस्तारित पुनरुत्पादन सिद्धान्त प्रतिमानातील अल्गॉरिथम अपूर्ण असून त्यात स्थिर भांडवलाची वाढ कशी होते याचा खुलासा होत नाही. ज्या ऐतिहासिक माहितीच्या आधारे मार्क्स यांनी आपल्या संकल्पना उभारल्या ती माहिती अनेक वेळा अपुरी होती. शिवाय भांडवलशाहीत नफ्याचा दर घटत जाईल, कामगार दारिद्र्याच्या खाईत लोटला जाईल आणि भांडवलशाहीचा अंत नजिकच्या भविष्यकाळात होईल यापैकी एकही अपेक्षा आजपर्यंत फलद्रूप झाली नाही. त्यामुळे निगमन विगमनाच्या दोन्ही कसोट्यांवर मार्क्स यांचे अर्थशास्त्र अवैज्ञानिकच आहे.

आतापर्यंत उल्लेखिलेले सहा लेख त्यातील प्रतिपादनामुळे चिंतनीय आहेत. तरी सोवनी यांची अर्थशास्त्राबद्दलची मूलभूत भूमिका समजण्याच्या दृष्टीने 'अर्थशास्त्र हे वैज्ञानिक शास्त्र आहे का ?', 'सामाजिक शास्त्रांचा समन्वित अभ्यास व शिक्षण' आणि 'अर्थशास्त्राच्या अभ्यासाची पुनर्रचना' हे तीन लेख अधिक महत्त्वाचे आहेत. यानंतरच्या विवेचनात या तीन लेखांचा एकत्रित विचार करून सोवनी यांची मते शक्य तितके त्यांच्याच शब्दात मांडली आहेत.

शास्त्र म्हणजे कोणतेही व्यवस्थित लावलेले ज्ञान. ज्या शास्त्राचे निष्कर्ष वास्तवातील घटनांच्या वा अनुभवांच्या अभ्यासावरून काढले जातात ते विज्ञान. विज्ञान निगमनीय व विगमनीय असे दुहेरी असते. विज्ञानाची दोन सर्वमान्य लक्षणे म्हणजे, (1) जड व अजड विश्वव्यापारांचे नियम शोधून त्यांचे नियंत्रण करण्याची शक्ती मिळविणे हे विज्ञानाचे उद्दिष्ट असते आणि (2) विज्ञान वास्तवावर आधारलेले असते आणि ते विश्वव्यापारांची अन्वेषणा करून कार्यकारणभाव शोधून काढते. विज्ञानात जिज्ञासावस्तू व अन्वेषणारीती मिळून एक संशोधन कार्यक्रम असतो. मध्यवर्ती प्रश्न हा त्याचा गाभा असतो. अन्वेषणारीतीत तर्कशास्त्र, गणित व संख्याशास्त्र यांचा कमी अधिक प्रमाणात समावेश होतो. सिद्धान्तन हे विज्ञानाचे साध्य असते. विगमन व निगमनाने प्रस्थापित केलेल्या सिद्धान्तांची संहति म्हणजे सिद्धान्तन. वैज्ञानिकदृष्ट्या सिद्ध होण्यासाठी सिद्धान्तनात पूर्वकथनाचे सामर्थ्य असले पाहिजे असा अनेक तत्त्ववेत्यांचा आग्रह आहे.

मानवी इतिहासात युक्लिडच्या भूमितीने वैज्ञानिक शास्त्र प्रथम साकार केले. अठराव्या शतकात हे

स्थान न्यूटन यांच्या यांत्रिकीने ( mechanics ) पटकाविले आणि ते पुढील शेदीडशे वर्षे अबाधित राहिले. (1) विश्व एकजिनसी व एकविध असल्याने विश्वातील सर्व वस्तू व अनुभवांचे वेगवेगळे भाग पाडून ज्याचे अधिक पृथ–क्करण होणे शक्य नाही त्या मूलकापर्यंत वा मूळ तत्त्वापर्यंत पोचता येते; (2) सर्व घटनांचा उलगडा कार्यकारण–भावातून होतो. कोणत्याही घटनेचे कारण ती घटना घडण्यास आवश्यक व पुरेसे असले तरच त्यास कारण म्हणता येते. अशा कारणमीमांसेवर आधारलेले शोध व निष्कर्ष अपवादरहित असतात; (3) ज्याच्या आंतररचनेतून त्याचे सर्व वर्तन ठरविले जाते अशा घड्याळासारखे विश्व एक यंत्रणा आहे; ही न्यूटनदर्शनातून परिणत झालेल्या विज्ञान व वैज्ञानिक विचारसरणीची प्रमुख अंगे होती. शिवाय काळ हा सर्वत्र सारखा व एकच आहे आणि सर्व विश्वव्यापार गणितबद्ध आहेत म्हणून गणित विज्ञानाचे अपरिहार्य अंग आहे ही उपांगे होती. विश्वातील प्रत्यक्ष माहिती विचारात घ्यावयाची, तिच्या आधाराने त्या निरीक्षीतातील कार्यकारण संबंधाबद्दल सिद्धान्तकल्पना बांधावयाच्या आणि त्यांचा वास्तवातील माहितीशी पुन्हा पडताळा पाहावयाचा हे सर्व न्यूटनप्रणीत वैज्ञानिक विचारसरणीत अनुस्यूत होते.

सामाजिक शास्त्रांचे रूपांतर वैज्ञानिक व नैसर्गिक शास्त्रात करता येणे शक्य आहे असा गैरसमज अनेक दशके आणि आजही प्रचलित आहे. अर्थशास्त्राला भौतिकीसारखे नैसर्गिक शास्त्र बनविण्याचा प्रयत्न गेली दीडशे वर्षे चालू आहे. यासाठी रिकार्डोपासून रॉबिन्सपर्यंत जे युक्तिवाद केले गेले त्यांचा सोवनींनी सम्यक् आढावा घेतला आहे.

सामाजिक व्यवहार व त्यातून उत्पन्न होणारे प्रश्न इतके व्यापक व गुंतागुंतीचे असतात की त्यांचा सर्वांगीण विचार एकाच वेळी करण्यास मानवी बुद्धी पुरी पडत नाही, म्हणून अर्थशास्त्राचा स्वतंत्र अभ्यास करणे समर्थनीय आहे. परंतु अर्थशास्त्राचा स्वतंत्र अभ्यास करावयाचा तर त्याची व्याप्ती कशी ठरवावयाची? एकूण सामा-जिक प्रक्रियेतून आर्थिक प्रक्रिया वेगळी करण्यासाठी कोणता निकष वापरावयाचा? या प्रश्नांचे उत्तर म्हणून अर्थशास्त्रज्ञांनी केन्द्रस्थानी मानलेले पूर्ण मानवाच्या आर्थिक अंगाचे 'आर्थिक मानव' हे संकल्पनात्मक चित्र मिल यांनी निर्माण केले. मानव ही बदलणारी व अस्थिर गोष्ट एका विशिष्ट प्रकारे वागणारी यंत्रणा आहे हे या संकल्पनेत गृहीत आहे. त्यामुळे मानवावर समाजाचे, संस्थांचे कोणतेच बंधन नसून त्याचे वर्तन स्थलकालातीतपणे स्थिर आहे असे मानता येऊन त्याच्या अजडत्वाचा निरास करण्यात आला. मानव शारीरिकदृष्ट्या सर्वत्र व सर्वकाळी सारखा असल्याने त्याची आर्थिक वर्तनाची प्रेरणा आणि तिचा आकृतीबंध कोणत्याही स्थळी व काळी तोच असतो असे म्हणता आले. वास्तवाची माहिती स्थलकाल विशिष्ट असल्याने तिच्या आधारे सर्वसाधारण विधान करणे शक्य नसते. तसेच प्रयोग करण्यास वाव नसतो. या अडचणी अमूर्तीकरण हा विज्ञानपुनीत मार्ग आहे असे म्हणून सोडविण्यात आल्या.

अर्थशास्त्र हे मानसिक वैज्ञानिक शास्त्र आहे या मिल यांच्या मताला सीमान्तवाद्यांनी दुजोरा दिला आणि उपयोगितेच्या महत्तमनासाठी मानव सहजप्रवृत्तीने ठराविक पद्धतीचे वर्तन करतो असे सुधारित प्रमेय जुन्या सिद्धान्ताला जोडले. तसेच कोणताही पुरावा न देता समतोलाचे तत्त्व आणि समतोलाकडे असणारी जोरदार प्रवृत्ती ही गृहीते मानून मानवाचे तर्कशुद्ध वर्तन ते की जे समतोलाकडे नेते अशी व्याख्याही केली. ज्ञात साधनांनी ज्ञात साध्ये गाठण्यासाठी इष्टतम रीतीने कशी विल्हे करावयाची हा अर्थशास्त्राचा मध्यवर्ती प्रश्न ठरवून उपयुक्तता व स्वार्थ यांची यांत्रिकी हे अर्थशास्त्राचे स्वरूप स्पष्ट केले. मानवाला अन्तर्मुख होऊन स्वतःच्या मनोव्यापारांचे निरीक्षण करता येते आणि त्यातून मिळणारी माहिती वस्तुनिष्ठच असते असा निगमनाचा सोयीस्कर अर्थ लावून ही माहिती विचारात घेऊन केलेले सिद्धान्तन विगमनसिद्ध मानावे असे प्रतिपादन केले आणि या सर्व मुद्यांच्या आधारे अर्थ–शास्त्राचे स्वरूप तर्कशुद्ध गणितशुद्ध स्थलकालातीत सार्वत्रिक सिद्धान्त आहे असा दावा मांडला.

हा दावा सोवनींना अमान्य आहे. न्यूटनीय चौकटीत कोंबल्यामुळे अर्थशास्त्राचे स्वरूप अ आशय अत्यंत विरुपित झाले आहे असे त्यांना वाटते. अर्थशास्त्राची निगमनीय बाजू नेहमीच दुर्बल राहिली आहे. त्यामुळे अर्थ–

शास्त्रातील तथाकथित सिद्धान्तन आणि प्रत्यक्षातील अर्थव्यवहार व प्रक्रिया यामध्ये फारसे साम्य राहिले नाही. सम-तोल संकल्पना इतकी मध्यवर्ती झाली की तिच्याशी सुसंगतता साधणे हे अर्थविश्लेषणाचे प्रमुख उद्दिष्ट बनले. त्यातही यांत्रिकीतील समतोलास अचरगती विश्वाचा संदर्भ असल्याने अर्थशास्त्रात स्थितीशील प्रतिमाने रूढ झाली. गतिशील अर्थव्यवहारांचे विश्लेषण करण्याची प्रारंभकालापासूनची प्रथा आणि स्थितीशील प्रतिमाने या दोहोतील विरोधाची जाणीव सॅम्युअलसन यांनी लक्ष वेधेपर्यंत अर्थशास्त्रज्ञांना झालीच नाही. सॅम्युअलसन यांनी संगतता तत्त्वाच्या आधारे हा विरोध निरस्त करता येतो असे दाखवून आर्थिक विश्लेषणाची बैठक तुलनात्मक स्थितिकीची आहे असे उपपादन केले. परंतु या तत्त्वाची व्याप्ती प्रत्यक्षातील आर्थिक स्थितीत फारच मर्यादित असल्यामुळे फारसे काही साधत नाही हे सिद्ध झाले.

या सबंध कालखंडात वेगळे विचार मांडलेच गेले नाहीत असे नव्हे. ऐतिहासिकवादी व संस्थावादी (institutionalists) यांना केवळ निगमनात्मक अर्थशास्त्राचे वावडे होते. आर्थिक मानव ही संकल्पना मर्यादित उपयोगाची आहे आणि अर्थशास्त्रज्ञांची मक्का जीवशास्त्र आहे, यांत्रिकी नव्हे, हे मार्शल यांचे उद्‌गार प्रसिद्ध आहेत. अलीकडे जॉन हिक्स यांनी अर्थशास्त्र वैज्ञानिक शास्त्र नसून अभ्यासाचा एक प्रकार वा पद्धती आहे असे आपले परिणत मत सांगितले आहे आणि ते केन्स यांनी केंब्रिज अर्थमालेच्या प्रस्तावनेत 1922 साली मांडले होते त्यासारखेच आहे असे म्हटले आहे. तेथे केन्स यांनी असे नोंदले आहे की, आर्थिक परिस्थितीस लागोठाम लागू करता येतील अशा सिद्धान्ताची प्रणाली असे अर्थशास्त्राचे स्वरूप नाही. ते एक बुद्धीचे हत्यार, अन्वेषणाचे एक तंत्र आहे. या मतातील गाभ्याची संकल्पना 1885 मध्येच मार्शल यांनी मांडलेली होती. काही अपवाद वगळता निव्वळ ज्ञानासाठी ज्ञान हा अर्थशास्त्राचा उद्देश कोणत्याच अर्थशास्त्रज्ञाने मानला नाही. लोककल्याणसाठी अर्थप्रक्रियांचे नियंत्रण करण्यासाठीच अर्थशास्त्रज्ञांनी अर्थशास्त्राचा प्रपंच प्रथम थाटला. हे सर्व लक्षात घेतले तर अर्थशास्त्राचे स्वरूप शास्त्रापेक्षाही कलेशी जास्त जवळचे आहे; हेच मत केन्स यांच्या पुढील विधानात प्रतिबिंबीत झाले आहे : "अर्थशास्त्र प्रतिमानांच्या साहृयाने विचार करणारे शास्त्र आहे आणि त्याच्याच जोडीचे सद्यःस्थितीत अनुरूप असे प्रतिमान निवडण्याची कलाही त्यात समाविष्ट आहे. चांगले अर्थशास्त्रज्ञ विरळाच असतात, कारण दक्ष निरीक्षणाने चांगले प्रतिमान निव-डण्याची देणगी फारच थोडयांजवळ असते." असे असले तरी ही भूमिका पूर्णपणे स्वीकारण्याची आणि ऐतिहासिक कालौघात चुकीचे वा खोटे ठरलेले सिद्धान्त टाकून देण्याची अर्थशास्त्रज्ञांनी नेहमीच अनिच्छा दाखविली आहे. एवढेच नव्हे तर आज एक शतकाहून अधिक काळ अर्थशास्त्रज्ञांचा एक व्यावसायिक गट निर्माण होऊन त्यास पंथसदृश स्वरूप प्राप्त झाले आहे. त्यांची एकमेकांशी संवाद करण्याची विशिष्ट परिभाषा तयार झाली आहे. त्या पठडीत निष्ठावंतांची भरती व पाखंडांचे दूरीकरण अनेक मार्गांनी होते. त्यामुळे मूळ पठडीच्या अनुयायांची परंपरा दीर्घकाल टिकली आहे.

विसाव्या शतकातील विज्ञानाच्या प्रगतीमुळे न्यूटनीय विज्ञान चौकट मोडून पडली. विश्वातील वस्तूंचे स्वरूप स्थिर व न बदलणारे असते हे न्यूटन गृहीत मॅक्स प्लांक यांचा पुंज सिद्धान्त आणि आइन्स्टाईन यांचा सापे-क्षता सिद्धान्त यांनी चूक ठरविले. त्यामुळे विश्वातील घडामोडींमध्ये निश्चित कार्यकारणभाव शोधणे अशक्य झाले. विज्ञानातील निश्चितता संपल्याने विज्ञानातील सिद्धान्तनही अनिश्चित, केवळ संभाव्य ठरले. विगमनाने सिद्धान्त खोटे ठरविता येतात, पण सत्य आहेत असे शाबीत करता येत नाही असे पॉपर यांनी सिद्ध केल्याने सार्वत्रिक, स्थलकालातीत, निश्चित व कायम स्वरुपाचे सिद्धान्त हे विज्ञानाचे स्वरूप कालबाह्य झाले.

विश्वाची रचना यंत्रसदृश नसून जैव घटितातील सेंद्रियात्मक प्रकारची व्यवस्था आहे या प्रतिपादनामुळे विश्वातील घटक स्वतंत्रपणे वागण्यास असमर्थ असतात हे सिद्ध झाले. जीवशास्त्रातील प्रगतीमुळे जैव व अजैव गोष्टीतील फरक रेखीवपणे स्पष्ट करता आला. जैव संघटना उघडया असल्याने सतत बदलणाऱ्या असतात. त्यांचे वर्तन त्यातील आन्तरिक स्वयंस्फूर्त शक्ती व हेतूजन्य प्रेरणांवर अवलंबून असते. जैव घटितामध्ये प्रत्येक घटकाच्या गुणाप्रमाणे त्याचे इतर घटकांच्या संदर्भातील स्थानही महत्त्वाचे असते. घटकाचे स्थान बदलले की घटितही बदलत

असल्याने विश्वात नाविन्य कसे उत्पन्न होते हा न्यूटन दर्शनातील अनुत्तरित प्रश्नही सोडविता येतो.

विज्ञानातील या प्रगतीमुळे त्या प्रगतीस अधिक संवादी अशी अन्वेषणारीती उदयास येत असून आता परिपक्व होत आहे. ही संपद्धती चिकित्सा ( Systems Analysis ) या नावाने ओळखली जाते. एकमेकांशी जैव संबंध असणाऱ्या कोणत्याही मूलकांचा गट म्हणजे संपद्धती. संपद्धती मूलकांच्या बेरजेपेक्षा अधिक आणि निराळी असते. नव्या रीतीप्रमाणे सध्याच्या सामाजिक शास्त्रांचे सवते सुभे आणि त्यांच्यातील प्रश्नांचे स्वतंत्र अन्वेषण चुकीचे ठरते. सर्व समाजव्यवहार अविभाज्य असल्याने त्यांचा संपूर्णपणे विचार करणे हेच नव्या रीतीस योग्य मानले जाते. म्हणून अलीकडे बहुशास्त्रान्वयी अभ्यासाऐवजी समन्वित अभ्यासाचा पुरस्कार केला जातो. विद्यमान अर्थशास्त्राची गृहीते आणि त्यांच्या अन्वेषणाची चौकट नव्या रीतीला अवास्तव वाटतात. फायद्याचे महत्तमन या एकाच व एकमेव उद्देशाने माणूस वागत नाही. ऐतिहासिक दृष्टीने पाहता उपलब्ध साधनसामग्री काटकसरीने वापरणे माणसाच्या वर्तनाचे फारसे महत्त्वाचे लक्षण नाही. अर्थव्यवहारांचा कल त्यांच्या समतोलाकडे असतो आणि तो तसा असावा यासठी उचित ठरणारे वर्तन तर्कशुद्ध हे गृहीत प्रसिद्ध आहे. या सिद्धान्ताप्रमाणे प्रत्यक्षात अर्थव्यवहार चालावयाचा ज्या प्रकारची अर्थव्यवस्था असावयास हवी तो प्रत्यक्ष अर्थव्यवस्थांशी दूरचेसुद्धा नाते सांगू शकत नाही. अर्थशास्त्रातील सिद्धान्त सामाजिक व सांस्कृतिक संस्था रचना कोणत्याही प्रकारची असली तरी खरे असतात हे म्हणणे अवास्तवाच्याही पलिकडचे आहे. नव्या अन्वेषणारीतीत मानव हा आंतरिक शक्तींनी प्रयुक्त असे व्यक्तिमत्व असलेला व सहेतुकपणे वागणारा प्राणी आहे. नवी रीत प्रत्यक्षातील संघटनांच्या अभ्यासावर भर देते. विश्वव्यापारांची प्रक्रिया हे तिचे मुख्य लक्ष्य असल्याने आणि ही प्रक्रिया सतत चालणारी असल्यामुळे तिचा अभ्यास गतिकीच्या संदर्भात करण्याचा नव्या पद्धतीचा कल आहे.

सामाजिक शास्त्रांच्या एकात्म अभ्यासात येणाऱ्या अडचणींची सोवनींना कल्पना आहे. अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, इत्यादी शास्त्रे सिद्धान्तनीय शास्त्रे असणे शक्य नाही हे मान्य करणे सर्वात मोठी अडचण आहे असे सोवनींना वाटते. संपद्धती रीती ही प्रत्यक्ष समस्या सोडविण्याचा मार्ग म्हणून उदयास आल्याने या रीतीच्या दृष्टीने समाजविज्ञान कलेच्या स्वरुपाचे आहे. त्यासाठी विशिष्ट काळी महत्त्वाच्या असलेल्या समस्या निवडून त्यांचा या पद्धतीने सर्वांगीण अभ्यास करणे आवश्यक आहे. हे काम सोपे नाही याची सोवनींना जाणीव आहे.

आतापर्यंत विशद केलेल्या भूमिकेमुळे विद्यापीठ अनुदान मंडळाने सुचविलेल्या पुनर्रचित अभ्यासक्रमातील अनेक दोष सोवनींनी दाखविले आहेत. त्या अर्थशास्त्रासंबंधी अन्वेषणारीतीच्या दृष्टीने अलीकडील विचारमंथनाकडे पाठ फिरविणे, अर्थशास्त्र हे सामाजिक शास्त्र आहे या मूलभूत बाबीकडे दुर्लक्ष करणे, आर्थिक इतिहासाची पार्श्वभूमी न पुरविणे; अन्वेषणारीतीसंबंधी काही कल्पना विद्यार्थ्यांना दिली पाहिजे याची जाण न ठेवणे हे प्रमुख दोष आहेत. ते कसे दूर करता येतील याचेही दिग्दर्शन त्यांनी केले आहे.

प्रचलित अर्थशास्त्रातील तार्किक प्रतिमान हे भोवतालच्या वास्तवापासून कसे व किती लांब आहे याचे आकलन होणे हाच अर्थशास्त्र शिकण्याचा व शिकविण्याचा मुख्य विषय आहे असे सोवनींचे मत आहे. हे मत मान्य वा अमान्य होऊ शकेल. तथापि आपल्या अभ्यास विषयाचे वास्तव स्वरूप, त्याचा आशय आणि व्याप्ती यांचे यथार्थज्ञान अभ्यासकाला असले पाहिजे याबाबत दुमत होण्याचे कारण नाही. तसे ज्ञान होण्यासाठी सोवनींच्या या लेखसंग्रहाचा फार मोठा उपयोग होईल यात मुळीच संशय नाही.

□ □

## श्रद्धांजली

### प्राचार्य ना. अ. मावळंकर

जुन्या पिढीतील अर्थशास्त्राचे ख्यातनाम प्राध्यापक आणि पुणे येथील बृहन्महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालयाचे भूतपूर्व प्राचार्य नारायण अनंत मावळंकर यांचे 18 एप्रिल 1995 रोजी वयाच्या एकोणनव्वदाव्या वर्षी दु:खद निधन झाले. अखंड ज्ञानसाधना, प्रखर कर्तव्यनिष्ठा, शिस्तप्रियता, सौजन्यपूर्ण वागणूक, विद्यार्थी आणि सहकारी यांच्याविषयी अपार तळमळ आणि आत्मीयता, पारदर्शी आणि संवेदनशील मन, इत्यादी गुणांचा मनोज्ञ मिलाफ त्यांच्या व्यक्तिमत्वामध्ये झाला होता.

मावळंकर मूळचे इतिहासाचे विद्यार्थी. थोरल्या माधवराव पेशव्यांवर प्रबंध लिहून त्यानी एम. ए. पदवी प्रथम श्रेणीमध्ये संपादन केली होती. पुण्याच्या फर्गसन महाविद्यालयात 1940 मध्ये अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून दाखल होण्यापूर्वी अहमदाबाद व बडोदे या ठिकाणी काही काळ त्यानी अध्यापन केले होते. 1945 मध्ये डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे आजीव सदस्यत्व स्वीकारल्यावर संस्थेच्या सांगली आणि पुणे येथील महाविद्यालयांमध्ये प्राचार्यपदाची धुरा त्यानी दीर्घकाळ वाहिली. एक उत्कृष्ट व्यासंगी प्राध्यापक आणि कुशल व कर्तबगार प्रशासक म्हणून त्याना मानमान्यता लाभली. अनेक अधिकारपदेही त्यानी भूषविली. त्यात पुणे विद्यापीठाच्या वाणिज्य विद्याशाखेचे अधिष्ठाता आणि अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख यांचा उल्लेख करावा लागेल. महाराष्ट्रातील अन्य विद्यापीठांच्या शैक्षणिक उपक्रमांशीही त्यांचा निकटचा संबंध होता.

1958 मध्ये अमेरिकेत फ्लॉरिडा स्टेट युनिव्हर्सिटी आणि कोलोराडो युनिव्हर्सिटीमध्ये अभ्यागत प्राध्यापक म्हणून वर्षभर त्यानी व्याख्याने दिली. या अल्प कालावधीत त्यांचे तेथील विद्यार्थ्यांशी असे काही ऋणानुबंध जुळले की त्या विद्यार्थ्यांनी स्वयंस्फूर्तपणे एक निधी पुण्यातील महाविद्यालयीन गरीब विद्यार्थ्यांसाठी उभारला आणि त्यांच्याकडे सुपूर्द केला. हा एक प्रकारे त्यांचा सन्मानच होता.

निवृत्तीनंतर विद्यापीठ अनुदान आयोगाने संशोधन कार्यासाठी विशेष अनुदान त्याना देऊ केले होते. सामाजिक शास्त्रांच्या अभ्यासाची पायाभूत तत्त्वे या विषयावर एका चिकित्सक प्रबंधाची त्यानी परिश्रमपूर्वक सिद्धता केली होती.

शिक्षण आणि शिक्षणपद्धतीविषयी मावळंकरांचा विशेष दृष्टिकोन होता. एखाद्या समस्येची वा सिद्धान्ताची विद्यार्थ्यांना निव्वळ माहिती देण्यापेक्षा त्याना स्वतंत्रपणे विचार करावयाला शिकविणे ही शिक्षकाची प्रधान जबाबदारी आहे असे ते मानीत. एखाद्या विषयाची विविध अंगे आणि उपांगे आणि त्यांचे अन्योन्य संबंध अभ्यासताना वैचारिक संपन्नता तर वाढतेच परंतु त्यात आगळावेगळा बौद्धिक आनंदही मिळतो या भूमिकेचा ते आवर्जून पुरस्कार करीत. त्यामुळे संधी मिळेल तेव्हा चर्चा आणि वैचारिक देवाणघेवाण करण्यात त्याना विशेष रस असे. अशा चर्चामध्ये एकांगीपणा, तर्ककर्कशता आणि अभिनिवेश याना थारा असू नये याबाबत ते आग्रही राहात.

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ते ज्येष्ठ आजीव सदस्य होते. काही वर्षांपूर्वी श्रीमती ना. दा. ठाकरसी महिला विद्यापीठाच्या वतीने पुणे येथे झालेल्या परिषदेच्या वार्षिक अधिवेशनातही ते सहभागी झाले होते.

अशा या थोर आणि आदर्श शिक्षकाच्या स्मृतीला परिषदेच्या वतीने विनम्र अभिवादन.

**व्यं. सु. पाटणकर**

## रघुनाथ ज. राजुरकर

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे आजीव सदस्य आणि नागपूर येथील गोविंदराम सक्सेरिया वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालयातील अर्थशास्त्राचे प्राध्यापक रघुनाथ ज. राजुरकर यांचे 4 जुलै, 1996 रोजी पुणे येथे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दुःखद निधन झाले. प्रा. राजुरकरांनी त्यांच्या महाविद्यालयाच्या विद्यमाने आयोजित केलेल्या मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या तेराव्या वार्षिक अधिवेशनासाठी स्थानिक कार्यवाह म्हणून जबाबदारी सांभाळली होती. त्यांच्या अकाली निधनामुळे त्यांच्या कुटुंबियांवर अचानक मोठी आपत्ती कोसळली. त्यांच्या आप्तस्वकीयांच्या दुःखात परिषद सहभागी आहे. मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने प्रा. राजुरकरांना श्रद्धांजली. ईश्वर मृतात्म्यास सद्गती देवो.

**रवीन्द्र दोशी**

□ □

## परिषदेचे सदस्य आणि हितचिंतक याना आवाहन

'अर्थसंवाद' या नियतकालिकावरील आणि कार्यालयीन खर्च गेली काही वर्षे सातत्याने वाढत असल्यामुळे आणि परिषदेला मिळणाऱ्या अनुदानात कोणतीही वाढ नसल्यामुळे परिषदेला दरवर्षी अधिकाधिक तूट येत आहे. ही तूट भरून काढण्यासाठी वर्गणीचे दर सुधारणे, जाहिराती मिळविणे इत्यादी निर्णय परिषदेच्या कार्यकारी मंडळाने वेळोवेळी घेतले आहेत. त्याचबरोबर मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या नावे एक स्वतंत्र कायम निधी उभारावा असेही ठरले आहे. या कायम निधीसाठी सदस्यांकडून आणि परिषदेच्या हितचिंतकांकडून देणग्या/अनुदाने मिळवावीत असेही वार्षिक साधारण सभेत सातत्याने ठरविण्यात आले आहे. 'अर्थसंवाद' चे वाचक, परिषदेचे साधारण सदस्य आणि अन्य हितचिंतकही या निधीसाठी स्वयंस्फूर्तपणे, यथाशक्ती आपले आर्थिक साहाय्य देतील आणि परिषदेला आर्थिक स्थैर्य मिळवून देतील असा आम्हांस विश्वास वाटतो.

या निधीसाठी पाठवावयाचे बँक ड्राफ्ट अथवा मनी ऑर्डर 'मराठी अर्थशास्त्र परिषद' या नावाने काढावेत आणि ते मंगळवेढा येथील कार्यालयीन पत्त्यावर पाठवावेत.

देणगीदारांची नावे वेळोवेळी 'अर्थसंवाद'च्या अंकात दिली जातील.

**आ. गो. पुजारी**
कार्यवाह–खजिनदार

# सांख्यिकी पुरवणी - (25)

# भारतातील सहकारी संस्था (3)

संकलन : रवीन्द्र दोशी *

## पतपुरवठा संस्था (1992-93) (1)

(कोटी रुपये)

| संस्थेचा प्रकार | संस्था | सभासद ('000) | स्वनिधी | ठेवी | खेळते भांडवल |
|---|---|---|---|---|---|
| **सर्व सहकारी संस्था** | **98,236** | **1,33,362** | **10,006** | **38,180** | **84,446** |
| **(अ) अल्पकालीन संरचना** | | | | | |
| 1 राज्य सहकारी बँका | 28 | 63 | 1,495 | 8,485 | 15,655 |
| 2 मध्यवर्ती सहकारी बँका | 350 | 919 | 2,528 | 14,668 | 26,110 |
| 3 औद्योगिक सहकारी बँका | 6 | 35 | 17 | 98 | 137 |
| 4 **प्राथमिक पतसंस्था** | | | | | |
| (1) कृषी | 65,833 | 90,887 | 1,857 | 2,294 | 12,612 |
| (2) धान्य बँक | 218 | 27 | 1 | – | 2 |
| (3) **कृषीतर**xx | **29,752** | **15,067** | **1,175** | **1,324** | **4,074** |
| (क) नागरी बँका | 76 | 266 | 8 | 63 | 89 |
| (ख) कर्मचारी पतसंस्था | 20,280 | 10,601 | 956 | 887 | 3,174 |
| (ग) इतर | 9,396 | 4,180 | 211 | 374 | 811 |
| (4) **प्राथमिक सहकारी बँका**xxx | **1,302** | **14,661** | **1,765** | **11,214** | **15,304** |
| (क) नागरी बँका | 1,192 | 13,704 | 1,630 | 10,827 | 14,532 |
| (ख) कर्मचारी पतसंस्था व इतर | 110 | 957 | 135 | 387 | 772 |
| **(आ) दीर्घकालीन संरचना** | | | | | |
| 1 मध्यवर्ती भूविकास बँका | 20 | 4,384^ | 840 | 76 | 7,277 |
| 2 प्राथमिक भूविकास बँका | 727 | 7,319^ | 328 | 21 | 3,275 |

टीप : ^ नाममात्र सभासदांसहित

xx Banking Regulation Act, 1949 च्या कक्षेत नसलेल्या संस्था.

xxx Banking Regulation Act, 1949 च्या कक्षेत असलेल्या संस्था.

* प्राध्यापक व प्रमुख, अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर आणि प्रमुख संपादक, 'अर्थसंवाद'.

## पतपुरवठा संस्था (1992–93) (2)

(कोटी रुपये)

| संस्थेचा प्रकार | कर्जे व अग्रिमे (Loans & advances) अग्रिमे अल्पकाल | अग्रिमे मध्यम व दीर्घकाल | अदत्त (outstandings) अल्पकाल | अदत्त मध्यम व दीर्घकाल | थकित अल्पकाल | थकित मध्यम व दीर्घकाल |
|---|---|---|---|---|---|---|
| **सर्व सहकारी संस्था** | **37,451** | **10,285** | **31,412** | **22,863** | **7,486** | **2,847** |
| **(अ) अल्पकालीन संरचना** | | | | | | |
| 1 राज्य सहकारी बँका | 11,873 | 1,053 | 8,006 | 2,345 | 351 | 202 |
| 2 मध्यवर्ती सहकारी बँका | 13,893 | 1,760 | 11,705 | 4,246 | 3,383 | 828 |
| 3 औद्योगिक सहकारी बँका | 112 | 26 | 60 | 28 | 11 | 5 |
| 4 **प्राथमिक पत संस्था** | | | | | | |
| (1) कृषी | 4,394 | 898 | 5,900 | 2,573 | 2,372 | 722 |
| (2) धान्य बँक | 1 nn | – | 1 nn | – | 1 nn | – |
| (3) **कृषीतर** xx | **1,142** | **1,280** | **1,184** | **1,680** | **266** | – |
| (क) नागरी बँका | 36 | 16 | 23 | 22 | 9 | – |
| (ख) कर्मचारी पतसंस्था | 879 | 1,080 | 867 | 1,412 | 169 | – |
| (ग) इतर | 227 | 184 | 294 | 226 | 88 | – |
| (4) **प्राथमिक सहकारी बँका** xxx | **6,038** | **3,535** | **4,558** | **4,237** | **1,102 nn** | – |
| (क) नागरी बँका | 5,914 | 3,078 | 4,457 | 3,763 | 1,080 nn | – |
| (ख) कर्मचारी पतसंस्था व इतर | 122 | 457 | 99 | 474 | 22 nn | – |
| **(आ) दीर्घकालीन संरचना** | | | | | | |
| 1 मध्यवर्ती भूविकास बँका | – | 1,191 | – | 5,295 | – | 657 |
| 2 प्राथमिक भूविकास बँका | – | 542 | – | 2,479 | – | 433 |

**टीप :** nn मध्यमकालीन कर्जासहित.

xx Banking Regulation Act, 1949 च्या कक्षेत नसलेल्या संस्था.

xxx Banking Reguolatin Act, 1949 च्या कक्षेत असलेल्या संस्था.

## पतपुरवठा संस्था (1992-93) (3)

(लक्ष रुपये)

| तपशील | राज्य सहकारी बँका | मध्यवर्ती सहकारी बँका | औद्योगिक सहकारी बँका | प्राथमिक सहकारी बँका | प्राथमिक कृषी पतसंस्था | मध्यवर्ती भूविकास बँका |
|---|---|---|---|---|---|---|
| **(अ) प्रतिबँक/संस्था सरासरी** | | | | | | |
| 1 स्वनिधी | 5,752 | 741 | 434 | 136 | 282 | 4,668 |
| 2 ठेवी | 32,633 | 4,301 | 2,445 | 861 | 348 | 424 |
| 3 घेतलेली कर्जे | 17,182 | 2,056 | 306 | 4,710 | 969 | 30,553 |
| 4 खेळते भांडवल | 60,212 | 7,657 | 3,429 | 1,175 | 1,915 | 40,430 |
| 5 दिलेली कर्जे | 49,714 | 4,591 | 3,446 | 735 | 804 | 6,617 |
| 6 अदत्त कर्जे | 39,814 | 4,678 | 2,188 | 675 | 1,287 | 29,419 |
| **(आ) सर्व बँका/संस्था–टक्केवारी** | | | | | | |
| 1 खेळत्या भांडवलाशी ठेवींची | 55 | 56 | 71 | 73 | 18 | 1 |
| 2 ठेवींशी अदत्त कर्जांची | 122 | 109 | 89 | 78 | सं. ना. | सं. ना. |
| 3 एकूण सभासदांशी कर्जे घेणाऱ्या सभासदांची | सं. ना. | सं. ना. | सं. ना. | 41 | 13 | सं. ना. |
| 4 अदत्त कर्जांशी थकबाकीची | 5 | 26 | 19 | 12 | 36 | 12 |

टीप : सं. ना. = संबंधित नाही.

## कृषी पतसंस्थांची बिगर-पतपुरवठा कामे

(कोटी रुपये)

| कामे | कामांचे मूल्य | | वाढीची टक्केवारी |
|---|---|---|---|
| | 1991–92 | 1992–93 | |
| 1 कृषी वस्तूंचा (farm requisites) पुरवठा | 1,608·3 | 1,758·4 | 9·3 |
| 2 ग्राहक वस्तूंचे वितरण | 1,104·3 | 1,380·0 | 25·0 |
| 3 कृषी मालाची विक्री | 115·7 | 95·1 | — |

## पंचवार्षिक योजनानिहाय सहकारी पतपुरवठा संस्थांची प्रगती

| योजनेचे अखेरचे वर्ष | राज्य संस्था | मध्यवर्ती संस्था | प्राथमिक कृषी पतसंस्था × | प्राथमिक कृषीतर पतसंस्था | प्राथमिक सहकारी बँका ×× |
|---|---|---|---|---|---|
| **(1) पतसंस्थांची संख्या** | | | | | |
| 1950–51+ | 20 | 505 | 1,15,748 | 7,810 | – |
| पहिली (1955–56) | 33 | 478 | 1,68,410 | 10,003 | – |
| दुसरी (1960–61) | 39 | 390 | 2,22,004 | 11,995 | – |
| तिसरी (1965–66) | 44 | 371 | 2,00,148 | 13,449 | – |
| चौथी (1973–74) | 47 | 349 | 1,60,138 | 17,536 | – |
| पाचवी (1977–78) | 47 | 345 | 1,22,064 | 21,168 | – |
| वार्षिक (1978–79) | 48 | 345 | 1,01,679 | 21,797 | – |
| वार्षिक (1979–80) | 48 | 344 | 1,00,486 | 20,357 | 1,189 |
| सहावी (1984–85) | 49 | 352 | 90,937 | 23,859 | 1,321 |
| सातवी (1989–90) | 49 | 351 | 72,379 | 21,573 | 1,487 |
| वार्षिक (1992–93) | 52 | 352 | 66,778 | 29,752 | 1,302 |
| **(2) सभासदांची संख्या (हजारात)** | | | | | |
| 1950–51+ | 31 | 207 | 5,369 | 2,178 | – |
| पहिली (1955–56) | 127 | 300 | 8,835 | 3,073 | – |
| दुसरी (1960–61) | 216 | 388 | 18,959 | 4,573 | – |
| तिसरी (1965–66) | 426 | 381 | 28,314 | 6,484 | – |
| चौथी (1973–74) | 2,968 | 686 | 39,682 | 53,918 | – |
| पाचवी (1977–78) | 2,465 | 333 | 53,918 | 12,404 | – |
| वार्षिक (1978–79) | 2,582 | 333 | 58,671 | 13,183 | – |
| वार्षिक (1979–80) | 2,676 | 335 | 61,536 | 8,194 | 6,063 |
| सहावी (1984–85) | 3,346 | 302 | 73,485 | 10,110 | 9,705 |
| सातवी (1989–90) | 3,690 | 2,027 | 75,869 | 10,217 | 12,325 |
| वार्षिक (1992–93) | 4,471 | 930 | 98,233 | 15,087 | 14,661 |

टीप : + पंचवार्षिक योजना सुरू होण्यापूर्वीची स्थिती.

× धान्य बँका व प्राथमिक भूविकास बँकांसहित.

×× 1978–79 पर्यंत ही माहिती प्राथमिक कृषीतर पत संस्था यामध्ये समाविष्ट केली जात असे.

### (3) सर्व पतसंस्थांचे खेळते भांडवल

(लक्ष रुपये)

| योजनेचे अखेरचे वर्ष | भाग भांडवल | राखीव व इतर निधी | ठेवी | घेतलेली कर्जे | इतर दायित्वे व शिल्लकी नफा | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| 1950–51+ | 2,697 | 2,177 | 9,938 | 5,476 | – | – |
| पहिली (1955–56) | 5,114 | 3,353 | 15,218 | 11,529 | – | – |
| दुसरी (1960–61) | 15,561 | 5,203 | 29,585 | 52,617 | 6,694 | 1,09,660 |
| तिसरी (1965–66) | 30,905 | 10,444 | 60,520 | 1,13,530 | 18,285 | 2,33,684 |
| चौथी (1973–74) | 79,773 | 32,971 | 1,81,018 | 3,40,800 | 51,947 | 6,86,509 |
| पाचवी (1977–78) | 1,20,048 | 67,136 | 3,42,211 | 5,59,818 | 99,083 | 11,88,296 |
| वार्षिक (1978–79) | 1,30,642 | 79,624 | 4,24,107 | 5,96,144 | 1,13,707 | 13,44,224 |
| वार्षिक (1979–80) | 1,42,029 | 95,680 | 5,00,075 | 6,55,748 | 1,44,737 | 15,38,269 |
| सहावी (1984–85) | 2,29,315 | 1,94,538 | 11,60,506 | 11,43,729 | 3,15,322 | 30,43,410 |
| सातवी (1 89–90) | 3,52,008 | 3,47,690 | 25,66,499 | 21,67,407 | 5,56.582 | 59,90,186 |
| वार्षिक (1992–93) | 4,75,780 | 5,25,054 | 38,17,976 | 27,29,063 | 8,96,908 | 84,44,781 |

### (4) प्राथमिक संस्थांचे कर्जव्यवहार

(लक्ष रुपये)

| योजनेचे अखेरचे वर्ष | या वर्षात दिलेली कर्जे | या वर्षात फेड केलेली कर्जे | अदत्त कर्जे (outstanding) | थकित कर्जे (overdues) |
|---|---|---|---|---|
| 1950–51+ | 7,148 | 5,885 | 7,590 | 973 |
| पहिली (1955–56) | 12,398 | 10,480 | 13,231 | 2,160 |
| दुसरी (1960–61) | 34,232 | 28,570 | 36,180 | 5,460 |
| तिसरी (1965–66) | 65,595 | 54,069 | 77,028 | 14,437 |
| चौथी (1973–74) | 1,63,349 | 1,57,516 | 2,04,553 | 49,525 |
| पाचवी (1977–78) | 2,44,597 | 2,17,255 | 3,37,198 | 94,492 |
| वार्षिक (1978–79) | 2,90,063 | 2,51,048 | 3,87,682 | 1,10,554 |
| वार्षिक (1979–80) | 3,40,574 | 2,89,096 | 4,51,409 | 1,32,118 |
| सहावी (1984–85) | 7,23,645 | 6,90,481 | 9,13,053 | 2,22,739 |
| सातवी (1989–90) | 13,19,544 | 10,14,823 | 16,31,049 | 4,17,608 |
| वार्षिक (1992–93) | 15,78,477 | 13,31,000 | 22,59,081 | 4,89,440 |

**टीप :** + पंचवार्षिक योजना आरंभ होण्यापूर्वीची स्थिती.

### (5) प्राथमिक कृषी पतसंस्था ; प्रतिसंस्था सरासरी

| योजनेचे अखेरचे वर्ष | सभासद संख्या | भाग भांडवल ('000 रुपये) | ठेवी ('000 रुपये) | अदत्त कर्जे ('000 रुपये) |
|---|---|---|---|---|
| 1950–51+ | 45 | 1 | – | 2 |
| पहिली (1955–56) | 49 | 1 | – | 3 |
| दुसरी (1960–61) | 80 | 3 | 1 | 10 |
| तिसरी (1965–66) | 136 | 6 | 2 | 18 |
| चौथी (1973–74) | 227 | 18 | 6 | 69 |
| पाचवी (1977–78) | 412 | 36 | 14 | 155 |
| वार्षिक (1978–79) | 549 | 49 | 23 | 214 |
| वार्षिक (1979–80) | 580 | 55 | 26 | 251 |
| सहावी (1984–85) | 730 | 81 | 61 | 451 |
| सातवी (1989–90) | 956 | 148 | 176 | 936 |
| वार्षिक (1992–93) | 1,380 | 195 | 348 | 1,287 |

टीप : + पंचवार्षिक योजना आरंभ होण्यापूर्वीची स्थिती.

## राज्य व मध्यवर्ती सहकारी बँकांचे खेळते भांडवल

(31 मार्च, 1993)

| तपशील | राज्य सहकारी बँका | | मध्यवर्ती सहकारी बँका | |
|---|---|---|---|---|
| | रक्कम (कोटी रुपये) | खेळत्या भांडवलाशी टक्केवारी | रक्कम (कोटी रुपये) | खेळत्या भांडवलाशी टक्केवारी |
| 1 स्वनिधी (owned funds) | 1,495 | 9·6 | 2,528 | 9·6 |
| 2 ठेवी | 8,485 | 54·2 | 14,667 | 56·2 |
| 3 घेतलेली कर्जे (borrowings) | 4,468 | 28·5 | 7,013 | 26·9 |
| 4 इतर दायित्वे | 1,207 | 7·7 | 1,902 | 7·3 |
| **एकूण खेळते भांडवल** | **15,655** | **100·0** | **26,110** | **100·00** |

# सर्व सहकारी पतसंस्थांची राज्यनिहाय संख्या ( 31 मार्च 1993 )

| राज्ये / केंद्रशशित प्रदेश | सर्व संस्थांची संख्या | राज्य बँका | मध्य-वर्ती बँका | औद्योगिक बँका | मध्य-वर्ती बँका | प्राथमिक कृषी संस्था | प्राथमिक सहकारी बँका | प्राथमिक कृषीतर बँका | धान्य बँका | प्राथमिक भूविकास बँका |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 अंदमान व निकोबार | 1 | 1 | – | – | – | – | – | – | – | – |
| 2 आंध्र प्रदेश | 7,482 | 1 | 22 | – | 1 | 4,638 | 61 | 2,959 | – | – |
| 3 अरुणाचल प्रदेश | 1 | 1 | – | – | – | – | – | – | – | – |
| 4 आसाम | 26 | 1 | 1 | – | 1 | – | – | – | – | 23 |
| 5 बिहार | 7,092 | 1 | 33 | – | 1 | 7,057 | – | – | – | – |
| 6 चंदीगढ | 1 | 1 | – | – | – | – | – | – | – | – |
| 7 दादरा व नगर हवेली | 23 | – | – | – | – | 8 | – | 15 | – | – |
| 8 दमण व दीव | 19 | – | – | – | – | 13 | – | 6 | – | – |
| 9 दिल्ली | 1 | 1 | – | – | – | – | – | – | – | – |
| 10 गोवा | 313 | 1 | – | – | – | 90 | 6 | 216 | – | – |
| 11 गुजराथ | 10,731 | 1 | 18 | 2 | 1 | 6,981 | 294 | 3,432 | – | 2 |
| 12 हरियाणा | 2,893 | 1 | 13 | – | 1 | 2,341 | 8 | 451 | – | 78 |
| 13 हिमाचल प्रदेश | 2,435 | 1 | 2 | – | 1 | 2,140 | 4 | 286 | – | 1 |
| 14 जम्मू व काश्मीर | 5 | 1 | 3 | – | 1 | – | – | – | – | – |
| 15 कर्नाटक | 6,623 | 1 | 19 | 1 | 1 | 4,374 | 213 | 1,698 | 139 | 177 |
| 16 केरळ | 2,627 | 1 | 14 | – | 1 | 1,580 | 56 | 932 | – | 43 |
| 17 लक्षद्वीप | – | – | – | – | – | – | – | – | – | – |
| 18 मध्य प्रदेश | 1,043 | 1 | 45 | – | 1 | – | 41 | 910 | – | 11 |
| 19 महाराष्ट्र | 33,474 | 1 | 30 | 1 | 1 | 19,723 | 379 | 13,275 | 64 | – |
| 20 मणिपूर | 176 | 1 | – | – | 1 | 173 | – | 1 | – | – |
| 21 मेघालय | 1 | 1 | – | – | – | – | – | – | – | – |
| 22 मिझोराम | 1 | 1 | – | – | – | – | – | – | – | – |
| 23 नागालँड | 1 | 1 | – | – | – | – | – | – | – | – |
| 24 ओरिसा | 3,724 | 1 | 17 | – | 1 | 2,820 | 10 | 806 | 13 | 56 |
| 25 पाँडिचेरी | 115 | 1 | – | – | 1 | 58 | 1 | 54 | – | – |
| 26 पंजाब | 4,477 | 1 | 15 | – | 1 | 3,544 | 4 | 848 | – | 61 |
| 27 राजस्थान | 6,138 | 1 | 26 | 1 | 1 | 5,306 | 69 | 699 | 2 | 33 |
| 28 सिक्किम | – | – | – | – | – | – | – | – | – | – |
| 29 तामिळ नाडू | 6,643 | 1 | 18 | 1 | 1 | 4,597 | 133 | 1,711 | – | 181 |
| 30 त्रिपुरा | 407 | 1 | – | – | 1 | 390 | – | 15 | – | – |
| 31 उत्तर प्रदेश | 1,720 | 1 | 57 | – | 1 | – | 23 | 16,38 | – | – |
| 32 पश्चिम बंगाल | 43 | 1 | 17 | – | 1 | – | – | – | – | 24 |
| **एकूण** | **98,236** | **28** | **350** | **6** | **20** | **65,833** | **1,302** | **29,752** | **218** | **727** |

## सर्व सहकारी पतसंस्था : राज्यनिहाय

| | राज्ये / केन्द्रशासित प्रदेश | राज्य बँका | मध्यवर्ती बँका | औद्योगिक बँका | मध्यवर्ती भूविकास बँका |
|---|---|---|---|---|---|
| 1 | अंदमान व निकोबार | 21,374 | – | – | – |
| 2 | आंध्र प्रदेश | 23 | 5,04,455 | – | 28 |
| 3 | अरुणाचल प्रदेश | 68 | – | – | – |
| 4 | आसाम | 15,921 | 10,142 | – | 23 |
| 5 | बिहार | – | 23,219 | – | 768 |
| 6 | चंदीगढ | 2,004 | – | – | – |
| 7 | दादरा व नगरहवेली | – | – | – | – |
| 8 | दमण व दीव | – | – | – | – |
| 9 | दिल्ली | 2,310 | – | – | – |
| 10 | गोवा | 2,428 | – | – | – |
| 11 | गुजराथ | 387 | 31,113 | 32,724 | 5,73,374 |
| 12 | हरियाणा | 39 | 7,170 | – | 81 |
| 13 | हिमाचल प्रदेश | 1,729 | 2,401 | – | 24,013 |
| 14 | जम्मू व काश्मीर | 988 | 5,645 | – | 68,552 |
| 15 | कर्नाटक | 78 | 23,660 | – | 188 |
| 16 | केरळ | 15 | 7,613 | – | 46 |
| 17 | लक्षद्वीप | – | – | – | – |
| 18 | मध्य प्रदेश | 2,987 | 11,174 | – | 48 |
| 19 | महाराष्ट्र | 5,919 | 87,625 | 19,47 | 10,78,547 |
| 20 | मणिपूर | 2,742 | – | – | – |
| 21 | मेघालय | 478 | – | – | – |
| 22 | मिझोराम | 510 | – | – | – |
| 23 | नागालँड | 775 | – | – | – |
| 24 | ओरिसा | 1,534 | 6,684 | – | 56 |
| 25 | पाँडिचेरी | 259 | – | – | 4,105 |
| 26 | पंजाब | 49 | 16,270 | – | 66 |
| 27 | राजस्थान | 75 | 10,471 | – | 57 |
| 28 | सिक्किम | – | – | – | – |
| 29 | तामिळ नाडू | 19 | 1,38,711 | 448 | 181 |
| 30 | त्रिपुरा | 748 | – | – | 10,027 |
| 31 | उत्तर प्रदेश | 68 | 21,429 | – | 26,23,921 |
| 32 | पश्चिम बंगाल | – | 10,912 | – | 24 |
| | **एकूण** | **63,527** | **9,18,684** | **35,119** | **43,84,135** |

## सभासद संख्या (1992–93)

| प्राथमिक कृषी पतसंस्था ('000) | प्राथमिक सहकारी बँका ('000) | प्राथमिक कृषीतर पतसंस्था ('000) | ग्रान्य बँका | प्राथमिक भूविकास बँक |
|---|---|---|---|---|
| – | – | – | – | – |
| 11,924 | 679 | 885 | – | – |
| – | – | – | – | – |
| – | – | – | – | – |
| 6,246 | – | – | – | – |
| – | – | – | – | – |
| 9 | – | 2 | – | – |
| 12 | – | 2 | – | – |
| – | – | – | – | – |
| 73 | 159 | 56 | – | – |
| 2,435 | 2,180 | 1,573 | – | 4,982 |
| 1,773 | 35 | 75 | – | 3,59,970 |
| 846 | 7 | 29 | – | 6,583 |
| – | – | – | – | – |
| 4,603 | 1,009 | 982 | 24,640 | 14,09,548 |
| 10,067 | 766 | 858 | – | 7,24,646 |
| – | – | – | – | – |
| – | 261 | 350 | – | 15,14,166 |
| 8,056 | 5,720 | 6,436 | 11 | – |
| 183 | – | 1 | – | – |
| – | – | – | – | – |
| – | – | – | – | – |
| – | – | – | – | – |
| 3,411 | 113 | 139 | 2,672 | 809 |
| 56 | 31 | 25 | – | – |
| 2,010 | 12 | 82 | – | 5,19,377 |
| 4,841 | 198 | 95 | 266 | 8,06,143 |
| – | – | – | – | – |
| 34,053 | 3,240 | 3,011 | – | 19,73,330 |
| 289 | – | 9 | – | – |
| – | 251 | 457 | – | – |
| – | – | – | – | – |
| **66,226** | **14,661** | **15,067** | **27,589** | **73,19,554** |

## मराठी अर्थशास्त्र परिषद

### स्थायी निधीसाठी देणगी

भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड, मुंबई यांनी मराठी अर्थशास्त्र परिषदेला 1996-97 या वर्षासाठी स्थायी निधीसाठी पंचवीस हजार रुपयांची भरीव देणगी देऊन परिषदेच्या उपक्रमांना चालना दिली आहे. या देणगीबद्दल परिषदेच्या वतीने या संस्थेला मनःपूर्वक धन्यवाद.

**आ. गो. पुजारी**
कार्यवाह – खजिनदार

## मराठी अर्थशास्त्र परिषद

### स्थायी निधीसाठी देणगी

इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि., नवी दिल्ली या संस्थेने मराठी अर्थशास्त्र परिषदेला 1996-97 या वर्षासाठी स्थायी निधीसाठी चाळीस हजार रुपयांची देणगी दिली आहे. या उदार देणगीमुळे परिषदेच्या उपक्रमांना मोलाचा आधार मिळाला आहे. त्याबद्दल या संस्थेचे आम्ही ऋणी आहोत.

**आ. गो. पुजारी**
कार्यवाह – खजिनदार

## मराठी अर्थशास्त्र परिषद

### विसावे वार्षिक अधिवेशन

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे विसावे वार्षिक अधिवेशन **दिनांक 17, 18 व 19 नोव्हेंबर, 1996** या दिवशी प्रताप कॉलेज, अमळनेर येथे आयोजित होणार आहे. पुणे येथील अर्थशास्त्राचे निवृत्त प्राध्यापक **स. ग. बापट** अध्यक्षस्थानी राहतील.

**आ. गो. पुजारी**
कार्यवाह–खजिनदार

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## (अ) परिषदेची प्रकाशने

(1) नी. वि. सोवनी — **अर्थसिद्धान्त : आणखी चिकित्सक निबंध,** 1977, पृष्ठे 226, किंमत रु 20.

(2) मो. वि. भाटवडेकर — **शिक्षणाचे अर्थशास्त्र,** 1978, पृष्ठे 157 (वितरण : व्हीनस प्रकाशन, अप्पा बळवंत चौक, पुणे.), किंमत रु. 20.

(3) भ. ग. बापट — **आंतरराष्ट्रीय व्यापार : सिद्धान्त आणि धोरण,** 1982, पृष्ठे 333 (वितरण : कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे) (आवृत्ती संपली), किंमत रु. 50.

(4) नी. वि. सोवनी — **अर्थमीमांसा,** 1995, पृष्ठे 345 (वितरण : डॉ. व्यं. सु. पाटणकर, फ्लॅट क्र. 1, कपिल अपार्टमेंटस, सर्व्हे क्र. 29, तेजस सोसायटीजवळ, कोथरूड, पुणे 411 029), किंमत रु. 250.

## (आ) परिषदेला देणगीरूपाने मिळालेली आणि परिषदेकडून विक्रीस उपलब्ध प्रकाशने

(1) नी. वि. सोवनी — **त्रोटक विचारसरणी : चार व्याख्याने,** पृष्ठे 64 (प्रकाशक : नी. वि. सोवनी), किंमत रु. 10.

(2) नी. वि. सोवनी — **अर्थसिद्धान्त : काही चिकित्सक निबंध,** 1972, (प्रकाशक : देशमुख आणि कंपनी, पुणे).


# मराठी अर्थशास्त्र परिषद

**विश्वस्त मंडळ** ( 1995 - 98 )

1 डॉ. प्रफुल्ल सुळे, मुंबई
2 डॉ. रवीन्द्र स. सबनीस, मुंबई
3 श्री. किरण बाबूराव ठाकूर, बेळगाव

# मराठी अर्थशास्त्र परिषद, प्रकाशन चौथे

## अर्थमीमांसा – वैज्ञानिक की कलात्मक ?

**लेखक : नी. वि. सोवनी**

किमत रु. 250 ( सूट 10 टक्के )

अर्थशास्त्राच्या पदवी आणि पदव्युत्तर वर्गाचे विद्यार्थी आणि प्राध्यापक याना उपयुक्त संग्राह्य ग्रंथ.

सूट वजा जाता निव्वळ किमत रु. 225 पुढील पत्त्यावर मनी ऑर्डर / डिमांड ड्राफ्टने पाठविल्यास ग्रंथ आमच्या खर्चाने रजिस्टर्ड बुक–पोस्टने पाठविला जाईल. डिमांड ड्राफ्ट पुणे येथील व्यापारी बँकेच्या शाखेवर देय असावा आणि तो '**मराठी अर्थशास्त्र परिषद**' या नावाने काढावा.

**पत्ता** : डॉ. व्यं. सु. पाटणकर, फ्लॅट क्र. 1, कपिल अपार्टमेंटस्, सर्व्हे क्र. 29,
तेजस सोसायटीजवळ, कोथरूड, पुणे 411 029.


# अर्थसंवाद

## पूर्वीच्या अंकांतील लेखांच्या झेरॉक्स प्रती

ज्या अभ्यासकांना 'अर्थसंवाद'च्या खंड 1, अंक 1 पासून तो आजपर्यंतच्या 'अर्थसंवाद' मधील कोणत्याही अंकातील एखाद्या लेखाची प्रत झेरॉक्स करून पाहिजे असेल तर ती करून पाठविण्याची सुविधा 'अर्थसंवाद'ने सुरू केली आहे. त्यासाठी केवळ झेरॉक्स करण्याचा खर्च संबंधितांकडून आकारला जाईल. अभ्यासकांना पूर्वीचे अंक पुरविता येत नसल्याने ही पर्यायी सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. त्याचा फायदा अभ्यासकांनी जरूर घ्यावा.

**प्रमुख संपादक**

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## आजीव सदस्यांची यादी

( एप्रिल–जून 1996 अंकावरून पुढे चालू )

727 प्रा. रमेश गणेशराव दांडगे, कोल्हापूर
728 प्रा. डॉ. एल. एम. तायडे, बार्शी
729 प्रा. प्रमोदकुमार कांतीलाल शहा, कुर्डुवाडी
730 प्रा. कमलाकर दे. हणवंत, दारव्हा (जिल्हा यवतमाळ)
731 श्री. वि. गो. पेंढरकर, पुणे
732 श्री. वि. श्री. दामले, पुणे
733 श्री. शेखर साठे, मुंबई
734 श्री. सदाशिव देशपांडे, पुणे
735 डॉ. पद्माकर दुभाषी, पुणे

## ‘अर्थसंवाद’ : पूर्वीच्या वर्षांचे अंक

‘अर्थसंवाद’चे 1992–93, 1993–94 आणि 1994–95 या वर्षांचे मर्यादित अंक उपलब्ध आहेत. ज्या व्यक्ती, संस्था आणि ग्रंथालयांना या वर्षांचे प्रत्येकी चार अंकांचे संच पाहिजे असतील त्यानी **कार्यवाहांकडे** प्रत्येक वर्षासाठी रु. 100/– पाठवून मागणी करावी. मर्यादित संच उपलब्ध असल्याने ‘प्रथम येणाऱ्यास प्रथम संधी’ यानुसार अंक पुरविले जातील.

कार्यवाह – खजिनदार

# महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने प्रकाशित केलेले कोश व भाषाप्रवेश

| अनु. | कोश | संपादक | किंमत (रु.) |
|---|---|---|---|
| (1) | इंग्रजी–मराठी स्थापत्य शिल्पकोश | श्री. रा. वि. मराठे | 15 |
| (2) | उर्दू–मराठी शब्दकोश | श्री श्रीपाद जोशी<br>श्री. एन. एस. गोरेकर | 50 |
| (3) | आयुर्वेदीय शब्दकोश भाग 1 व 2 (संस्कृत-संस्कृत) | पं. वेणी माधवशास्त्री जोशी व पं. ना. ह. जोशी | 50 |
| (4) | आयुर्वेदीय शब्दकोश भाग 1 व 2 (संस्कृत–संस्कृत–मराठी) | " " | 75 |
| (5) | वैज्ञानिक पारिभाषिक संज्ञा (वनस्पतीशास्त्र व्याख्यासंग्रह) | डॉ. गो. रा. परांजपे | 10 |
| (6) | मराठी वाङ्मयकोश खंड 1 | श्री. गं. दे. खानोलकर | 50 |
| (7) | तामिळ–मराठी शब्दकोश | सौ. रमाबाई जोशी<br>श्री. पु. दि. जोशी | 74 |
| (8) | मराठी–कन्नड शब्दकोश | श्री. गुरुनाथ दिवेकर | 74 |
| (9) | गुजराती–मराठी शब्दकोश | श्री. स. ज. धर्माधिकारी | 15 |
| (10) | कन्नड भाषा प्रवेश | श्री. गु. व्यं. दिवेकर | 13 |
| (11) | बंगाली भाषा प्रवेश खंड 1 | श्री. स. ग. सुखटणकर | 16 |
| (12) | बंगाली भाषा प्रवेश खंड 2 | " " | 16 |
| (13) | मल्याळम भाषा प्रवेश | श्री. रा. बं. जोशी | 28 |

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची प्रकाशने खालील केंद्रांवर मिळतील.

प्रकाशन व्यवस्थापक,
शासन मुद्रण व लेखनसामग्री विभाग,
चर्नी रोड, मुंबई 400 004.

व्यवस्थापक,
शासन लेखनसामग्री आणि ग्रंथागार,
शहागंज, गांधी चौक,
औरंगाबाद 431 001.

व्यवस्थापक,
शासकीय ग्रंथागार,
बडवे बिल्डिंग, पी. वाय. सी. जिमखाना,
पुणे 411 004.

व्यवस्थापक,
शासन मुद्रण व ग्रंथागार, सिव्हिल लाईन्स,
नागपूर 440 001.